एम. ए. भाग - १

इतिहास - अभ्यासपत्रिका क्र.४

चीनचा इतिहास

१

२० व्या शतकाच्या प्रारंभीचा चीन पारंपारिक समाज आणि विचारसरणी

घटक रचना :

१.० उद्दिष्टये
१.१ प्रस्तावना
१.२ ऐतिहासिक पार्श्वभूमी
१.३ विचारप्रणाली
१.४ पारंपारिक चीनीसमाज
१.५ समारोप
१.६ प्रश्न

१.० उद्दिष्टये

१. चीनचा ऐतिहास विकास थोडक्यात समजून घेणे.
२. चीनच्या समाज व राजकारणात प्रभावी ठरलेल्या विचारसरणींचा अभ्यास करणे.
३. पारंपारिक चीनी समाजामध्ये सामाजिक संरचना, कुटुंबाची भूमिका आणि स्त्रीयांची स्थिती यावर दृष्टीक्षेप टाकणे.

१.१ प्रस्तावना

चीन हा जगातील एक प्राचीन देश आहे. जगातील महत्वाच्या प्राचीन संस्कृतींमध्ये चीनची संस्कृती मोडते. चीनच्या समाजाचे राजकीय स्थित्यंतर होण्यासाठी हजारो वर्षे लागली. चीनची पारंपारिक समाजव्यवस्था ही इ. स. पू. ६ व्या शतकातील कन्फ्युशियस आणि तावो यांच्या विचारसरणीतून विकास पावलेली होती. त्यातही पारंपारिक चीनी समाजव्यवस्थेचा मुख्य आधार कन्फ्युशियसची विचारसरणी हाच होता.

१.२ ऐतिहासिक पार्श्वभूमी

जगातील महान देशांमध्ये चीन असा देश आहे की, त्याला जवळजवळ ४००० वर्षांपासूनची अखंडित परंपरा व संस्कृती लाभलेली आहे. ही संस्कृती चीनच्या उत्तरेकडील भागामध्ये पीत नदीच्या खोऱ्यात विकसित झालेली होती. पारंपारिक दस्तऐवजानुसार ह्युआंग टी (२७०० इ. स. पू.) हा चीनचा प्रथम ऐतिहासिक राजा होऊन गेला. तरीपण पुरातत्वीय पुराव्यांच्या आधारे आपणास असे दिसून येते की, इ. स. पू. १३०० आणि १२०० च्या दरम्यान चीनमध्ये राजेशाही अस्तित्त्वात होती. ते राजे शांग घराण्यातील असून उत्तर चीनवर त्यांचे राज्य होते.

शांग राजांची उत्तर चीनवरील सत्ता आणि पहिल्या लिखित पुराव्यांवरून चीनचे स्थित्यंतर नवाश्म संस्कृतीपासून ते आजच्या प्रगत संस्कृतीपर्यंत झालेले दिसते. शांग ही एक मूळची भटकी जमात असून आपल्या आक्रमक हल्ल्यांनी त्यांनी उत्तर चीनमधील इतर जमातींचा पराभव करून सत्ता स्थापन केली होती. शांग राजांची राजधानी, एक भिंतींचे कुंपण असलेले शहर होते आणि ते नेहमीच बदलत राहीले. त्यांची शेवटची ज्ञात राजधानी आजच्या अन्यांग येथे होती.

शांग लोकांनी कांस्य धातूकला विकसित केली आणि आजही जगामध्ये त्यांच्या तोडीचे धातूकाम, धातूकला नाही. कांस्य (ब्रॉन्झ) धातूचा उपयोग समारंभप्रसंगी उपयोगी आणि पिण्याची भांडी बनवण्यासाठी, त्याचबरोबर शस्त्रे बनवण्यासाठी केला जात होता. या भांड्यांवर सुंदर असे नक्षीकाम करून ती सजवली जात असत.

शांग लोकांनी ५००० अक्षर चिन्हांची वेगळी अशी लेखन कला विकसित केली की, जीचा आजही चीनमध्ये उपयोग केला जातो. या प्रत्येक अक्षरांचा स्वतंत्र शब्द असून ती चित्रमय असून ती चित्रे निरीक्षण करता येईल अशा वस्तूंची तसेच वेगवेगळ्या कल्पना व्यक्त करणारी आहेत.

इ. स. पू. ११२२ मध्ये झाऊ टोळीच्या प्रमुखाने शांग राजाला पदच्यूत केले. कारण तो निष्पक्ष व कल्याणकारी नव्हता. नवीन झाऊ राजाने घोषणा केली की, स्वर्गातूनच (तिएन) शांग राजाला दूर करण्याचा आदेश त्याला मिळाला आहे. त्यामुळे हे विज्ञानाच्या पलिकडचे कारण सत्ता हस्तगत करण्यासाठी महत्त्वाचे ठरले.

झाऊ राजाने उत्तर चीनसहीत एकिकृत चीनचा बराच भाग आपल्या ताब्यात घेऊन राज्य स्थापन केले. त्याच्या परिणामी झाऊ राजांनी सामंतशाहीची स्थापना केली आणि स्थानिक पातळीवर आपल्या मर्जीतील व नातेवाईक लोकांना तसेच सरदारांना सत्तापदे बहाल केली. मग या मांडलिक स्थानिक सरदार व नातेवाईक सामंतांनी झाऊ राजांचे वर्चस्व मान्य केले. अनुवंशिकतेने सामंतशाही चालू ठेवली, प्रसंगी झाऊ राजांना लष्करी मदतही केली.

झाऊ राजांच्या कारकीर्दीत सामंतशाहीमुळे वर्ग - विभाजन आणि वर्गजाणीवा मोठ्या प्रमाणात विकसित झाल्या. राजा आणि राजाचे निष्ठावान सरंजामदार सामान्य जनतेपासून पूर्णपणे स्वतंत्र झाले. त्यांच्याकडे मोठमोठ्या जमिनींचा ताबा होता आणि तो वंशपरंपरागत त्यांच्याकडे चालत आला होता.

राजेशाही समाजाचे मुख्य घटक – प्राथमिक कुंटुंब, विस्तारित कुटुंब आणि कूळ असून ते पितृसत्ताक अधिकार आणि पूर्वजांच्या पुण्याईने एकत्र राहत होते. त्यांच्यामध्ये – कुटुंब व कुटुंबामध्ये औपचारिकरित्या विवाह लावले जात असत.

नंतरच्या काळात सामंतशाही पद्धतीने झाऊ राजांच्या काळातील केंद्रीय प्रशासन खिळखिळे केले होते. प्रसिद्ध 'युद्धजन्य राज्यांच्या' (इ. स. पू. ४७५-२२१) काळात चीन अनेक छोट्या छोट्या राज्यांत विभागला गेला होता. शेवटी कीन राज्याचा उद्य झाला आणि त्याच्याच नावावरून 'चीन' हे नाव घेण्यात आले. त्याने अनेक छोटी छोटी राज्ये जिंकून घेतली,

सामंतशाही पद्धतीचा नायनाट केला आणि एकिकृत असे चीनचे साम्राज्य उभारले. त्याचा प्रथम राजा कीन घराण्याचा कीन शिह हुआंग टी हा होता. सुरूवातीच्या अनेक राज्यांच्या राजांनी चीनची उत्तर सीमा संरक्षण करण्यासाठी भिंती बांधलेल्या होत्या. त्यातूनच कीन शिह हुआंग टी याने त्या भिंती एकत्र जोडून चीनची जगप्रसिद्ध 'महाभिंत' बांधून पूर्ण केली. चीनी लोकांचे वैशिष्ट्य आणि चीनची केंद्रीय शासनप्रणाली जिचा उल्लेख पाश्चिमात्य साहित्यामध्ये 'चुंग कुओ' असा सापडतो हे चीनच्या महाभिंती द्वारे जगाच्या निदर्शनास आणून दिले. त्याचप्रमाणे शिह हुआंग टी हा चीनच्या इतिहासात ग्रंथ जाळणारा आणि कन्फ्युशियनवाद्यांचा कर्दनकाळ म्हणून सुद्धा कुप्रसिद्ध आहे. त्याने कन्फ्युशियची सर्व पुस्तके जाळून नष्ट केली आणि त्यातील तत्ववेत्यांची, विद्वानांची व विचारवंतांची कत्तल केली.

कीन घराणेशाही फक्त २० वर्षांपर्यत अस्तित्त्वात होती. त्याचे कारण म्हणजे शिह हुआंग टी यांच्या मृत्यूनंतर (इ. स. पू. २१०) उच्च अधिकाऱ्यांमध्ये सत्तासंघर्ष वाढला आणि सरकारी अधिकाऱ्यांच्या छळाला कंटाळून जनतेने बंड केले. चीनच्या कीन घराण्याचा अंत जरी लवकर झाला असला तरी 'एकीकृत चीनची कल्पना' आणि 'एक सम्राट कल्पना' रूढ झाली होती. चीनमध्ये अनेक घराण्यांचा उद्य व ऱ्हास झाला. अनेक वेळा विभाजन झाले असले तरीही जवळजवळ २००० वर्षे चीनने एकछत्री केंद्रीय प्रशासनाचा अनुभव घेतला होता.

कीन घराण्याच्या अस्तानंतर इ. स. पू. २०६ मध्ये हान घराणे उद्यास आले. चीनच्या दीर्घ इतिहासामध्ये हान घराण्याचा काळ हा वैभवशाली आणि एक स्फूर्तिदायक काळ होता. हान संस्कृतीने चीनी संस्कृतीला वैभव प्राप्त करून दिले. त्यांच्या कारकीर्दीमध्ये साहित्य आणि कला, विज्ञान, उद्योग आणि शासनामध्ये चांगली प्रगती झाली. त्यांच्या काळात चीनी लोकांनी चांद्रवर्ष आणि भूकंपमापन आलेख विकसित केले. अंतर्गत व परराष्ट्र व्यापाराच्यादृष्टीने चीनी लोकांनी खास नक्षीकाम केलेले तलम कापड तयार केले. साहित्य अभिव्यक्ती उन्नत झाली. हान काळामध्ये प्रथम प्रमाणित इतिहासाची कागदावर लिहिलेली पुस्तके प्रकाशित करण्यात आली. याच काळामध्ये चीन प्रथमच पश्चिम आशियाच्या आणि रोमन साम्राज्याच्या संपर्कात आला.

हान राजांच्यानंतर पुन्हा एकदा चीनची एकता भंग झाली. इ. स. चौथ्या शतकाच्या सुरूवातीला उत्तर चीनवर हान घराण्याचे वर्चस्व होते तर त्सीन घराण्याकडे फक्त दक्षिणेकडील भाग होता. चीनची विभागणी सोळा राज्यांमध्ये झाली. याच काळात चीनमध्ये धार्मिक क्षेत्रात प्रगती झालेली आढळते.

हान घराण्याच्या अस्तानंतर ४०० वर्षांनी चीन पुन्हा एकदा प्रगतीच्या शिखरावर तांग घराण्याच्या अंतर्गत (इ. स. ६१८ – ९०६) पोहोचलेला आपल्याला दिसतो. त्यांच्या काळामध्ये शिक्षणाला उत्तेजन मिळाले, नागरी सेवा परीक्षा, आणि पूर्वीच्या सुई घराण्याच्या योजनांवर भर दिला गेला. कायदेसंहिता बनवल्या गेल्या, व्यापारवाढीस उत्तेजन दिले गेले. तांग साम्राज्याने संपूर्ण चीन अधिपत्याखाली आणला आणि मांचुरिया व तुर्कस्तानपर्यंत साम्राज्याचा विस्तार केला.

तांग घ्ण्याच्या अस्तानंतर चीनमध्ये पुन्हा राजकीय गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. इ. स. ९०७ च्या दरम्यान तांग साम्राज्यावर जवळजवळ पाच घराण्यांनी नियंत्रण करण्याचा प्रयत्न केला. सर्व जगाला अंचंबित करील अशी महत्त्वपूर्ण घटना याच काळात चीनमध्ये घडली आणि ती म्हणजे मुद्रण कलेचा (छपाई) शोध होय. कन्फ्युशियन आणि बौद्ध वाङ.मय लवकरच लाकडी अक्षरी ठोकळ्यांच्या साहाय्याने छापून संपूर्ण चीनभर पसरले. हाच काळ म्हणजे चीनमधील प्रसिद्ध वाईट प्रथा चालू झाली, ज्यामध्ये मुलींचे पाय लहानपणीच मोठे

होऊ नयेत म्हणून बांधण्याची प्रथा चीनी समाजात रूढ झाली. या काळातच समाजाच्या राजकीय व आर्थिक संरचनेचा पाया उखडला गेला असे आढळते.

या गोंधळाच्या आणि बेबंदशाहीच्या काळात इ.स. ११२७-११३५ चा अपवाद वगळता इ.स. ९६०-१२७९ पर्यंत सुंग घराण्याने चीनवर राज्य केले. याच काळात चीनी नागरी संस्कृतीने प्रगतीचे शिखर गाठले होते. श्रीमंत व धाडसी चीनी व्यापारी वर्गाने चीनअंतर्गत आणि आग्नेय – आशियासोबत व्यापारी संबंध विकसित केले होते. लोकांचे राहणीमान उंचावले होते आणि कला व शिक्षणात प्रगती झालेली होती. अरबांशी व्यापारी संबंध आल्याने बीजगणितशास्त्र प्रगत झाले होते. पद्य लेखन, निसर्गदृश्य रंगकाम, छपाई कला, आणि नव – कन्फ्युशियन विचार सुंग काळामध्ये विकसित झाला.

सुंग घराण्याच्या उत्तरार्धात भटक्या टोळ्या उत्तरेकडून दक्षिण चीनकडे सरकू लागल्या. अंतिमतः इ. स. १२७९ मध्ये मंगोल सम्राट कुबलाई खान याने संपूर्ण चीन जिंकून घेतला. मंगोल घराण्याच्या (युआन) इ. स. १२७९ – १३६८ या काळात चीन मंगोल साम्राज्याचा भाग बनला. कारण काही काळ संपूर्ण आशियाच मंगोलांच्या अधिपत्याखाली होता. चीनवर परकीय अंमल ही चीनची पहिलीच वेळ होती. मंगोल साम्राज्याच्या काळात युरोपिय देशांना चीनचे आकर्षण वाटू लागले. कुबलाई खानच्या कारकीर्दीमध्ये व्हेनिसचा (इटली) व्यापारी मार्को पोलो याने चीनला भेट दिली होती. त्याने इ. स. १२७५-१२९२ असा मोठा काळ चीनमध्ये राहून प्रवास केला आणि चीनच्या उच्च प्रतिच्या विकसित संस्कृतीचा देश त्याचाच उल्लेख त्याने कॅथे म्हणून केला आहे. त्याचे संपूर्ण प्रवास वर्णन व्हेनिसमध्ये प्रसिद्ध केले गेले.

मंगोल राज्य एक शतकापेक्षाही कमी काळ टिकले. इ. स. १३६८ मध्ये चीनी लोकांनी मंगोलांविरूद्ध उठाव केला आणि त्यांच्याजागी चीनी रक्ताच्या मिंग घराण्याची (१३६८-१६४४) स्थापना केली. मिंग घराण्याने स्थिरता, वैभव आणि कला-साहित्य यांना उत्तेजन दिले. याच काळामध्ये कन्फ्युशियन विचारवंताचा चीनी समाजावर पगडा निर्माण झाला. मंगोल राजांच्यानंतर मिंग घराण्याने सर्व गोष्टींची परकीय म्हणून संभावना केली. जेव्हा इ. स. १४००-१६०० दरम्यान युरोपिय व्यापाऱ्यांनी चीनला भेटी दिल्या तेव्हा परकीय व्यापारी आणि त्यांचा व्यापार यांच्याबद्दल चीनी दृष्टीकोन अत्यंत नकारात्मक झाल्याचे आपणास आढळते.

मिंग घराण्याच्या अस्तानंतर, अर्धसंस्कृत आणि चीनबाहेरच्या, ईशान्य मांचुरियात राहणाऱ्या मांचु गटाने चीनवर आक्रमण केले आणि चीनवर कींग किंवा मांचू घराण्याची स्थापना केली. मंगोलांप्रमाणेच मांचूसुद्धा परकीय होते. तरीसुद्धा चीनवर संपूर्ण नियंत्रण करण्यापूर्वी त्यांनी चीनच्या संस्कृतीमधील बऱ्याच गोष्टींचा स्विकार केला होता. मांचू राजांनी नव - कन्फ्युशियन तत्वज्ञानाला संपूर्ण पाठींबा दिला आणि मिंग राजांप्रमाणे त्या आधारावर आपली राजकीय प्रशासन पद्धती निर्माण केली.

इ. स. १६६१- १७९९ दरम्यान मांचू साम्राज्याने राजकीय स्थैर्य आणि वैभव चीनला प्राप्त करून दिले. तसेच मंगोलिया, तिबेट आणि मध्य आशियामध्ये चीनी प्रदेशाचा विस्तार करण्यात आला. या काळात कृषीक्षेत्र, हस्तोद्योग आणि व्यापार यांचा उल्लेखनीय विकास झाला. परंतु इ. स. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात शेती उत्पादनापेक्षा लोकसंख्येची वाढ अधिक होऊ लागली आणि चीनी लोकांच्या राहाणीमानाचा दर्जा घसरत चालला. लोकांच्या या बिकट परिस्थितीचा एक दुष्परिणाम म्हणून मांचू-विरोधी गुप्त संघटनांनी इ. स. १७९६ मध्ये उठाव

केला. तो इ. स. १८०४ पर्यंत चालूच होता, त्यामुळे मांचू राजवट खिळखिळी होण्यामध्ये त्याची परिणती झाली.

१.३ विचारप्रणाली

इ. स. पू. व्या शतकामधील शांग आणि झाऊ घराण्यांनी चीनमध्ये निर्माण केलेले स्थैर्य व वैभव सरंजामदार आणि युद्धजन्य राष्ट्रे यांच्यातील वाढत्या, सततच्या युद्धांनी नष्ट केले. सुशिक्षित चीनी नागरिकांना त्यांच्या पूर्वजांनी निर्माण केलेली परिस्थिती आणि त्यांच्या काळातील सामाजिक परिस्थिती यांच्यातील मोठी तफावत जाणवत होती. त्याचा परिणाम असा झाला की, मानवतेचा अभ्यास व समाजाच्या विविधांगी समस्या यांची सोडवणूक करणाऱ्या विचारप्रणालीची अंमलबजावणी करण्याबाबत त्यांच्यामध्ये सामाजिक जाणीव निर्माण झाली. काही विद्वानांनी बौद्धिक वर्गाचा चीनमध्ये उदय व विकास आणि ग्रीक तत्त्वज्ञान, भारतीय धार्मिक विचार यांचा सहसंबंध जोडला आहे. तरीसुद्धा चीनमधील समाजिक जाणीव आणि विचार प्रणाली यांचा जन्म चीनच्या अंतर्गत तात्विक अभिसरणाशी संबंधित असून बाह्य प्रभावाचा परिणाम त्यावर झालेला नाही असे आपणास आढळते. २० व्या शतकाच्या प्रारंभी चीनच्या सामाजिक राजकीय पद्धतीला प्रभावीत करणारी प्रमुख विचारप्रणाली पुढील प्रमाणे सांगता येतील.

१.३.१ कन्फ्युशियन विचारधारा

चीनीसमाजाला सर्वात प्रथम प्रभावित करणारा सुप्रसिद्ध विचारवंत आणि महान शिक्षक म्हणजे के ऊंग – फ्यू – त्झू आणि लोकप्रिय म्हणून झालेला 'कन्फ्युशियस' (इ.स.पू. ५५१-४७९) हा होता. 'कन्फ्युशियनवाद' हा चीनी संस्कृतीचा एक मैलाचा दगड आहे. झिया, शांग आणि झाऊ घराण्याच्या शासनावर आधारित व पारंपारिक संस्कृतीवर आधारित संपूर्ण आर्दशवादी विचारधारा म्हणजे कन्फ्युशियन विचारधारा होय. कन्फ्युशियनवादाचा सरंजामशाहीवर कट्टर पगडा होता आणि ती जवळजवळ २००० वर्षे टिकून होती, त्यामुळेच चीनी इतिहास, सामाजिक संरचना आणि चीनी जनता यांच्यावरील कन्फ्युशियसचा प्रभाव अत्यंत महत्त्वाचा आहे. चीनच्या सामाजिक वैशिष्टयांवरसुद्धा कन्फ्युशियसचा फार मोठा पगडा आहे. कन्फ्युशियस हा महान शिक्षणतज्ज्ञ, विचारवंत परंतु अयशस्वी राजकारणी असून सर्वात महत्त्वाचे म्हणजे तो महान नीतिमान व बुद्धिवादी होता. त्याने संपूर्ण आयुष्यभर सत्य, दया आणि परिपूर्णता यांचा पाठपुरावा केला. त्याचे यशापयश हे त्याच्या चारित्र्यमुळे होते व त्याचा चीनी बुद्धिमंतावर कायमचा प्रभाव पडलेला होता.

कन्फ्युशियसने पाच कन्फ्युशियन ग्रंथांचे लेखन व संपादन केले आहे. त्यामध्ये दोन इतिहासाची पुस्तके आणि गद्य, ईश्वरसंबंधी, आणि समारंभ यांचे प्रत्येकी एक असे पाच ग्रंथ झाऊ राजांच्या काळात त्याने निर्माण केले. ते ग्रंथ त्यानेच लिहिले याबाबत एकमत नाही. परंतु त्यांमधील निवडक सुविचार म्हणजे कन्फ्युशियसने आपल्या शिष्यांच्या प्रश्नांना दिलेली उत्तरे याचे श्रेय पूर्णपणे (निश्चितपणे) कन्फ्युशियसलाच जाते.

कन्फ्युशियस हा निम्न राजघराण्यातील आणि भारतातील गौतम बुद्ध, पर्शियातील झोरोष्टर आणि ग्रीसमधील सुरूवातीच्या काळातील तत्त्ववेत्यांच्या समकालीन होता. गौतम बुद्ध आणि झोरोष्टर यांच्या प्रमाणेच चीनमध्ये सुद्धा सामाजिक अनागोंदी, राजकीय गोंधळाचा काळ हा कन्फ्युशियसच्या काळात होता आणि त्यांच्याप्रमाणेच कन्फ्युशियसलासुद्धा चीनी

समाजातील, राजकीय-प्रणालीतील गोंधळ दूर करून सुधारणा करावयाची होती. हे ध्येय साध्य करण्यासाठी कन्फ्युशियसने देव आणि अतिमानवीय गोष्टींचा अजिबात आधार घेतला नाही. त्याने जरी स्वर्गाची कल्पना आणि आत्म्याला मान्यता दिली असली तरी त्याने पुरूषसत्ताक समाजामध्ये माणसाची कर्तव्ये पालन करणे हे अधिक महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन केले. तो म्हणत असे, "आपल्याला मानवसेवा करणे माहित नाही आणि आपण ईश्वरसेवा कशी करू शकतो ?" त्याने राजकर्त्यांना उपदेश केला –

"भूताखेतांना माना परंतु त्यांना आपल्या जवळ येऊ देऊ नका.
जनतेच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी पुरेसा वेळ द्या."

कन्फ्युशियसची शिकवण सुप्रशासनाच्या समस्या सोडविण्यासाठी होती. समाजाची प्रगती करणे ही राजाची जबाबदारी असते आणि त्याची गुणवत्ता राजाच्या नैतिक चारित्र्यावर अवलंबून असते. तो म्हणतो, राजा स्वतः सद्गुणी, न्यायी, प्रामाणिक आणि कर्तव्य – दक्ष असला पाहिजे. त्याच्यामुळेच यथा राजा तथा प्रजा असते. कन्फ्युशियसने चारित्र्याची घडण, मनाची शुद्धता आणि वागणे यांवर अधिक भर दिल्याचे आपणास आढळते. त्यामुळेच चारित्र्य हाच खरा दागिना असून लोकांनी त्याच्या विकासावरच अधिक भर द्यावा.

कन्फ्युशियच्या मते मुळातच मानवी स्वभाव हा चांगलाच असतो. या चांगुलपणाची परिणती आपल्याला महान संत – महंत यांच्यामध्ये झालेली आढळते. त्यामुळेच प्रत्येक मनुष्याने चांगुलपणासाठी सतत प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्याने आपले कर्तव्य निःश्रेयस, तत्परतेने व सत्याचे अनुकरण करून करीत राहावे. ज्याच्याकडे चांगले चारित्र्य आणि दैवी सद्गुण आहेत ती व्यक्ती म्हणजे जणू राजकुमारच. ही व्यक्ती सद्गुणांना चिटकून बसते तर दूर्गुणी मनुष्य भौतीक सुखाच्या मागे धावतो. सद्गुणी मनुष्य न्यायी असतो तर दुर्गुणी मनुष्य सतत पुरस्कार आणि फळाची अपेक्षा करतो. सद्गुणी मनुष्य प्रतिष्ठित, थोर, उदात्त, नम्र असतो तर दुर्गुणी मनुष्य नीच, गर्विष्ठ, दुष्ट आणि हट्टी असतो. मानवजातीच्या विकासाच्या दृष्टीने तसेच राष्ट्रसेवेसाठी स्वयंविकास आणि त्याचे सामान्य जिवनामध्ये परिवर्तन करण्यासाठी मनुष्याच्या महान अध्ययनाची एक प्रक्रीया असते, त्याचे काही टप्पे असतात. कन्फ्युशियसने त्या महान विकासाचे पुढील टप्पे सांगितले आहेत. त्यामध्ये १ – इंद्रीयगोचर गोष्टींचे अन्वेषण, २ – अध्ययन ३ – प्रामाणिकपणा ४ – उद्देशाप्रती सचोटी ५ – स्वयं-विकास ६ – कौटुंबिक शिस्त ७ – स्थानिय स्वशासन आणि ८ – सार्वत्रिक स्व-शासन

कन्फ्युशियन समाज हा पाच प्रकाराच्या संबंधानी तयार झालेला आहे असे म्हटले आहे. त्यामध्ये १) पती-पत्नी २) पालक व मूल ३) मोठा व लहान भाऊ किंवा लहान-मोठा ४) राजा व मंत्रिमंडळ किंवा प्रजा आणि ५) मित्र-मित्र. त्याच्या मते, सर्व नातेसंबंध जेव्हा चांगल्या प्रकारे आपले कार्य करतील, योगदान देतील तेव्हाच देशाचे प्रशासन चांगले चालेल. तो म्हणतो, देशामध्ये सचोटी व इमानदारी किंवा प्रामाणिकपणा तेव्हाच दिसेल जेव्हा पिता-पिता म्हणून, मुलगा-मुलगा म्हणून राजा-राजा म्हणून आणि मंत्री-मंत्री म्हणून आपले योगदान देतील व तसेच वागणे ठेवतील.

१.३.२ मेन्सियस

कन्फ्युशियनवादला अधिक लोकप्रिय करण्याचे काम मेन्सियसने (इ.स.पू. ३७२ – २८९) केले. मेन्सियसचा जन्म कन्फ्युशियसनंतर शंभर वर्षांनी झाला आणि त्याने कन्फ्युशियसच्या तत्त्वज्ञानामध्ये प्रामुख्याने मानवी संस्कृती आणि शासन या दोन गोष्टींवर भर दिलेला आहे. कन्फ्युशियसच्या मते, मानवी स्वभाव हा चांगलाच असतो तर मेन्सियसच्या मते, सर्व लोकच मूलतः स्वभावाने चांगलेच असतात. ज्याप्रमाणे एखाद्या टेकडीवर पडलेले पाणी भर्रकन सखल भागाकडे वाहून जाते त्याप्रमाणे चांगल्या स्वभावाचे असते. जोपर्यंत लोक आपल्यातील नैसर्गिक चांगुलपणाचे संवर्धन आणि विकास करीत नाहीत तोपर्यंत त्या प्रचलित वातावरणामध्ये भ्रष्टाचारास बळी पडण्याची शक्यता असते. त्याच्या मते, प्रामाणिकपणाच्या विरोधातील स्वभाव म्हणजे स्वार्थीपणा होय. त्याचप्रमाणे त्याने ताओवादाच्या अनुयायांच्या स्वार्थीपणावर कडाडून टीका केलेली आहे.

दुसऱ्या बाजूने मेन्सियसने कन्फ्युशियसच्या राजकीय सिद्धांतावर विश्लेषण केले आहे. त्यासाठी त्याने समकालीन प्रजाहीतदक्ष, कल्याणकारी राजे आणि हिंसा आणि अराजक माजवणारे राजे यांच्यामध्ये फरक आहे असे सांगितले. त्यांच्या मते, कल्याणकारी राजांना नैतिक मूल्यांची चाड असते आणि म्हणूनच ते प्रजाहिताचा नेहमीच विचार करतात. या उलट ज्या कन्फ्युशियसने वंशपरंपरागत राजेशाहीला प्रश्न केलेला नसताना मेन्सियस म्हणतो की, अराजक माजवणाऱ्या दुर्गुणी राजांविरूद्ध त्याच्या प्रजेला बंड करण्याचा अधिकार आहे. किंबहुना त्यांना ठार करण्यासही हरकत नाही. कारण त्यांची निवड ज्या हेतूने झालेली असते त्याविषयी ते कर्तव्यपराड.मुख झालेले असतात. मेन्सियसची ही कल्पना झाऊ याने उचलून धरली आणि त्याचा सहसंबंध शांग घराणेशाही विरूद्धच्या बंडाशी जोडला. जेव्हा राजाच्या निवडचा संबंध धर्माशी आणि स्वर्गीय निवडीशी जोडलेला असताना मेन्सियसने मात्र त्याचा संबंध प्रत्यक्ष जनतेशी जोडलेला आपल्याला आढळतो. त्याने शासनाचा अंतिम मसुदा 'जनकल्याण' असावा असे प्रतिपादन केले आहे. एवढेच नाही तर त्याने असेही म्हटले आहे की, राजापेक्षा त्याची प्रजाच अधिक महत्त्वाची असते.

आधुनिक राजकीय भाष्यकारांनी मेन्सियसच्या तत्त्वज्ञानास 'आधुनिक लोकशाहीची प्रथम सुरूवात' असे संबोधले आहे. मेन्सियसच्या मते, सर्व लोक समान आहेत आणि राजाला लोकांची संमती घेणे अनिवार्य आहे. असे असले तरी मेन्सियस हा 'प्रजा लोकशाही' ऐवजी 'कल्याणकारी राजेशाहीचा' समर्थक होता.

१.३.३ ताओवादी तत्त्वज्ञान :-

कन्फ्युशियसचा समकालीन मानला गेलेला अजून एक विचारवंत म्हणजे लाओत्सु ज्याने झाऊ काळामध्ये आपल्या विचार सरणीचा एक नवा ठसा उमटवला होता. लाओत्सुच्या शिकवणीची मुख्य संकल्पना म्हणजे ताओ किंवा रस्ता / मार्ग होय. ताओवाद म्हणजे वागणुकीची वैशिष्ट्ये कि, ज्यावर हे विश्व चालते त्याविषयीचे तत्त्वज्ञान होय. ही संज्ञा संपूर्ण वास्तव मार्गाचे निदर्शन करते. कन्फ्युशियसने 'ताओ' म्हणजे मानवी व्यवहाराचे एक मूल्याधिष्ठीत वैज्ञानिक प्रमाण असे म्हटलेले असताना लाओत्सुने त्यास एक नवा अर्थ जसा 'नैसर्गिक प्रवास आणि नैसर्गिक अनिवार्य सार्वत्रिक क्रम' प्राप्त करून दिला. ताओवाद आपल्याला 'लाओत्सु' (नंतरचे नाव ताओ ते चिंग – गुण व मार्ग यांचा सुंदर वर्णन) आणि 'चुआंग त्सु' या दोन पुस्तकांत

सापडतो. लाओत्सु हे अनेक साधनांनी तयार केलेले असून त्याचे लेखक आणि संपादक यांची नावे माहित नाहित.

कन्फ्युशियसच्या मते, "अर्थव्यवस्था, कर्तव्य, तत्परता, नैतिकता आणि सार्वजनिक सेवा यांच्यावर भर देणाऱ्या कडक शिस्तीच्या समाजामध्ये मनुष्य चांगले सहजीवन जगू शकतो." परंतु ताओवादी तत्तवज्ञान पारंपारिक सामाजिक बंधने झुगारून साधे, स्वयंस्फूर्त, चिंतनीय आणि निसर्गाच्या सान्निध्यात जीवन जगणेच खरे जीवन आहे असे सांगते. म्हणूनच ताओवादी तत्तवज्ञानाचा गाभा हा स्वयंस्फूर्त किंवा नैसर्गिक जीवन आहे. त्याच्या मते, निसर्गामधील सर्व गोष्टींचे चलन शांतपणे होत असते. त्यांची कार्यपूर्ती झाल्यावर ते पुन्हा आपल्या पूर्वपदास पोहोचतात, समाजाची घडी बसविण्यासाठी सतत कार्यरत असलेला सभ्य गृहस्थ, लाओत्सुच्या मते, अहंभावी, व्यक्तिगत मनुष्य असतो.

चीनच्या सामाजिक सांस्कृतिक व वैचारिक जडणघडणी मध्ये कन्फ्युशियन व ताओवादी तत्त्वज्ञानांनी अत्यंत महत्वाची भर घातलेली आहे. त्यांच्यामध्ये वैचारिक फरक असला तरी जीवनाच्या पलीकडचे तत्त्वज्ञान त्यांनी शिकवले नाही तर त्यांच्या तत्त्वज्ञानाचा क्रेंद्रबिंदू हा मानव त्याचा समाज त्याचे वागणे व त्याचे प्रशासन हाच राहिलेला आहे. त्यामुळेच शेकडो वर्षे चीनी समाज हा सामाजिक संबंधानी कन्फ्युशियन तर व्यक्तिगत जीवनामध्ये ताओवादी विचार सरणी बाळगणारा दिसून येतो.

१.३.४ विधीवाद :-

चीनमध्ये अजून एक आढळून येणारी विचारसरणी म्हणजे विधीवाद किंवा कायदेवाद होय. ही विचार सरणी इ. स. पूर्व ४थ्या – तिसऱ्या शतकामध्ये होती व त्यास 'कायदा तत्त्वज्ञान' किंवा 'विधीवाद' म्हटले जाते. त्यामध्ये कन्फ्युशियन आणि ताओवाद यासारखे व्यक्तिगत विचारवंत नव्हते किंवा विशिष्ट व्यक्तिस अनुसरणारे अनुयायीसुद्धा नव्हते. त्या विचार सरणीचा उद्देश एवढाच होता की, अराजकाच्या, अंनागोंदीच्या स्थितीमध्ये चीनमध्ये एक स्थैर्य निर्माण करणे होय. विधीवाद्यांनी प्रामुख्याने कायद्याचे कठोर पालन केल्याने समाजामध्ये शीस्त आणि विकासास चालना मिळते यावर भर दिला. त्यांच्यामध्ये मानवी स्वभाव हा मूलतः वाईट असतो आणि कायदा हे असे शस्त्र आहे की, त्याचे शीस्तीमध्ये परिवर्तन करू शकते. म्हणून कोणत्याही विशिष्ट वर्ग, स्तर किंवा परिस्थितीला अपवाद न करता सरसकट सर्वांना वेगवेगळ्या गुन्ह्यांसाठी कडक शिक्षेची तरतूद कायद्याने करण्यायात यावी असे त्यांचे मत होते. न्यायाधिशास आपली मर्जी किंवा सदसद-विवेकबुद्धी निर्णय देताना वापरता येऊ नये व त्यामुळे जो गुन्हा तशीच शिक्षा व्हावी असे विधीवीद्यांचे मत होते. त्यामुळे कायद्याच्या आचारसंहितेनुसारच शिक्षा व्हावी आणि हीच पद्धती बऱ्याच प्रमाणात आजही चीनमध्ये वापरली जात आहे.

सदर विचारप्रणालीनुसार बलाढ्य राष्ट्र व त्याचा बलाढ्य राजा अशी संकल्पना निर्माण करण्याचा उद्देश होता. त्यामुळे कायद्यापुढे सर्व समान गणले जात. त्यामुळे युद्धजन्य छोट्या राष्ट्रांची कल्पना अडगळीत जाऊन क्रेंद्रीय बलाढ्य शासन व देशाची एकता यासाठी ही विचारसरणी उपयुक्त ठरते. याचाच परिणाम म्हणजे इ. स. पू. २२१ मध्ये संपूर्ण चीनचे एकीकरण झालेले होते असे आपल्याला समजते.

१.३.५ आपली प्रगती तपासा :–

१) कन्फ्युशियसच्या विचारसरणीची प्रमुख तत्वे कोणती होती ?

२) कन्फ्युशियच्या विचारसरणीच्या विकासामध्ये मेन्सियसचे योगदान थोडक्यात सांगा.

३) ताओवादाचा मुख्य गाभा थोडक्यात स्पष्ट करा.

४) विधीवादावर थोडक्यात टीप लिहा.

_____

_____

_____

_____

_____

१.४ पारंपारिक चीनी समाज

इतर प्राचीन समाजव्यवस्थेप्रमाणेच पारंपारिक चीनी समाज हा पुराणमतवादी होता. कट्टर कन्फ्युशियनवादावर आधारितच चीनची समाज मूल्ये आधारित होती. त्या मूल्यांचा मुख्य भर चीनी समाज आणि सार्वजनिक प्रशासन यावरच होता. कन्फ्युशियन विचारसरणी ही धर्माधार न ठरता एक समाजव्यवस्था म्हणून तिचा स्विकार केला गेला होता. प्रशासकांनी आपल्या धोरणाद्वारे जनतेचे आणि राजाचेसुद्धा शिक्षण होईल अशी नीती अवलंबून समाजात सौहार्द राहिल याची काळजी घेणे अवश्यक होते. त्यामुळेच कन्फ्युशियन विचारसरणीने प्रशिक्षित प्रशासक निर्माण करण्याचे महत्त्वाचे काम केलेले आढळते.

१.४.१ पारंपारिक चिनी समाज रचना :-

पारंपारिक चीनी समाज हा गुंतागुंत असलेला कृषिप्रधान समाज होता. चीनी समाजाची प्रमुख वैशिष्टे म्हणजे स्थिरता, पुरोहित वर्गाचा अभाव, विद्वान वर्गाचे वर्चस्व, धार्मिक परंपरांचा अभाव, समाजाचे चार घटकांत विभाजन. त्याचबरोबर उर्ध्वगामी व अधोगामी समाजिक शिथिलता, पितृप्रधान कुटुंबसंस्था आणि स्त्रियांना समाजातील हीन दर्जा इ. होता. पारंपारिक चीनी समाज चार घटकांत विभागला गेला होता. त्यामध्ये -

१) सभ्य विद्वान वर्ग किंवा मांदारीन २) शेतकरी वर्ग ३) कारगीर वर्ग ४) व्यापारी वर्ग आणि ५) इतर

१) सभ्य – विद्वान वर्ग (मांदारीन) – (Scholar gentry / Mandarin)

इ. सनाच्या काहीच वर्षे अगोदर चीनमध्ये सरंजामशाही नष्ट झाली होती. सैन्यबळाच्या जोरावर उभ्या केलेल्या राज्यामध्ये शेवटी केंद्रीकृत शासनाची निर्मिती झाली होती. त्यानंतर चीनीसमाजाच्या जडणघडणीमध्ये सैन्याने कोणतीही भूमिका बजावली नव्हती. चीनी समाजामध्ये नेतृत्व देऊ शकेल अशा पुरोहीत वर्गाचा अभाव होता. कारण इतर समकालीन समाजामध्ये त्या वर्गाने नेहमीच आपली भूमिका वर्चस्ववादी ठेवली होती व सामाजिक स्तरांमध्ये कामगिरी बजावली होती. अशाप्रकारे चीनी समाजावर सरकारी अधिकारी आणि प्रशासन यांचाच दबदबा

होता. हा सभ्य – विद्वानवर्ग संख्येने लहान असला तरीही साम्राज्यवादी चीनच्या प्रशासनामध्ये त्याने नेहमीच मोलाचा सहभाग दिलेला होता. त्यांची गणना समाजाचे नेते आणि राज्याचे अधिकारी म्हणूनच केली जाई.

सभ्य – विद्वान वर्ग चीनी लोकसंख्येचा एक टक्के असूनही त्याची काही खास वैशिष्ट्ये होती. स्थानिक पातळीवर त्यांचे वर्चस्व होते आणि खेड्यापाड्यांत ते विखुरले होते. त्यांच्याकडील जमीन ते कुळांना कसण्यास देत असत. परंतु तत्कालीन युरोपियन सामंतां प्रमाणे त्यांच्याकडे वंशपरंपरागत अधिकार नव्हते. त्यांनी शासनाच्या त्रैवार्षिक नागरी सेवा परीक्षेमध्ये यश संपादन करून आपले स्थान उच्च व प्रतिष्ठीत बनविले होते. हे अधिकार ते कठीण अशा नागरी सेवा परीक्षेमार्फत पिढ्यानपिढ्या प्राप्त करीत होते. या परीक्षेद्वारेच शासनाचे अधिकार निवडले जात आणि कन्फ्युशियनवादाचा अभ्यास किती दांडगा आहे यावर त्यांची निवड केली जाई.

राज्याचा कारभार एका छोट्या नागरी नोकरशाहीद्वाराच चालविला जाई. हे अधिकारी बादशाहाद्वारे नियुक्त केले जात आणि त्यांचे वेतनही तोच देई. परंतु त्यांनी नागरी सेवा परिक्षा उत्तीर्ण होणे गरजेचे मानले जाई. अधिकाऱ्यांना बादशाहाप्रती आपली निष्ठा व्यक्त करावी लागे आणि आपल्या प्रदेशापेक्षा वेगळ्या प्रदेशात त्यांना काम करावे लागे. बादशाच्या केंद्रीय अधिकाऱ्यांना वेतनमान कमी असे परंतु व्यक्तिगत विकासाची नामी संधी असल्यामुळे हा वर्ग मोठ्या अटीतटीच्या स्पर्धेतून ही नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण होण्याची धडपड करीत असे आणि सेवेमध्ये नियुक्त होत असे. परंतु बऱ्याच वेळेस हे नागरी सेवा अधिकारी आजीवन सरकारी सेवेत राहत नसत. थोडीवर्षे शासकीय सेवा केल्यावर आणि आपल्या ओळखी निर्माण केल्यावर ते आपल्या प्रांतात आणि आपल्या ओळखीच्या जोरावर आपली खाजगी मालमत्ता, सत्ता, प्रतिष्ठा निर्माण करीत असत.

२) शेतकरी वर्ग - (Peasantry)

बहुसंख्य चीनी समाज हा खेड्यापाड्यांत राहात होता आणि शेती व्यवसायात गुंतलेला होता. शतकानुशतके ८० – ९० टक्के चीनी समाज हा शेतकरी वर्ग होता. या वर्गाने थोड्याफार प्रमाणात कुशल कारागीर वर्ग आणि थोड्याफार प्रमाणात भूधारक उच्च वर्गाला एक प्रकारचा आधार दिलेला होता. अन्नधान्य आणि कृषिप्रधान वस्तूंचे उत्पादक असल्यामुळे पारंपारिक चीनी समाजामध्ये त्यांना दोन नंबरचे मानाचे स्थान म्हणजे सभ्य – विद्वान वर्गानंतर असायचे. त्यांना आपली जमीन विकण्याची तसेच इतरांची जमीन विकत घेण्याची मुभा असे. जर त्यांच्यामध्ये बौद्धिक क्षमता असल्यास ते नागरी सेवा परिक्षा उत्तीर्ण होऊन प्रशासना मध्ये सभ्य – विद्वान वर्गापर्यंत पोहचू शकत असत. कुळांना जमिनदारांप्रमाणेच स्वातंत्र्य होते. त्यामुळे कुळांना मजूर म्हणून वागविले जात नव्हते आणि आपल्या जमीनदारास कोणतीही वैयक्तिक सेवा द्यावी लागत नसे.

३) कारागीर वर्ग - (Artisans)

हान राजांच्या काळात समाज इतर सर्व संस्कृतींच्या पेक्षा तत्वज्ञानाच्या बाबतीत सर्वात जास्त प्रगतीशील बनला होता. त्यामध्ये १) कागदाचा शोध – वापर २) पाणचक्की ३) पूड करण्याची चक्की ४) आणि होकायंत्र यांचा समावेश होता. नवनवीन कौशल्यांचा, तंत्रांचा वापर खाणकाम, तलम कापड, आणि मातीचे भांडीकाम यांमध्ये केला गेला. ह्या प्रगतीचा परिणाम असा झाला की, नागरी कारागीर आणि उत्पादक वर्गांचा त्यातून उद्य झाला. कारागीर आणि

हस्तकुशल कामगारांची गणना कामगार वर्गांत केली जाऊ लागली. त्यांनाही शेतकरी वर्गाप्रमाणेच समाजात आदर असे, कारण ते त्यांच्या व इतरांच्या गरजेच्या वस्तूंची सतत निर्मिती करीत असत. ते राज्याला आधिक महसूल देत नसले, जमीनीचे मालक नसले तरीही त्यांचा दर्जा हा व्यापारी वर्गा पेक्षाही वरचा होता. प्राचीन काळापासूनच कुशल कारागीर व हस्तकला कारागीर हे आपल्या कारागीरीचा वारसा पिढ्यानपिढ्या वडिलांकडून मुलाकडे चालून येत असे.

कुशल कारागीर आणि हस्त कारागीर हे शक्यतो शासनाच्या सेवेत किंवा खाजगीमध्ये काम करीत असत. तसेच एखादा अकुशल कारागीर हा आपला स्वतःचा व्यवसाय करून इतर मजूरांना कामावर ठेवीत असे आणि स्वतः एक व्यवस्थापक म्हणून नावारुपाला येई. त्यामुळे कारागीर वर्गाने आपला स्वतंत्र उद्योग निर्माण केला होता आणि ते सुद्धा व्यापारी वर्गाप्रमाणेच होता. त्यांची स्वतंत्र व्यवसायीक संघटना असे. कारागीर वर्ग सभ्य – विद्वान वर्गाद्वारे शेतकरी वर्गाच्याही खाली सामाजिक रचनेद्वारा फेकला गेला असला तरी जीवनमानाच्या बाबतीत त्याने त्यांच्याही वरचे स्थान प्राप्त केले होते.

४) व्यापारी वर्ग - (Merchants)

घाऊक व्यापारी, छोटे व्यापारी आणि फेरीवाले यांना सभ्य – विद्वान वर्गाने अत्यंत आवश्यक मानले होते. तरीही सामाजिक रचनेमध्ये त्यांचे स्थान सर्वात खालचे ठेवण्यात आले होते. सभ्य – विद्वान वर्गाचा व्यापार धंद्याप्रती दृष्टीकोन हा चटकन उघडपणे दिसून येणारा होता. कारण त्यांच्या मते, हा वर्ग लोभी आणि स्वार्थी असून त्यांना नीतीमतेची चाड नसते. समाजाच्या गरजांबाबतीत व्यापारी वर्ग परावलंबी असलेला दिसून येतो. ते इतर कारागीर वर्गाने बनविलेले उत्पादन स्वतः विकतात आणि मोठा नफा कमावतात. त्यामुळेच चीनी सुसंस्कृत समाजाच्या दृष्टीने त्यांच्यामध्ये नैतिक मूल्ये नसून नफा कमावणे हीच त्यांची प्रवृती असलेली दिसून येते.

५) इतर सामाजिक घटक (गट) (Others)

वरील चार वर्गांव्यतिरिक्त पारंपारिक चीनी समाजामध्ये इतरही काही गट होते. त्यमध्ये सैनिक, सुरक्षा रक्षक, धार्मिक प्रमुख, ज्योतिषी, तृतीय पंथी (षंढ), रखेल्या, मनोरंजनकार, दरबारी कलाकार, घरगुती नोकर, गुलाम, बेश्या, हीन दर्जाची कामे करणारे कामगार इ. चा समावेश होतो. इतर चार वर्गापेक्षा इतरांना दूर ठेवण्यामध्ये राजकारणी आणि सभ्य – विद्वान वर्गाचा एक उद्देश होता. राज्यकर्ते आणि सभ्य – विद्वान वर्ग हे स्वतःच जमीनधारक असल्यामुळे त्यांनी शेतकरी वर्गाला आपल्या नंतरचे म्हणजे दुसरे स्थान दिले होते. त्यातच व्यापारी वर्गाला खाली ठेवण्यात आले होते कारण शेतकरी व कामगारी वर्ग नेहमीच समाजोपयोगी वस्तूंचे उत्पादन करत आला होता. परंतु व्यापारी वर्ग हा फक्त व्यापार – धंदा आणि त्यात नफा कमविणे एवढ्याच उद्देशाने समाजात राहत होता त्यामुळे तो वर्ग धनलोभी आणि परोपजीवी मानला जात होता.

सैनिकी वर्गास समाजचौकटीतून बाहेर ठेवण्या मागे असे कारण होते की, सभ्य – विद्वान वर्ग बुद्धिवादाचे परिपोषण करून हिंसेचा निषेध करत होते. त्यामुळेच जे जे वर्ग हिंसा व हीन कृत्यांशी संबंधीत होते त्या सर्वांना अमान्य व वेगळे असे समाजचौकटीबाहेर ठेवले गेले होते. मनोरंजनकारक किंवा दरबारी हे नेहमीच धनवान व्यक्तिकडे किंवा नीतभ्रष्ट व्यक्तिंकडे आश्रय मिळवित असत. म्हणूनच त्यांना अधिकृत मान्यता नसे. ज्योतिषी आणि धार्मिक ज्ञानी हे सभ्य

विद्वान वर्गावरही वर्चस्व स्थापन करतील या भीतीने त्यांनाही समाजाच्या स्तर रचनेबाहेर ठेवले गेले होते.

१.४.२ पारंपारिक चीनी समाजातील कुटुंबव्यवस्था : –

पारंपारिक चीनी समाजव्यवस्थेमध्ये कुटुंब हा प्रमुख घटक होता. बऱ्याच कुटुंबामध्ये तीन ते चार पिढ्या एकत्र नांदत असत. चीनी कुटुंबव्यवस्था ही पितृप्रधान असल्यामुळेच वडिलधाऱ्या पुरूषांचा कुटुंब प्रमुख म्हणून स्विकार करून त्याला कुटुंबात मानाचे स्थान दिले जाई. कुटुंबातील रचना आणि त्यांचे आपसातील नातेसंबंध हे कन्फ्युशियसच्या विचारसरणीवर आधारित असत. कन्फ्युशियसच्या मते, समाजाचा डोलारा हा मुलांनी पालकांचा आदर करणे, पत्नीने पतीची आज्ञा पाळणे आणि प्रजेने राजाज्ञेचे पालन करणे यांवर उभा असतो. चीनी समाजाच्या पारंपारिक वैशिष्ट्यांमध्ये कुटुंबातील कनिष्ठ सदस्य वरिष्ठ सदस्यांचा आदर करत असत आणि बऱ्याच मध्ययुगीन समाजामध्ये स्त्रियांना पुरूषांपेक्षा कमी लेखले जात असे. कुटुंबप्रमुखांना सर्व सदस्यांना जाब विचारण्याचा अधिकार होता आणि त्याचा शब्द हा सर्व सदस्यांना प्रमाण असे. कुटुंबाचे आणि सर्व सदस्यांचे कल्याण राखणे हा त्याचा उद्देश असून कुटुंबाची सर्व संपत्ती त्याच्याच मालकीची असे. त्याने घेतलेला प्रत्येक निर्णय हा सर्वांना बंधनकारक असे. कुटुंबातील धार्मिक कर्तव्यसुद्धा कुटुंबप्रमुखास पार पाडावी लागत. चीनमध्ये पूर्वजांची पूजा करणे ही प्राचीन काळापासूनची परंपरा अस्तित्वात होती.

१.४.३ पारंपारिक चीनी समाजातील स्त्रियांचे स्थान :-

पारंपारिक चीनी पितृसत्ताक समाजामध्ये स्त्रियांना कमी दर्जाची व पुरूषांपेक्षा हीन वागणूक दिली जाई. त्यांना पुरूषांपेक्षा नेहमीच कमी लेखले जाई आणि खालच्या दर्जाची कामे व कमी महत्त्वाची पदे बहाल केली जात असत. त्यानुसार घरामध्ये मुलांचा जन्म म्हणजे ईश्वराने दिलेली देणगी होय असे मानले जाई आणि त्याला वागणूकही तशीच दिली जाई. फक्त मुलालाच आपल्या पूर्वजांचे संस्कार करण्याचा अधिकार असे. मुलीचा जन्म म्हणजे कुटुंबावरील एक ओझे मानले जाई.

इसवी सनाच्या १० व्या शतकात तांग घराण्याच्या काळामध्ये उगम पावलेली 'पद – बंधन' किंवा 'मुलींचे पाय बांधून ठेवण्याची प्रथा' जवळपास १९ व्या शतकापर्यंत चालूच होती. बालपणापासूनच मुलींचे पाय एखाद्या वस्त्राने बांधून ठेवले जात किंवा लाकडाच्या पायाच्या साच्यामध्ये अडकवून ठेवले जात जेणेकरून त्यांची वाढ न होता ते आकाराने लहानच रहावेत. त्यमुळे चालताना स्त्रिला अतिशय वेदना होत असत आणि काळजीपूर्वक त्यांना चालावे लागे. यामगे अशी भावना होती की, छोटे पाय असलेली मुलगी सुंदर मानली जाई आणि लग्न करताना ती एक प्रमुख बाब मानली जात असे. त्यामुळे आईची मुलीचे पाय बांधून ठेवण्याची एक महत्वाची जबाबदारी असे. त्यातही ही 'पद – बंधन प्रथा' सभ्य – विद्वान वर्गामध्ये प्रमुख्याने जास्त प्रचलीत होती. शेतकऱ्यांच्या स्त्रियांना कितीही झाले तरी शेतीमध्ये काम करावे लागत असल्यामुळे त्यांना यां वेदनादायक प्रथेपासून सुटका मिळत असे.

पारंपारिक चीनी समाजातील स्त्रियांना आपल्या पतीच्या आज्ञांचे हर प्रकारे पालन करावे लागे आणि आपल्या सासूबाईंच्या अधिकाराखाली राहावे लागत असे. त्यांना संपत्तीचा वारसा

हक्क मिळत नव्हता. पुरूषांना दुसरा विवाह किंवा बहुपत्नीत्वाचा अधिकार होता परंतु स्त्रियांना आपल्या पतीच्या निधनानंतरसुद्धा विवाहाचा (विधवा विवाह) अधिकार नव्हता. एवढेच नव्हे तर पुरूषांना विवाहपूर्व आणि विवाहबाह्य संबंध ठेवण्याचा, तसेच रखेलसुद्धा .बाळगण्याचा पूर्ण अधिकार होता आणि तत्कालीन समाजाची मान्यतासुद्धा त्याला होती. चीनमध्ये वेश्या व्यवसायाला कायदेशीर मान्यता होती.

१.५ समारोप

अशाप्रकारे चीनीसमाजामध्ये कन्फ्युशियन, मेन्सियस, ताओवादी विचारसरणीचा पगडा अधिक असून कायदेवाद किंवा विधीवादावरसुद्धा तेवढाच भर होता. पारंपारिक चीनी समाज हा सभ्य – विद्वान, शेतकरी वर्ग, कारागीर वर्ग, आणि व्यापारी वर्ग यामध्ये विभागला गेला होता. परंतु त्यांच्यामध्ये समाजीक बंधने प्रबळ नव्हती तर समाजिक गतीशीलता होती. त्या चार वर्गांव्यातिरिक्त चीनी समाजात सैनिक, सुरक्षा रक्षक, धार्मिक प्रमुख, ज्योतिषी, तृतीयपंथी, रखेल, वेश्या, मनोरंजनकारक, घरगुती नोकर, गुलाम हे समाजा स्तराच्या चौकटीबाहेर होते. चीनी कुटुंबव्यवस्था पितृप्रधान असून स्त्रियांचे स्थान कमी दर्जाचे होते.

१.६ प्रश्न

१) चीनमधील वेगवेगळ्या विचारधारांचे स्पष्टीकरण करा.
२) पारंपारिक चीनी समाजाचा मागोवा घ्या.
३) पारंपारिक चीनी समाजावर वेगवेगळ्या विचारधारांचा कसा प्रभाव होता त्याचा आढावा घ्या.
४) टीपा लिहा.
   अ) कन्फ्युशियन विचारधारा
   ब) ताओवाद
   क) समाजरचना
   ड) स्त्रियांचे स्थान

❖❖❖

२

२० व्या शतकाच्या सुरूवातीचा चीन -२

अ. चीनमधील साम्राज्यवाद
ब. चीनवरील पाश्चिमात्यांचा प्रभाव
क. पाश्चिमात्यांना चीनचा प्रतिसाद

घटक रचना :-

२.० उद्दिष्ट्ये
२.१ प्रस्तावना
२.२ पश्चिमी देश व चीनमधील सुरूवातीचे संबंध
२.३ पाश्चिमात्यांना चीनचा सुरूवातीचा विरोध
२.४ शैक्षणिक प्रगती
२.५ चीनच्या लष्करी सुधारणा
२.६ चीनचा औद्योगिक विकास
२.७ शंभर दिवसांचा सुधारणा कार्यक्रम
२.८ मांचू सुधारणा कार्यक्रम (१९०१ -११)
२.९ समारोप
२.१० प्रश्न

२.० उद्दिष्ट्ये

१) चानवरील सम्राज्यवादाच्या परिणामांचा मागोवा घेणे.
२) चीनी समाजावरील पाश्चिमात्यांच्या प्रभावाचा अभ्यास करणे.
३) पश्चिमी देशांच्या प्रभावास चीनने दिलेल्या प्रतिसादाचे मूल्यमापन करणे.

२.१ प्रस्तावना

सामान्यपणे पाश्चिमात्यांचा अतिपूर्वेकडील देशांशी विशेषतः चीनशी आलेला संपर्क आणि त्याचे परिणाम यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. युरोपिय साम्राज्यावाद आणि त्याचा चीनच्या समाजावरील प्रभाव यांना चीनच्या शिक्षित, बुद्धिवादी, सनातनी समाजाने वेगवेगळ्या पद्धतींनी प्रतिसाद दिला. इंग्लंडने सर्वात प्रथम आपल्या युरोपिय व्यापार धंद्यासाठी चीनची द्वारे खुली केली. चीनने दोन दशकांच्या काळात दोन अफू युद्धे केली आणि त्यास दारूण पराभवास सामोरे जावे लागले. त्यमुळे चीनला युरोपिय देशांशी विषमतेचे तह व करार करावे लागले आणि परकीयांना स्वकीय कायद्याबाहेर राहण्याचे (Extra territorial) अधिकार बहाल करावे लागले. या परकीय सत्तांनी चीनला आपल्या सोयीनुसार तुकड्यांमध्ये वाटून घेतले व चीनचे

आर्थिक शोषण सुरू ठेवले. त्यातच अमेरिकेने चीनमध्ये मुक्तद्वार धोरण (Open Door Policy) सुरू केले तरीही परकीय सत्तंपासून चीनचे आर्थिक शोषण काही थांबले नाही. या परकीय सत्तांचे चीनच्या समाजावर दूरगामी परिणाम झाले आणि चीनी समाजाने त्याला वेगवेगळ्या पद्धतोंनी प्रतिसाद दिला. या परकीय शैक्षणिक प्रगती, लष्करी सुधारणा, उद्योग व व्यापारात नवीन बदल करण्याचे योजिले. कँग यु वाई यांच्या सारख्या विद्वतसमजसुधारकांनी मांचू राजांनी चीनी समाजातील सुरू केलेल्या सुधारणांना पूर्णपणे पाठिंबा दिला. मांचू राजांनी आपली सत्ता चिरकाल टिकवण्यासाठी शिक्षण, अर्थ, लष्करी आणि प्रशासन यांसारख्या क्षेत्रात विविध आधुनिक सुधारणांना सुरूवात केली. या सुधारणांमुळे चीनी समाजाची नवीन (आधुनिक) सुधारणा स्विकारण्यास मानसिक तयारी झाली. त्याबरोबरच कालबाह्य झालेली जुलमी मांचू राजवट नष्ट करून परकीयांना देशातून हाकलवून लावणे आवश्यक आहे म्हणून राष्ट्रवादाची पायाभरणी करण्यास त्यांनी सुरूवात केलेली आपणांस दिसून येते.

अ. चीनमधील साम्राज्यवाद

२.२ पश्चिमी देश आणि चीन यांमधील सुरूवातीचे संबंध

इसवी सनाच्या सुरूवातीच्या काळापासूनच चीनचा पाश्चिमात्य देशांशी संपर्क आला होता. त्यावेळी रोमन सम्राज्याशी चीनचा रेशमी कापडाचा व्यापार चालत असे. कारण चीनी रेशमास रोमन साम्राज्याकडून मोठी मागणी होती. परंतु चीन कोणत्याही पाश्चात्य देशावर अवलंबून नव्हता. इ. स. ७ व्या शतकात चीनमध्ये ख्रिचन धर्माचा परिचय झाला. तांग घराण्याच्या काळात पर्शियन चर्चचा प्रमुख नेस्थेरियन मिशनरी इ. स. ६३५ मध्ये चीनमध्ये गेला. मिशनऱ्यांनी चीनच्या अनेक शहरांमध्ये चर्च निर्माण केले. अधून – मधून नेस्थेरियन मिशनऱ्यांचा छळ होत होता. परंतु तरीही जवळजवळ २०० वर्षे ते चीनमध्ये आपले बस्तान ठेवून होते.

चीनमध्ये पाच घराण्यांच्या (इ.स. ९०७ - ९६०) आणि सुंग घराण्याच्या (इ.स. ९६० - १२७९) काळात पश्चिमी देशांशी सुरळीतपणे चीनचा व्यापार चालत असे. दोन्हीं देशांमधील मध्यस्थ म्हणून मुस्लिम अरब व्यापारी चीनला नियमित भेटी देत असत. एवढेच नव्हे तर ज्यू व्यापाऱ्यांच्यासुद्धा चीनमध्ये वसाहती होत्या. असा एक सार्वत्रिक समज आहे की, केवळ अरब मुस्लिम व्यापाऱ्यांमार्फत युरोपिय देशांना चीनच्या चहाचा परिचय झाला. इ .स. १३ व्या शतकात चंगीज खानाने मंगोल सम्राज्य स्थापन केले आणि आपल्या साम्राज्याचा विस्तार रशियाच्या पश्चिमी सीमेपासून पॅसिफिक महासागरा पर्यंत केला. त्यामुळे जवळजवळ ४०० वर्षे चीनचा पाश्चिमात्य संबंध जो बंद होता, त्यानंतर नवीन मार्गानी खुला करण्यात आला. चीनशी युरोपियन संपर्काची अनेक कारणे सांगता येतील. इस्लामचा वाऱ्याच्या वेगाने झालेला प्रसार यामुळे युरोपातील ख्रिचन धर्माला धोका निर्माण झाला होता. त्यामुळे इस्लामच्या विरोधात मंगोल आणि चीन यांच्याशी ख्रिचन युरोपची युती फायद्यात येईल अशी आशा निर्माण झाली. ख्रिचन धर्मयुद्धांमुळे (Crusades) युरोपियन देशांना पौर्वात्य देशांमधून येणाऱ्या वस्तूंची मागणी वाढली. शिवाय रोमन कॅथलिक चर्चने चीनमध्ये ख्रिश्चन धर्म नेण्याची इच्छा बाळगली. अशा प्रकारे भिती, भौतीक लाभ आणि धर्मप्रसार या गोष्टींमुळे चानमध्ये पाश्चात्य देशांना संबंध साधण्यात रस निर्माण झाला.

इ. स. च्या १३ व्या आणि १४ व्या शतकात (मंगोल कार्यकाल) युरोपातून चीनला नियमितपणे धार्मिक, व्यापारी आणि राजकीय शिष्टमंडळे व प्रतिनिधी पाठविले गेले होते. इ. स. १२४६ मध्ये फ्रान्स मिशनरी जान डी प्लानो कार्पिनी यांचे कुबलाई खानाने स्वागत केले. इ. स. १२४९ आणि १२५२ मध्ये फ्रान्स चा सम्राट १४ वा लुई याने चीनला दोन राजकीय प्रतिनिधीमंडळे पाठविली. इ. स. १२६४ मध्ये दोन व्हिनिशीयन व्यापारी निकोलो आणि माफीयो पोलो कुबलाई खानच्या दरबारात आले. त्यानंतर इ. स. १२७५ मध्ये निकोलो यांचा मुलगा मार्को पोलो आणि पोलो बंधूंनी चीनले भेट दिली. जेव्हा मार्को पोलो व्हेनिसला परतला तेव्हा त्याचे चीनमधील अनुभव 'The Book of Marco Poto' जे 'The Description of the World` या पुस्तकात जगप्रसिद्ध आहे. यामुळे चीनमध्ये व्यापारवाढीसाठी अत्यंत पोषक वातावरण आणि संधी असल्याचे युरोपियन देशांच्या लक्षात आले व त्यांचा चीनमध्ये शिरकाव झाला.

२.२.१ चीनकडील समुद्रमार्ग :-

अतिपूर्वेकडील देशांकडे जाण्यासाठी उपलब्ध असलेल्या (मध्य आशियाद्वारे) खुष्कीच्या मार्गावर व संबंधीत प्रदेशांवर तुर्क्री साम्राज्याचे वर्चस्व असल्यामुळे धोका निर्माण झाला होता. म्हणून युरोपिय देश समुद्रमार्गे नवीन मार्गांच्या शोधात होते. इ. स १४९८ मध्ये वास्को द गामा या पोर्तुगिज खलाशाने भारतीय किनाऱ्यावरील कालिकतला भेट दिली. इ. स १५११ मध्ये त्याचाच आदर्श घेऊन इतर पोर्तुगिज खलाशी मलाक्का येथे पोहोचले. इ. स. १५१६ मध्ये चीनला प्रथम भेट देणारा पोर्तुगिज म्हणजे राफेल पेरेस्टेरेला होता. पुढे इ. स. १५५७ मध्ये चीनच्या दक्षिण भागातील मकाऊ उपखंडामध्ये पोर्तुगिजांनी आपले बस्तान बसविले. इ. स. १५७५ मध्ये स्पेन व्यापारी चीनमध्ये आले आणि त्यांनी पोर्तुगिजांची चीनमधील मक्तेदारी मोडून काढली. पुढे मग इ. स. १६०४ मध्ये डच, इ. स. १६३७ मध्ये ब्रिटीश आणि इ. स. १७८४ मध्ये अमेरिकन यांनी क्रमाक्रमाने चीनच्या व्यापारावर आपला कब्जा मिळवला. तरीही इ. स. १६८९ मध्ये चीनशी अधिकृतपणे करार करणारा प्रथम देश रशिया होता. त्याद्वारे उभय देशांमध्ये नियमित व्यापार चालू झाला.

युरोपियन व्यापाऱ्यांमध्ये रोमन कॅथलिक मिशनरी सुद्धा मागे नव्हते. मिशनऱ्यांनी चीनी अधिकाऱ्यांची वैज्ञानिक व बौद्धिक इच्छा स्विकारल्यामुळे त्यांना काही मदत मिळाली. सतराव्या शतकामध्ये फ्रान्सिस्कन, डॉमिनिकन आणि ऑगस्टीनियन मिशनऱ्यांनी चीनमध्ये प्रवेश केला. इ. स १६९२ मध्ये चीनी साम्राट कँग सी याने रोमन कॅथलिकांना संपूर्ण चीनमध्ये श्रद्धा स्वातंत्र्य बहाल केले. तरीसुद्धा काही प्रसंगी सनातन्यांकडून सदर मिशनऱ्यांना कँटन किंवा मकाऊ येथे पळून जावे लागत असे.

२.२.२ युरोपियनांप्रती चीनची प्रतिक्रीया :-

चीनमधील युरोपियनांच्या उपस्थितीविषयी सामान्यपणे चीनी जनता आणि विशेष म्हणजे मांचू राजे यांच्या मनात संमिश्र प्रतिक्रीया होत्या. चीनी लोकांच्या मते, आपली संस्कृती ही जगातील सर्वांपेक्षा उच्च प्रतीची आहे. त्यांच्या मते, युरोपियन लोक असंस्कृत व रानटी आहेत. त्यामुळेच चीनचे सांस्कृतिक वर्चस्व आणि चीनच्या साम्राज्याचे अधिकार युरोपियांनी मान्य करावेत अशी चीनी जनतेची अपेक्षा होती. त्यांच्या बदल्यात या परकीयांना चीनला वार्षिक खंडणी सुद्धा द्यावी लागत असे. त्यामुळे परकीय देशांच्या राजदूतांना सर्वभौम राष्ट्रांचे प्रतिनिधी म्हणून समान वागणूक मिळत नव्हती. त्यांना चीनमध्ये चीनच्या सम्राटासमोर गुडघे

टेकून आपले शिर जमिनीला टेकवून आदर करण्याची प्रथा (Kowtow) पाळावी लागत असे. त्यातच चीनी प्रशासनाने या युरोपियांनवर अनेक बंधने लादली होती. त्याना चीनचाच कायदा पाळावा लागे आणि चीनमध्ये त्याकाळी सार्वत्रिक असा जकात कायदा नव्हता.

२.२.३ कँटन व्यापार पद्धती:-

मांचू राजे परकीय व्यापार नष्ट करण्यापेक्षा त्यावर अधिक मर्यादा आणि नियंत्रण घालण्याच्या बाजूने होते. त्यातूनच पुढे कँटन व्यापार पद्धतीचा विकास झाला. त्यानुसार इ. स. १७५७ मध्ये फक्त कँटन हे एकच व्यापारी बंदर म्हणून परकीयांना खुले केले. हा व्यापार संपूर्णपणे चीनी व्यापारी संघटना 'कोहोंग' द्वारे नियंत्रित केला जात होता आणि त्याबदल्यात चीनच्या सम्राटाला मक्तेदारी म्हणून काही रक्कम दिली जात होती. परकीय व्यापाऱ्यांना चीनी जनतेशी संपर्क साधण्यात आणि चीनी भाषा शिकण्यावर बंधने घालण्यात आली होती. 'कोहोंग' स्वतःच वस्तूंच्या किमती ठरवित असे, व्यापाऱ्यांकडून जकात कर वसूल करूत असे आणि व्यापाऱ्यांवर असंख्य करांचे ओझे लादत असे.

२.२.४ इस्टइंडिया कंपनीचा चीनमधील शिरकाव :-

१८ व्या शतकामध्ये पूर्वेकडील व्यापारावर ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीचीच मक्तेदारी होती. युरोपिय बाजारपेठांमध्ये चीनी रेशीम, सुती कापड आणि चहा यांस जोरदार मागणी होती. त्याबदल्यात चीनला मसाल्याचे पदार्थ आणि चांदी दिली जाई. त्यामुळे हा व्यापार चीनला अनुकूल होता. परंतु इंग्लंडला त्यामध्ये स्वारस्य वाटत नव्हते. परंतु १८ व्या शतकामध्ये चहा हे इंग्लंडचे राष्ट्रीय पेय बनले असल्यामुळे चीनमधून तोच एक महत्वाचा पदार्थ इंग्लंडला आयात करावा लागे. १९ व्या शतकाच्या सुरूवातीला इंग्लंडची जहाजे चीनमधून लाखो किलो ग्रॅम चहा इंग्लंडमध्ये आयात करीत असत. परंतु त्यांच्या तुलनेने चीनमध्ये ब्रिटीश व्यापाऱ्यांना आपल्या वस्तूंची विक्री करता येत नव्हती. त्याचा परिणाम असा झाला की, जवळजवळ ९० टक्के जहाजे चीनच्या बंदरामध्ये फक्त चांदीनेच भरलेली असत. त्यामुळे केवळ चहाच्या बदल्यात चीनला महाग अशी चांदी देणे हे ब्रिटीश व्यापाऱ्यांना असमतोल व्यापाराचे लक्षण वाटत होते. म्हणून इ. स. १७९३ मध्ये ब्रिटीश सरकारने संपूर्ण चीन ब्रिटीश व्यापाराला खुला करणे आणि कँटन व्यापार पद्धती बंद करणे या मांगण्यासाठी आपले राजकीय शिष्टमंडळ पाठविले. परंतु चीनी अधिकाऱ्यांनी ब्रिटीश शिष्टमंडळाची ही मागणी धुडकावली. इंग्लंडचा राजा जॉर्ज तृतीय ह्यास पाठविलेल्या उत्तरात चीनी साम्राटाने असे म्हटले की, आमच्याकडे सर्व काही आहे. मला असे वाटते की, तुमच्या वस्तू किंवा कुशल सेवा आणि तुमचा व्यापार याची आमच्याकडे काहीच किमंत नाही.

२.२.५ अफू युद्धे :-

अफूचा व्यापार आणि त्यानंतर झालेली अफू युद्धे ही इंग्लंडचे चीनवरील सम्राज्यवादाचे एक रूप होते. चीनच्या सार्वत्रिक व्यापारासाठी अफू हे इंग्लंडच्या व्यापाऱ्यांना एक साधन मिळाले. हे एक मादक द्रव्य चीनमध्ये बराच काळ चालू राहीले. इ. स. १७७३ मध्ये ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीने भारताच्या अफूच्या लागवडीवर मक्तेदारी स्थापन केली. अफूचा चीनी जनतेच्या आरोग्यावर झालेले दुष्परिणाम पाहून चीनी सरकारने चीनमधील अफूच्या लागवडीवर आणि आयातीवर बंदी घातली. परंतु चीनी भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या संगनमताने ब्रिटीश व्यापाऱ्यांनी अफूचा चोरटा व्यापार सुरू केल्यामुळे सदरची बंदी निष्प्रभ ठरली. ही अफू चीनच्या जनतेला नशेबाज

बनविण्याबरोबरच इंग्लंडला फार मोठ्या प्रमाणात चांदी मिळत होती. चीनमधील चांदी मोठ्या प्रमाणात इंग्लंडमध्ये जाऊ लागल्यामुळे चीनमध्ये आर्थिक टंचाई निर्माण झाली व चीनची अर्थव्यवस्थाच कोलमडून गेली. इ. स. १८३३ च्या चार्टर कायद्याने इंग्लंडची मक्तेदारी संपुष्टात आली. त्यामुळे चीनच्या बाजारपेठेत नवीन व्यापारीवर्गाचा प्रवेश झाला. अफूची मोठ्या प्रमाणात चीनमध्ये आवक वाढल्यामुळे चीनच्या लोकसंख्येचा फार मोठा वर्ग अफूच्या सेवनाच्या आहारी गेला.

२.२.६ पहिले अफू युद्ध (इ.स. १८३९ – ४२)

इ. स. १८३० च्या शेवटी चीनी सरकारने अफूचा काळाबाजार रोखण्यासाठी काही गंभीर पावले उचलली. अत्यंत सक्षम व कार्यतत्पर अधिकारी लीन त्से सु यास कँटन येथे पाठवले. त्याने जे परकीय व्यापारी चीनला चोरट्या मार्गाने अफू पाठवितात त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचे ठरविले. मार्च १८३९ मध्ये त्याने ब्रिटीश व्यापाऱ्यांना आपल्या कडील असलेल्या अफूचा साठा फक्त तीन दिवसांमध्ये जमा करण्याचे आदेश दिले. पुन्हा अफूच्या काळ्याबाजारात हात आढळल्यास मृत्यूदंडाची शिक्षा होईल असा करार सुद्धा करण्यास सांगितले. जेव्हा ब्रिटीश व्यापारी अधिक्षक चार्ल्स इलियट याने त्याच्याशी सामोपचाराची बोलणी करण्याचे ठरविले त्यावेळी ली ने सर्व परकीयांचा व्यापार बंद केला आणि त्या व्यापाऱ्यांना ओलीस ठेवण्यात आले. त्यानंतर ली नं सर्वांना अफूचा साठा त्याच्याकडे जमा करण्यास सांगितले. जेव्हा त्यांनी तो साठा जमा केला, त्यातील सर्व म्हणजे २०००० पेट्या ली ने समुद्रात बुडवल्या. परंतु ब्रिटीश व्यापाऱ्यांनी भविष्यात अफूचा व्यापार न करण्याचे लेखी आश्वासन देण्यास नकार दिला. त्यामुळे पुढे पहिले अफू युद्ध निर्माण झाले.

चीनी सरकारने कँटन येथील ब्रिटीशांशी युद्ध करण्याची पुरेशी तयारी केली होती. तरीसुद्धा ब्रिटीश सैन्याने कँटन बंदराचा मार्ग रोखून धरला. त्यामुळे चीनपुढे अडचण निर्माण झाली. ब्रिटीश नौदलाला कोणत्याही चीनी आव्हानांपेक्षा संपूर्ण किनाऱ्यावर मुभा होती. त्यातच जमिनीवरील युद्धातदेखील चीनी सैन्य काही ब्रिटशांविरोधात आपला प्रभाव पाडू शकत नव्हते. त्यांची शस्त्रे जुनी होती. त्यांच्यात शिस्तीचा अभाव होताच पण पुरेसे लष्करी प्रशिक्षण सुद्धा त्यांना मिळाले नव्हते. शेवटी हे युद्ध नानकींगचा तह (इ.स. १८४२) होईपर्यंत चालले आणि चीनचा पराभव झाला. नानकींग तहाच्या अटी पुढील प्रमाणे होत्या.

१) 'कोहोंग' (चीनी व्यापारी नियंत्रण संघटना) नष्ट करणे.
२) अमॉय, फूचौ, निंग्पो आणि शांघाय ही आणखी चार बंदरे खुली करण्यात येऊन ब्रिटीश व्यापाऱ्यांच्या निवासाची सोय करणे.
३) हाँगकाँग बेट ब्रिटीशांना बहाल करणे.
४) ब्रिटीशांना भला मोठा युद्धखर्च देणे आणि
५) 'पाच टक्के ॲडव्होलोरम' म्हणून प्रसिद्ध झालेली सार्वत्रिक व सौम्य अशी आयात निर्यात जकात लागू करणे.

एवढे करूनही नानकींग तहाने ब्रिटीश संतुष्ट नव्हते म्हणून त्यांनी चीनी सरकारवर 'बोग चा तह' लादला. या तहाने ब्रिटीशांनी फौजदारी गुन्ह्यांच्या बाबतीत चीनचा कायदा लागू न होण्याची सवलत मागून घेतली. त्यानुसार कोणत्याही ब्रिटीश व्यक्तीने चीनमध्ये एखादा

फौजदारी गुन्हा केला असेल तर त्याचा निवाडा चीनी कायद्याने न करता तो ब्रिटीश कायद्यानेच करावा असे ठरले. तसेच इंग्लंडने चीनकडून 'प्रथम प्राधान्य राष्ट्र' (Most Favoured Nations) हा दर्जा मिळविला. त्यानुसार चीनने इतर कोणत्याही देशास सवलत देण्याचे ठरवल्यास ती सवलत इंग्लंडला आपोआपच प्राप्त होईल.

२.२.७ द्वितीय अफू युद्ध (इ.स. १८५६ – ६०) :-

प्रथम अफू युद्धाच्या परिणामांमुळेच दुसऱ्या अफू युद्धाची पार्श्वभूमी तयार झाली. पहिल्या अफू युद्धाच्या अटींचे पालन करण्याची चीनी जनतेची अजिबात इच्छा नव्हती. तशातच ब्रिटीश व्यापाऱ्यांना चीनबरोबरील व्यापारातून नफा मिळत नसल्यामुळे ते काहीसे नाखूश होते. त्यामुळे चोरटा व्यापार चालूच राहीला आणि चीनी जनतेचा परकीयांप्रती वरील विरोध अधिकच वाढला.

त्यातच द्वितीय अफू युद्धाला एक तत्कालिक कारण घडले. इंग्लंडमध्ये नोंदणी झालेले 'ॲरो' नावाचे जहाज हे हाँगकाँग मधील अनिवासी चीनी व्यपाऱ्याचे होते. ऑक्टोबर १८५६ मध्ये ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय चीनी अधिकारी कुप्रसिद्ध समुद्री चाच्यांच्या शोधात कँटन बंदरातून सदर ॲरो जहाजात बसले. या मोहीमेदरम्यान जहाजावरील एका चीनी अधिकाऱ्याने ब्रिटीश ध्वज खाली खेचला. ब्रिटीशांच्यादृष्टीने हा त्यांच्या राष्ट्रध्वजाचा अपमान होता. या छोट्याशा गोष्टींचा ब्रिटीशांनी बाऊ केला आणि चीनविरूद्ध दुसऱ्या अफू युद्धाच्या कारणांना सुरूवात झाली. चीनच्या विरूद्ध फ्रान्सची फौज ब्रिटीश फौजेला मिळाली. कारण फ्रेंचांच्या एका मिशनरीचा फेब्रुवारी १८५६ मध्ये खून झाला होता. थोड्याच कालावधीनंतर ब्रिटीश – फ्रेंच संयुक्त सैन्याने डिसेंबर १८५७ मध्ये कँटनवर ताबा मिळवला आणि मग उत्तरेकडे पेकींग ह्या चीनच्या राजधानी कडे मोर्चा वळविला. जून १८५८ मध्ये युरोपियन सत्तांनी चीनी सरकारवर 'तिएनत्सिनचा तह' लादला. या तहातील सर्वात महत्वाची तरतूद म्हणजे परकीयांना पेकींग मध्ये आपली वकीलात उघडण्याची परवानगी मिळाली आणि वेळ पडल्यास व्यापार वाढवण्यासाठी अतिरीक्त बंदरे खुली करण्याचा अधिकार प्राप्त झाला.

जेव्हा ब्रिटीश व फ्रेंचांनी तिएनात्सिन तहाच्या तरतूदींची अंमलबजावणी होण्यासाठी चीनला सांगितले तेव्हा चिडलेल्या चिनी फौजेने गोळीबार करण्यास सुरूवात केली. त्यामध्ये ४०० ब्रिटीश लोक मारले गेले आणि त्यांची चार जहाजे सुद्धा बुडाली. त्यानंतर जवळजवळ एका वर्षानी ब्रिटीश – फ्रेंच भली मोठी संयुक्त फौज ऑगस्ट १८६० मध्ये आली, राजधानीवर हल्ला केला आणि 'समर पॅलेस' पूर्णपणे जाळून टाकला. राजदरबारी राजधानीतून सुरक्षेसाठी पळून गेले. २४ ऑक्टोबर १८६० मध्ये ब्रिटीश प्रतिनीधींनी पराभूत झालेल्या चीनी सरकारवर 'पेकींग कन्वेन्शन' लादले. या कन्वेन्शन द्वारा पुढील बंधने चीनवर लादण्यात आली –

१) चीनच्या राजधानीमध्ये परकीयांना राजकीय प्रतिनिधी ठेवण्याचा हक्क;
२) परकीयांवरील चीनमध्ये प्रवास करण्यावरील निर्बंध हटवणे;
३) ख्रिश्चन मिशनऱ्यांना आपले कार्य करण्याची परवांनगी देणे आणि स्वत:ची मालमत्ता सुद्धा धारण करू देणे आणि
४) शेवटी अफूचा व्यापार पूर्णपणे कायदेशीर बनविला गेला.

अफू युद्धाचे अनेक परिणाम झाले ते पुढील प्रमाणे

१) पाश्चिमात्यांकडून चीनवर अन्यायकारक तह लादले गेले.

२) या तहांनी परकीयांना चीनच्या हद्दीतील कायद्यांपासून मुक्तींचे अधिकार (Extra Territorial Rights) आणि प्रथम प्राधान्य राष्ट्र (Most Favoured Nations) असे हक्क मिळाले.

३) चीनचे सर्वभौमत्व नष्ट झाले आणि त्याच्या राजकीय संस्था खिळखिळ्या झाल्या.

४) मांचू घराण्याची सत्ता नष्ट होण्यामध्ये अफू युद्धे आणि त्यानंतर घडलेल्या घटनांनी हातभार लावला.

५) काही इतिहासकारांच्या मते, अफू युद्धांनी परंपरावादी चीनला हलवून जागे केले आणि त्यामुळेच या युद्धांना चीनी जनतेने दुष्ट आणि लोभी पाश्चिमात्यांनी चीनचे आर्थिक शोषण करण्यासाठी चीनवर लादलेली अफू युद्धे व त्यानंतर अन्यायकारक तह ही वेदनादायक स्मृती होती आणि पुढे चीनची राज्यक्रांती करण्यासाठी तयारीचा पाया होता.

२.२.८ चीनचे साम्राज्यवादी विभाजन (Slicing of the Chinese Melon) :-

चीन फक्त पाश्चिमात्य साम्राज्याला बळी पडला नाही, तर त्याला आशियाई शेजारी जो औद्योगीकदृष्ट्या प्रगत बनला होता त्या जपान कडूनही त्यास वारंवार धमक्या येत होत्या. जपानला कोरियामध्ये आपले बस्तान बसवायचे असल्यामुळे त्या प्रश्ना वरून चीन व जपान यांच्यामध्ये इ. स. १८९४-९५ मध्ये युद्ध झाले आणि त्यामध्ये चीनला जपान कडून दारूण पराभवास सामोरे जावे लागले. शिमोनोसेकीच्या तहानुसार जपानला चीनकडून प्रादेशिक, व्यापारी आणि प्रशासनिक अधिकार मिळाले. त्यातच चीनवर त्याच्या क्षमतेच्या पलीकडे युद्धभरपाई लादली गेली.

चीनसमोर जपानला युद्धभरपाई कशी द्यायची हा मोठा प्रश्न उभा ठाकला होता. त्यामुळेच चीनची ही अडचण सोडविण्यासाठी फ्रान्स, रशिया, इंग्लंड आणि जर्मनी यांनी चीनला कर्ज ठेवण्याचा प्रस्ताव ठेवला. त्याच्या परतफेडीसाठी त्यांनी चीनकडे 'प्रादेशिक प्रभावक्षेत्र' (प्रादेशिक वाटप) विभागून देण्याचा प्रस्ताव ठेवला. त्यामुळे चीनचे एक प्रकारे या देशांमध्ये प्रभावक्षेत्राच्या स्वरुपात तुकडे करण्यात आले आणि ह्यास 'चीनीरूपी कलिंगडाच्या छोट्या छोट्या फोडी करून आपापसांत वाटून घेणे' (Slicing of the Chinese Melon) अशी संज्ञा वापरली जाते.

२.२.९ मुक्त द्वार धोरणा (Open Door Policy) : –

इ. स. १८६१-६५ या यादवी युद्धकाळात अमेरिका ही यादवी शांत करण्यामध्ये गुंतली होती. त्यामुळेच चीनच्या केलेल्या वाट्यांमध्ये त्यांस हिस्सा घेता आला नव्हता. इ. स १८९७ पर्यंत अमेरिकेने औद्योगिक क्षेत्रामध्ये मोलाची प्रगती केली होती आणि आपल्या अतिरिक्त मालाची व भांडवलाची अनुक्रमे विक्री व गुंतवणुक करण्यासाठी बाजारपेठांची आवश्यकता निर्माण झाली. त्यामुळे तिने पुन्हा आशिया मध्ये आपला जम बसवण्याचे प्रयत्न चालू केले. इ. स. १८९८ मध्ये 'स्पॅनिश अमेरिकन युद्धाने' स्पेनकडून फिलीपाईन्स मिळाल्यावर अमेरिका चीनच्या अधिक जवळ आला. त्यामुळे जेव्हा युरोपियन सत्तांनी व जपानने चीनचे साम्राज्यवादी विभाजन केले तेव्हा अमेरिकेला सुद्धा चीनमध्ये आपले प्रभाव क्षेत्र निर्माण करण्यासाठी इच्छा निर्माण झाली.

चीनचे अधिक विभाजन टाळणे, प्रादेशिक एकात्मता आणि स्वातंत्र्य अबाधित ठेवणे त्याचबरोबर अमेरिकन व्यापाऱ्यांच्या हितसंबंधांना जपण्यासाठी अमेरिकेचे परराष्ट्र सचिव जॉन हे यांनी चीनमध्ये इ. स. १८९९ मध्ये 'मुक्तद्वार धोरणाचा' प्रस्ताव ठेवला. त्यानुसार चीनची सर्व बंदरे चीनमध्ये असणाऱ्या सर्व राष्ट्रांना खुली करण्याचे ठरले. त्यामुळे अमूक एक बंदर अमूक एक राष्ट्राच्या प्रभावाखाली नियंत्रणाखाली आहे हे अमान्य करण्यात येऊन सर्वांना व्यापारासाठी खुले करण्यात आले. त्याचबरोबर सर्व राष्ट्रांना व्यापारासाठी कोणत्याही बंदरामध्ये समान जकात आकारण्याचे ठरले.

२.२.१० आपली प्रगती तपासा :–

१) सुरूवातीच्या काळातील चीनबरोबर पाश्चिमात्यांचे संबंध थोडक्यात सांगा.

२) अफू युद्धाच्या कारणांची यादी तयार करा.

३) चीनच्या साम्राज्यवादी विभाजनात कोणती राष्ट्रे सामील झाली ?

_____

_____

_____

_____

_____

ब. चीनवरील पाश्चिमात्यांचा प्रभाव

२.३ पाश्चिमात्यांना चीनचा प्रारंभीचा विरोध

चीनला पाश्चिमात्यांकडून अनेक वेळा पराभव पत्करावा लागला होता, अपमानास्पद तह स्विकारावे लागले होते आणि आर्थिक शोषणही चालूच होते. परंतु चीनने अजूनही त्यातून काही धडा घेतला नव्हता. आपल्या प्राचीन संस्कृतीचा फाजील गर्व बाळगून जपान प्रमाणे त्यांने शिकणे गरजेचे असताना पाश्चिमात्यांच्या लोकशाही राज्यक्रांत्या आणि आधुनिकीकरण याकडे चीनने जाणीव पूर्वक लक्ष दिले नाही. चीनने जरी पाश्चिमात्यांना वेगवेगळ्या आघाड्यांवर प्रतिकार केला असला तरीही पाश्चिमात्यांनी चीनचे आर्थिक शोषण थांबवले नव्हते. त्यामुळे परकीयांनी आपले जकात अधिकारी चीन बंदरावर नेमले होते. पेकिंगला (राजधानी) आपले राजकीय दूतावास स्थापन केले होते. हे पाश्चिमात्य व्यापारी आपल्याबरोबर ख्रिश्चन मिशनरी सुद्धा आणत असत आणि त्यामुळे पाश्चिमात्य संस्कृतीचा चीनमध्ये प्रचार व प्रसार चालू झाला होता. त्याचा परिणाम चीनच्या जीवनाच्या प्रत्येक अंगांवर दिसून येत होता.

२.३.१ पाश्चिमात्यांशी चीनचे संबंध आणि बर्लिंगेम मिशन :-

चीनबरोबर राजकीय संबंध स्थापित करून पाश्चिमात्यांनी चीनमध्ये आपले प्रभावक्षेत्र हळूहळू विस्तारण्यास सुरूवात केली. पेकींगच्या तहाने पाश्चिमात्यांना चीनमध्ये आपले राजकीय हितसंबंध परकीय दूतावास स्थापन करून वाढविण्याची मुभा मिळाली. इ.स. १८६७ मध्ये

पाश्चिमात्यांशी चीनने परकीय संबंध कसे स्थापन करावेत याबाबतीत चीनला सल्ला देण्यासाठी अमेरिकेचे निवृत राजदूत बर्लिंगेम यांना पेकींगला येण्याचे आमंत्रण दिले. त्यानंतर बार्लिंगेम याने स्वतः चीनी शिष्टमंडळाचे नेतृत्व केले आणि त्याने स्वतः अमेरिकेला जाऊन चीन अमेरिकेच्या नेतृत्वाखाली पाश्चिमात्यीकरण व प्रगतीसाठी अमेरिकेची मदत घेऊ इच्छित असल्याचे अमेरिकेने जनतेला सांगितले. अमेरिकेनेसुद्धा चीनी शिष्टमंडळाचे व बर्लिंगेमचे मोठ्या उत्साहात स्वागत केले. सदर बर्लिंगेम शिष्टमंडळाने (चीनच्या) अमेरिकन सरकारबरोबर अनेक प्रकारचे करारमदार केले. त्यांद्वारे चीनला अमेरिकेच्या बंदरावर आपले प्रतिनिधी नेमणे आणि अमेरिकेससुद्धा चीनच्या बंदरावर आपले प्रतिनिधी नेमण्याची मुभा मिळाली. तसेच अमेरिकेतील वास्तव्यास असलेल्या चीनी रहिवाशांना पूर्णपणे धार्मिक स्वातंत्र्य बहाल केले जाईल असे ठरले गेले. त्याचबरोबर चीनच्या अंतर्गत कारभारात अमेरिका हस्तक्षेप करणार नाही असे आश्वासन चीनला दिले गेले.

या बर्लिंगेम मिशनने (शिष्टमंडळ) लंडन, पॅरिस, बेल्जियम, प्रशिया, डेन्मार्क, स्वीडन, हॉलंड आणि रशिया यांना भेटी दिल्या. त्यानंतर मांचू प्रशासनाने सर्वात प्रथम इ. स. १८७७ मध्ये इंग्लंड आणि इ. स. १८७८ मध्ये अमेरिकेशी आपले परराष्ट्र संबंध अधिकृतरित्या स्थापन केले. इ. स. १८८० पर्यंत चीनने बहुतेक पाश्चिमात्य राष्ट्रांशी आणि जपानबरोबर आपले परराष्ट्र संबंध स्थापित केले होते. त्यानंतर पाश्चिमात्य संस्कृती, आधुनिकीकरण, राज्यपद्धती आणि संस्थाचा अभ्यास करण्यासाठी चीनची शिष्टमंडळे अनेक वेळा पश्चिमी देशांच्या अभ्यास दौऱ्यावर गेली. त्यामुळेच या दौऱ्यांद्वारे जी काही पश्चिमी ज्ञान, विज्ञान, राज्यपद्धती, शिक्षण, उद्योग यांची माहिती ही चीनला भावी आधुनिकीकरणासाठी पुरक ठरली.

२.३.२ ख्रिश्चन मिशनऱ्यांचा प्रभाव :–

१९ व्या शतकाच्या सुरूवातीला ख्रिश्चन मिशनऱ्यांचे चीनमध्ये आगमन झाले होते. परंतु चीनमध्ये त्यांना तीव्र विरोध झाला होता. त्यामुळे बऱ्याच मिशनऱ्यांना छळाला समोरे जावे लागले होते. फ्रेंच कॅथलिक मिशनऱ्याचा खून झाल्यानंतर फ्रान्सने दुसऱ्या अफू युद्धात इंग्लंडशी हात मिळवणी केली होती. या युद्धात पराभव झाल्यानंतर जो तिएंतसिनचा तह (१८५८) झाला त्याद्वारे मिशनऱ्यांना आणि ख्रिश्चन धर्माला चीनमध्ये सहिष्णुता व कायदेशीर दर्जा मिळाला. त्यानंतर १८६० च्या पेकींग कन्वेन्शननुसार चीनच्या अंतर्भागात ख्रिश्चन मिशनऱ्यांना राहण्याचे अधिकार मिळाले. त्याचबरोबर जमीन खरेदी करण्याचे, चर्च बांधण्याचे, शाळा उघडण्याचे आणि कोणत्याही अडथळ्याशिवाय ख्रिश्चन धर्माचा प्रचार – प्रसार करण्याचे अधिकार देण्यात आले.

ख्रिश्चन मिशनऱ्यांमध्ये इंग्लिश आणि अमेरिकन प्रॉटेस्टंट यांचा चीनमध्ये सामाजिक व धार्मिक दृष्टीकोन काही प्रमाणात उदार होता. त्यांनी चीनीधर्मांतरीत लोकांना पाश्चिमात्य शिक्षण दिले, वैद्यकीय सुविधा दिल्या आणि त्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी पाश्चिमात्य धार्मिक व धर्मनिरपेक्ष साहित्य आणि तत्वज्ञान सुशिक्षित चीनी लोकांमध्ये पसरविण्यास सुरूवात केली त्यामुळे पाश्चिमात्य ज्ञानाचा चीनी लोकांना परिचय झाला. तरीही, मिशनऱ्यांचा सांस्कृतिक प्रभाव त्यामानाने फारसा नव्हता. बऱ्याच मिशनऱ्या प्रभावशाली बंदरांच्या परिसरातच होत्या आणि फार थोड्या चीनच्या अंतर्भूमीमध्ये पोहोचल्या होत्या.

ख्रिश्चन मिशनऱ्यांचा संशय आणि तिरस्कार यामुळे चीनी परंपरावादी (conservatives) आणि अधिकारी यांच्या प्रखर विरोधाची परिणती 'तिएन्तसिन हत्याकांडामध्ये' (१८७०) झाली. चीनी जमावाने रोमन कॅथलिक अनाथालय आणि चर्च नष्ट केले, फ्रेंच राजनीतीक अधिकारी , दोन धर्मगुरू, दहा ख्रिश्चन साध्वी, तीन रशियन आणि तीस चीनी नोकर यांना निर्घृणरित्या ठार केले. ख्रिश्चन – विरोधी दंगल हे चीनमध्ये नित्याचेच उदाहरण झाले होते आणि त्याची परिणती शेवटी बॉक्सर उठावामध्ये (१९००) झाली.

क. पाश्चिमात्यांना चीनचा प्रतिसाद

२.४ शैक्षणिक प्रगती

पाश्चिमात्यांचा चीनवरील सर्वांत महत्त्वाचा प्रभाव म्हणजे चीनच्या शैक्षणिक प्रगतीत झालेले बदल होत. ख्रिश्चन मिशनरी आणि चीनचा पाश्चिमात्यांशी आलेला वारंवार संबंध यामुळे चीनच्या शिक्षण पद्धतीमध्ये सुधारणा होण्यास सुरूवात झाली. त्यामुळे चीनची परंपरावादी शिक्षण पद्धती मागे पडू लागली. मिशनऱ्यांनी चीनी लोकांची बोलीभाषा शिकून घेतली आणि परकीय साहित्याचे चीनीमध्ये भाषांतर केले. त्याच बरोबर शब्दकोशांची रचनाही केली. इ. स. १८६६ मध्ये परदेशी भाषा शिकण्यासाठी पेकींग येथे भाषा प्रशिक्षण शाळेची स्थापना केली. हळूहळू चीनच्या इतरही शहरांमध्ये वेगवेगळ्या विषयांचे अध्ययन-अध्यापनासाठी जसे परकीय भाषा, खगोलशास्त्र, गणितशास्त्र, जहाजनिर्मिती इ. शाळांची व प्रशिक्षण संस्थाची निर्मिती केली गेली.

तायपिंग उठाव दडपून टाकण्यासाठी ज्या दोन चीनी अधिकाऱ्यांनी उदा. त्सेंग कुओ फान आणि ली हंग चँग यांनी पाश्चिमात्य धर्तीवर आधारित शिक्षण पद्धतीस प्रोत्साहन दिले. त्यांनी चीनी तरूणांना पाश्चिमात्य देशांमध्ये विशेषत: अमेरिका, इंग्लंड आणि फ्रान्स येथे उच्च शिक्षण घेण्यासाठी पाठविले. त्यातच इ. स. १८७२ – १८८१ या दरम्यान त्यांनी १२० चीनी विद्यार्थ्यांची तुकडी अमेरिकेस उच्च शिक्षण घेण्यासाठी पाठविली. त्यानंतर दुसरी ३० विद्यार्थ्यांची तुकडी (Student's Mission) तांत्रिकी प्रशिक्षण घेण्यासाठी इंग्लंड व फ्रान्स येथे पाठविली.

२.५ चीनच्या लष्करी सुधारणा

चीन हा लष्करीदृष्ट्या कमजोर असल्याचे अफू युद्धे आणि तायपिंग उठवले सिद्ध केले होते. त्यामुळे लष्करी सुधारणांची चीनला आवश्यकता होतीच. मांचू राजांकडे केंद्रीय लष्करी दल नसल्यामुळे त्यानी प्रादेशिक सैन्यासाठी प्रोत्साहन दिले होते. त्यातच तायपिंगसारखे बंड जर मोडून काढायचे असेल तर नवीन लष्करी दलाची आवश्यकता निर्माण झाली होती. सरकारी फौजा या भ्रष्टाचाराने आणि बेशिस्तिने ग्रासल्या होत्या. इ. स. १८५२ मध्ये मांचू सरकारने तायपिंग बंडखोरांना धडा शिकवण्यासाठी त्सेंग कुओ फान आणि ली हंग चँग यांना स्थानिक लोकांची लष्करी पथके निर्माण करण्यास सांगितले. त्यानुसार या दोघाही लष्करी अधिकाऱ्यांनी पाश्चिमात्य लष्करी तज्ञांच्या सल्ल्यानुसार स्थानिक लष्करी पथके संघटीत केली. त्यांनी

पाश्चिमात्यांकडून शस्त्रे व दारूगोळा खरेदी केला. त्याचप्रमाणे स्थानिक लष्करी पथकांमध्ये काही पाश्चिमात्य सैन्यसुद्धा भरती झाले. त्यामुळेच हळूहळू ब्रिटीश व फ्रेंच सरकारच्या पाठींब्याने आणि इतर परकीयांच्या सहकार्याने त्सेंग कुओ फान आणि ली हंग चँग यांनी तायपिंग बंडाचा बिमोड केला.

स्थानिक लष्करी दले (Local militias), परदेशी अधिकारी आणि पाश्चिमात्यांचा पूर्ण पाठींबा यामुळे स्वकीयांच्या हातून मांचू राजांनी होणारा विध्वंस टाळण्याचा प्रयत्न केला होता. त्यावरून हे सिद्ध झाले होते की, बळकट केंद्रीय लष्करी बळाच्या अभावी (निशस्त्र भ्रष्टाचारी, बेशिस्त) मांचू राजे कमजोर होते व त्यांची सत्ता केव्हाही उलथवून टाकू शकता येत होती. त्यामुळेच इ. स. १८६५ मध्ये लष्करी अधिकारी त्सेंग कुओ फान आणि ली हंग चँग यांनी मांचू सरकारला तातडीने लष्करी दल उभारण्याची विनंती केली. इ. स. १८६५ – १८८८ दरम्यान अनेक लष्करी दले उभारण्यात आली. तिएन्तसिन येथे पाश्चिमात्यांच्या धर्तीवर नाविक आणि लष्करी प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात आल्या.

इ. स. १८९४ -९५ चे चीन - जपान युद्ध (चीनचा पराभव), १९०० चे बॉक्सर बंड आणि इ. स. १९०४ – ०५ चे रशिया – जपान युद्ध (रशियाचा पराभव) या घटनांनी चीनला लष्करी सुधारणांची नितांत आवश्यकता भासू लागली. त्यामध्ये चीन-जपान युद्धाअगोदर ली हंग चँग याचा कोरीयातील प्रतिनीधी युआन शि काय हा प्रमुख होता. युआन शि काय ने तिएन्तसिन येथे लष्करी पद्वी प्रशिक्षण पूर्ण केलेल्या तरूण अधिकाऱ्यांना बरोबर घेऊन उत्तम प्रशिक्षण, सशस्त्र आणी शिस्त-बद्ध सैन्याची चीनमध्ये उभारणी केली. त्यातच मांचू घराण्याची सत्ता-प्रतिष्ठा पुनरूज्जिवित करण्यासाठी मांचू राजांनी इ. स. १९०२-११ दरम्यान लष्करी सुधारणा कार्यक्रम राबवला. त्यामध्ये लष्करी शाळा सुधारणाचा प्रस्ताव पुढे आला. ह्या सुधारणा कार्यक्रमावर लक्ष ठेवण्यासाठी लष्करी पुनर्संघटन आयोगाची स्थापना केली गेली. लष्करी नियंत्रण, सुसज्जता, प्रशिक्षण याबरोबर लष्करी उद्योगांना प्रोत्साहन देण्यात आले आणि त्याप्रमाणे वेगवेगळ्या योजना राबविण्यात आल्या. एवढे करूनही मांचू घराणे काही पुढे वाचू शकले नाहीत.

२.६ औद्योगिक विकास

पाश्चिमात्यिकरणाचा चीनच्या आर्थिक जीवनावरसुद्धा प्रभाव पडलेला आपणास दिसतो. चीनमधील औद्योगिकरणाची प्रक्रीया काहीशी धीम्या गतीने चालू होती. इ. स. १८६५ मध्ये प्रथमच शांघाय येथे पहिले आधुनिक जहाजबांधणी केंद्र उभारले गेले. इ. स. १८७१ मध्ये ली हंग चँग याने शांघाय येथे चीनी व्यापारी स्टीम नेव्हीगेशन कंपनीची स्थापना केली. तिएन्तसीन मशिन फॅक्टरीचे आधुनिक शस्त्रास्त्र निर्मितीसाठी पुनरुज्जीवन करण्यात आले. इ. स. १८७८ मध्ये केपिंग कोळसा खाणीसाठी प्रथमच आधुनिक पाश्चिमात्य तंत्राचा वापर सुरू करण्यात आला. इ.स. १८७६ मध्ये प्रथमच शांघाय – वुचांग रेल्वे मार्ग बांधण्यात आला. परंतु अंधश्रद्धाळू चीनी लोकांनी रेल्वेमार्गास विरोध केला. ली हंग चँग यांच्या पुढाकारांने इ. स. १८८१ मध्ये चीनमध्ये रेल्वे बांधणीचा दुसरा प्रयत्न करण्यात आला. त्याला आलेल्या प्रतिसादाने चीनच्या आधुनिक दळणवळणास एक नवीन वळण मिळाले. इ. स. १८८२ मध्ये तिएन्तसिन आणि शांघाय दरम्यान प्रथमच तारायंत्र चालू झाले. पोर्ट आर्थर येथे जहाज कारखाना उभारला आणि पोलादी जहाजबांधणीची योजना पुढे आणली गेली.

इ. स. १९०६ पर्यंत पेकींग येथे कृषी, उद्योग आणि वाणिज्य मंत्रालयांची स्थापना करण्यात आली. व्यापारी व कंपनी कायद्यांची नियमावली तयार करण्यात आली. यामुळे चीनी उद्योगधंद्यांच्या वाढीस चालना मिळाली. उद्योगांमध्ये सुती कापडगिरण्या, विद्युत केंद्रे, पीठ गिरण्या, आगपेटी कारखाना, तंबाखू कारखाने, पोलादी उद्योग आणि रेशीम उद्योग यांची स्थापना करण्यात आली. या सर्वांबरोबरच आधुनिक बँकींग प्रणालीस सुरूवात करण्यात येऊन उद्योगधंद्यांच्या विकासासाठी आर्थिक पुरवठा उपलब्ध केला गेला.

२.७ शंभर दिवसांचा सुधारणा कार्यक्रम

चीनमध्ये पायाभूत सुधारणा राबविण्यामध्ये कँटन येथील रहिवासी कँग यु वाइ याने पुढाकार घेतला. तो अत्यंत बुद्धिमान असून त्याच्यावर पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रभाव होता. त्याच्यावर पश्चिमी बुद्धिवाद्यांचा आणि कन्फ्युशियन विचारसरणीचा अधिक प्रभाव होता. त्याची या दोन्ही विचारांचा संगम चालून चीनचा विकास करण्याची योजना होती. त्याने आपल्या 'ग्रॅन्ड युनियन' या पुस्तकामध्ये चीनची पारंपारिक विचारसरणी आणि आधुनिक पायाभूत क्रांतीकारी सुधारणा यांवर आपले विचार व्यक्त केले होते. त्याच्या मते, चीनी समाज हा मागास आहे आणि त्याचे आधुनिकीकरण होणे गरजेचे आहे. त्याची अशी ठाम धारणा होती की, चीनने जपानचे अनुकरण करावे, भ्रष्टाचाराचे निर्मूलन करावे आणि पाश्चिमात्य नियम व कायद्यांसारखेच कायदे – कानून चीनमध्ये तयार करावेत तरच चीनची प्रगती संभव होईल.

इ. स. १८९८ मध्ये कँग यु वाई ने बादशाहा कुआंग सू ह्याची भेट घेतली. त्याचा बादशाहावर अत्यंत प्रभाव पडला आणि बादशाहाने ताबडतोब चीनमध्ये सुधारणा कार्यक्रम राबवण्याचे आदेश काढले आणि त्यासाठी 'मूलभूत शंभर दिवसांचा सुधारणा कार्यक्रम' राबविण्यास सुरूवात केली. त्यानुसार ११ जून १८९८ पासून १६ सप्टेंबर १८९८ पर्यंतचा कार्यक्रम व त्याचे विविध विषय याचे आदेश दिले. या आदेशांमध्ये शिक्षणाचे पाश्चिमात्यिकरण, प्रशासन यंत्रणेचे पुनर्संघटन करणे, लष्करी व नाविक दलाचे पाश्चिमीकरण, अंतर्गत व्यापाराला चालना देणे, उद्योग विकासाचा वेग वाढवणे आणि दळणवळणाची सुधारणा करण्यासाठी रेल्वेचे जाळे निर्माण करणे इत्यादी सुधारणांचा समावेश करण्यात आला होता. शंभर दिवसांचा सुधारणा कार्यक्रम हा पाश्चिमात्यांच्या आधुनिकाकरणास चीनने दिलेला सर्वात पहिला अंतर्गत प्रतिसाद होता. चीनला राष्ट्र म्हणून एक बळकट स्थान निर्माण करून देणे, पाश्चिमात्यांचे अनुकरण करणे आणि त्यामुळेच चीनला परकीयांचा मुकाबला करण्यासाठी समर्थ बनवणे हा या कार्यक्रमापाठीमागचा उद्देश होता.

बादशाहा कुआंग याची चुलती विधवा राणी त्सू सी हीने परिवर्तन विरोधकांचे दरबारमध्ये नेतृत्व केले आणि सुधारणा कार्यक्रमाला कठोर विरोध केला. त्यातच मांचू अधिकारी आपले वर्चस्व धोक्यात येईल म्हणून सुधारणांना विरोध करू इच्छित होते. विधवा महाराणी त्सु सी ने सुधारणांविरोधात आणि बादशाहा कुआंग सू विरोधात कटकारस्थान केले. तिने बादशाहा आजारी असल्याची अफवा पसरवली आणि त्याला त्याच्या मृत्यू पर्यंत म्हणजे इ. स. १९०८ पर्यंत राजप्रासादात बंदी करून टाकले. तिने अनेक सुधारणावाद्यांची कत्तल (Summary Execution) केली. कँग यु वाई आणि त्याचे अनुयाई हे कसेबसे हाँगकाँग येथे पळून जाण्यात यशस्वी झाले.

२.८ मांचू सुधारणा कार्यक्रम (इ.स. १९०१ – ११)

मांचू शासन हे जवळजवळ अर्धा शतक (इ.स. १८६० – १९०८) विधवा महाराणी त्सु सी हिच्या वर्चस्वाखाली होते. शासनावर आपले नियंत्रण राखण्यासाठी तिने सुधारणा कार्यक्रमास कडवा विरोध केला होता. जेव्हा इ. स. १८९८ मध्ये बादशहा कुआंग सू याने कँग यु वाई याच्या मार्गदर्शनाखाली पाश्चिमात्यांच्या प्रभावाने प्रेरित सुधारणा कार्यक्रम (Hundred Days Reforms) राबविण्याचे ठरविले तेव्हा त्सु सी च्या नेतृत्वाखालील प्रतिगामी शक्तींनी ह्या कार्यक्रमास विरोध करून कार्यक्रम हाणून पाडण्याचे ठरवले. बादशाहाला कैद केले आणि कँग यु वाई याला चीनमधून पळून जावे लागले. त्यांच्या चीनमधील पाठीरख्यांना मात्र अमानुष छळ व कत्तलींस सामोरे जावे लागले.

परंतु २० व्या शतकाच्या प्रारंभास अशी आवश्यकता निर्माण झाली की त्सु सी च्या शासनाला काही सुधारणा राबवणे क्रमप्राप्त झाले. परंतु त्सु सी चे सरकार मनापासून सुधारणा राबवित नव्हते तर आपले सरकार वाचविण्यासाठी (मांचू घराणे) काही तरी सुधारणा कराव्यात म्हणून त्यांनी तो कार्यक्रम राबविण्याचे ठरविले.

इ.स. जानेवारी १९०२ मध्ये बॉक्सर तहानंतर पेकींग येथे परतल्यावर त्सु सी ने चीनच्या सामाजिक सुधारणा कार्यक्रमाविषयीचे आदेश काढले. आंतरजातीय विवाहांवरील बंदी उठविली गेली. तसेच 'पद्बंधन' (Foot Binding) प्रथा सुद्धा बंद करण्याचे आदेश दिले गेले. शैक्षणिक सुधारणांमध्ये तरूणांना उच्च शिक्षण घेण्यासाठी शासनाच्या खर्चाने परदेशात पाठवण्यात आले. त्यासाठी इ. स. १९०३ मध्ये स्वतंत्र शिक्षण मंत्रालयाची स्थापना करण्यात आली. चीनी आणि पाश्चिमात्य विषय शिकवण्यासाठी शाळांची स्थापना करण्यात आली. न्यायिक सुधारणांसाठी आयोग नेमण्याची तरतूद केली आणि त्याच आयोगाच्या शिफारशींनुसार चीनचे पारंपरिक कायद्यांमध्ये आधुनिक पद्धतीने बदल करण्यात आले. गुन्ह्यांबद्दलच्या दुष्ट व अमानुष शिक्षणसुद्धा नष्ट करण्यात आल्या. इ.स. १९०५ मध्ये चीनी अभिजात साहित्यावर आधारित पारंपारिक नागरी सेवा परीक्षा सुद्धा रद्द करण्यात आली.

वरील सुधारणांमध्ये सर्वात महत्त्वाची सुघारणा म्हणजे 'घटनात्मक सरकारची सुरूवात' होय. महाराणी त्सु सी ने जपान आणि इतर पश्चिमी देशांत त्यांच्या संविधानाचा व राज्यपद्धतीचा अभ्यास करण्यासाठी चीनच्या शिष्टमंडळांना पाठविले. ब्रिटीश, जर्मन आणि जपानी संविधानांचा सखोल अभ्यास केल्यानंतर चीनने जपानच्या राज्यपद्धतीचा स्विकार केला. इ. स. १९०८ मध्ये हंगामी संविधान लागू केल्यानंतर राजाला सर्वाधिक अधिकार बहाल करण्यात आले. चीनी नागरिकांना विचार स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य व संघटन स्वातंत्र्य बहाल केले गेले. संविधानाने दृविगृही कायदेमंडळाची तरतूद केली पण काही प्रमाणात बंधनेही लादली.

इ. स. १९०८ मध्ये बादशाहा कुआंग सू चे निधन झाले आणि थोड्याच दिवसांनी महाराणी त्सु सी सुद्धा मेली. तिच्या मृत्यूबरोबर मांचू घराण्याचे प्रतिक असलेली राजेशाही सुद्धा लयास गेली. तायपिंग बंडापासून बॉक्सर उठावापर्यंत चीनच्या सरकारवर नेहमी तिचेच वर्चस्व राहीले होते. तिच्या मृत्यूनंतर तिचा भाचा तीन वर्षांचा अल्पवयीन पुत्र आयसिन जिओरो पू यी ह्यास चीनच्या राजगादीवर बसविण्यात आले. त्याचे वडिल त्याचे काळजीवाहू (Regent)

प्रशासक बनले. परंतु तो अकार्यक्षम आणि आधुनिक आव्हानांना सामोरे जाण्यास असमर्थ होता. त्यातच महाराणी त्सू सी च्या सुधारणा तुटपूंज्या आणि फारच उशिरा आल्यामुळे इ. स. १९११ च्या राज्यक्रांतीच्या संकटातून मांचू राजघराणेशाहीस वाचविता आले नाही आणि मांचू राजवटीचा दु:खद अंत झाला.

२.८.१ आपली प्रगती तपासा :-

१) चीनचा पश्चिमी शैक्षणिक सुधारणांना कसा प्रतिसाद मिळाला ?
२) चीनच्या लष्करी सुधारणा सांगा.
३) कोणत्या उद्योगांना चीनमध्ये चालना देण्यात आली ?
४) शंभर दिवसांचा सुधारणा कार्यक्रम यावर टीप लिहा.
५) मांचू सरकारच्या सुधारणांची यादी करा.

_____
_____
_____
_____
_____

२.९ समारोप

चीनचे पश्चिमी राष्ट्रांशी सुरूवातीच्या काळातील संबंध फारसे चांगले नव्हते. सुरूवातीला चीनी जनतेने पाश्चिमात्यांना व्यापार – उदीम करण्यास, त्यांच्या बाजारपेठा स्थापन करण्यास, त्यांचे लष्कर स्थापन करण्यास विरोध करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचा फारसा परिणाम झाला नाही. चीनी जनतेला अफू युद्धांना तोंड द्यावे लागले. परंतु त्यांना अंतिम विजय मिळविता आला नाही. चीनने शैक्षणिक सुधारणा, लष्करी प्रगती, औद्योगिक विकास, शंभर दिवसांचा सुधारणा कार्यक्रम राबविण्याचे प्रयत्न केले. मांचू राजांनी स्वत:च्या काही सुधारणा राबविल्या व त्याचे काही चांगले परिणाम झाले. अशाप्रकारे २० व्या शतकाच्या प्रारंभी चीनला साम्राज्यवादास सामोरे जावे लागले खरे पण त्यांनीसुद्धा पाश्चिमत्यांना आपल्या परीने तोंड देण्याचा प्रयत्न केला.

२.१० प्रश्न

१) अफू युद्धांच्या संदर्भात चीनवरील पाश्चिमात्य साम्राज्यवादाचा आढावा घ्या.
२) चीनी शासन आणि समाज यावरील पाश्चिमात्यांच्या प्रभावाचे परीक्षण करा.
३) पाश्चिमात्य प्रभावास चीनी प्रतिसाद याचे विश्लेषण करा.
४) चीनवरील पाश्चात्य प्रभावाची चर्चा करा. त्यास चीनने कशा प्रकारे प्रतिसाद दिला ?

❖❖❖

३

सुधारणा आणि राज्यक्रांती–१

घटक रचना :-

३.० उद्दिष्ट्ये
३.१ प्रस्तावना
३.२ चीनी राष्ट्रवादाचा उदय
३.३ चीनी राष्ट्रवादाची पार्श्वभूमी
३.४ डॉ. सन् यत सेन यांचे पूर्वचरित्र
३.५ डॉ. सन् यत सेन : एक क्रांतीकारी
३.६ सिंग चुंग हुई
३.७ डॉ. सन् यत सेन यांचा परदेश प्रवास
३.८ तुंग मेंग हुई
३.९ जनतेची त्रितत्व प्रणाली
३.१० समारोप
३.११ प्रश्न

अ. राज्यक्रांतीचा सामाजिक उगम

ब. डॉ. सन यत सेन

३.० उद्दिष्टे

१) चीनच्या राष्ट्रवादाच्या विकासाआधारे १९११ च्या राज्यक्रांतीचा सामाजिक उगम समजून घेणे.

२) डॉ. सन् यत सेन यांच्या 'क्रांतीकारी ते सुधारक' या परिवर्तनवादी भूमिकेचा आढावा घेणे.

अ. चीनच्या राज्यक्रांतीचा (इ.स. १९११) सामाजिक उगम

३.१ प्रस्तावना

पारंपारिक अपरिवर्तनीय चीनी समाज हा पाश्चिमात्य साम्राज्यशाहीमुळे आतल्या आत असंतोषाने धुमसत होता. तशातही सुशिक्षित आणि पाश्चिमात्यांच्या प्रभावाखाली आलेला वर्ग सामाजिक व इतर सुधारणांची अपेक्षा करीत असताना आपली जनतेवरील प्रशासनावरील सत्ता व नियंत्रण शिथिल होईल व पर्यायाने आपल्याला सत्ताही गमवावी लागेल या भितीने चीनच्या मृत राजाची पट्टराणी त्सु सी हिने कठोर समाजिक सुधारणांना विरोध केला होता. तरी सुद्धा तरूण

व शिकलेला वर्ग राष्ट्रवादाच्या भावनेतून हळूहळू पुढे आला आणि त्याचे नेतृत्व डॉ. सन यत सेन यांनी केले. शेवटी इ. स. १९११ मध्ये चीनची राज्यक्रांती घडून आली.

३.२ चीनी राष्ट्रवादाचा उदय

आशिया खंडातील इतर राष्ट्रांपेक्षा पाश्चिमात्य साम्राज्यवादाचा परिणाम चीनवर अगदी वेगळ्याप्रकारे झालेला होता. त्यामुळेच चीनमधील राष्ट्रवादाचा उगम व स्वरूपसुद्धा वेगळे होते. भारत, इंडोचायना आणि इंडोनेशिया या आशियाई देशांमध्ये अनुक्रमे ब्रिटीश, फ्रेंच आणि डच यांनी आपली राजकीय व आर्थिक सत्ता स्थापन केली होती. या सत्तांची सदर देशांवर मजबूत पकड असून इतर युरोपिय देशांचासुद्धा थोडाफार प्रभाव होता. या साम्राज्यवादी देशांनी सदर देशांमधील केंद्रीय सत्ता बदलून आपली सत्ता स्थापन केली होती. त्यामुळेच या देशांमधील राष्ट्रवाद हा साम्राज्यवादी देशांनी निर्माण केलेल्या परिस्थितीला प्रत्युत्तर असून त्यांच्या जोखडातून देशाला मुक्त करणे यासाठीच प्रामुख्याने त्यांच्या चळवळी होत्या आणि त्यांना 'स्वातंत्र्य चळवळ' म्हणणे आवश्यक आहे.

चीनी समाजाला मात्र साम्राज्यवादी देशांचे वर्चस्व आणि तेथील कालबाह्य झालेली राजेशाही या दोन गोष्टींविरूद्ध लढा द्यावयाचा होता. चीनी समाजाने साम्राज्यावादी राष्ट्रांच्या लष्करी व व्यापारी सत्तेला थोपवण्यामध्ये आणि चीनची दयनीय अवस्था निर्माण करण्यामागे मांचू राजांच्या अपयशाला दोष दिला. दुसऱ्या बाजूला साम्राज्यावादी देशांनी व्यापार, नफेखोरी, प्रभावक्षेत्रे याद्वारे चीनचे आर्थिक शोषण चालवले होते. त्यामुळे चीनी जनतेला गरीबी व इतर हालआपेष्टांना सामोरे जावे लागत होते. त्यातच साम्राज्यवादी सत्तांनी चीन सरकारबरोबर अन्यायकारक करार करून राष्ट्रीय अपमान केला होता. ख्रिश्चन मिशनऱ्यांचे जाळे व प्रचार यांनी चीनची प्राचीन संस्कृती व श्रद्धा यांवर घाला घातला हेता. त्यामुळे सनातन चीनी समाज त्याविरूद्ध होता. त्यामुळेच वरील कारणांमुळे चीनी राष्ट्रवादाचा उदय झाल्याचे आपणांस दिसते. म्हणून चीनी राष्ट्रवादी चळवळीचा मुख्य उद्देश परकीयांना हकलून लावून मांचू राजांना पद्च्यूत करणे व चीनमध्ये प्रजातंत्र बहाल करणे हा होता. चीनी राष्ट्रवादी चळवळीचा कार्यक्रम विविध स्वरूपाचा होता. त्यामध्ये १) गुप्त संघटना स्थापणे २) मांचू व परकीय यांच्या विरूद्ध उठाव करणे ३) सुधारणा जाहीर करणे ४) सैन्य, उद्योग आणि अर्थव्यवस्था यांचे पाश्चिमात्य सत्तांप्रमाणे संघटन करणे यांचा समावेश होता. इ. स. १९११ च्या क्रांतीने चीनमधील मांचू राजांची जुलमी सत्ता नष्ट केली आणि चीनला प्रजातंत्र बहाल केले गेले. त्यानंतर सैन्यप्रमुख आणि संरंजामदार यांचे पतन करून चीनचे राष्ट्रीय एकीकरण करण्यासाठी प्रयत्न केले गेले. प्रामुख्याने १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २० व्या शतकाच्या पहिल्या दशकामध्ये चीनमध्ये राष्ट्रवादाचा उगम व विकास झालेला आपल्याला दिसतो.

३.३ चीनी राष्ट्रवादाची पार्श्वभूमी

३.३.१ गुप्त संघटना:-

१९ व्या शतकाच्या पहिल्या अर्धकात चीनच्या अनेक भागात काही गुप्त संघटना स्थापन झाल्या होत्या. या संघटनानी चीनी समाजामध्ये परकीयांविरोधात आणि मांचू राजवटीविरोधात जोरदार प्रचार केला. काही संघटना प्रखर राष्ट्रवादी होत्या. उठावाला सतत पेटते ठेवण्यासाठी या संघटनांनी बेकार व असंतुष्ट युवकांची सदस्य म्हणून भरती केली आणि त्यांना लष्करी

प्रशिक्षण सुद्धा दिले. मध्य-चीन मध्ये 'व्हाईट लोटस सोसायटी (शुभ्र - कमळ संघटना)' ही बौद्ध तत्त्वज्ञानाने प्रभावीत होऊन त्यांनी मोठा उठाव घडवून आणला होता. इ. स. १८२२ मध्ये 'बँडीट' व 'स्मॉल पॅक्स च्यु' या गुप्त संघटनांनीसुद्धा बंडाचा झेंडा फडकवला. इ. स. १८३० मध्ये 'ट्रायड्स' आणि 'याई' या गुप्त संघटनाच्या सदस्यांनी हुनान प्रांतामध्ये गोंधळ माजविला. त्याबरोबर 'हेवन' आणि 'अर्थ सोसायटी' या संघटनादेखील चीनमध्ये मोठ्या प्रमाणात कार्यरत होत्या.

३.३.२ तायपिंग बंड (इ.स. १८५१-१८६४) :-

१९व्या शतकाच्या मध्यानंतर चीनमध्ये मांचू राजवटीविरूद्ध सुरू झालेली मुख्य चळवळ म्हणजे तायपिंग बंड होय. स्वत:ला येशु ख्रिस्ताचा छोटा भाऊ मानणारा धार्मिक प्रमुख हुंग सिऊ चुआन याच्या नेतृत्वाखाली दक्षिण चीनमध्ये जवळजवळ एक दशकभर महान शांतीचे स्वर्गीय राज्य - या नावाचे समांतर शासन चालविले. तायपिंग शासनाला स्थानिक लोकांचा मेसियानिक ख्रिश्चन आणि चीन-बाह्य मांचू राजवटीवर हल्ला करण्यासाठी पाठिंबा मिळाला. हुंग सिऊ चुआन ने आपला साथीदार हाक्का जो इतर चीनी लोकांपेक्षा वेगळ्या बोलीभाषा व चालिरिती पाळणारा होता. त्यास आपला संदेश समजावून सांगितला. हुंगने हाक्का यास नैतिक आणि धार्मिक संघटनेद्वारा मोक्ष मिळेल असे सांगितले. नैतिक मुल्यांचे संगोपन होण्यासाठी मद्यपान, अफू, जुगार, वंशशुद्धता, दरोडेखोरी आणि हिंसा यांच्यावर बंदी घातली. त्याच्या ख्रिस्त धर्माने जुन्या करारामधील क्रुद्ध ईश्वराची प्रतिमा बिंबवली होती की, ज्याने आज्ञाधारक आणि सद्गुणी लोकांना मृत्यूनंतर स्वर्गात स्थान दिले तर दुष्टांना नरकात पाठवले. हुंगाच्या पाठीराख्यांनी पुढे 'बाइ शांगदी हुई (God Worshipper's Society)' या नावाने पूजेसाठी आणि परस्पर रक्षणासाठी धार्मिक चळवळ चालू केली.

इ. स. १८५३ च्या दरम्यान हुंग आणि त्याचे अनुयायांनी आपला मोर्चा नानकींग येथे संघटेनेचे मुख्य ठाणे स्थापन करण्याच्या दृष्टीने उत्तरेकडे (चीन) वळविला. त्यानंतर एक दशकापेक्षाही जास्त काळ त्यांनी यांगत्से नदीच्या परिसरात आपला जम बसविला आणि पेकींग मधून मांचू राजवट उलथवून टाकण्यासाठी अयशस्वी प्रयत्न केले. स्थानिक लष्करी प्रशिक्षितांचे नेतृत्व करीत त्सेंग कुओ फान याने तसेच परकीयांच्या मदतीने मांचू राजांनी सन १८६४ मध्ये तायपिंग बंडाचा बिमोड केला. तायपिंग बंडाचा बिमोड झाल्यानंतर सुद्धा जवळजवळ दशकभर मांचू राजवटीची अराजकता लोकांमध्ये पसरवली गेली होती. त्याबरोबरच राजकीय प्रशासन संस्था यांची अकार्यक्षमता आणि तातडीची नवीन सामाजिक दृष्टीची आवश्यकता यांवर भर दिला गेला. या बंडाने गंभीररित्या केंद्रीय प्रशासनाला खिळखिळे करून सोडले. तायपिंग बंडाने चीन-बाह्य मांचू राजवटीविरूद्ध वंशविरोधाचे रणशिंग फूंकले होते आणि त्यानंतर ५० वर्षांच्या आतच मांचू राजवटीचा बिमोड करण्याची पार्श्वभूमी या तायपिंग बंडाने तयार करून ठेवली.

३.३.३ बॉक्सर उठाव :-

तायपिंग बंडाच्या पार्श्वभूमीवर चीनमध्ये सुधारणांना सुरुवात झाली. तायपिंग बंडाचा बिमोड करण्यात यशस्वी झालेले दोन सैनिक अधिकारी त्सेंग कुओ फॅन आणि ली हुंग चँग हे सुधारणा सुचविण्यात अग्रेसर होते. परंतु विधवा पट्टराणीच्या नेतृत्वाखालील सनातनी गटाच्या दबावामुळे सुधारणांना गती प्राप्त झाली नाही. त्याचप्रमाणे 'शंभर दिवसांच्या सुधारणा' कार्यक्रम बंद करावा लागला. सुधारणांचा पुरस्कर्ता बादशाहा कुआंग सू यास कैदेत टाकले आणि याच सुधारणांचा मुख्य उद्गाता कँग यु वाई याला हद्दपार व्हावे लागले.

'शंभर दिवसांच्या सुधारणा कार्यक्रम' समाप्तीनंतर कुप्रसिद्ध बॉक्सर उठावाला चीनला सामोरे जावे लागले. या उठावाने पाश्चिमात्य साम्राज्यावादाच्या दुष्परिणामांचा निषेध व्यक्त केला गेला. बॉक्सर उठावाने प्रथम परकीय मिशनरी, चीनी ख्रिश्चन आणि शेवटी पाश्चिमात्य मुत्सद्दी अधिकारी अशा क्रमाने त्यांना लक्ष्य केले. बॉक्सर उठावाचा उगम कसा व कोठे झाला हे सांगणे कठीण आहे. त्याचा संबंध १८ व्या शतकाच्या इ- हो - चुआन (Harmonious Brotherhood) या गुप्त संघटनेशी जोडला जातो. बॉक्सरांनी (मुष्टीयोद्धे) चीनच्या विलक्षण लष्करी कलेवर निष्ठा व्यक्त केली. त्याचबरोबर अंधश्रद्धा, जादूमंत्र, जारण मारण आणि कर्मकांड यांवर त्यांची श्रद्धा होती. बहुसंख्य बॉक्सर हे गरीब शेतकरी किंवा निम्न सामाजिक गटातील होते आणि आधुनिक दळणवळण व उद्योगांमुळे त्यांची पारंपारिक उपजिविकेची साधने धोक्यात आली होती. या बॉक्सरच्या मनात मूळातच मांचू विरूद्ध असंतोष होता. तरीसुद्धा विधवा पट्टराणी त्सु सी आणि राजदरबाराने परकीय आणि मिशनऱ्यांविरोधात बॉक्सरांशी हातमिळवणी केली. त्यामुळे अचानक राजदरबाराचा पाठिंबा मिळाल्यामुळे बॉक्सर राजघराण्याच्या बाजूने झाले आणि त्यांनी परकीय – विरोधी अधिकाऱ्यांशी युती केली.

जून १९०० मध्ये सामान्यपणे बॉक्सरांनी मिशनरी व परकीयांविरूद्ध खुलेपणाने हल्ले करण्यास सुरूवात केली. या उठावांना शांटूंग, चिहली, शान्सी आणि मांचुरीया या भागांमध्ये सुरूवात झाली होती. बॉक्सरांनी परकीयांविरोधात आगपाखड केली आणि रेल्वेरूळ उखडले, टेलीग्राफ केंद्रे उध्वस्त केली, चर्च जाळले, मिशनरी लोकांचे खून केले व चीनी ख्रिश्चनांनासुद्धा ठार मारण्यास सुरूवात केली. बॉक्सर उठावाला परकीयांविरोधात २१ जून १९०१ रोजी युद्ध घोषित केले. मांचू सरकारचा पाठिंबा मिळाल्याबरोबर बॉक्सरांनी पेकींग येथील परकीयांच्या कार्यालयांवर हल्ले केले. परंतु पाश्चिमात्य सत्तांच्या संयुक्त सैन्याने व जपानी फौजांनी एकत्रित पणे पेकींगमध्ये प्रवेश केला आणि बॉक्सरांचा व चीनी सरकारच्या सैन्याचा पराभव केला. त्याच्या बदल्यात चीनी सरकारकडून फार मोठी युद्ध भरपाई मागितली आणि समझोता केला. हा समझोता चीनच्या इतिहासात 'बॉक्सर प्रोटोकाल' (१९०१) म्हणून प्रसिद्ध आहे.

बॉक्सर उठाव हा परकीयांविरोधी भावनांचा स्वयंस्फूर्त उद्रेक होता. चीनच्या अधः पतनास चीनी समाजाने परकीयांनाच जबाबदार धरले. त्यामुळे परकीय लोक व त्यांची यंत्रसामुग्री, त्यांचे नवीन शोध सुधारणा, त्यांचा विचित्र असहिष्णु धर्म आणि त्यांची वर्णश्रेष्ठत्वाची कल्पना यांना नष्ट करणे हा या उठावाचा प्रमुख उद्देश होता. बॉक्सर उठावाने चीनच्या राजकीय भवितव्यावर प्रभाव पडला. त्यामुळेच परकीयांविरोधातील बॉक्सरांची कट्टर भावना झाल्यामुळे यापुढे चीनच्या मागण्यांची परकीयांना दखल घ्यावी लागली. त्यामुळेच विधवा पट्टराणीने घराणेशाही (मांचू) चालू ठेवण्यासाठी सनातन सुधारणांचा कार्यक्रम चालू केला. जरी मांचू घराणे इ. स. १९११ पर्यंतच टिकू शकले तरी त्याचे भविष्य बॉक्सर उठावानेच सिमित केले होते. त्यामुळेच चीनच्या राष्ट्रीयत्त्वाच्या भावनेला बळकटी देण्याचे काम बॉक्सर उठावाने केले व त्याला गती प्राप्त करून दिली.

३.३.४ आपली प्रगती तपासा :-

१) चीनी राष्ट्रवादाचा उदय कसा झाला ?

२) तायपिंग बंडावर थोडक्यात टीप लिहा.

३) बॉक्सर उठावाचे महत्व सांगा.

_____

_____

_____

_____

ब. डॉ. सन. यत. सेन

३.४ डॉ. सन यत सेन यांचे पूर्वचरित्र

चीनची हलाखी दूर करण्यासाठी करण्यात आलेल्या मांचू – विरोधी तायपिंग बंड आणि परकीय –विरोधी बॉक्सर उठावांनी आणि समजसुधारणांनी चीनच्या परिस्थितीमध्ये फारसा बदल झाला नाही. अजूनही चीनच्या समाजामध्ये राष्ट्रवादाच्या भावनेचा लोकांची एकजूट होण्यासाठी अभावच होता. त्यामुळे १९ व्या शतकाच्या शेवटी व २० शतकाच्या सुरूवातीला चीनमध्ये उदयास येत असलेल्या शिक्षित मध्यम वर्गाने नव्या जोमाने पुन:प्रयत्न करणे आवश्यक होते व लोकांमध्ये राष्ट्रवादाची भावना रुजवणे गरजेचे होते. त्या मध्यमवर्गीय समाजाचे नवराष्ट्रवादाच्या दृष्टीकोनातून डॉ. सन यत सेन यांनी नेतृत्व केले.

डॉ. सन यत सेन यांचा जन्म इ. स. १८६६ मध्ये कॅन्टन शहराजवळील एका खेड्यात झाला. त्यांचे कुटुंब शेतकरी असून त्यांचे शिक्षणही पारंपारिक शाळेतच झाले. वयाच्या १३ व्या वर्षी होनोलूलू (हवाईबेटे) येथे आपल्या मोठ्या भावाने सुरू केलेल्या व्यापारधंद्यात लक्ष घालण्यासाठी त्याला पाठवण्यात आले. होनोलुलू येथे डॉ. सेन यांना परकीय व अधुनिक शिक्षण मिळाले आणि ते स्वत: ख्रिश्चन धर्मांतरीत झाले. जेव्हा ते पुन्हा आपल्या गावी आले तेव्हा ते ख्रिश्चन झाल्यामुळे त्याच्या कुटुंबाने आणि शेजारी व नातेवाईकांनी त्यांना वाळीत टाकले आणि शेवटी त्यांना पुन्हा आपले गाव सोडावे लागले. तेथून ते हाँगकाँग येथे गेले व त्यांनी औषधशास्त्राचा अभ्यास करून इ. स. १८९२ मध्ये ब्रिटीश मिशन हॉस्पिटल येथे डॉक्टर झाले. थोड्या काळावधीसाठी त्यांनी मकाऊ येथे आपले वैद्यकीय कार्य केले आणि त्याचवेळी ते मांचू – विरोधी गुप्त संघटनेच्या सदस्यांच्या संपर्कात आले. पुढे याचा परिणाम असा झाला की ते स्वत: एक यशस्वी मांचू –विरोधी संघटनेचे संस्थापक आणि सत्तापालट करण्यात प्रमुख भागीदार बनले.

३.५ डॉ. सन यत सेन : एक क्रांतीकारी

याचवेळी डॉ. सेन हे अत्यंत गोंधळाच्या व विरोधाभासी परिस्थितीच्या प्रभावाखाली आले होते. त्यामध्ये एक बाजूला शक्तीशाली राज्यराष्ट्रांचे पाश्चिमात्य जग आणि जुन्या कन्फ्युशियन विचारधारेशी चिकटलेला, कालबाह्य राजेशाहीने चालवला जाणारा, आणि साम्राज्यवादी राष्ट्रांकडून आर्थिक शोषण झालेला दयनीय चीन दुसऱ्या बाजूला अशी विरोधाभासी प्रतिमा डॉ. सेन यांच्या समोर होती. बरीच वर्षे अनुभव आल्यावर त्यांना पाश्चिमात्य देशांचे वैभव, त्यांचे साम्राज्य, हवाई व हाँगकाँग येथील निरीक्षणे, त्यांच्या गावाची व एकूणच चीनची मागास

परिस्थिती व त्यामागील कारणे त्यांच्या लक्षात आली. त्यातच पाश्चिमात्यांची प्रगती व भ्रष्टाचारी मांचू राजे यामुळे ते अधिकच अस्वस्थ झाले. त्यामुळे डॉ. सन यत सेन यांचे असे मत बनले की, चीनला नवी झळाळी देण्यासाठी व त्याची वैभवशाली परंपरा मिळवण्यासाठी मांचू राजांना पायउतार होणे गरजेचे तर आहेच, त्याचबरोबर परकीयांनासुद्धा चीनमधून घालवून लावणे आवश्यक आहे. डॉ. सेन स्वतः आधुनिक पाश्चिमात्य शिक्षण घेतलेले ख्रिश्चन आणि डॉक्टर असल्यामुळे आपली तत्वे लोकांच्या, सभ्य – विद्वान वर्गाच्या आणि ' के अँग यु वाई ' सारख्या सुधारकांच्या गळी उतरविणे कठीण झाले होते. परंतु स्वतः पाश्चिमात्य संस्कृतीशी परिचित असल्यामुळे आपले नेतृत्व गुण पारंपारिक पाश्चिमात्य शिक्षणाने वंचित नेत्यांपेक्षा अधिक चांगले असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

डॉ. सेन शेतकरी कुटुंबात जन्मले होते. आणि चीनबाहेरील चीनी लोकांमध्ये त्यांचे वास्तव्य होते. त्यामुळे चीनी समाजातील निम्न वर्गाबरोबर क्रांतीकारी भूमिका पटविणे त्यांना अवघड जाणार नव्हते. ज्याप्रमाणे कन्फ्युशियन सुधारक स्वतःस वेगळे समजून सामान्य जनतेपर्यंत जाऊ शकत नव्हते. याउलट डॉ. सेन हे स्वतः सामान्य लोकांशी मिळून मिसळून वागत असत. उत्तर चीनपेक्षा दक्षिण चीनमध्ये विशेषतः क्वांगटुंग येथे मांचू – विरोधी परंपरा अतिशय मजबूत होती. त्यामुळेच अशा वातावरणात त्यांचा जन्म झाल्यामुळे ते स्वतः जन्मतःच एक क्रांतीकारी प्रवृत्तीचे होते.

सुरूवातीच्या काळात डॉ. सन यत सेन हे कट्टर क्रांतीकारी नव्हते हे समजून घेतले पाहिजे. अजूनही पारंपरिक पद्धतीनुसार समाजसुधारणांनी चीनच्या परिस्थितीत बदल होईल असे त्यांना वाटत होते. म्हणूनच त्यांनी तत्कालीन सुधारणावादी 'कँअँग यु वाई' (१८९३) आणि 'ली हुंग चँग' (१८९४) यांच्या भेटी घेतल्या. डॉ. सेन यांनी सुधारणांचे अनेक प्रस्ताव पुढे केले. त्यांच्या या प्रस्तावांकडे ली हुंग चांगने दुर्लक्ष केले आणि त्यांनतर डॉ. सेन मांचू राजवट उलथवून टाकण्यासाठी एक पूर्णवेळ क्रांतीकारी बनले.

३.६ सिंग - चुंग हुई (Revive China Society) :

आपल्या सुधारणा प्रस्तावांना चीन सरकारने कोणताही प्रतिसाद दिला नाही हे पाहून डॉ. सेन यांनी फक्त देशभक्ती आणि मांचूविरोधी संघटनेच्या फंदात न पडता आधुनिकवादी, राष्ट्रवादी आणि राजेशाही – विरोधी संघटना स्थापन कण्याचे ठरविले. इ. स. १८९४-९५ मध्ये डॉ. सेन हवाई आणि हाँगकाँग येथे चीनच्या 'पुनरुजीवनवादी संघटना' (Hsing chung Hui) स्थापन केली. या संघटनेमध्ये चीनबाहेर असलेले चीनी रहिवासी आणि ख्रिश्चन आणि त्यांचे नेतृत्व सन यत सेन सारखे मिशनरी शिक्षण घेतलेल्या तरूण वर्गाकडे दिले. सुरूवातीला त्यांचे फक्त १५० सदस्य होते. त्यांनी मांचू राजांची हकालपट्टी, चीनी जनतेचे राज्य आणि प्रजातंत्र बहाल करण्याची शपथ घेतली.

मध्य चीनच्या अनेक भागांनमध्ये सिंग चुंग हुई संघटनेच्या शाखा उघडल्या गेल्या. संघटनेच्या सदस्यांनी लोकांना जीवनावश्यक वस्तूंच्या उत्पादनाच्या सुधारित पद्धतींचे शिक्षण देण्यास सुरूवात केली. चीनच्या बाहेर राहणाऱ्या चीनी लोकांनी हाँगकाँग सारख्या ठिकाणी उठाव करायचे आणि चीनच्या मुख्यभूमीत लढाई करण्यासाठी गुप्त संघटनेंचे सशस्त्र सदस्य पाठवावेत अशी गुप्त योजना बनवली गेली. इ. स. १८९४ – ९५ च्या चीन-जपान युद्धाने निर्माण

झालेल्या गोंधळाचा फायदा उठविण्यासाठी डॉ. सेन यांनी कँटन येथील शासनावर कब्जा मिळविण्यासाठी इ. स. १८९५ मध्ये प्रथम उठाव करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना त्यात अपयश आल्यामुळे ते जपानला पळून गेले. त्यांनी तेथे मित्र बनविले आणि आपल्या प्रयत्नांत गुप्त संघटना Revive China Society साठी आर्थिक व नैतिक पाठबळ मिळविले.

३.७ डॉ. सेन यांचा परदेश प्रवास

इ. स. १८९५ नंतर डॉ. सेन यांनी पश्चिमी देशांची सहानभूती आणि अनिवासी चीनी जनतेचा अधिकाधिक पाठिंबा मिळविण्यासाठी अनेक देशांत प्रवास केला. डॉ. सेन यांच्या मते, चीनमध्ये यशस्वी क्रांती करायची असेल तर कृतीशील परकीय मदत किंवा निदान मैत्रीपूर्ण परकीय अलिप्तता आवश्यक आहे. त्यामुळे त्यांनी परकीय सत्तांना अशी खात्री दिली की, त्यांचे व्यापारी आणि मिशनरी हितसंबंध भ्रष्टाचारी मांचू राजांपेक्षा नवीन प्रजातंत्र अधिक चांगल्या प्रकारे जोपासेल. त्यांनी असेही आश्वासन दिले की, क्रांतीकारी स्थापित प्रजातंत्र सरकार परकीयांना अधिक फायदेशीर होईल. एवढे प्रयत्न करूनही डॉ. सेन यांच्या क्रांतीकार्याला परकीय राष्ट्रांकडून फारसा प्रतिसाद मिळाला नाही. इ.स. १८९६ – ९८ मध्ये डॉ. सेन युरोपमध्ये होते. इ. स. १८९६ मध्ये ते आपला अभ्यास पूर्ण करण्यासाठी आणि पाश्चिमात्य ज्ञान अद्यावत करण्यासाठी लंडनला गेले. लंडनमध्ये असताना चीनी वकीलातीमधील काही मांचू अधिकाऱ्यांनी त्यांचे अपहरण केले. परंतु आपल्या इंग्लिश मित्रांच्या मदतीने त्यांची सुटका करण्यात आली. त्यांनतर त्यांनी अपहरण नाट्याची कथा प्रकाशीत केली आणि एका रात्रीतच ते चीनी क्रांताकारी म्हणून प्रसिद्धीच्या झोतात आले. ही घटना म्हणजे डॉ. सन् यत सेन यांचा मांचू राजवट उध्वस्त करणे व त्यांच्या कार्यास पाठींबा मिळविणे यासाठी योजनाबद्ध प्रयत्न होता.

३.८ तुंग – मेंग हुई (The Revolutionary Alliance, १९०५)

इ.स. १९०० मध्ये मायदेशी परतल्यावर डॉ. सेन यांनी मांचू विरोधी आपला प्रचार चीन इंडोचायना, मलाया, फिलीपाईन्स आणि जपान येथे चालू केला. बॉक्सर उठावा दरम्यान त्यांनी मांचू शासनाचे अधिकारी (मंत्री) ली हुंग चँग यांनी राजांची सेवा करणे बंद करून प्रजातंत्र सरकारला पाठींबा देण्याचे आवाहन केले. इ. स. १९०० नंतर सशस्त्र क्रांतीद्वारे प्रजातंत्र निर्माण करणे आणि राष्ट्रवाद जोपासणे हे दोन प्रमुख राजकीय उद्देश डॉ. सेन यांचे होते.

मांचू सुधारणा कार्यक्रम सुरू असताना डॉ. सेन यांनी सिंग चुंग हुई (Revive China Society) चे तुंग मेंग हुई (The Revolutionary Alliance) म्हणून संघटन केले. इ. स. १९०५ - ०६ दरम्यान जवळजवळ १००० लोक तुंग – मेंग हुई चे सक्रीय सदस्य बनले. त्यांमध्ये ९० टक्के सदस्य जपानमधील अनिवासी चीनी होते. त्यामध्ये सुद्धा बहुतेक विद्यार्थी आणि बुद्धिवादी असून जवळजवळ चीनच्या सर्व प्रांतांतील सदस्य होते. नवीन संघटनेने (Tung Meng Hui) प्रजातंत्र तत्तवप्रणाली शिकवण्यास सुरूवात केली. सदर संघटनेची प्रथमिक व सर्वात महत्त्वाची उद्दिष्ट्ये म्हणजे – १) मांचू राजवट उलथवून टाकणे, २) प्रजातंत्र बहाल करणे आणि ३) संसदीय शासन प्रणालीचा स्विकार करणे ही होती. याव्यातिरिक्त संघटनेचा सहा कलमी कार्यक्रमसुद्धा होता. त्यामध्ये पुढील बाबींचा समावेश होता.

१) मांचू राजांची सत्ता उध्वस्त करणे.
२) प्रजातंत्र स्थापन करणे.
३) जागतिक शांततेचे पालन करणे.
४) जमिनीचे राष्ट्रीयीकरण करणे.
५) जपान बरोबर सहकार्य वाढविणे आणि
६) क्रांतीकारी चळवळीला जागतिक पाठींबा मिळविणे.

डॉ. सन यत सेन यांच्या पहिल्या आधुनिक राजकीय क्रांतीचा सिद्धांत आपल्या त्यांच्या इ. स. १९०५ मध्ये टोकीयो येथे स्थापन झालेल्या तुंग मेंग हुई या संघटनेच्या जाहिरनाम्यांमध्ये सापडतो. सदर संघटनेचे अधिकृत मुखपत्र मीन पाओ (The People) हे सुद्धा टोकीयो येथूनच प्रकाशित केले जात होते. त्याचा उद्देश सांविधानिक राजेशाहीच्या विरोधात प्रजातंत्र सिद्धांत आणि क्रांतीकारी मार्गाचे समर्थन करणे हा होता.

३.९ लोक तत्वत्रयी (Three Principles of the People)

डॉ. सेन यांनी पुढे जनतेची त्रि – तत्व प्रणाली (San – Min – Chu - i) विकसित केली. चीनला राष्ट्रराज्य बनवणे, लोकशाही शासन प्रदान करणे आणि लोकांच्या उपजिविकेची योग्य साधने निर्माण करणे हे या त्रि – तत्व प्रणालीमागचे डॉ. सेन यांचे उद्देश होते. ही त्रि - तत्व प्रणाली पुढील प्रमाणे आहे.

१) राष्ट्रवाद (Min – tsu – chu - i) :-

सुरूवातीच्या काळात राष्ट्रवादाचा उद्देश फक्त मांचू सत्ता नष्ट करणे एवढाच होता. परंतु पुढे १९१२ सालानंतर डॉ. सेन यांच्या असे ध्यानात आले की, केवळ मांचू सत्ता नष्ट केल्याने चीनला राष्ट्रराज्याचा (Nation State) दर्जा मिळणार नाही. त्यामुळे प्राचीन सांस्कृतिक एकतेच्या जागी सर्व चीनी समाजाची मजबूत राजकीय एकता तयार होणे आवश्यक आहे. डॉ. सन यत सेन यांच्या मते, लोक एका वाळूच्या ढील्या पट्टीप्रमाणे आहेत आणि त्यामुळेच त्यांच्यामध्ये एकी नाही. त्यामुळे ही सुट्या वाळूची पट्टी एकत्र बांधण्यासाठी 'राष्ट्रवाद' नावाच्या सिमेंटसारख्या घटकाचा उपयोग करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे डॉ. सेन यांनी मांचू, मंगोल, तिबेटी आणि इतर नगण्य गटांना एकत्र आणण्यासाठी राष्ट्रवाद तत्त्वावर भर दिला. मूळातच हा राष्ट्रवाद काही मांचू – विरोधी किंवा परकीय- विरोधी सुद्धा नव्हता. त्याचा खरा अर्थ लोकांची कूळ – कुटुंब- गाव यांच्याशी असलेली पारंपारिक निष्ठा काढून घेऊन ती 'राजकीय राष्ट्रराज्य' याच्याशी मिळवणे हा होता. शेवटी राष्ट्रवाद हा साम्राज्यवाद विरोधी व वसाहतवाद विरोधी बनला. त्यामुळेच डॉ. सेन यांना एकीकृत राष्ट्रीय आघाडीद्वारे अंतर्गत व बाह्य शक्तींचे संघटन आवश्यक वाटत होते.

२) लोकशाही (Min – chuan – chu - i) :-

'मिन चुआन' याचा शब्दशः अर्थ म्हणजे लोकांची सत्ता किंवा लोकशाही. डॉ. सेन यांनी इ.स. १९०५ मध्ये सांविधानिक राजेशाहीच्या पाठीराख्यांवर हल्ला करतानाच लोकशाहीची कल्पना उचलून धरली होती. पुढ इ.स. १९२४ मध्ये त्यांनी लोकशाही तत्त्वाचे विश्लेषण केले आणि त्यामागे चार गोष्टींचा सहभाग होता. तो म्हणजे –

१) पाश्चिमात्य प्रजातंत्रवाद
२) स्वित्झर्लंडची पुढाकार, सार्वमत, निवडणूका आणि परत बोलावणे म्हणजेच(Initiative, Referendum, Elections & Recall) ही तत्त्वे.
३) रशियाचा लोकशाही केंद्रीकरण आणि
४) परीक्षा व नियंत्रण ही चीनची तत्वे.

डॉ.सन यत सेन यांचा निवडणुकीच्या तत्वाने सरकारवर लोकांचे नियंत्रण प्रस्थापित होऊ शकते असा विश्वास होता. त्यानंतर सरकारवरील नियंत्रण ठेवण्यामध्ये सार्वमत, पुढाकार आणि निवडून दिलेल्या प्रतिनिधींचे कार्य असमाधानकारक आढळल्यास लोकांनी त्यास परत बोलावण्याच्या पद्धतींचा समावेश करता येतो. आपले प्रशासन प्रभावीपणे चालविण्यासाठी सरकारकडे शक्तीशाली कार्यकारी अधिकार असणे आवश्यक आहे.

डॉ. सेन यांच्यामते, राजकीय सत्ता पाच गोष्टींद्वारे अंमलात आणली जाऊ शकते. त्यामध्ये –

१) कार्यकारीमंडळ (Executive Body)
२) विधानमंडळ (Legislative Body)
३) न्यायमंडळ (Judiciary)
४) परीक्षामंडळ (Examination) आणि
५) मुद्रण परीक्षण यांचा समावेश होतो. (Censorship)

वरील पाच पैकी तीन मंडळे पाश्चिमात्य देशांच्या राज्यपद्धतीमध्ये अत्यंत लोकप्रिय व प्रचलित आहेत. परंतु शेवटची दोन म्हणजे परीक्षा आणि मुद्रणपरीक्षा ही दोन मंडळे प्राचीन चीनच्या कन्फ्युशियन विचारसरणीमधील आहेत.

डॉ. सेन यांनी लोकशाहीचा विकास तीन वेगवेगळ्या अवस्थामधून सांगितला आहे. त्यामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो.

१) सैनिकी लष्करी कारवाई, सत्ता आणि नियंत्रण.
२) दुसऱ्या अवस्थेमध्ये लोकांवर राजकीय नियंत्रण असेल आणि त्यांना आपले हक्क बजावण्याचे प्रशिक्षण मिळेल. ही लोकशाही प्रक्रीया स्थानिक पातळीवरून सुरूवात होईल आणि ती राष्ट्रीय लोकशाहीपर्यंत पोहचेल. आणि
३) शेवटच्या टप्प्यामध्ये ज्यावेळी लोक आपले लोकशाही हक्क राष्ट्रीय पातळीपर्यंत बजावण्यामध्ये प्रशिक्षित होतील त्यावेळी सांविधानीक (घटनात्मक) आणि लोकशाही सरकारची खऱ्या अर्थाने स्थापना होईल.

३) उपजिविका (Min – sheng – chu - i) :-

या शेवटच्या तत्वामध्ये डॉ. सेन यांच्यावर प्रभाव पडलेल्या अनेक सिद्धांतांचा व तत्वप्रणालींचा समावेश होतो. हे तत्व डॉ. सेन आणि त्यांच्या अनुयायांनी नेहमीच मार्क्सच्या समाजवादासारखेच वापरले. परंतु ते मार्क्सच्या मूळ तत्वज्ञानाने प्रभावित झालेले नव्हते. डॉ. सेन यांनी मार्क्सच्या 'वर्ग संघर्ष' आणि 'आर्थिक तत्वज्ञान' या तत्वांचा स्विकार केला नव्हता. चीनमध्ये उद्योग विकासाला चालना देण्यासाठी डॉ. सेन यांनी 'जकात स्वायत्ततेची' आणि

'संरक्षक जकातीची' अंमलबजावणी यांवर भर दिला. त्यांनी शेती क्षेत्राच्या तत्रज्ञान सुधारणेच्या व अंमलबजावणीवर भर दिला.

३.९.१ आपली प्रगती तपासा :-

१) डॉ.सन् यत् सेन यांचे सुरूवातीचा जीवनप्रवास थोडक्यात सांगा.
२) डॉ. सन् यत् सेन यांच्या एका गुप्त संघटनेबद्दल माहिती लिहा.
३) डॉ. सन् यत् सेन यांनी कोणती तीन तत्वे शिकविली ?

_____

_____

_____

_____

_____

३.१० समारोप

इ. स. १९११ ची चीनची राज्यक्रांती ही चीनच्या राष्ट्रवादाच्या उदयाचे एक महान द्वार मानले जाते. राष्ट्रवादामागील शक्तींचे भरण – पोषण हे गुप्त संघटनांच्या कार्याने आणि डॉ. सेन् यत् सेन यांच्या तत्वज्ञानाने केलेले होते. त्यामुळेच या शक्तींनी मांचू घराण्याच्या शेकडो वर्षांची जुलमी राजवट इ. स. १९११ च्या राज्यक्रांतीने उध्वस्त करून टाकली.

३.११ प्रश्न

१) इ. स. १९११ च्या चीनच्या राज्यक्रांकीचा सामाजिक उदय स्पष्ट करा.
२) चीनी राष्ट्रवादाची सामाजिक पार्श्वभूमी विशद करा.
३) डॉ.सन् यत् सेन यांचा एक क्रांतीकारी म्हणून भूमिकेचे मूल्यमापन करा.
४) डॉ. सेन यांच्या एक समाजसुधारक ते क्रांतीकारी या परिवर्तनाचा परामर्श घ्या.

❖❖❖

४

सुधारणा आणि राज्यक्रांती – २
इ. स. १९११ ची चीनची राज्यक्रांती

घटक रचना :

४.० उद्दिष्ट्ये
४.१ प्रस्तावना
४.२ इ.स. १९११ च्या चीनच्या राज्यक्रांतीची कारणे
४.३ इ.स. १९११ च्या चीनच्या राज्यक्रांतीची व्याप्ती
४.४ इ.स. १९११ च्या चीनच्या राज्यक्रांतीचे परिणाम
४.५ समारोप
४.६ प्रश्न

४.० उद्दिष्ट्ये

१) इ.स. १९११ च्या राज्यक्रांतीची कारणे अभ्यासणे.
२) इ.स. १९११ च्या राज्यक्रांतीची व्याप्ती समजून घेणे.
३) इ.स. १९११ च्या राज्यक्रांतीच्या परिणामांचे विश्लेषण करणे.

४.१ प्रस्तावना

२० व्या शतकाच्या उदयास चीनची सामाजिक – राजकीय परिस्थिती ही राज्यक्रांतीसाठी पोषक बनली होती. त्या परिस्थितीमध्ये दुर्बळ मांचू राजे, परकीय साम्राज्यवाद, आर्थिक शोषण, पाश्चिमात्य उदारमतवादाचा प्रभाव, वाढती लोकसंख्या आणि त्याचा जमिनीवरील बोजा, पुरवठा तुटवडा, शेतकऱ्यांचे दारिद्र्य, उच्च कर पद्धती, नैसर्गिक आपत्ती इ. गोष्टींनी भर घातली व चीनच्या राज्यक्रांतीस अनुकूल वातावरण तयार झाले. तरीसुद्धा वास्तव पाहता चीनच्या राज्यक्रांतीचे बीज कन्फ्युशियन विचारसरणीमध्ये दडलेले आपणास दिसून येते. त्यानुसार चीनचा साम्राट हा स्वर्गीय आदेशानुसार राजगादीवर बसलेला असतो. त्या बदल्यात त्याने आपल्या प्रजेकरीता शांतता व सुव्यवस्था आणि कल्याण राखणे जरूरीचे असते. सम्राटास केवळ सामाजिक व राजकीय गोंधळासाठी जबाबदार धरता येत नाही तर पूर, दुष्काळ आणि भूकंप यांसारख्या नैसर्गिक आपत्तीसाठी सुद्धा जबाबदार धरावे लागते. त्यामुळेच सम्राट आपली ही जबाबदारी पूर्ण करू शकला नाही म्हणून जनतेला त्याच्याविरूद्ध बंड करून त्याच्या जागी नवीन सम्राटाची नेमणूक करणे आवश्यक होते.

४.२ इ.स. १९११ च्या चीनच्या राज्यक्रांतीची कारणे

४.२.१ मांचू घराण्याचा ऱ्हास :

इ.स. १६४४ पासून ते १८ व्या शतकाच्या शेवटीपर्यंतच्या काळात मांचू राजांची चीनवरील दीर्घकाळ चाललेली सत्ता ऱ्हास पावत होती. राजगादीवर अज्ञान मुलापासून चैनी व विलासी आणि दुर्बळ राजांनी सत्ता भोगल्यामुळे राजेशाहीची पत पूरती खालावली होती. त्यामुळे १९ व्या शतकाच्या अंतापर्यंत मांचू घराण्यात एकही पराक्रमी सम्राट नव्हता. राजदरबार आणि राजमहालात स्त्रिया, तृतीय पंथी, वेश्या, अकार्यक्षम, भ्रष्ट अधिकारी आणि दरबारी यांचाच जास्त भरणा झाला होता. अशा परिस्थितीत मांचू राजे लोकांच्या अपेक्षेप्रमाणे राजकीय नेतृत्व देण्यात असमर्थ ठरले होते. प्रशासनाकडे राजाचे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले होते आणि कामचुकारपणा, भ्रष्टाचार यांनी प्रशासनाची जागा घेतली होती. नागरी सेवा भ्रष्टाचार आणि आळशीपणा यात पूरती बुडली होती. केंद्रीय सत्तेचे नियंत्रण नसल्यामुळे प्रांतामध्ये सुद्धा भ्रष्टाचार व कुप्रशासन चालू होते. प्रांतातील सामान्य माणसांना लाचखोरी, शोषण, खंडणी, चुकीची न्यायप्रणाली आणि मानवनिर्मित दुष्काळ यांना सतत सामोरे जावे लागत होते.

जनतेचे बंड दडपण्यासाठी व शासनाच्या खर्च भागवण्यासाठी मांचू दरबाराने तर सरकारी पदांचे लिलावच काढले होते. त्यामुळे प्रत्येक माणसाची सरकारी नोकरी करण्याची शर्यत लागली आणि सरकारी नोकरी मिळाल्यावर ते जनतेकडून भ्रष्टाचार, लाचखोरीने पैसा लुटीत असत. राजकीय सत्ता एवढी भ्रष्टाचारी बनली होती की, पेकींगवरसुद्धा राजे नियंत्रण ठेवू शकत नव्हते. त्यामुळे प्रांतातील राजकरणी केंद्रीय सत्तेचे काही ऐकत नव्हते आणि इ.स. १८५१ – ६४ च्या तायपिंग बंडा पासून ह्याचे प्रमाण फार वाढले होते. त्यावेळी बंड दडपण्यासाठी मांचू राजांनी प्रांतीय सेना निर्माण करण्याची परवानगी व प्रोत्साहन दिले होते. त्यामुळे ही प्रांतीय सेना स्थानिक जनता, स्थानिक पैसा, स्थानिक नेते यांच्याद्वारे चालविली जात होती. त्यामुळे त्सेंग कुओ फान आणि ली हंग चँग यांसारख्या स्थानिक नेत्यांच्याच नियंत्रणाखाली ती सेना काम करीत असे. त्यामुळेच राजधानी पेकींगचे निर्देश ते पाळत नव्हते. याच कारणास्तव इ.स. १९११ मध्ये प्रांताना स्वातंत्र्य देण्यात आले होते.

मांचू राजे दुर्बळ असल्यामुळे ते चीनमध्ये येणाऱ्या परकीयांना बंदरांवरील नियंत्रणाचे करार करण्यापासून (Treaty Port System) आणि इतर सोयीसुविधा मिळवण्यापासून रोखू शकले नाहीत. एवढेच नाही तर त्यांना चीनचे नियंत्रणसुद्धा न पाळण्याची मुभा दयावी लागली होती. तशातच अफू युद्ध आणि तायपिंग बंड यामुळे तर चीनची लष्करी कमजोरी पूर्णपणे उघडी पडली आणि त्याची परिणती शेवटी मांचू राजांच्या ऱ्हासात झाली.

४.२.२ आर्थिक व सामाजिक कारणे :-

बऱ्याच वेळेस आर्थिक घटक हे स्थानिक बंडांना कारणीभूत झालेले आढळतात. सुरूवातीच्या आणि मधल्या मांचू घराण्याच्या काळात चीनमध्ये बऱ्यापैकी शांतता होती. त्यामुळे चीनच्या लोकसंख्येत वाढ झाल्याचे दिसते. वाढत्या लोकसंख्येचा भार तुटपुंज्या जमिनीवर आला आणि ही जमीन शक्तीशाली जमीनदार वर्गाच्या कब्जात एकवटली होती. तसेच मांचूरियासारख्या विस्तीर्ण भूभागात जाणे किंवा इतर ठिकाणी पर्यायी जमीन किंवा कामधंदा करण्यासाठी चीनी जनतेवर काही बंधने लादण्यात आली होती. तशातच चीनमध्ये वाढत्या

बेकारीस कामधंदा देण्यासाठी उद्योगधंदेसुद्धा नव्हते. लोकांच्या राहणीमानाचा दर्जा खालावला होता. त्यामुळे चीनी जनता विषमता आणि गरीबीच्या विळख्यात अडकली होती.

जनताच मुळात गरीब असल्यामुळे मांचू राजांना मिळणारा कर महसूल कमी होता. त्यातच जो काही कर सरकारी अधिकारी जमा करीत त्यातला बरासचा भाग भ्रष्टाचाराच्या मार्गांनी ते फस्त करून टाकीत असत. चीनच्या नोकरशाहीच्या भ्रष्टाचाराचा सर्वात जास्त फटका शेतकरी वर्गाला बसत असे. कर महसूल एखाद्या खंडणी प्रमाणे वसूल केला जात असे. कर हा रोख आणि वस्तूविनिमय या दोन्ही माध्यमांनी भरला जात असल्यामुळे भ्रष्ट अधिकारी निर्धारीत कराच्या दुप्पट – तिप्पट कर वसूल करत असत. त्यामुळे या अडाणी शेतकरी वर्गाने मांचू राजाकडे पूरती पाठ फिरवली आणि त्यांच्या विरोधात उभे ठाकले. जेव्हा या शेतकरी वर्गाने उघडपणे बंड केले तेव्हा शमविण्यासाठी मांचू राजांना फार मोठी किंमत मोजावी लागली आणि त्याचा प्रत्यक्ष परिणाम आर्थिक स्थिती अधिकाधिक खालावण्यावर झाला. १९ व्या शतकाच्या मध्यास राजकीय विकेंद्रीकरणाचे प्रमाण वाढले आणि केंद्रीय प्रशासनाला प्रांतीय सरकारकडून कर वसूल करणे अधिकाधिक कठीण झाले. किंबहुना, अशक्य झाले. अकार्यक्षम प्रशासनामुळे आर्थिक नियोजन ढासळले. मग ही परिस्थिती सावरण्यासाठी सरकारने करांचे दर वाढवले आणि हे कर वसूल करून देणाऱ्या अधिकाऱ्यांना सरकारी नोकऱ्या अक्षरशः विकण्यात आल्या. त्यामुळे भ्रष्टाचार बोकाळला गेला. सामाजिक परिस्थिती दयनीय झाली आणि शेवटी जनतेनेच बंड करण्यास सुरूवात केली.

चीनमधील आर्थिक मंदीस वारंवार येणारे पूर, दुष्काळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तीसुद्धा जबाबदार होत्या. त्यातच जमिनदारीचे वाढते प्रमाण, लघुउद्योग व हस्तोद्योग यांचा ऱ्हास यांमुळे बेकारीचे प्रमाण भलतेच वाढले. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात तर स्वस्त अशा परकीय मालाने चीनची बाजारपेठ काबीज केली त्यामुळे चीनची ग्रामीण मालबाजारपेठ बंद पडली. पर्यायी व्यवसाय नसल्यामुळे चीनी जनतेला आपल्या उदरनिर्वाहासाठी केवळ शेतीवरच अवलंबून राहावे लागले. तशातच शेतीमधील फक्त पारंपारिक शेतीतंत्राचा अवलंब चालू राहिल्यामुळे शेतीचे उत्पन्न सुद्धा फारसे वाढत नव्हते.

चीनची तिजोरी तर दिवाळखोरीच्या मार्गावरच होती. चीनला आपला महसूल नवीन सैन्य उभारणी, नवीन रेल्वेबांधणी, नवीन शिक्षण पद्धती यांवर खर्च करावा लागत असे. इ.स. १८९४ – ९५ च्या चीन – जपान युद्धातील पराभवामुळे चीनला जपानला फार मोठी रक्कम युद्धखर्च म्हणून द्यावी लागली. तसेच बॉक्सर बंड दडपण्यासाठी सुद्धा चीनला आपल्या तिजोरीतून पैसा खर्च करावा लागला. त्याच्या परिणामी देशाच्या उत्पन्नाचे साधनच संपुष्टात आले होते. त्यामुळे सरकारला जनतेवरच कराराचा बोजा टाकावा लागला आणि लोकांत मांचू राजांविरूद्ध असंतोष आणि चीड निर्माण झाली.

४.२.३ सुधारणा कार्यक्रमाचे अपयश :-

कांग यु वाई यांच्या मार्गदर्शनाखाली इ.स. १८९८ साली चीनी सम्राट कुआंग सू याने शंभर दिवसांचा सुधारणा कार्यक्रम राबविण्यास घेतला खरा परंतु परंपरावादी गटाचे नेतृत्व स्वतःच विधवा महाराणी त्सू सी करीत असल्यामुळे त्यांनी कडवा विरोध करून अल्पकाळातच या सुधारणा हाणून पाडल्या. तशातच तिने राजाला आजारपणाच्या सबबीखाली कैद केले व राजघराणे सुधारणांसाठी अनुकूल नसल्याचे वातावरण निर्माण केले. त्यामुळे दक्षिण चीनमधील

कट्टरतावादी आणि परदेशात पळून लावलेल्या चीनी लोकांची अशी खात्री झाली की, चीनची वैभवशाली परंपरा विकास, वैभव जर पुन्हा प्राप्त करायचे असल्यास मांचू राजांना पायउतार करण्याशिवाय पर्याय नाही.

४.२.४ मांचू सुधारणा व परिणाम :-

विधवा महाराणी त्सू सी व तिच्या परंपरावादी गटाने सम्राट कुआंग सू आणि कँग यु वाई यांच्या शंभर दिवसांच्या सुधारणा कार्यक्रमास कट्टर विरोध केला असला तरी थोड्याच वर्षांनी चीनमधील प्राप्त परिस्थितीने महाराणीस सुद्धा सुधारणा कार्यक्रम राबविण्यास भाग पाडले. जर मांचू राजांची सत्ता पुढे टिकवायची असेल तर सुधारणा आवश्यक आहेत याचे तिला भान आले. त्यामुळे तिने मोठ्या मुत्सद्दीपणाचा वापर करून घटनात्मक राजेशाहीची स्थापना केली. त्यामुळे या महत्त्वपूर्ण परिवर्तनासाठी महाराणी त्सू सी ने आवश्यक आणि दूरदर्शी प्रशासनिक, न्यायालयीन आणि आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम हाती घेतला. त्याचबरोबर आधुनिक सैन्यरचना, औद्योगिक विकास, पारंपारिक नागरी सेवा परीक्षा रद्द करणे आणि नवीन शैक्षणिक योजनांना प्रोत्साहन देण्याचे प्रस्तावसुद्धा ठेवले होते. परंतु तिने पुढे केलेले प्रस्ताव पुरेसे नव्हते व जरा उशिरा केलेले असल्यामुळे ते तिच्यावरच बुमरँगसारखे पलटले व मांचू घराण्याच्या ऱ्हासास सुरूवात झाली.

मांचू राजाच्या (राणी त्सू सी पुरस्कृत) या सुधारणा वरकरणी चांगल्या दिसत असल्या तरी त्याने पुन्हा मांचू राजांचा कमकुवतपणा सिद्ध केला. सरकारला आपल्या मनाविरूद्ध जनमतापुढे झुकुन सवलती द्यावा लागल्या. परिणामतः मांचू राजांची प्रतिष्ठा कमी झाली, त्यांचे आसन डळमळीत झाले. ज्या उच्चशिक्षण संस्था कन्फ्युशियन विचारसरणीचे विद्वान घडवित होत्या त्या आता क्रांतिकारकांना पदवीचे शिक्षण देवून प्रशिक्षित करीत होत्या. जे नवीन सैन्य उभे करण्यात आले होते त्यामध्ये देशभक्तीने प्रेरित झालेले तरूण राष्ट्रवादाच्या भावनेने सुद्धा झपाटले होते आणि सतत राज्यक्रांतीची भाषा बोलत होते.

नवीन उद्योग व त्यांचे आधुनिकीकरण यामुळे चीनमध्ये एक नवीन वर्ग उदयास आला आणि तो म्हणजे व्यापारी आणि विद्वान – अधिकारी वर्ग होय. त्यांच्या गरजा आणि मूल्ये ही पारंपारिक राज्यकर्त्यांपासून वेगळी होती. या नवोदित वर्गाच्या प्रतिनिधींना नवीन निर्माण झालेल्या प्रांतीय विधानमंडळामध्ये सदस्यत्व मिळाले आणि राजकीय आंदोलनामध्ये ते एक नैसर्गिक केंद्र बनले. मांचू सुधारणा कार्यक्रमाचा आणखी महत्त्वाचा एक उद्देश हा होता की, केंद्रीय सत्ता अधिक शक्तीशाली बनवणे आणि प्रांतांवर त्याचे वर्चस्व राखून ठेवणे. परंतु सामान्य लोक, प्रांतिय नोकरवर्ग यांनी या मर्यादांना विरोध केला आणि स्थानिक संस्थाचे पारंपारिक हक्क व सवलती कायम राखण्याचे समर्थन केले.

४.२.५ पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रसार :-

सुरूवातीच्या काळात परंपरावादी प्रवृत्ती मुळे पाश्चिमात्य शिक्षणाला विरोध होत होता परंतु हळूहळू तरूणांना त्याची आवड निर्माण झाली. ख्रिश्चन मिशनरी प्रवृत्ती, पाश्चिमात्यांचे समुद्री – करार (Port Treaties) त्यामुळे लोकशाही आणि प्रजासत्ताकवाद यांसारख्या आधुनिक कल्पनांचा चीनला परिचय झाला. नव्हे, चीनी बुद्धिवंतांमध्ये त्या कल्पना अत्यंत लोकप्रियसुद्धा

झाल्या. त्याचप्रमाणे या बुद्धिवंत, प्रगतीशील वर्गावर फ्रेंच राज्यक्रांती (१७८९), इटली व जर्मनीचे एकीकरण यांसारख्या युरोपियन महान घटनांचा अत्यंत प्रभाव निर्माण झाला.

तशातच सततची लोकसंख्या वाढ व त्याचे परिणाम आणि चांगले भवितव्य यासाठी फार मोठे चीनी तरूण परदेशी (पश्चिमी देशांत) स्थलांतर करू लागले. त्यांचा तेथील आधुनिक युरोपियन कल्पनांशी सतत संपर्क आला. त्यांच्यावर स्वातंत्र्य, समता, बंधूता, प्रजासत्ताक, लोकशाही इ. उदार कल्पनांचा प्रभाव झाला. बरेच चीनी देशांतून हद्दपार झाले तर काही प्रशिक्षणासाठी जपानला गेले. जे चीनी क्रांतीकारी स्वत:हून परदेशी पळून गेलेले होते (जपानला) त्यांनी गुप्तपणे चीनी मांचू राजांविरूद्ध जनमत बनविण्यास व तशा कारवाया करण्यास सुरूवात केली. परदेशी उदार शिक्षणामुळे त्या देशभक्त तरूणांची मानसिकता मांचू विरोधी बनली व क्रांती कारण्यासाठी ते तयार होऊ लागले. त्यामुळे आधुनिक शिक्षण पद्धतीस प्रोत्साहन देऊन मांचू घराण्याने आपलीच कबर खोदल्याचा अनुभव त्यांना पुढे आला व त्यांचा ऱ्हास झाला.

४.२.६ सम्राट कुआंग सू आणि महाराणी त्सू सी यांचा मृत्यू :-

शंभर दिवसांचा सुधारणा कार्यक्रम रद्द करून विधवा महाराणी त्सू सी हिने सम्राट कुआंग सू यास कैद केले आणि तो आजारी असल्याचे कारण दाखवले होते. त्याचा १४ नोव्हेंबर १९०८ रोजी पेकींग येथे मृत्यू झाला. त्याच्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे १५ नोव्हेंबरला महाराणी त्सू सी आजारी पडली आणि तीसुद्धा काही तासांतच मरण पावली. त्यानंतर तिचा पणतू आदसिन पू यी ह्या तीन वर्षांच्या मुलास मांचू घराण्याचा वारस म्हणून सम्राटपदावर बसविले. त्याला सूआन तुंग म्हणून नाव धारण करावे लागले. त्याचा काळजीवाहू प्रशासक म्हणून त्याचा पिता राजपुत्र चून (सम्राट कुआंग सू चा लहान भाऊ) याने ताबा घेतला. तो दुर्बळ व असमर्थ होता. तरीही त्याने आपल्या भावाच्या तुरुंगवासाचा निषेध केला आणि सेनापती युआन शि काय यास सदर कटाचा सूत्रधार म्हणून संबोधिले. कारण त्यावेळेस चीनच्या राज्यकारभारातील अनेक महत्त्वाच्या बाबतीत युआन शि काय ह्याचाच हस्तक्षेप होता.

त्यामुळे प्रशासकाची (Regent) पहिली कामगारी ही की, त्याने युआन शि काय ह्यास पदावरून दूर केले. त्याच्यावर मांचूवादी (दरबारातील) गटाचा प्रभाव होता आणि हा गट कोणत्याही मंत्री किंवा अधिकाऱ्यावर विश्वास ठेवत नव्हता. त्यामुळे महत्त्वाच्या खात्यांमध्ये आपल्या नात्यातील व्यक्तींची मंत्री म्हणून नेमणूक करण्याचा त्याने सपाटा लावला. अशा परिस्थितीत सामान्य जनता विशेषत: सिशिक्षित वर्गाचा सदर राजावरचा विश्वास पूर्णपणे उडाला आणि त्याला बदलण्याची मानसिकता त्यांच्यात तयार झाली.

४.२.७ डॉ. सन् यत् सेन यांची भूमिका :-

खरे पाहता क्रांतीसाठीची चळवळ आणि प्रजासत्ताक मानसिकता ह्याची जडणघडण १९११ च्या क्रांतीच्या पंधरा वर्ष अगोदरच झाली होती. डॉ. सन् यत् सेन हे पाश्चिमात्य शिक्षित आणि ख्रिश्चन धर्मांतरीत झालेले विद्वान हेच या क्रांतीचे मुख्य शिल्पकार ठरले. जेव्हा डॉ. सन् यत् सेन यांनी तत्कालीन चीनचे व्हाईसरॉय ली हुंग चँग यांच्याकडे आपल्या सुधारणांचा प्रस्ताव ठेवला, तो त्यांनी मान्य केला नाही तेव्हाच मांचू सत्तेच्या विरोधात इ.स. १८९५ साली डॉ. सेन यांनी कँटन येथे उठाव केला आणि त्याच्यामुळेच त्यांना चीन सोडून जावे लागले होते.

त्यानंतर डॉ. सन् यत् सेन यांनी हाँगकाँग, मलाया, जपान आणि अमेरिका येथे वास्तव्य केले. तेथे त्यांनी आपल्या चळवळीकरीता आर्थिक निधी आणि तरूणांची भर्ती यासाठी कार्य केले. त्याचमुळे चीनच्या राज्यक्रांतीस सर्वात महत्त्वाचा आर्थिक पुरवठा हा परदेशी चीनी आणि व्यापारी ह्यांच्याकडून होत होता. या परकीयांच्या मते चीनची ही चळवळ खरी राष्ट्रवादी व चीनला अराजकापासून मुक्त करणारी आहे आणि त्यामुळेच त्यांनी क्रांतीकारकांना पैशाचा ओघ सतत चालू ठेवला.

इ.स. १९०५ साली डॉ. सेन यांनी टोकीयो येथे तुंग मेंग हुई या नावाने एक गुप्त संघटना स्थापन केली. त्या संघटनेचा मुख्य उद्देश जपान येथे उच्च शिक्षणासाठी आलेल्या चीनी तरूण विद्यार्थ्यांमध्ये क्रांतीकारी कल्पनांचा प्रसार करणे हा होता. इ. स. १९०६- ११ या दरम्यान डॉ. सेन यांच्या क्रांतीकारी अनुयायांनी मांचू राजांविरूद्ध जवळजवळ दहा वेळा उठाव केलेले होते परंतु ते सर्व अपयशी झाले होते. तसेच त्यांना अपेक्षित पाठिंबासुद्धा मिळत नव्हता. तरीसुद्धा सदर संघटनेच्या क्रांतीकारकांचे मनोबल न खचता भविष्यात यश मिळेल या आशेने ते चळवळ करीतच होते. २७ एप्रिल १९१० रोजी कँटन येथील दहावा उठाव अपयशी ठरल्यानंतर डॉ. सेन यांनी जपान सोडले आणि ते अनिवासी चीनी रहिवाशांकडे पाठिंब्यासाठी पहिल्यांदाच आग्नेय आशियाच्या दौऱ्यावर गेले. त्यानंतर ते क्रांतीकार्यासाठी पुरेसा निधी आणि पाठींबा मिळविण्यासाठी अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले.

४.२.८ तत्कालिक कारण – रेल्वेचे राष्ट्रीयीकरण :-

इ.स. १९११ च्या चीनच्या राज्यक्रांतीस जबाबदार ठरलेली घटना म्हणजे चीनच्या रेल्वेवरील नियंत्रणाचा वाद होय. बहुतेक चीनी जनतेच्या मते, रेल्वेच्या जाळ्यावरील परकीयांचे नियंत्रण ही चीनच्या स्वातंत्र्यामधील प्रमुख अडचण होती. त्यातच परकीयांनी काही रेल्वेमार्ग अर्धवट सोडून चीनी सरकारच्या हवाली केले होते. स्थानिक (प्रांतीय) शासनाने आपल्या प्रदेशातून सदर मार्गांच्या पूर्ततेसाठी काही निधी खर्च केला होता. दरम्यान मांचू सुधारणा कार्यक्रमनुसार तयार झालेली विधीमंडळे केंद्रीय शासनाच्या बाबतीत स्वतःच्या अधिकारांचे उल्लंघन होऊ नये यासाठी जागरुक होती. इ.स. १९११ च्या सुरूवातीस मध्य, दक्षिण आणि नैऋत्य चीनच्या रेल्वेबांधणीचे अधिकार 'रेल्वेचे राष्ट्रीयीकरण' या फतव्याद्वारे केंद्रीय शासनाने काढून घेतले होते. परंतु ह्याचे खरे कारण काही वेगळेच होते. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स आणि जर्मनी या बँकांकडून चीनी केंद्र शासनाने जे सहा दशलक्ष पौंडाचे कर्ज घेतले होते त्याच्या बदल्यात सदरचे रेल्वेमार्ग त्या बँकांकडे तारण म्हणून ठेवावयाचे होते.

त्यामुळे जनतेने रेल्वेमार्गांचे संरक्षण यासाठी आंदोलन सुरू केले. मे १९११ मध्ये प्रादेशिक रेल्वेमार्गाचे राष्ट्रीयीकरण करण्यासाठी आदेश काढल्यानंतर तर सिचुआन आणि अनेक मध्य चीनच्या प्रांतांमध्ये चळवळीने संवेदनशील स्वरूप धारण केले. त्याचाच परिणाम पुढे इ.स. १९११ च्या राज्यक्रांतीमध्ये झाला. सदरचे रेल्वेमार्गांचे राष्ट्रीयीकरण म्हणजे त्यावर केंद्रीय आणि प्रादेशिक नियंत्रणा ऐवजी परदेशी भांडवलाचा शिरकाव होऊन त्यांचे नियंत्रण येणार होते. सिचुआन प्रांतातील वेगवेगळ्या वर्गाचे लोक मूळतः क्रांतीकारी आणि राष्ट्रवादी चळवळीशी संबंधीत होते. त्यामुळे त्यांची चळवळ हीच पाश्चिमात्य – विरोधी, मांचू – विरोधी आणि निरंकूश सत्ता विरोधी होती. मध्य आणि दक्षिण चीनमध्ये सुरु झालेल्या या आंदोलनाच्या बातम्या जशा पसरत गेल्या तशा गुप्त संघटनासुद्धा या आंदोलनामध्ये सामील झाल्या. डॉ. सेन यांनी या संधीचा लाभ उठविण्याचे ठरविले आणि आंदोलनाची गती दुप्पट केली.

४.२.९ हँकाव्ह घटना :-

१० ऑक्टोबर १९११ रोजी हँकाव्ह बंदराजवळील रशियाच्या प्रभावक्षेत्रामध्ये असलेल्या एका घरामध्ये मोठा बॉम्बस्फोट झाला. त्याची चौकशी केली असता पोलिसांनी ते घर म्हणजे क्रांतीकारकांचे निवास (मुख्य ठाणे) आणि शस्त्रागार होते असे सांगितले. त्यामुळे पोलिसांनी डॉ. सेन यांच्या गुप्त संघटनेच्या (तेंग मेंग हुई) महत्त्वाच्या नेत्यांची धरपकड केली, अनेक अनुयायी तरूणांना पकडले आणि त्यांच्याकडील गुप्त कागदपत्रेसुद्धा जप्त केली. त्यामुळे धरपकडीतून पोलिसांच्या हाती सापडण्याअगोदर संघटनेच्या क्रांतीकारकांनी जोरदार आंदोलनास सुरूवात केली.

४.२.१० मांचुंग उठाव :-

हँकाव्ह येथील घटनेची माहिती व क्रांतीकारकांची धरपकड व आंदोलन वांचुंग पलटणीच्या अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचली. तेव्हा त्यांचा सेनापती ली युआन हुंग जो राजनिष्ठ होता त्याच्या शयनगृहामध्ये रात्रीच्या वेळी सदर वांचुंग पलटणीच्या अधिकाऱ्यांनी प्रवेश केला. त्याला पिस्तूलाचा धाक दाखवून 'क्रांतीमध्ये सामील हो अथवा मृत्यू' असे म्हणून धमकावले. तेव्हा ली ने क्रांतीमध्ये सामील होण्यास होकार दिला. १२ ऑक्टोबर १९११ च्या सकाळी मांचू घराण्याचा 'ड्रॅगन ध्वज' वांचुंग येथे उतरविण्यात आला आणि येथूनच इ.स. १९११ च्या चीनच्या राज्यक्रांतीची सुरूवात झाली.

४.२.१० आपली प्रगती तपासा :-

१) मांचू घराण्याच्या पतनास कोणते घटक कारणीभूत झाले ?

२) पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रभाव यावर चीनच्या राज्यक्रांती – १९११ संदर्भात टीप लिहा.

३) इ.स. १९११ च्या चीनच्या राज्याक्रांतीचे तत्कालिक कारण सांगा.

_____

_____

_____

_____

_____

४.३ इ.स. १९११च्या राज्यक्रांतीची व्याप्ती

४.३.१ राज्यक्रांतीचा प्रसार :-

संपूर्ण दक्षिण चीनमध्ये फौजांनी बंड केले आणि स्वतंत्र प्रशासनाची उभारणी केली. बऱ्याच शहरांमध्ये हे बदल शांतीपूर्ण झाले आणि काही प्रांतात राजाच्या गव्हर्नरांनीसुद्धा क्रांतीस पाठींबा दिला. दोन महिन्याच्या आतच मध्य, दक्षिण आणि वायव्य चीन प्रांतांनी आपले स्वातंत्र्य घोषित केले. परंतु पश्चिम चीनमध्ये प्रांतिक राजधानीमध्ये मांचू प्रभाव असल्यामुळे क्रांतीला काहीसे हिंसक वळण लागले. शेन्सी प्रांताची राजधानी सिआन येथे (प. चीन) 'एल्डर ब्रेदरन' या प्रभावशाली गुप्त संघटनेने मांचू – विरोधी अगदी पद्धतशीरपणे कारवाया करून मूडदे पाडले. तरीही, उत्तर चीन प्रांत अजूनही मांचू राजांशी एकनिष्ठ होता. २ डिसेंबर १९११ रोजी

क्रांतीकारी सैन्याने नानकींग शहरावर ताबा मिळविला आणि प्रजासत्ताक घोषित करून नानकींग त्याची राजधानी म्हणून स्थापन केली.

४.३.२ डॉ.सेन यांचे अमेरिकेहून चीनला आगमन :-

डॉ. सन् यत् सेन हे अमेरिकेच्या कोलारॅडो प्रांतातील डेन्वर या ठिकाणी वास्तव्यास होते. त्यावेळी राज्यक्रांतीच्या बातम्या त्यांना वर्तमानपत्रातून कळाल्या. त्यामुळे त्यांनी चीनमध्ये परतून राज्यक्रांतीचे नेतृत्व करण्याचे ठरवले. आपल्या परतीच्या प्रवासात ते मध्येच काही आर्थिक निधी जमविण्यासाठी लंडन येथे उतरले परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. त्यानंतर ते पॅरिसला उतरले. शेवटी २४ डिसेंबर १९११ रोजी डॉ. सेन शांघाय येथे चीनी प्रजासत्ताकाचे हंगामी अध्यक्ष बनण्यासाठीच पोहोचले आणि १ जानेवारी १९१२ रोजी नानकींग येथे त्यांनी आपल्या पदाचा कार्यभार घेतला.

४.३.३ युआन शि काई ह्यास परत बोलावणे :-

हतबल झालेल्या मांचू राजांनी युआन शि काई कडे मदत मागितली. कारण त्याच्या ताब्यात तत्कालीन चीनची प्रशिक्षित आणि शक्तीशाली फौज होती. त्याला चार वर्षांपूर्वीच अपमानास्पद वागणूक देऊन हाकलून लावले होते. तरीही सदर प्रसंगी लष्करावर नियंत्रण घेऊन त्याचा योग्य वापर युआन शि काई हाच करू शकतो अशी मांचू राजांची खात्री झाली होती. म्हणून मांचू राजांनी त्याला परत बोलावले. परंतु त्याच्या बदल्यात त्याने आपल्यासाठी फार मोठी सत्ता घेतली व जणू एक फायद्याचा सौदाच केला. त्याचवेळी त्याने क्रांतीकारकांशीसुद्धा बोलणी केली. त्यानुसार त्याने डॉ. सन् यत् सेन यांच्याबरोबर करार केला व चीनचे प्रजासत्ताक शासनात रुपांतर करण्यास पाठींबा देण्याच्या बदल्यात त्याच प्रजासत्ताकाचे अध्यक्षपद (प्रमुख) आपल्यालाच मिळावे अशी अट घातली व मंजूरही करून घेतली. अशाप्रकारे युआन शि काई ने आपल्या संधीसांधूपणाचा जणू कहरच केला.

४.३.४ मांचू घराण्याचा अस्त :-

मांचू घराण्यास कोणताही प्रतिकार न करता पायउत्तार व्हावे लागले. राजदरबार एकदम हतबल आणि निर्धन झाले होते. मांचू राजांबरोबर गुप्त वार्ता सुरु करण्याअगोदरच युआनने राजाचे शेवटचे आर्थिक अस्त्र म्हणजे राजाचा खजिना आपल्या ताब्यात घेतला. त्याने राज्याचा प्रशासक (Regent) याला समजाविले की, यापुढे क्रांतीकारकांशी दोन हात करण्यात किंवा प्रतिकार करण्यात अर्थ नाही आणि त्यामुळेच राजसत्ता सोडणे क्रमप्राप्त आहे. परंतु तो 'राजघराण्यास हितकारक व उदार वागणूक मिळेल यासाठी प्रयत्न करील' असेही आश्वासन दिले.

त्यामुळे क्रांतीकारी आणि राजघराण्यामध्ये जो करार झाला त्यानुसार राजकुटुंबास उदार वागणूकीची तरतूद होती. त्यानुसार राजाने कायदेशीररित्या आपले स्थान सोडावे व प्रजासत्ताक सरकारच्या ताब्यात सत्ता द्यावी. त्याच्या बदल्यात सम्राटास आपला किताब धारण करता येईल व राजदरबारसुद्धा ठेवता येईल. एवढेच नव्हे तर पदावनत सम्राटास आपला राजमहाल 'समर पॅलेस' सह परत मिळाला आणि आपली सर्व संपत्ती सुद्धा परत मिळाली. त्याला वर्षासन म्हणून ४ दशलक्ष डॉलर्सची तरतूद केली गेली. ही पदावनतीची प्रक्रीया एका अधिकृत राजकीय हुकूमाद्वारे १२ फेब्रुवारी १९९२ रोजी पार पाडण्यात आली. अशाप्रकारे इ.स. १९११ च्या

राज्यक्रांतीने मांचू घराण्याचा अस्त झाला आणि चीनमध्ये पहिल्या प्रजासत्ताकाची स्थापना करण्यात आली.

४.३.५ प्रजासत्ताकाचा विश्वासघात :-

१३ फेब्रुवारी १९९२ रोजी डॉ. सन् यत् सेन यांनी आपल्या हंगामी प्रमुख पदाचा (हंगामी अध्यक्ष) राजीनामा दिला आणि ठरल्यानुसार युआन शि काई यांस प्रजासत्ताक चीनच्या अध्यक्षपदी रितसर निवडून देण्यात आले. प्रजासत्ताकाचा अध्यक्ष आणि कार्यकारीणी ही पेकींगमध्ये स्थायिक झाले तर क्रांतीकारी परिषद अजूनही नानकींग येथेच होती. लोकशाही सरकार स्थापन करण्यासाठी संसद निर्मिती आणि संविधान समिती निर्माण करण्याच्या कामामध्ये क्रांतीकारी परिषद गुंतली होती. डॉ. सेन यांचा अत्यंत निष्ठावान व समर्थ अनुयाई सुंग चिआवो जेन याने तेंग मेंग हुई या गुप्त संगटनेचे विलय करून तिच्या जागी 'कोमिंगटांग' किंवा 'राष्ट्रवादी जनता पक्ष' या नावाने एका खुल्या संसदीय पक्षाची स्थापना केली. परंतु युआन शि काई यास आपली निवड होईल याची खात्री नसल्यामुळे त्याने 'रिपब्लिकन पार्टी' स्थापन केली.

फेब्रुवारी १९१३ मध्ये निवडणूका घेण्यात आल्या. प्रचंड भ्रष्टाचार होऊनही कोमिंगटांग पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले. त्यामुळे सुंग चिआवो जेन यास पंतप्रधान (प्रजासत्ताकाचे) पद मिळणे क्रमप्राप्त होते. परंतु त्यामुळे युआनच्या अध्यक्ष म्हणून सत्तेवर अंकूश आला असता. त्यामुळेच अचानक २० मार्च १९१३ रोजी सूंग चिआवो जेन याचा शांघाय रेल्वे स्थानकात खून करण्यात आला आणि शक्यतो, युआनच्याच इशाऱ्यावरून झाल्याचा संशय होता. जुलै महिन्यामध्ये कोमिंगटांगच्या समर्थकांनी मध्य व दक्षिण चीनमध्ये युआन शि काई विरूद्ध उठाव केले. परंतु ते सहजपणे दडपण्यात आले. इ.स. १९१३ च्या शेवटापर्यंत युआनने कोमिंगटांग पक्षाला बेकायदेशीर ठरवले. जानेवारी १९१४ मध्ये त्याने संसद भंग केली. त्यामुळे संसदीय सरकारचा चीनमध्ये शेवट झाला. युआनने आपल्या निवडक सदस्यांच्या बळावर एक वेगळी संसद स्थापन केली व त्याला 'राजकीय परिषद' असे संबोधले. १ मे १९१४ रोजी राजकीय परिषदेत नवीन राज्यघटनेचा प्रस्ताव ठेवला आणि त्याद्वारे अध्यक्षास सर्वअधिकार बहाल करण्यात आले. हे सर्व अधिकार म्हणजे विधवा महाराणी त्सू सी ने १९०८ साली सांविधानिक मांचू राजवटीवेळी जे मांचू सम्राटाकडे अधिकार राखून ठेवले होते त्यांचा समावेश होता.

४.३.६ युआन शि काई सत्तारूढ :-

युआनने प्रजासत्ताकाचा विश्वासघात करून स्वत:स अध्यक्ष करून घेतले आणि कोमिंगटांग पक्षास बेकायदेशीर ठरवून निरंकुश सत्ताधीश बनला. त्याने केवळ अध्यक्षपदच घेतले नाही तर राजकिताब सुद्धा धारण केला. इ.स. १९१४ च्या शेवटी फक्त सम्राटास अधिकार असलेला महायज्ञ युआनने रितीरिवाजाप्रमाणे स्वत:साठी करून घेतला. त्यावरून त्याचे हेतू स्पष्ट झाले. इ.स. १९१५ च्या सुरूवातीस त्याने 'कन्वेन्शन' भरवली. जेव्हा ऑगस्ट १९१५ रोजी कन्वेन्शन भरली तेव्हा तिच्या पदावर युआन शि काई यास आरूढ होण्यास आमंत्रित करण्यात आले आणि नवीन घराण्याची स्थापना झाली. त्याने रितीरिवाजाप्रमाणे तीनदा नकार दिला आणि नंतर 'जनतेच्या इच्छेखातर' राजपदाचा स्विकार केला. या नव्या घराण्याची घोषणा इ.स. १९१६ च्या पहिल्या दिवशी (नववर्षादिनी) करण्याचे ठरले.

दरम्यान प्रथम विश्व युद्ध चालू होते. पाश्चिमात्य महासत्ता युद्धामध्ये (युरोपात) गुंतल्या असल्याचा फायदा घेण्यासाठी जपानने युआनकडे प्रसिद्ध एकवीस मागण्यांची यादी सोपविली.

या मागण्यांमध्ये जपानने चीनच्या भूमीवर आपले वर्चस्व ठेवण्याबरोबरच चीन सरकारच्या महत्त्वाच्या खात्यांमध्ये जपानी सल्लागारांची नेमणूक केली पाहिजे अशी सुद्धा मागणी होती. तशातच युआनच्या घराणेशाहीला चीनी जनतेचा विरोध होता. सुशिक्षित वर्ग, लष्कर प्रमुख आणि प्रांतिक राज्यपाल यांचे वेगवेगळे उद्देश युआनला विरोध करण्यामागे होते. त्यामुळे अनेक प्रांतांमध्ये असंतोष आणि उठाव पसरू लगला. युआनने उठाव दडपण्यासाठी पाठवलेल्या सैन्याने सुद्धा लढण्यास नकार दिला. अशा गोंधळाच्या परिस्थितीत युआनने राज्यारोहण समारंभ तात्पुरता पुढे ढकलला आणि कायदा – सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी लक्ष केंद्रीत केले. परंतु प्रांतिक राज्यपाल आणि लष्करी अधिकारी त्याच्यापासून दूर गेले, बंडखोरांना जाऊन मिळाले. त्यांनी संयुक्तपणे दूरसंदेश पाठवून नवीन घराणेशाही व राजशाही रद्द करण्याची एकमुखाने मागणी केली. २२ मार्च १९१६ रोजी युआनने सिंहासन सोडून दिले, राजेशाही रद्द केली आणि अध्यक्षपदाचा कार्यभार ताब्यात घेतला. तरीसुद्धा त्याच्याविरूद्ध असंतोष कमी झाला माही. तो मात्र चिंता करूनच आजारी पडला आणि ६ जून १९१६ रोजी मरण पावला.

तसे पाहिल्यास युआन शि काईचे आयुष्य हे विश्वासघात व फसवणुक यातच गेले होते. त्याने चीनच्या (मांचू) सम्राटाचा विश्वासघात केला. त्याने मांचू घराण्याचा विश्वासघात केला. शेवटी तर त्याने डॉ. सन् यत् सेन आणि त्याच्या प्रजासत्ताकाचाही विश्वासघात केला. त्याचे अपयश आणि त्याचा अकाली मृत्यू याने तर चीनमध्ये अराजक, गृहयुद्ध आणि नवीन आडाख्यांना जन्म दिला. तरीही त्यामुळे चीनी राज्यक्रांतीचा पहिला टप्पा संपला, लोकशाही प्रजासत्ताकास अपयश आले आणि राजेशाहीच्या पुनर्स्थापनेच्या प्रयत्नाचा देखील शेवट झाला.

४.३.७ प्रजासत्ताकाचे पुनरूज्जीवन :-

युआन शि काई च्या मृत्यूनंतर ताबडतोब इ.स. १९१२ चे संविधान पुन्हा लागू केले गेले आणि प्रजासत्ताकाची पुनर्स्थापना केली गेली. ली युआन हुंग (उपाध्यक्ष) यास अध्यक्षपद बहाल केले आणि ट्युआन ची जुई यास पंतप्रधानपदी बसविण्यात आले. पंतप्रधान ट्युआन ची जुई याने सरकारमध्ये आपले प्रभुत्व निर्माण करून राजनिष्ठ सेनाधिकाऱ्यांच्या मदतीने पहिल्या महायुद्धात चीनने सहभागी व्हावे की नाही यावर मतभेद होऊन अध्यक्षासच पदावरून हकलून लावले. तशातच काही काळ मांचू राजांचे पुनरुज्जीवन झाले. अज्ञान मुलगा पू यी यास पुन्हा सम्राटपदावर बसविले. तरीसुद्धा ट्युआनने राजनिष्ठावंतांना पुन्हा हाकलून लावले आणि राजेशाही पुन्हा नष्ट झाली.

४.३.८ डॉ. सन् यत् सेन यांचे पुनरागमन :-

चार वर्षांपूर्वी शांघायमधून हद्दपार करण्यात आलेले डॉ. सन् यत् सेन चीनमधील अराजक, अनागोंदी, अस्थिरता, गटबाजी, युद्धपिपासूवृती, परदेशी हस्तक्षेप व त्यात जपानच्या मागण्या इ. नंतरच कँटन येथे परत आले. इ.स. १९२१ मध्ये त्याची दक्षिण चीनच्या प्रजासत्ताकाच्या अध्यक्षपदी पुन्हा निवड करण्यात आली. त्याचवेळी लष्करी गटांमधील भांडणांमुळे त्यांना पुन्हा कँटनमधून शांघाय येथे जावे लागले. परंतु वारंवार येणाऱ्या अपयशाने डॉ. सेन खचून गेले नाहीत. त्यांनी आपला वेळ कोमिगंटांग या पक्षाची संघटना बांधण्यामध्ये दिला. प्रजासत्ताकास समोरे जावे लागलेल्या समस्यांमुळे व त्यांचे विश्लेषण करून त्यांनी नवीन कृती कार्यक्रम योजला. प्रजासत्ताकास स्थैर्य मिळवून देण्यासाठी त्यांनी भावी डावपेच आखणी केली. त्यामध्ये सोव्हिएत संघाशी सलोखा, चीनी साम्यवादी पक्षाशी सहकार्य आणि कामगार व शेतकरी यांच्या समस्यांचे निराकरण यावर भर दिला. त्यातच १२ मार्च १९२५ रोजी त्यांचा

मृत्यू झाला. परंतु त्यांच्या हयातीमध्ये चीनचे प्रजासत्ताक राज्यामध्ये एकीकरण करण्याचे स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही. पुढे त्यांचा शिष्य चँग कै शेक याने व त्याच्या राष्ट्रीय सरकारने ही कामगिरी पार पाडली.

४.३.९ आपली प्रगती तपासा :-

१) इ.स. १९११ च्या राज्यक्रांतीने कोणकोणत्या भागात प्रभाव निर्माण केला ?

२) इ.स. १९११ मध्ये डॉ. सेन अमेरिकेहून चीनमध्ये का आले ?

३) युआन शि काई ने प्रजासत्ताकाचा विश्वासघात का केला ?

_____

_____

_____

_____

_____

४.४ इ.स. १९११ च्या चीनी राज्यक्रांतीचे परिणाम

चीनच्या इतिहासामध्ये इ.स. १९११ च्या राज्यक्रांतीस एक अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे चीनच्या राजकीय, आर्थिक व सामाजिक जीवनामध्ये दूरगामी परिणाम झाले. त्याने परंपरावादाचा नाश होऊन उदारमतवाद आणि आधुनिकतावाद यांची पायाभरणी केली. या राज्यक्रांतीचे परिणाम पुढील प्रमाणे सांगता येतील.

४.४.१ मांचू घराण्याचा शेवट :-

इ.स. १९११ ची राज्यक्रांती म्हणजे चीनच्या इतिहासावर मिळविलेला एक विजय होता. कारण चीनच्या राज्यावर जवळजवळ दोन हजार वर्षांची राजेशाही त्यातही मांचू राजघराणे हे शेवटचे अस्तित्वात होती व ती पिढ्यानपिढ्या एका घराण्याकडून दुसऱ्या घराण्याकडे चालत आलेली होती. परंतु ही राजेशाही पद्धतच १९११ च्या राज्यक्रांतीने नष्ट केली. ही राजेशाही आपल्या प्रजेस नेहमीच गृहीत धरीत आली होती आणि राजा सांगेल तीच पूर्व दिशा अशी पद्धती चीनमध्ये चालत आलेली होती. परंतु इ.स. १९११ च्या राज्यक्रांतीने सार्वभौम सत्ता ही राजाकडे नसून जनतेच्याच ताब्यात असावी हे सिद्ध केले.

४.४.२ प्रजासत्ताकाची स्थापना :-

घराणेशाहीचा व राजेशाहीचा चीनमधून शेवट झाल्यावर चीनमध्ये प्रजासत्ताकाची स्थापना करण्यात आली. त्याकाळात जगामध्ये प्रजासत्ताक ही सार्वत्रिक राज्यपद्धती नव्हती. उदा. इ.स. १९११ मध्ये संपूर्ण अशिया खंडामध्ये चीनव्यतिरिक्त कुठेही प्रजासत्ताक अस्तित्त्वात नव्हते. युरोपखंडामध्ये सुद्धा फक्त फ्रान्स आणि स्वित्झर्लंड या दोनच देशात प्रजासत्ताक अस्तित्वात होती. त्यामुळेच आशिया खंडामध्ये चीनच्या क्रांतीने देशाच्या राज्यपद्धतीमध्ये जो प्रयोग केला तो अत्यंत उल्लेखनीय बाब असल्याचे आपणास दिसून येते.

४.४.३ कन्फ्युशियन विचारसरणीची घसरण :-

चीनच्या राज्यक्रांतीने (१९११) चीनच्या राजकीय पद्धतीस लावलेला चाप यामुळे चीनच्या सामाजिक जडणघडणीमध्ये सुद्धा बदल होऊ घातले. त्यामुळे चीनी समाजावर असलेला कन्फ्युशियन विचरसरणीचा प्रभाव कमी होऊ लागला. राजेशाही आणि कन्फ्युशियन विचारसरणी हे चीनच्या राज्यपद्धताचे दोन अविभाज्य घटक होते. त्यामुळे इ.स. १९११ च्या राज्यक्रांतीने चीनी समाज व राज्यपद्धतीवरील कन्फ्युशियन विचारसरणीचा प्रभाव आजच्या परिस्थितीमध्ये आवश्यक नसून वेळेच्या मागणीनुसार त्याच्यामध्ये अपेक्षित बदल होणे आवश्यक आहे हे सिद्ध करून दाखवले. त्यानंतर इ.स. ४ मे १९११ च्या राज्यक्रांतीने कन्फ्युशियन आणि जीवनपद्धती यावर तत्कालीन समाजाच्या वतीने वैचारिक हल्ले केले गेले. त्यामुळे इ.स. १९११ च्या राज्यक्रांतीने इ.स. १९१९ च्या बुद्धिवादी क्रांतीसाठी जणू पायभरणीच केली होती असे आपणास आढळते.

४.४.४ पश्चिमात्यीकरण व आधुनिकीकरणाचा प्रसार :-

इ.स. १९११ च्या क्रांतीने चीनमध्ये प्रजासत्ताक सरकारची स्थापना झाली. त्यामुळे त्याचा पाया मूळातच पाश्चिमात्य विचारसरणीवर आधारित होता. त्यानंतर चीनच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक जीवनामध्ये पाश्चिमात्यीकरण आणि आधुनिकीकरण यांस जोरदार चालना मिळाली. त्यासाठी भविष्यामध्ये चीनी जनमत नवीन व आधुनिक कल्पनांचा स्विकार करण्यास मानसिकदृष्ट्या तयार झाले होते.

४.४.५ सामाजिक क्रांतीचा अभाव :-

इ.स. १९११ ची राज्यक्रांती राजकीयदृष्ट्या यशस्वी झाली असली तर सामाजिकदृष्ट्या ती अपयशी ठरली होती. या क्रांतीने चीनच्या राज्यकारभार आणि पारंपारिक राज्यसंरचनेमध्ये काही फारसे बदल केलेले नव्हते. मांचू राजा आणि त्याचे मंत्रिमंडळ अस्तित्वात नसले तरीही क्रांतीने पारंपारिक जमिनदारी नष्ट केली नव्हती. ते आजही चीनी ग्रामीण समाजावर आपला प्रभाव टिकवून होते. शिवाय युआन शि काई सारखे मांचूनिष्ठ लष्करी अधिकारीसुद्धा तग धरून होते. त्यामुळे क्रांतीकारी आणि बुद्धिवंत वर्गाच्या हातात सत्ता आली असली, तरीही या जमिनदार आणि लष्करी अधिकाऱ्यांपुढे त्यांचे काही चालत नव्हते.

दुसरे असे की, राज्यक्रांती काही ठराविक शहरांपुरतीच मर्यादीत होती. मांचू राजांना ताबडतोब पायउतार व्हावे लागले असले तरी ग्रामीण चीन हा अजूनही राज्यक्रांतीपासून व तिच्या प्रभावापासून अलिप्त होता. त्यामुळेच राज्यक्रांतीने केवळ राज्यपद्धतीमध्ये बदल झाले असले तरीही सामाजिक संरचना चीनमध्ये होती तशीच राहीली. ह्याचा परिणाम असा झाला की, शहरांचे तेवढे आधुनिकीकरण झाले आणि ग्रामीण जीवन मागास आणि परंपरावादीच राहीले.

४.४.६ प्रादेशिक विकेंद्रीकरण :-

इ.स. १९११ च्या राज्यक्रांतीने राजेशाही जशी नष्ट झाली त्याबरोबरच प्रांतांचे राजधानी पेकींगशी असलेले पारंपारिक संबंध तुटले. नवप्रजासत्ताक सरकार तेवढे प्रभावशाली व सर्वव्यापी नसल्यामुळे संपूर्ण चीनमध्ये आपले नियंत्रण प्राप्त करू शकले नाही. परिणामी स्थानिक – प्रांतिक बुद्धिवंत वर्गाचे राष्ट्रीय घडामोडीपासून लक्ष दूर गेले व ते स्थानिक आणि प्रांतिक राजकारणातच जास्त रस घेऊ लागले.त्यामुळे राष्ट्रवादाची भावना चीनी समाजामध्ये धीमी

झाली. त्यादृष्टीने पाहिल्यास इ.स. १९११ च्या क्रांतीने राजकीय विकेंद्रीकरणाची समस्या निर्माण झाली व त्यांना स्वातंत्र्याची अपेक्षा निर्माण झाली.

४.४.७ मांचू विरोधी ते साम्राज्यविरोधी भावना :-

इ.स. १९११ पूर्वी चीनच्या बुद्धिवादी वर्गाने चीनच्या सर्व राष्ट्रीय आणि सामाजिक समस्यांसाठी मांचू घराण्यास जबाबदार धरले होते. परंतु इ.स. १९११ नंतर मांचू फार काळ राज्य करू शकले नाही. त्यामुळे क्रांतीचा उद्देश जो मांचू विरोधी होता तो आता परकीय विरोधी व साम्राज्यविरोधी बनला. त्यादृष्टीने आधुनिक चीनी राष्ट्रवाद हा हळूहळू मांचूविरोधी स्थित्यंतर करून साम्राज्यविरोधी चळवळीचे स्वरुप धारण करु लागला.

४.४.८ चीनमध्ये परकीयांचा वाढता प्रभाव :-

इ.स. १९११ च्या राज्यक्रांतीने उदयास आलेले चीनी प्रजासत्ताक सरकार कमजोर आणि आपापसातील हेवेदावे यामुळे चीनमध्ये परकीय नियंत्रण अधिकाधिक वाढू लागले. उदा. परकीय मुत्सद्दी राजकारणी – व्यापाऱ्यांनी पेकींगमधील चीनच्या सामुद्रीक व्यापारावर पूर्णपणे नियंत्रण स्थापन केलेले असल्याचे आपणास आढळते.

४.४.९ बाह्य – मंगोलिया आणि तिबेटचे स्वातंत्र्य :-

चीनच्या प्रजासत्ताक सरकारची प्रभावहीनता आणि अतंर्गत गटबाजी व भांडण यामुळे चीनचे विभाजन झाले. त्यामुळे चीनचे पारंपारिक घटक असलेले बाह्य – मंगोलिया आणि तिबेट या प्रांतांनी स्वत:चे स्वातंत्र्य घोषित केले आणि चीनपासून वेगळे झाले.

४.४.१० ४ मे ची राज्यक्रांती :-

१९ व्या शतकामध्ये चीनमधील परकीय साम्राज्यवाद विरोधी चळवळीने चीनमध्ये परकीयांबद्दल एक प्रकारचा तिरस्कार निर्माण झाला होता. त्यामुळे पाश्चिमात्य वस्तूंबद्दल चीनी जनतेमध्ये एक नावड निर्माण झाली होती. परकीयांनी चीनमधून जावे यासाठी ती जनता आंदोलने करीत होती. तरीसुद्धा पहिल्या महायुदधानंतर पाश्चिमात्य शिक्षणाने प्रभावीत झालेल्या चीनी बुद्धिवंत वर्गाने एका नवीन राष्ट्रवादी चळवळीस सुरूवात केली. त्या आधुनिक चीनी राष्ट्रवादाचे वर्णन '४ मे ची चळवळ' किंवा '४ मे ची राज्यक्रांती' (May Fourth Movement) असे केले जाते.

ही ४ मे ची चळवळ विशेषत: शिक्षणक्षेत्रातील बुद्धिवाद्यांनी सुरू केली होती. त्याचे शक्तीस्थान विद्यार्थी आणि विद्यापीठांतील प्राध्यापक वर्ग होते. त्यासंदर्भात ४ मे १९११ रोजी पेकींग येथे विद्यार्थ्यांनी निदर्शने केली आणि त्यांनी पहिल्या महायुद्धानंतर घेण्यात आलेल्या पॅरिस शांतता परिषदेने शांटूंग प्रांतातील जर्मनीचे अधिकारक्षेत्र काढून जपानला हस्तांतरीत केल्याबद्दल निषेध – आंदोलन केले. या चळवळीने लवकरच राष्ट्रीय स्वरूप धारण केले, व्हर्सायच्या तहाचा निषेध केला आणि जपानी मालावर बहिष्कार घालण्याची घोषणा दिली. त्यामुळेच ४ मे ची चळवळ ही एका अर्थाने सांस्कृतिक पुनर्घटन आणि सामाजिक क्रांती होती. या चळवळीमध्ये केवळ राजकीय निषेध नव्हता तर पाश्चिमात्य विचारसरणीने प्रभावीत झालेली एक साहित्य चळवळ होती आणि वैज्ञानिक विचारसरणीचासुद्धा त्यामध्ये अंतर्भाव होता. हळूहळू ही चळवळ संपूर्ण चीनमध्ये पसरली व जवळजवळ तीन वर्षे चालू होती.

४.४.११ ४ मे च्या क्रांतीची फलनिष्पती :-

४ मे च्या क्रांतीने चीनी राष्ट्रवादाची पकड मजबूत झाली आणि बुद्धिवादी वर्गामध्ये लोकशाही संकल्पना अधिकाधिक लोकप्रिय झाली. समते सारख्या कल्पनांनी बुद्धिमान वर्गावर अत्यंत प्रभाव निर्माण झाला. चीनी स्त्रीच्या दर्जामध्ये सुधारणा झाली. स्त्रियांना औपचारिक शिक्षण खुले करण्यात आले आणि पदबंधन प्रथासुद्धा कमी होऊ लागली. प्रमुख बुद्धिवादी वर्ग लोकांच्या भाषेमध्ये त्यांना समजेल अशाप्रकारे लेखन निर्मिती करू लागले. त्यामुळे पूर्वी सामान्यलोकांच्या भाषेमध्ये जी ज्ञाननिर्मिती होत नव्हती ती आता होऊ लागल्यामुळे लोकशिक्षण सुलभ झाले. त्यामुळे पुढे पुढे चीनमध्ये आधुनिक आर्थिक सुधारणांचा विकास होत गेला आणि समतावादी समाजाची निर्मिती होण्यास चालना मिळाली.

४ मे च्या चळवळीने राष्ट्रवाद, प्रगतीवाद, लोकशाही आणि विज्ञानवादास प्रोत्साहन मिळाले. चीनी पारंपारिक आदर्शांचा धिक्कार आणि युरोपियन मूल्यांचा स्विकार यांमध्ये एक दुवा जोडण्यात आला. चीनी विचारवंतामध्ये चीनी पारंपारिक समाजव्यवस्था कालबाह्य झालेली आहे अशी धारणा तयार झाली व त्यांच्यासमोर परकीय अनुकरण हाच पर्याय दिसत होता. सर्वत्र आधुनिकीकरणाच्या समर्थनासाठी व त्याचे अनुकरण करण्यासाठी स्पर्धा लागली होती. लोकांनी जागोजगी 'सार्वत्रिक पाश्चिमात्यीकरण' अशा घोषणा देण्यास सुरूवात केली होती. पाश्चिमात्य साहित्याचे चीनी भाषेमध्ये भाषांतर केले गेले. बरीच नियतकालिके दोन भागांमध्ये विभागलेली होती आणि त्यातील एक भाग पूर्णपणे भाषांतरासाठी समर्पित होता.

अशाप्रकारे ४ मे च्या क्रांतीचे वर्णन 'सांस्कृतिक क्रांती' आणि 'राष्ट्रवादाची अभिव्यक्ती' म्हणून केले जाते. ४ मे १९१९ रोजी पेकींग या राजधानीच्या ठिकाणी चीनी विद्यार्थ्यांनी केलेल्या निदर्शनांनी पुढे एका बुद्धिवादी क्रांतीमध्ये परिवर्तन घडून आले होते. त्यानंतर शांघाय आणि कँटन यांनीसुद्धा या आंदोलनामध्ये भाग घेतला व त्यांची व्याप्ती वाढविली आणि हा हा म्हणता काही आठवड्यांच्या अवधीतच संपूर्ण चीनमध्ये एका संपूर्ण राष्ट्रवादी क्रांतीची पसरणी झाली. ती एक महान राष्ट्रीय चळवळ बनली आणि तिने सर्वसमावेशक व आमूलाग्र परिवर्तनाच्या लढाईचे स्वरूप धारण केले.

४.५ समारोप

इ.स. १९११ मध्ये चीनमध्ये राज्यक्रांती होऊन मांचू राजवटीचा अंत झाला. आपल्या कारकीर्दीत मांचू राजांनी चीनी जनतेला कोणत्याही सुधारणा दिल्या नाही. उलट आर्थिक परिस्थिती अधिकच बिकट झाली. परकीयांचा मुकाबला करण्यातसुद्धा मांचू राजांना यश आले नाही. त्यातच पाश्चिमात्यांनी चीनची आर्थिक लयलूट केली होती पण त्यांच्या ख्रिश्चन मिशनऱ्यांनी चीनमध्ये शाळा उघडून आरोग्यसुविधा देऊ केल्या. पाश्चिमात्य साहित्य वाचनात आल्यामुळे वैचारिक पार्श्वभूमी तयार झाली. डॉ. सन् यत् सेन सारख्या वैद्यकीय क्षेत्रातील माणसाने क्रांतीसाठी पुढाकार घेतला व चीनी भूमीस वैचारीक खतपाणी दिले. रेल्वेचे राष्ट्रीयीकरण, हँकाव्ह घटना आणि वांचूंग उठाव यामुळे चीनमध्ये क्रांतीचे रूप धारण केले.

इ.स. १९११ च्या क्रांतीने चीनमध्ये लोक प्रजासत्ताकाची स्थापना झाली. कन्फ्युशियन विचारसरणी काही प्रमाणात मागे पडून पाश्चिमात्यीकरण आणि आधुनिकीकरणाकडे चीनी समाजाने पाऊल उचलण्यास सुरूवात केली. ही क्रांती राजकीय दृष्ट्या यशस्वी झाली खरी परंतु सामाजिक दृष्ट्या तिला यश आले नाही.

४.६ प्रश्न

१) इ.स. १९११ च्या क्रांतीच्या कारणांचे विश्लेषण करा.
२) इ.स. १९११ च्या चीनच्या राज्यक्रांतीची व्याप्ती स्पष्ट करा.
३) इ.स. १९११ च्या चीनच्या राज्यक्रांतीचा मागोवा घ्या.
४) इ.स. १९११ च्या चीनच्या राज्यक्रांतीच्या परिणामांचे परीक्षण करा.
५) इ.स. १९११ च्या चीनच्या राज्यक्रांतीची कारणे व परिणांमाची चर्चा करा.

❖❖❖

५

चीनचे राष्ट्रीय सरकार

घटक रचना :

५.० उद्दिष्ट्ये
५.१ प्रस्तावना
५.२ डॉ. सन् यत् सेन यांचे राष्ट्रीय सरकार
५.३ चँग कै शेक सरकार
५.४ चँग कै शेकचे अंतर्गत धोरण
५.५ राष्ट्रीय सरकारचे प्रशासन
५.६ राष्ट्रीय सरकारचे अपयश
५.७ चँग कै शेकचे परराष्ट्र धोरण
५.८ समारोप
५.९ प्रश्न

५.० उद्दिष्ट्ये

१) कोमिंगटांग पक्षाचा विकास आणि डॉ. सन् यत् सेन यांच्या कारकीर्दीतील राष्ट्रीय सरकारचा आढावा घेणे.
२) चँग कै शेकच्या कारकीर्दीचा पूर्वेतिहास अभ्यासणे.
३) चँग कै शेकच्या राष्ट्रीय सरकारच्या अंतर्गत धोरणाचा मागोवा घेणे.
४) राष्ट्रीय सरकारचे परराष्ट्र धोरण अभ्यासणे.

५.१ प्रस्तावना

इ.स. १९११ च्या चीनच्या क्रांतीने चीनमधील मांचू राजांची पिढ्यानपिढ्या चालत आलेली जुलमी राजवट नष्ट झाली आणि चीनमध्ये एका नव्या प्रजासत्ताक पर्वाचा उदय झाला. परंतु डॉ. सेन आणि राष्ट्रवाद्यांचे लोकशाही प्रजासत्ताक प्रत्यक्षात आणण्याचे स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही. इ.स. १९१२ – १९२७ दरम्यान काळात चीनमध्ये अनेक महत्त्वाच्या घडामोडी झाल्या. त्यांमध्ये युआन शि काई व हुकुमशहा बनण्याचे त्याचे प्रयत्न, पहिले महायुद्ध आणि जपानने चीनकडे केलेल्या एकवीस मागण्या, युद्धखोरी प्रवृत्ती, गटबाजी, परकीय शक्तींचे चीनला नेहमी विभाजित आणि कमजोर करण्याचे प्रयत्न, दक्षिण चीन प्रजासत्ताकाचा अध्यक्ष म्हणून डॉ. सेन यांचा पुनर्उदय व चँग कै शेकचा डॉ. सेन यांच्या मृत्यूनंतर चीनच्या राष्ट्रीय सरकारमध्ये उदय यांसारख्या घडामोडींचा समावेश होतो. चँग कै शेक यास कोमिंगटांग पक्षात आपले स्थान बळकट करणे, पक्षावरील वर्चस्व संपविणे आणि एकूणच चीनमधून साम्यवाद्यांचे निर्मूलन करणे, चीनचे एकीकरण करणे, कार्यक्षम सरकार स्थापन करणे, जपानी आक्रमणांचा मुकाबला करणे आणि शेवटी साम्यवादयांविरूद्ध गृहयुद्ध इ. गोष्टींचा सामना करावा लागला.

परंतु साम्यवाद्यांपुढे तो निभाव धरू शकला नाही आणि त्याला चीनमधून पळून जाऊन तैवानमध्ये आपले सरकार स्थापन करावे लागले.

५.२ डॉ. सन् यत् सेन यांचे राष्ट्रीय सरकार

५.२.१ कोमिंगटांग ची स्थापना :-

डॉ.सेन यांनी स्थापना केलेली तेंग मेंग हुई ही गुप्त संघटना चीनच्या १९११ च्या राज्यक्रांती पाठीमागे होती. त्यामुळे याच संघटनेचे उघड स्वरूप म्हणून नव्या स्वरूपाचा 'कोमिंगटांग' या नावाने एक राजकीय पक्ष स्थापन केला. त्यालाच 'राष्ट्रीय लोक पक्ष' (National People's Party) असे नाव दिले. त्याच पक्षाच्या नावाने जेव्हा युआन शि काई ने हुकुमशाही राज्य करण्याचा प्रयत्न केला तेव्हा पक्षामध्ये त्यास कडवा विरोध झाला. परंतु कोमिंगटांगच्या इतर सदस्यांना त्यात यश मिळाले नाही आणि लष्करी अधिकाऱ्यांमुळे तर कोमिंगटांगचा प्रभावच नाहीसा झाला. या दहा वर्षांच्या निष्क्रीय कालखंडानंतर इ.स. १९२१ साली कोमिंगटांग पक्षाने डॉ. सेन यांच्या अध्यक्षतेखाली कँटन येथे चीनी प्रजासत्ताकाची स्थापना केली.

५.२.२ कोमिंगटांग पक्ष आणि साम्यवादी :-

इ.स. १९११ -२१ दरम्यान कोमिंगटांग पक्षात अनेक सक्रीय कार्यकर्त्यांनी प्रवेश केला. पहिले महायुद्ध, जपानच्या एकवीस मागण्या, १९१७ ची रशियन राज्यक्रांती (बोल्शेविक), पॅरिस शांतता परिषदेमध्ये निराशा आणि ४ मे ची चळवळ या सर्वांचा सुशिक्षित चीनी समाजावर फार मोठा परिणाम झाला. त्यांच्या विचार शक्तीमध्ये परिवर्तन घडून आले. रशियन राज्यक्रांतीने (१९१७) प्रभावित झालेल्या तरूणांनी चीनी साम्यवादी पक्षाची स्थापना केली. सोव्हिएत रशियाने चीनमधील राष्ट्रवाद्यांशी हातमिळविणी करण्याचे ठरवले आणि साम्यवादी तत्वज्ञान जर चीनमध्ये प्रसारित करायचे असेल तर कोमिंगटांग हे एक साधन म्हणून वापरता येईल असा त्यांनी विचार केला.

५.२.३ कोमिंगटांगचे पुनर्संघटन :-

सोव्हिएट रशियाने कोमिंगटांग वर आपला चांगलाच प्रभाव पाडला होता. रशियाच्या बोल्शेविक साम्यवादी पक्षाच्या धर्तीवर चीनमधील राष्ट्रीय पक्षाची रचना केली गेली होती. दक्षिण चीनी प्रजासत्ताकाचा रशियन सल्लागार मायकल बोरोदीन याने कोमिंगटांग पक्षाला मजबूत, राष्ट्रव्यापी आणि शिस्तबद्ध बनविण्यासाठी एक महत्वाची भूमिका बजावली होती. त्यामुळे रशियाबाबतची कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने डॉ. सेन यांनी संघटीत राष्ट्रीय पक्षाचे सदस्य म्हणून साम्यवादी तरूणांची भरती करण्यास परवानगी दिली होती. कोमिंगटांग व साम्यवादी यांच्या युतीच्या काळात कोमिंगटांग पक्षाचे धोरण, प्रचार आणि लष्करी कारवाई असेच होते. ज्यावेळी कोमिंटांग पक्ष अंतर्गत गोंधळ, प्रादेशिक घुसखोरी यांसारख्या समस्यांमध्ये गुंतलेला होता त्याचवेळी साम्यवादी पक्ष मात्र मार्क्सवादाचा प्रचार – प्रसार आणि शासनातील महत्त्वांच्या पदांवर आपल्या माणसांची वर्णी लावण्यात, तसेच अधिकाधिक लोकांची भरती करण्यात गुंतलेला होता. त्यातच शेतकऱ्यांची संघटना आणि कामगार संघटना यांमध्ये त्याने बांधणी करण्यास सुरूवात केली होती. दरम्यान बाह्यमंगोलिया आणि चीनी पूर्व रेल्वे याबाबत इ.स. १९२४ मध्ये एक शांतीपूर्ण करार झाला. त्यामुळे रशियास मंगोलिया आणि मांचूरिया येथे आपले प्रभावक्षेत्र निर्माण करण्याची आयतीच संधी मिळाली.

५.२.४ कोमिंगटांगचे पहिले अधिवेशन :-

इ.स. १९२४ मध्ये कोमिंगटांग पक्षाचे पहिले अधिवेशन भरले. त्यामध्ये डॉ. सन् यत् सेन यांनी 'राजकीय तत्वत्रयी' म्हणून निश्चित केलेली राष्ट्रवाद, लोकशाही आणि समाजवाद ही प्रणाली स्विकारण्यात आली. चीनमध्ये आपले स्थान बळकट करण्याच्या उद्देशाने कोमिंगटांग पक्षाने तीन प्रमुख धोरणांचा स्विकार केला. त्यामध्ये सोव्हिएत संघाशी सलोखा, चीनी साम्यवादयांशी सलोखा आणि कामगार व शेतकरी वर्गाचा पाठींबा मिळविणे यांचा प्रामुख्याने समावेश होता. या अधिवेशनामध्ये चीनी लोकांच्या राजकीय क्षमतेवर गाढा विश्वास व्यक्त केला गेला. चीनमधील राष्ट्रवादी शक्तींना बळकट करण्यासाठी शेतकरी, कामगार, विद्यार्थी तरूण आणि अनिवासी चीनी नागरिक यांना आवाहन करण्यात आले. या अधिवेशनाने चीनचे परराष्ट्रीय धोरणसुद्धा स्पष्ट केले. युद्धखोर परकीय राष्ट्रांनी चीनबरोबर अनेक प्रकारचे अपमानास्पद करार करून सवलती मिळविल्या होत्या त्या नष्ट करण्याचे आणि त्यांचे अतिप्रादेशिक हक्क बंद करण्याची मागणी याच अधिवेशनात करण्यात आली. क्रांतीकारी सैन्याला प्रशिक्षण देण्यासाठी व्हॅम्पूआ लष्करी अकादमीची स्थापना करण्यात आली. डॉ. सेन यांचा कटटर समर्थक आणि रशियाद्वारा प्रशिक्षण घेतलेला लष्करी तरूण चँग कै शेक याची या अकादमीचा प्रमुख म्हणून नेमणूक करण्यात आली.

५.२.५ कोमिंगटांग फूट :-

थोडयाच कालावधीमध्ये कोमिंगटांग पक्षात असलेल्या प्रभावशाली नेत्यांमध्ये आपल्या प्रतिष्ठेविषयी असुया निर्माण झाली. हे प्रामुख्याने साम्यवादी होते आणि आपल्यालाच पक्षामध्ये श्रेष्ठ स्थान मिळण्यासाठी परस्परांविरूद्ध स्पर्धा करीत होते. त्यामुळे जेव्हा इ.स. १९२४ मध्ये कोमिंगटांग पक्षाचे पुनर्संघटन रशियाच्या साम्यवादी पक्षाच्या धर्तीवर करण्यात आले तेव्हापासूनच डावे आणि उजवे असे दोन गट निर्माण झाले. जे सदस्य पक्षाचे पुनर्संघटन आणि साम्यवादी पक्षाशी युती यांना पाठींबा देत होते ते 'डावे' (Leftist) आणि जे विरोधात होते ते 'उजवे' (Rightist) म्हणून ओळखले जाऊ लागले. लोकांच्या युद्धखोर आणि साम्राज्यवादी चळवळीला डाव्यांनी पाठींबा दिला. डॉ. सेन यांच्या मृत्यूपर्यंत डाव्यांचे पुनर्संघटीत कोमिंगटांग पक्षामध्ये बहुमत होते. तर उजवे सदस्य मूळच्या पक्षाशी एकनिष्ठ होते. ते जमिनदार आणि व्यापारी वर्गाचे हितसंबंध जोपासत होते.

साम्यवादी (चीनी) पक्ष कोमिंगटांग पक्षातील या दुफळीला खतपाणी घालून डाव्यांशी सहकार्य करीत होता आणि उजव्यांना पूर्णपणे नेस्तनाबूत करण्यासाठी प्रयत्न करीत होता. त्यातच डाव्यांचे साम्यवाद्यांशी साठेलोटे उजव्यांना मान्य नव्हते आणि ते डाव्यांना 'मास्कोचे दलाल' म्हणून संबोधित होते. त्यामुळे उजव्यांनी कोमिंगटांगमधून साम्यवाद्यांची हकालपट्टी करण्याची मागणी केली. इ.स. १९२४ पर्यंत तर उजव्या पांढरपेशा वर्गधार्जिण्या नेत्यांनी शांघाय येथे 'शुभ्र कोमिंगटांग' (White Kuomingtang) या नावाने 'लाल कोमिंगटांग' (Red Kuomingtang) या कँटन येथील गटास विरोध करणारा गट स्थापन केला. जो पर्यंत डॉ. सेन हयात होते, तोपर्यंत त्यांनी कसेबसे या दोन गटांना एकत्र ठेवण्यात यश मिळविले होते. जरी डॉ. सेन यांच्या इ.स. १९२५ मध्ये झालेल्या मृत्यूने या पक्षातील संतुलन साधण्याचा दुवा नष्ट झाला असला तरी साम्राज्यवादी धोका आणि लष्करी मोहिमा यामुळे काही प्रमाणामध्ये कोमिंगटांग पक्षात गटबाजी सूप्तावस्थेत होती.

५.३ चँग कै शेक सरकार

५.३.१ पार्श्वभूमी :-

माओ त्से तुंग आणि डॉ. सन् यत् सेन या चीनमधील दोन प्रमुख राजकीय तत्त्ववेत्यांच्या नव्हे नेत्यांच्यामध्ये आपल्याला अजून एक प्रभावशाली नेतृत्व पाहावयास मिळते आणि ते म्हणजे चँग कै शेक होय. २० व्या शतकाच्या सुरूवातीस चीनची राजेशाही सत्ता संपुष्टात आणण्यासाठी चँग कै शेकने डॉ. सेन यांच्या 'युनायटेड रिव्होल्युशनरी लीग' आणि कोमिंगटांग यांच्यामार्फत लढा दिला होता. इ.स. १९१२ मध्ये चीनच्या प्रजासत्ताकाची स्थापना करण्यात आली. परंतु इ.स. १९२० च्या दशकात कोमिंगटांग पक्षामध्ये फूट पडून साम्यवादी गट माओ त्से तुंग यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झाला. डॉ. सेन यांच्या मृत्यूनंतर कोमिंगटांग सैन्याचे प्रमुखपद चँग कै शेक ने घेतले आणि चीनी प्रजासत्ताक सरकारचे संपूर्ण नियंत्रण मिळविले.

५.३.२ चँग कै शेक चे पूर्वायुष्य :-

चँग कै शेक ह्यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८८७ रोजी पूर्व चीनमधील चेकीयांग प्रांतातील मीठाच्या व्यापाऱ्याच्या कुटुंबात झाला. आपल्या तरूणपणाच्या काळात चीनला वारंवार परकियांच्याकडून पराभवास समोरे जावे लागत असल्याचे त्याने पाहिले होते. परकीयांनी चीनला कर्जबाजारी केले होते, राजकीय सत्ता अस्थिर केली होती आणि ते चीनच्या अंतर्गत कारभारामध्ये हस्तक्षेप करीत होते. त्यामुळेच आपल्या मायभूमीला या परकीयांच्या छळातून मुक्त करण्याच्या उद्देशाने चँग ने लष्करी प्रशिक्षण घेतले होते. निंग्बो येथे शालेय शिक्षण पूर्ण केल्यावर आणि इ.स. १९०६ मध्ये जपान वारी केल्यानंतर त्याने बाओडिंग येथे शासकीय लष्करी अकादमीत प्रवेश घेतला. इ.स. १९०८ पासून १९१० पर्यंत त्याने टोकीयो येथील लष्करी प्रशिक्षण शाळेमध्येसुद्धा प्रशिक्षण पूर्ण केले.

५.३.३ चँग कै शेक आणि इ.स. १९११ ची राज्यक्रांती :-

चँग कै शेक जेव्हा जपानमध्ये गेले तेव्हाच त्यांनी चीनच्या ऱ्हासास कारणीभूत झालेल्या मांचू घराण्याची सत्ता उलथवून टाकण्याच्या उद्देशाने लष्करी क्रांतीकारी चळवळीत प्रवेश केला. इ.स. १९०८ मध्ये चँग कै शेक डॉ. सेन यांच्या 'तेंग मेंग हुई' या गुप्त संघटनेचे सदस्य बनले. इ.स. १९११ मध्ये जेव्हा राज्यक्रांतीस सुरूवात झाली तेव्हा चँग कै शेकने जपान सोडून चीनमध्ये (शांघाय) क्रांतीवाद्यांना मदत करण्यासाठी आगमन केले. क्रांतीवाद्यांनी चीनचे राजेशाही सरकार उलथवून टाकल्यावर पूर्व चीनच्या नानकींग येथे प्रजासत्ताक सरकारची स्थापना केली. इ.स. १९१२ मध्ये चँग कै शेक आणि इतर क्रांतीवाद्यांनी मिळून एक नवीन राजकीय पक्षाची स्थापना केली व त्याचे नाव कोमिंगटांग असे ठेवून डॉ. सन् यत् सेन यांना नेतृत्व बहाल केले.

इ.स. १९१७ मध्ये लष्करी नेत्यांना तोंड देण्यासाठी डॉ. सन् यत् सेन यांनी दक्षिण चीनच्या कँटन शहरामध्ये आपले क्रांतीकारी सरकार स्थापन केले. त्यांनी इ.स. १९१८ मध्ये लष्करी प्रशिक्षित आणि सक्षम असल्यामुळे चँग कै शेकना प्रजासत्ताकमध्ये सामील होण्यास आमंत्रण दिले. पुढच्या काही वर्षामध्ये चँग कै शेक कधी शांघाय तर कधी कँटन अशी सतत ये – जा करत होते परंतु त्यांच्या कारवाया व हेतु काही स्पष्ट नव्हते. पुढे असे दिसून आले की, ते शेअरबाजार तेजी - मंदीमध्ये शांघाय येथे गुंतले होते जेणेकरून डॉ. सेन यांच्या पक्षासाठी भला

मोठा निधी जमविता येईल. परंतु त्यामुळे त्यांचे मुख्य कामाकडे दुर्लक्ष होऊन ते गुन्हेगारी विश्वाशी जोडले गेले.

५.३.४ चँग कै शेकचा राजकीय क्षितिजावर उदय :-

इ.स. १९२३ मध्ये डॉ. सन् यत् सेन यांनी सरकारच्या लष्करी खात्याचा प्रमुख म्हणून चँग कै शेकची नेमणूक केली. पुढे डॉ. सेन यांनी रशियाच्या साम्यवादी पक्षाशी युती केल्यामुळे कोमिंगटांग पक्षाला आर्थिक व लष्करी मदतीचा ओघ सुरू झाला. डॉ. सेन यांनी चँग कै शेक यांस मास्को येथे पाठविले. तेथे चँग ने रशियन लष्करी व राजकीय संघटन यांचा अनेक महिने अभ्यास केला. त्यामुळे इ.स. १९२४ मध्ये रशियाच्या मदतीने व्हॅम्पुआ (कँटन) येथे कोमिंगटांग मिलिटरी अकादमीची स्थापना करण्यात आली. चँग कै शेक सदर अकादमीचे प्रमुख झाले व तीन वर्षांच्या आत जवळजवळ दोन हजार तरूणांना त्यांनी लष्करी प्रशिक्षण दिले. पुढे हे लष्करी अधिकारी 'व्हॅम्पुआ क्लीक' म्हणून ओळखले जाऊ लागले आणि राजकीय फायद्यासाठी ते चँग कै शेकची सावली बनून राहीले.

५.४ चँग कै शेक सरकारचे अंतर्गत धोरण – कार्यक्रम

५.४.१ चीनच्या एकीकरणासाठी प्रयत्न :-

डॉ. सन् यत् सेन यांच्या इ.स. १९२५ मधील अकाली मृत्यूने कोमिंगटांग पक्षामध्ये एक राजकीय पोकळी निर्माण झाली. चँग कै शेक कडे डॉ. सेन यांचा एक निष्ठावान व मुख्य राजकीय वारस म्हणून पाहिले जात होते. ते राष्ट्रीय सैन्याचे मुख्य सेनापती झाले. त्यांनी उत्तर चीनवर नियंत्रण करून बसलेल्या लष्करी नेत्यांविरूद्ध इ.स. १९२६ मध्ये उत्तर मोहिम सुरू करून कोमिंगटांग पक्षाच्या छत्राखाली चीनचे एकीकरण करण्याचा प्रयत्न केला तेव्हाच त्यांच्या कार्याची खरी चुणूक चीनी जनतेला पाहावयास मिळाली.

चँग कै शेक च्या राष्ट्रीय सैन्याने हळूहळू उत्तरेकडे प्रयाण केले आणि लष्करी नेत्यांविरूद्ध निर्णायक विजय मिळविले. इ.स. १९२५ च्या दरम्यान त्यांनी क्वांगटुंग आणि क्वांग्सी प्रांत कोमिंगटांग कार्यकारणीच्या नियंत्रणाखाली आणले. इ.स. १९२६ रोजी ह्युआन प्रांतातून यांगत्से खोऱ्याकडे (उत्तर चीन) कूच केले आणि काही महत्त्वाची शहरे ताब्यात घेतली. या राष्ट्रीय सैन्याला स्थानिक जनतेचा संपूर्ण पाठींबा मिळाला. शेवटी लष्करी मोहिमेद्वारे संपूर्ण चीनचे प्रत्यक्ष एकीकरण होण्यासाठी जवळजवळ दोन वर्षांचा कालावधी लागला. ही मोहिम दोन टप्प्यांमध्ये राबविण्यात आली. पहिल्या टप्प्यामध्ये राष्ट्रीय सैन्याने थोड्याच महिन्यात हँकाऊ शहर काबीज केले. दुसऱ्या टप्प्यामध्ये राष्ट्रीय सैन्याने जून १९२८ रोजी पेकींगवर ताबा मिळविला. पेकींग ही फार प्राचीनकाळापासून चीनची राजधानी होती. या एकीकरणाच्या कामगिरीने चँग कै शेक यांना अत्यंत लोकप्रियता मिळाली.

५.४.२ कोमिंगटांग पक्षात फूट :-

दरम्यानच्या काळात कोमिंगटांग पक्षामध्ये अंतर्गत मतभेद निर्माण होऊन उजवे आणि डावे असे दोन गट पडले. जानेवारी १९२७ मध्ये कोमिंगटांग पक्षातील डाव्या गटाने चीनी साम्राज्यवादी गटाच्या आणि रशियन सल्लागार (मास्को) मायकल बोरोदिन यांच्या मदतीने नागरी सरकारचे कार्यालय कँटन येथून मध्य चीनमधील हँकाव्ह येथे हलविले. यामुळे कोमिंगटांग पक्षामधील सत्तेच्या लालसेसाठी वैचारिक मतभेद उघड झाले. मार्च १९२७ मध्ये शांघाय व

नानकींग जिंकल्यावर चँग कै शेकनी हँकॉव्ह गटातून फुटून निघण्याचे ठरवले. १२ एप्रिल १९२७ रोजी चँगनी आपल्या प्रभावाखालील प्रदेशांमध्ये संशयित साम्यवादाविरूद्ध जलद व कठोर हल्ले केले व हजारोंना यमसदनास पाठविले. सोव्हिएत रशियाच्या सल्लागारांना रशियात परत पाठविले गेले. त्यानंतर परंपरावादी गटाच्या मदतीने त्यांनी नानकींग येथे स्वतःचे राष्ट्रीय सरकार स्थापन केले. चँगना आपल्या या लढ्यामध्ये शांघाय येथील धनदांड्या व्यापाऱ्यांनी भरगोस आर्थिक मदत केली.

सततच्या राजकीय आणि लष्करी सत्ता स्पर्धांमध्ये आपली सत्ता स्थिर करण्यासाठी चँग कै शेकना अनेक महिने लागले. ऑगस्ट १९२७ मध्ये त्यांनी नानकींग राष्ट्रीय सरकारचा राजीनामा दिला. परंतु सरकारवर अप्रत्यक्षपणे त्यांनी पूर्ण नियंत्रण ठेवले होते. पुढच्याच महिन्यात ते जपानला गेले. चँग ची अगोदरच दोन लग्ने झाली होती आणि त्यांना एक मुलगाही होता. परंतु जपानमध्ये गेल्यावर १ डिसेंबर १९२७ रोजी शांघायमधील सुप्रसिद्ध ख्रिश्चन नेत्याच्या तिन नंबरच्या मुलीशी त्यांनी (सूंग मेई लिंग) तिसरा विवाह केला. त्या सूंग मेई लिंगची मोठी बहीण सूंग चिंग लिंग ही डॉ. सन् यत् सेन यांची विधवा पत्नी हाती. अशाप्रकारे चँग कै शेकनी सूंग विवाहसंबंधाद्वारे कोमिंगटांग पक्षाच्या संस्थापकाशी आपले संबंध निर्माण केले. पुढच्या दशकामध्ये मॅडम चँगने पाश्चिमात्य शक्तींशी विशेषतः अमेरिकेशी सहकार्य करण्यात आपली कारकीर्द घालविली.

नोव्हेंबर – डिसेंबर १९२७ दरम्यान कँटनमध्ये साम्यवादी उठावास सुरूवात झाल्यामुळे चँग कै शेक राजकीय लष्करी जीवनातून जणू निवृत्त झाले. तरीही कोमिंगटांग पक्षाच्या सर्व गटांना चँग कै शेकची लष्करी उणीव भासू लागली. यामुळे पुन्हा जानेवारी १९२८मध्ये चँग कै शेक पुन्हा कोमिंगटांग पक्षाच्या राजकारणात निर्विवाद नेता म्हणून उदयास आले.

५.४.३ पेकींगवर ताबा :-

साम्यवाद्यांपासून सोडचिठ्ठी घेतल्यानंतर चँग कै शेकनी पुन्हा लष्करी मोहिमेद्वारा देशाचे एकीकरण करण्यासाठी दुसरा टप्पा चालू केला. जून १९२८ मध्ये राष्ट्रीय सैन्याने पेकींग ताब्यात घेतले. त्यावेळचा पेकींगचा प्रमुख नेता चँग त्सोलीन हा मुकडेन प्रांतात पळून गेला आणि पुढे एका बॉम्बस्फोटामध्ये मारला गेला. त्याच्या पश्चात त्याचा मुलगा चँग ह्युसे लिंयांग याच्या नियंत्रणात अजूनही पूर्वचीनचे तीन प्रांत होते, परंतु त्याने कोमिंगटांग ध्वजाचा स्विकार केला होता. त्यानंतर त्याला पक्षाचे सदस्यत्व स्विकारण्यासाठी सांगण्यात आले आणि राष्ट्रीय सरकारचा उपाध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी देण्यात आली. अशाप्रकारे सैद्धांतिकदृष्ट्या चीनचे चँग कै शेक च्या लष्करी राज्य आणि राष्ट्रीय सरकारच्या नियंत्रणाअंतर्गत तात्पुरते का होईना परंतु एकीकरण झाल्याचे आपणास दिसून येते.

चँग कै शेकच्या राष्ट्रीय सरकारची राजधानी नानकींग येथे हलविण्यात आली. अमेरिका, इंग्लंड आणि फ्रान्स यांसह जवळजवळ बारा पाश्चिमात्य राष्ट्रांनी चँग कै शेक च्या राष्ट्रीय सरकारला मान्यता दिली. राष्ट्रीय सरकारने सन् यत् सेन यांच्या स्वप्नातील 'लोक तत्वत्रयी' पैकी राष्ट्रवादाच्या तत्वाची पूर्ती केल्याचा दावा केला. आता पुढे भविष्यात उरलेल्या दोन तत्वांची जसे - लोकशाही आणि लोकांचे राहणीमान यांची पूर्ती करण्याचे राष्ट्रीय सरकारने लक्ष्य ठेवले.

५.४.४ कोमिंगटांगची घटना :-

डॉ. सन् यत् सेन यांचा कार्यक्रम राबविण्यासाठी ऑगस्ट १९२८ मध्ये, कोमिंगटांग पक्षाच्या केंद्रीय कार्यकारिणी समितीची बैठक बोलवण्यात आली. त्यामध्ये 'संघटनात्मक कायदा' (Organic Law) या नावाने हंगामी घटना स्विकारण्यात आली. या कायद्याने सरकार आणि राजकीय पक्ष यांच्यामध्ये लोकशाही केंद्रीकरण तत्वाच्या साहाय्याने दुवा जोडण्यात आला. राष्ट्राच्या सर्वात श्रेष्ठ घटकाला 'राज्य परिषद' (State Council)म्हणून संबोधण्यात आले आणि राज्य परिषदेच्या प्रमुखास 'राष्ट्रप्रमुख' म्हणून दर्जा देण्यात आला. राज्य परिषदेच्या अंतर्गत पाच 'युआन्स' किंवा सरकारी विभाग देण्यात आले. त्यामध्ये विधीमंडळ, कार्यकारीमंडळ, कायदेमंडळ, परीक्षण आणि नियंत्रण यांचा समावेश होता. चँग कै शेक स्वत: राज्य परिषदेचे प्रमुख बनले. राज्य परिषदेने कोमिंगटांगच्या केंद्रीय कार्यकारी समितीच्या सहकार्याने केंद्रीय राजकीय परिषदेची निर्मिती केली. त्यामुळे प्रशासनावर पूर्णपणे कोमिंगटांग पक्षाचे नियंत्रण आले. हा संघटनात्मक कायदा (Organic Law) राष्ट्रीय जन परिषदेने (National People's Convention) दुसरी हंगामी घटना मे १९३१ पर्यंत स्विकार करेपर्यंत चीनी सरकारची आदर्श कायदेसंहिता म्हणून पाया मानला गेला.

५.४.५ राष्ट्रवादी आणि साम्यवादी यांमध्ये संघर्ष :-

चँग कै शेकचे सर्वात कटटर विरोधक म्हणजे चीनी साम्यवादी हे त्यांच्या पक्षाच्या बाहेर कार्यरत होते. साम्यवाद्यांनी ग्रामीण चीनमध्ये आपले गट व प्रभाव क्षेत्र निर्माण केले आणि रशियन धर्तीच्या स्वरुपात १९३० च्या दशकात कियांगसी प्रांतात आपले शासन स्थापन केले. शहरी भागामधून साम्यवाद्यांचा नायनाट करण्यात राष्ट्रवादी सरकारला फारसे प्रयत्न करावे लागले नाहीत. परंतु दक्षिण आणि मध्य चीनच्या ग्रामीण भागात गरीब शेतकरी वर्गाने साम्यवाद्यांना माओ त्से तुंग यांच्या नेतृत्वाखाली भरघोस पाठींबा दिला होता. साम्यवाद्यांनी कामगारांचे कामाचे तास, वेतन, सुविधा इत्यादी सारखे विषय उचलून धरून त्यांच्या संघटना बांधल्या आणि कामगार वर्गाचासुद्धा भरघोस पाठींबा मिळवून आपले प्रभावक्षेत्र निर्माण केले. हे पाहून चँगनी साम्यवाद्यांचा पूर्ण नि:पात करण्याचे ठरवले. जर्मन लष्करी तज्ज्ञांच्या सहकार्याने चँगनी साम्यवाद्यांना पराभूत करण्यासाठी अनेक मोहिमा राबविल्या. इ. स. १९३४ मधील आपल्या पाचव्या लष्करी मोहिमेमध्ये चँग कै शेक नी साम्यवाद्यांना वेढा घातला आणि 'संपूर्ण निर्मूलन' (साम्यवाद्यांचे) मोहिम राबविली. या कोंडीमुळे साम्यवाद्यांचे जसे हाल होऊ लागले तसे त्यांनी सुप्रसिद्ध 'प्रदीर्घ मोर्चा' (Long March) चालू केला. शेवटी साम्यवाद्यांनी आपले येनान (अति ईशान्य) प्रांतात मुख्य ठाणे स्थापन केले.

५.४.६ जपानविरुद्ध संयुक्त मोर्चा :-

इ.स. १९३१ च्या मांचुरियन वादानंतर जपानच्या मांचुरियातील आक्रमणा संदर्भात चँग कै शेकनी बचावात्मक धोरण अवलंबिले. दरम्यान चीनमधून साम्यवाद्यांना हाकलून लावण्यासाठी त्यांनी निकराचे प्रयत्न केले. इ.स. १९३२ मध्ये चीनी साम्यवादी पक्षाने जपानविरुद्ध अगोदरच युद्ध घोषित केले होते. त्यांनी चँग कै शेकना अंतर्गत युद्ध नष्ट करण्याचे आणि जपानविरुद्ध संयुक्त लढा देण्याचे आवाहन केले. परंतु चँगनी साम्यवादयांचे आवाहन आणि देशभक्त जनतेचा जपानी शत्रूविरुद्ध संयुक्त लढयाचा आग्रह यांकडे दुर्लक्ष केले. एवढेच नाही तर चँग चा उपसेनापती चँग ह्युसे लियांग जो मुकडेन घटनेनंतर मांचूरियातून पळून आला होता त्याने सुद्धा याबाबतीत चँग च्या हेतुबाबत संशय व्यक्त केला.

यामुळे इ.स. १९३६ मध्ये चँग कै शेकनी चँग लियांग यास सिआन प्रांतामध्ये बंदी बनविले व त्याचा जीव धोक्यात घातला. तरीही इ.स. १९३७ च्या सुरुवातीस जपानविरुद्ध संयुक्त आघाडी उघडण्याबाबत चँग कै शेकनी साम्यवाद्यांशी सहमती दर्शविली. सदरच्या समझोत्यानुसार साम्यवाद्यांनी आपले स्वायत्त शासन आणि सैन्य राष्ट्रीय सरकारच्या अंतर्गत काम करण्यास सहमती दिली. त्यानंतर जपानी आक्रमण पतवून लावले आणि देशात लोकशाही राज्यपद्धती राबविण्यासाठी राष्ट्रीय सरकारने ठाम निश्चय केला. त्याने सामाजिक व आर्थिक सुधारणांचे सुद्धा आश्वासन दिले. त्यामुळे तात्पुरते का होईना साम्यवादी आणि राष्ट्रीय सरकारमधील गृहयुद्ध एका समान उद्दिष्टासाठी स्थगित झाले.

५.४.७ आपली प्रगती तपासा :-

१) डॉ. सन् यत सेन यांच्या गुप्त संघटनेचे नाव काय होते ?

२) इ.स. १९२८ मध्ये चीनमध्ये कोणता कायदा अस्तित्वात आला ?

_____

_____

_____

_____

_____

५.५ राष्ट्रीय सरकारचे प्रशासन

इ.स. १९३० – ३७ दरम्यान चीनच्या राष्ट्रीय सरकारचे प्रशासन म्हणजे भांडवलशाहीचा विकास, आर्थिक, कायदेविषयक आणि शैक्षणिक सुधारणा आणि परिवहन व दळणवळणांच्या माध्यमांत सुधारणा यामध्ये विशेष वाटचाल दिसून येते.

५.५.१ भांडवलशाहीचा विकास :-

चँग कै शेक हे पूर्णपणे साम्यवादविरोधी व परंपरावादी असल्यामुळे त्यांनी चीनमध्ये भांडवलशाहीस प्रोत्साहन दिले. त्यांना त्यांच्या साम्यवाद्यांविरुद्धच्या संघर्षात चीनमधील धनदांडग्या कुटुंब, व्यापारी वर्ग, जमीनदार आणि उच्च वर्गाचा पाठींबा मिळाला. तसाच त्यांनी सूंग घराण्यातील धनदांडग्याच्या मुलीशी विवाह केला होता. ख्रिष्चन धर्मामध्ये धर्मांतर केल्यावर त्यांना ख्रिश्चन मिशनरींचाही पूर्ण पाठींबा मिळाला. आपल्या परराष्ट्रधोरणात ते नेहमीच पाश्चिमात्य देशांच्या बाजूने राहीले. त्यामुळे चीनमध्ये भांडवलशाहीचा विकास होण्यास मदत झाली.

५.५.२ आर्थिक सुधारणा :-

राष्ट्रीय सरकारचे पाश्चिमात्य देशांशी संबंध सुधारल्याचा फायदा घेत चीन मध्ये परकीय बँकांना आमंत्रण देण्यात आले. चँग कै शेक चा मेव्हणा टी. व्ही. सूंग याची अर्थमंत्री म्हणून नेमणूक करण्यात आली. त्याने चीनमध्ये अनेक प्रकारच्या आर्थिक सुधारणा राबविल्या. त्यामुळे चीनमध्ये भांडवलशाहीच्या विकासास चालना मिळाली. तसेच राष्ट्रसंघाच्या वतीने सर फ्रेडरीक लीथ – रॉस यानेसुद्धा चीनची आर्थिक रचना सुधारण्याचे प्रयत्न केले. इ.स. १९३६ मध्ये

जुन्या 'ताइल (लियांग)' या चलनाच्या जागी नवीन 'युआन चलन' वापरात आणले .त्यानंतर 'फा- पी' नावाचे कागदी चलनसुद्धा स्विकारण्यात आले. कागदी चलनाच्या आधारासाठी निकेल आणि तांब्याची नाणीसुद्धा दशमान पद्धतीने सुरु करण्यात आली.

५.५.३ बँकींगक्षेत्रातील सुधारणा :-

आर्थिक सुधारणांबरोबरच चँग कै शेकच्या राष्ट्रीय सरकारने बँकींग क्षेत्रातही काही महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या. एकूण १०० मिलियन चीनी डॉलर्स (युआन) भांडवलाच्या साहाय्याने चीनची केंद्रीय बँक स्थापन करण्यात आली. तिचे मुख्य कार्य चलन स्थिरता राखणे हे होते. त्याचप्रमाणे बँक ऑफ चायना एकूण ४० मिलीयन (युआन) भाग भांडवलाच्या आधारे परकीय चलनसाठ्यावर नियंत्रण ठेवू लागली. देशांतर्गत उद्योगांच्या विकासासाठी २० मिलीयन युआन गुंतवून बँक ऑफ कम्युनिकेशन स्थापन केली व त्यांच्यावर सदर कामगिरी सोपविली. शेती कर्ज आणि जमीनतारण यांवर नियंत्रण देखरेख ठेवण्यासाठी 'फार्मर्स बँक ऑफ चायना' ची निर्मिती करण्यात आली. चीनमधील व्यापारी राष्ट्रांशी जकात कराबाबत सुधारित करार केल्यामुळे चीनला जकात स्वायत्तता मिळाली आणि चीनच्या महसूल उत्पन्नातही वाढ झाली. चीनच्या राष्ट्रीय सरकारने नियमितपणे अर्थसंकल्प सादर करण्याची प्रथा चालू केल्यामुळे सरकारचे चीनच्या अर्थव्यवस्थेवर नियंत्रण असल्याचे स्पष्ट झाले.

५.५.४ कायदेविषयक सुधारणा :-

परकीय राष्ट्रांनी चीनबरोबर केलेल्या अन्यायकारक तह व करार नष्ट करण्याची आवश्यकता निर्माण झाल्यामुळे कायदेविषयक व न्यायिक सुधारणांना चालना मिळाली. युआन शि काई आणि लष्करी नेत्यांची पेकींगमध्ये सत्ता असतानाच कायदेविषयक सुधारणा करण्याचे प्रयत्न हाती घेण्यात आले होते. तरीसुद्धा चीनमधील परकीयांना त्यांचे विशेष हक्क रद्द करण्यासाठी व कायदेविषयक सुधारणा करण्यासाठी राष्ट्रीय सरकारने कळकळीचे प्रयत्न केले. इ.स. १९२९ – ३५ दरम्यान युआनने व्यापार, उद्योग, खाणउद्योग, वन इत्यादीबाबत अनेक सुधारणा करण्याचे पाऊल उचलले.

५.५.५ शिक्षणक्षेत्रातील सुधारणा :-

घटनात्मक सरकार आणि लोकशाही यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने चीनमधील राष्ट्रीय सरकारने शैक्षणिक क्षेत्रामध्ये आमूलाग्र सुधारणा करण्याचे ठरवले. देशातील मुलांना निदान सहा वर्षे तरी अनिवार्य प्राथमिक शिक्षण देण्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला गेला. परंतु आर्थिक निधीचा व प्रशिक्षित शिक्षकांचा पुरेसा अभाव असल्यामुळे या कार्यक्रमास हवे तेवढे यश मिळाले नाही. याउलट उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात झालेली प्रगती काहीशी उल्लेखनीय होती. अनेक सरकारी विद्यापीठे, महाविद्यालये, आणि व्यवसायिक विद्यालये उघडली गेली. त्याचप्रमाणे १३ राष्ट्रीय विद्यापीठे, ५ तंत्रशास्त्र महाविद्यालये आणि ९ प्रांतिक विद्यापीठांची स्थापना करण्यात आली. राष्ट्रीय सरकारने खाजगी संस्थाना उच्च शिक्षण क्षेत्रात प्रोत्साहन देण्यासाठी अनेक प्रकारच्या सवलती दिल्या.

५.५.६ औद्योगिक विकास :-

चीनमध्ये उद्योग क्षेत्राला चालना देण्यासाठी राष्ट्रीय सरकारने आपले निकराचे प्रयत्न केले. चीनच्या ताब्यातून मांचूरिया गेला होता आणि शांघायवर जपानने हल्ला केला होता. त्यामुळे

राष्ट्रीय सरकारच्या नियंत्रणाखाली असलेल्या मध्य आणि सखल यांगत्से प्रदेशामध्ये त्यांनी मध्यम व उच्च प्रतीचे उद्योगधंदे उभारण्यावर भर दिला. सामान्य चीनी आणि चीनी उद्योगपती या दोघांनीही चीनच्या केंद्रीय प्रदेशावर दुर्लक्ष करुन किनारी प्रदेशाकडेच आपले उद्योग उभारण्यावर भर दिला. हलक्या उद्योगामध्ये जसे कापडउद्योग, आगपेटी, पीठ गिरणी, सिमेंट आणि रासायनिक उद्योग यांमध्ये लक्षणीय प्रगती झालेली दिसून येते.

५.५.७ शेती सुधारणा :-

डॉ. सन् यत् सेन यांचे 'लोकांची उपजिविका' या तत्त्वाची पूर्तता करण्यासाठी शेतकरी व कष्टकरी यांच्या समस्यांकडे राष्ट्रीय सरकारने चांगलेच लक्ष पुरविले. इ.स. १९३० मध्ये राष्ट्रीय सरकारने भूमी कायदा पारित केला. त्यामुळे कुळांचे अधिकार वाढून त्यांचे भाडे कमी करण्यास मदत झाली. या कायद्याद्वारे कूळांनी जर दोन वर्षे काही कारणाने जमीन लागवड केली नाही किंवा ते भाडे देऊ शकले नाहीत तर त्यांना त्या दोन वर्षाची भाडे सवलत मिळण्याचा अधिकार मिळाला. परंतु या कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे न केल्यामुळे गरीब शेतकऱ्यांची परिस्थिती फारशी सुधारली नाही.

शेतकरी वर्गाचे प्रश्न सोडविण्यामध्ये हवे तेवढे यश न आल्यामुळे राष्ट्रीय सरकारने शेतीक्षेत्रात तांत्रिक सुधारणा करण्याचे ठरवले. त्यासाठी कृषि संशोधन संस्थांची उभारणी करण्यात आली. अनेक महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये कृषी विभागांची स्थापना करण्यात आली. अन्नधान्य, कापूस आणि रेशमी उद्योग यांमध्ये उत्पादन वाढीसाठी अभ्यास प्रकल्प घेण्यात आले. शेतकऱ्यांना उत्पादनक्षम बियाणे आणि रासायनिक खतांचा वापर यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. पूरग्रस्त क्षेत्रांमध्ये छोटे बंधारे (डाईक्स) बांधणे आणि अवर्षणग्रस्त भागामध्ये जलसिंचन पुरवठा करणे असे प्रकल्प राष्ट्रीय सरकारने हाती घेतले. तरीसुद्धा सर्वसामान्य तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत सदर शेती सुधारणांचे फायदे पोहोचले नाहीत आणि शेतकरी वर्गाची परिस्थिती अधिकच बिकट होत चालली.

५.५.८ वाहतूक व दळणवळणाच्या सोयी:-

राष्ट्रीय सरकारने वाहतूक व दळणवळण क्षेत्रामध्ये सुधारणा करण्यासाठी अनेक प्रकल्प हाती घेतले. अस्तित्वात असलेल्या रेल्वेमार्गांचा वापर करणे आणि नवीन रेल्वे मार्गांचा विस्तार करण्याच्या उद्देशाने इ.स. १९२८ साली स्वतंत्रपणे रेल्वे मंत्रालयाची स्थापना करण्यात आली. राष्ट्रीय सरकारने मध्य आणि दक्षिण चीनपर्यंत रेल्वे मार्गांचा विस्तार केला. पेकींग ते कँटन सारखे रेल्वे मार्ग परदेशी मदतीने उभारण्यात आले. त्याचप्रमाणे दूरदूरच्या अंतरापर्यंत मोटार वाहतूकीसाठी आधुनिक पद्धतीचे रस्ते बनविण्यात आले. रस्ते बांधकाम प्रकल्पाचे चांगल्याप्रकारे पर्यवेक्षण करण्यासाठी राष्ट्रीय रस्ते नियोजन आयोग स्थापन करण्यात आला. चीनी आणि अमेरिकन भांडवलाच्या संयुक्त उभारणीद्वारे इ.स. १९३० मध्ये चीनी राष्ट्रीय हवाई वाहतूक महामंडळ स्थापन केले गेले. संदेश वाहतूकीच्या क्षेत्रामध्ये राष्ट्रीय सरकारने टपाल, तारायंत्र आणि दूरसंदेश वहन सेवांमध्ये मोलाची प्रगती केली.

५.६ राष्ट्रीय सरकारचे अपयश

इ.स. १९४९ मध्ये साम्यवादी माओ त्से तुंग यांनी राष्ट्रीय सरकारचा दारुण पराभव केला व त्याची चीनच्या मुख्यभूमीतून तैवानमध्ये हकलपट्टी केली. यांवरून राष्ट्रीय सरकार हे लष्करी

डावपेच, मुत्सद्दीपणा यांमध्येच अपयशी ठरले नसून प्रशासनाच्या पातळीवर देखील त्यांना यश मिळाले नाही. त्याची कारणे आपणांस पुढीलप्रमाणे अभ्यासता येतील.

५.६.१ ग्रामीण समस्या सोडविण्यात अपयश :-

राष्ट्रीय सरकारचा कार्यक्रम हा क्रांतीकारी स्वरुपाचा नव्हता तर तो सामाजिक व आर्थिक सुधारणांचा होता. त्यांचा सुधारणा कार्यक्रम हा मध्यम – वरिष्ठ भांडवलदारी वर्गाच्या फायद्याचा होता. त्यामुळे गरीबीने व्यापलेल्या बहुसंख्य वर्गापर्यंत सदर सुधारणा पोहोचल्या नाहीत. ग्रामीण पुनर्रचन बाबतचे प्रयोग करण्याची जबाबदारी राष्ट्रीय सरकारने अर्ध-स्वायत प्रांतिक सरकारांवर सोपविली असली तरी त्यात किती प्रमाणात यश आले किंवा नाही यांकडे दुर्लक्ष केले. भूमी सुधार कायदे जे शेतकऱ्यांच्या हितासाठी केले होते त्यांची अंमलबजावणी क्वचित केली गेली. धनदांडग्या जमीनदार वर्गाने राष्ट्रीय सरकारला नेहमीच आर्थिक व राजकीय पाठींबा दिला होता व त्यांना शेतकऱ्यांना कर्जसुविधा, भूमीसुधारणा मिळू नयेत असे वाटत असल्यामुळेच त्यांचे हितसंबंध जोपासण्यासाठी राष्ट्रीय सरकारने सदर कायद्यांची अंमलबजावणी केली नाही. त्यामुळे ग्रामीण जनतेने राष्ट्रीय सरकारला ग्रामीण जमीनदार आणि शहरी उद्योगपती यांचेच रक्षणकर्ते मानले. त्यामुळे हा ग्रामीण समाज साम्यवाद्यांच्या बाजूने जाऊ लागला.

५.६.२ आर्थिक विकासाचा अभाव :-

आर्थिक विकासाच्या बाबतीत पाहिले तर राष्ट्रीय सरकारचा आर्थिक विकासाचा कार्यक्रम अतिशय निराशाजनक होता. ज्यावेळेस हलक्या व मध्यम उद्योगांची सुरूवात झाली होती, दूरसंदेश व दळणवळण सोयींनी वेग घेतला होता आणि आयात – निर्यात संस्थांची सुरुवात झाली होती त्याचवेळी कोमिंगटांग पक्षाचा उदय होण्यास सुरूवात झाली आणि जग पहिल्या महायुद्धात गुंतले होते. तशातच आर्थिक आधुनिकीकरण प्रक्रीया जलद व विस्तारीत होईल याबाबतची अपेक्षा राष्ट्रीय सरकारकडून पूर्ण होईल याची काहीच शाश्वती नव्हती. तरीदेखील जकात स्वायत्तता, आर्थिक, कायदेविषयक आणि शैक्षणिक सुधारणांच्या बाबत तसेच औदयोगिक विस्तारीकरण, वाहतूक व दळणवळण सुधारणा यांमध्ये थोडे फार बदल करून आर्थिक विकासाबाबत आपली कळकळ सिद्ध करण्याचा प्रयत्न केला होता. तरीसुद्धा सदरच्या सुधारणा पारंपारिक पद्धतीपासून फारशा वेगळ्या व आधुनिक अर्थव्यवस्थेस पूरक नव्हत्या.

चीनी जीवन व राहणीमान यांवर दूरगामी परिणाम होईल अशा आर्थिक सुधारणांची चीनच्या जनतेला गरज होती. राष्ट्रीय सरकारची आर्थिक निती ही आर्थिक वाढीस प्रतिकूल होती. राष्ट्रीय सैन्याची उभारणी करण्यासाठी वारेमाप खर्च केल्यामुळे आर्थिक कार्यक्रमास थोड्याफार प्रमाणात चालना मिळाली. परंतु त्यामुळे ज्या प्रकल्पांनी भविष्यात अधिक उत्पादन व सेवा दिली असती अशा प्रकल्पांचा निधी व श्रम लष्कर उभारणीसाठी वापरण्यात आला. त्याचा परिणाम असा झाला की, इ.स. १९३२ – ३६ दरम्यान चीनचे ठोक राष्ट्रीय उत्पन्न (GNP) आणि वाढती लोकसंख्या यांचा ताळमेळ बसेनासा झाला. त्यामुळे लोकांमध्ये राष्ट्रीय सरकारविरुद्ध असंतोष निर्माण झाला.

५.६.३ तात्विक मार्गदर्शनाचा अभाव :-

चँग कै शेक हे स्वत: लष्करी सेनापती असल्यामुळे त्यांनी चीनच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक प्रश्नांकडे लष्करी सेनापतीच्या चष्म्यातून पाहिले. त्यांनी देशाच्या आर्थिक व सामाजिक समस्यांवर लष्करी दृष्टीकोनातून उपाय योजण्याचे प्रयत्न केले. त्यांच्या लष्कराने चीनवर ताबा मिळविल्यावर काही दुसरे उपाय केल्यासच ही सत्ता आपल्या ताब्यात राहू शकते याचा त्यांनी विचारच कधी केला नाही. त्यांनी लष्करावरच भर दिल्यामुळे त्यांच्या कोमिंगटांग पक्षाला तात्विक अधिष्ठान उरले नाही. त्यामुळे सदर पक्षाच्या पाठीमागे एक आदर्श विचारसरणी असल्याचे कोणतेही चिन्ह दिसत नव्हते. त्यामुळे त्यांच्या लष्करी दृष्टीकोनामुळे लोकांचा समज झाला की, "चँग कै शेक नी चीनवर कोणतेही वैचारिक राज्य केले नसून लष्करी राज्य केले."

डॉ. सन् यत् सेन यांच्या 'तत्वत्रयी' व्यतिरिक्त लोकांशी प्रत्यक्ष बोलणी केली जाणे व संपर्क साधणे गरजेचे होते. परंतु राष्ट्रीय सरकारकडे साम्यवाद्यांच्या तुलनेत काहीच देण्यासाठी नव्हते. चँग कै शेक कडे फक्त एकच गोष्ट होती आणि ती म्हणजे इ.स. १९३५ मध्ये चीनच्या एकीकरणासाठी त्यांनी सुरू केलेली 'नवजीवन चळवळ होय'. चीनच्या आधुनिक समस्यांच्या निराकरणार्थ कन्फ्युशियन विचारसरणीचे पुनरुज्जीवन करण्यात आले. राष्ट्रीय नेत्यांचा असा भ्रम झाला की, चीनमध्ये वर्गवाद अस्तित्वातच नाही आणि साम्यवाद्यांनी त्याचे चुकीचे अर्थान्वयन केलेले आहे. त्यामुळे राष्ट्रीय सरकारने राजकीय नियंत्रणावर भर दिला आणि अंतर्गत सुधारणांकडे दुर्लक्ष केले.यामुळे राष्ट्रीय सरकारची तत्वज्ञानी दिवाळखोरी झाली आणि तेच त्यांच्या अपयशाचे खरे कारण ठरले.

५.६.४ साम्यवादी पक्षाचे आव्हान :-

राष्ट्रीय सरकाला सर्वात कडवे आव्हान माओ त्से तुंग यांच्या नेतृत्वाखालील साम्यवादी पक्षाने उभे केले. इ.स.१९२७ मध्ये कोमिगंटांग पक्षातून हकालपट्टी झाल्यानंतर साम्यावादी पक्ष राष्टीय सरकार विरुद्ध कारस्थाने करुन एक 'नागरी राज्यक्रांती' करण्याची संधी पाहत होते. दरम्यान किंयांग्सी आणि हुनानसारख्या ग्रामिण चीनच्या भागामध्ये साम्यवादाच्या दुसऱ्या गटाने लोकांना आपले तत्वज्ञान सांगून शेतकरी व कष्टकरी ग्रामीण जनतेमध्ये क्रांतीसाठी मोर्चेबांधणी करण्यात सुरूवात केलेली होती. त्यामुळे चँग कै शेक नी साम्यवाद्यांचा पूरता नि:पात करण्यासाठी त्यांच्याविरुध्द अनेक लष्करी मोहिमा राबविल्या. परंतू त्या संपूर्णत: अपयशी ठरल्या आणि त्यामध्ये जिवित, वित्त व भौतिक हानी झाली.

इ.स.१९३१ मध्ये जपानने मांचुरियावर आक्रमण केले तेव्हा केवळ साम्यवादयांना विरोध म्हणून चँग कै शेक नी जपानबरोबर समझोता केला.परंतू त्यानंतर अंतर्गत दबाव आणि साम्यवादयांची जपानबरोबर लढण्याची तयारी यामुळे राष्ट्रीय सरकार व साम्यवादी यांच्यामध्ये काही काळ युती झाली. तरीसुध्दा दुसऱ्या महायुध्दामध्ये (१९४५) जपानचा पराभव झाला आणि जपानने शरणागती पत्करली त्यानंतर चीनमध्ये राष्ट्रीय सरकार आणि साम्यवादी यांच्यामध्ये गृहयुध्दास सुरूवात झाली व त्यामध्ये साम्यवाद्यांचा विजय झाला आणि चँग कै शेकना आपल्या राष्ट्रीय सरकारसह तैवानच्या बेटावर पळून जावे लागले.

५.६.५ आपली प्रगत तपासा:-

१) डॉ.सन्.यत सेन यांनी सोव्हिएत रशियाची मदत का घेतली ?

२) चँग कै शेकच्या राष्ट्रीय सरकारच्या प्रशासकीय सुधारणांची यादी करा.

_____

_____

_____

_____

_____

५.७ चँग कै शेकच्या राष्ट्रीय सरकारचे परराष्ट्र धोरण

चँग कै शेकच्या राष्ट्रीय सरकारचे परराष्ट्र धोरण पहावयाचे झाल्यास आपणांस डॉ.सन् .यत् सेन यांच्या कोमिंगटांगच्या नेतृत्वा-पासून पहावे लागेल. डॉ.सेन हे पश्चिमी लोकशाही आणि त्यांची प्रशासन पध्दती यांचे अतिशय चाहते होते आणि त्याचेच अनुकरण ते चीनमध्ये करु इच्छित होते. परंतु हे पाश्चिमात्य देश आपल्या व्यक्तिगत स्वार्थापायी चीनला मदत करण्यास पुढे येत आहेत हे पाहून डॉ.सेन यांचा पूरता भ्रमनिरास झाला. या देशांना ही भीती होती की, आपणच प्रशिक्षित केलेला एकीकृत व लोकशाहीवादी चीन भविष्यात आपणासच व आपल्या चीनमधील कारवायांस मारक ठरेल. त्यामुळेच डा.सेन यांनी साम्यवादी सोव्हिएत रशियाकडे मदतीचा हाच मागितला आणि परिणामी चीनमध्ये हळूहळू साम्यवाद मूळ धरु लागला.

५.७.१ रशियाबरोबर परस्पर सहकार्य:-

इ.स.१९२० पासून रशिया चीनसमोर परराष्ट्र संबंध स्थापित करण्यासाठी अधिकृत प्रस्ताव ठेवत आला होता. परंतु सुरुवातीला कोमिंगटांग पक्ष आपल्या दृष्टीकोनाविषयी व्दिधा मन:स्थितीत होता. एका गटाच्या मते, रशियाबरोबर सहकार्य करुन त्यांची चीनला मदत घेणे आवश्यक आहे तर दुसऱ्या गटाचा रशियाच्या साम्यवादालाच विरोध होता. तशाच परिस्थितीत रशियाच्या साम्राज्यवादविरोधी दृष्टीकोनाने चीनमधील राष्ट्रवादी गटाच्या मनावर अतिशय प्रभाव निर्माण केला. रशियाने झार प्रशासन काळात (रशिया) चीनकडून ज्या काही विशेष सवलती मिळविल्या होत्या त्या विनाअट सोडून देण्याची घोषणा केली. तसेच मांचुरियावर कब्जा करण्यापासून रशिया जपानला रोखू शकेल आणि साम्राज्यवाद विरोधी लढ्यामध्ये रशिया चीनला मदत करील या रशियाच्या आश्वासनांनी तर राष्ट्रवादी नेते रशियाकडे अत्यंत आकर्षित झाले.

पाश्चिमात्य देशांनी डॉ. सेन यांच्या सरकारला आर्थिक मदत देण्यास नकार दिल्यामुळे त्यांचा भ्रम निरास झाला व त्यांनी रशियाकडे मदतीची मागणी केली. रशिया जणू काही या संधीची वाटच पाहात असल्यामुळे रशियाने चीनला साम्राज्यवादा विरुध्द लढण्यासाठी हवी ती मदत देण्याचे आश्वासन दिले. रशियाने कँटनला राजनीतीक आणि लष्करी शिष्टमंडळे पाठविली. इ.स. १९२३ मध्ये डॉ.सेन यांनी अशी घोषणा केली, “आम्ही पाश्चिमात्य देशांकडे आता मदत मागणार नाही. आमच्या नजरा आता रशियाकडे वळल्या आहेत”.

५.७.२ चँग कै शेकची परराष्ट्र नीती :-

इ.स. १९२७ च्या नानकींग घटनेने परकीय देशाचे प्रतिनिधी (चीनमधील) अतिशय दुखावले गेले होते. त्यामुळे चीनच्या राष्ट्रीय सरकारबरोबर कोणतेही संबंध वाढविण्यास ते तयार नव्हते. तसे पाहिल्यास नानकींग घटनेचा नानकींग हत्याकांडाशी कोणताही संबंध नाही. जसजसा कोमिंगटांग पक्षाच्या राष्ट्रीय फौजांनी जवळ येऊन शहरांमध्ये प्रवेश केला (कारण परकीय देशांच्या प्रतिनिधींचे वास्तव्य शहरातच अधिक होते) तसेतसे त्यांनी परकीयांची मालमत्ता लुटण्यास सुरुवात केली. एवढेच नव्हे तर बऱ्याच परकीयांना ठार मारणे, त्यांचे शक्य तेवढे नुकसान करणे, त्यांना जखमी करणे इत्यादी कृत्यांना सुरुवात झाली. पश्चिमी आणि जपानी युध्दजहाजे चीनी फौजांना प्रतिकार करत होती व शहरांचे कमीत कमी नुकसान होईल असे प्रयत्न करीत होती.

चँग कै शेक नी या घटनेचे खापर कोमिंगटांग फौजेमध्ये छुप्या स्वरूपात असलेल्या साम्यवादी तत्वावंर फोडले आणि ते जपानी आणि पश्चिमी देशांनी सहज स्विकारले. परंतू ते सिध्द करण्यासाठी कोणताही पुरावा नव्हता. इ.स.१९२७ च्या नानकींग घटनेने तर परकीय अत्यंत चिडलेले होते. तरीसुध्दा अमेरिका व जपानने चँग कै शेक विरुध्द कडक कारवाई करण्याचे टाळले. कारण चँग कै शेकचा साम्यवादी तत्वांना असलेल्या विरोधाची धार काहीशी बोथट होईल व तो त्यांच्याशी युती सुध्दा करील आणि त्यांचीच भीती या सर्व परकीय साम्राज्यावादयांना वाटत होती. नानकींग घटनेने झालेले नुकसान भरुन काढण्याचा चँग कै शेकने प्रयत्न केला आणि आपल्या राष्ट्रीय सरकारला या सर्व परकीयांकडून अधिकृत मान्यता मिळवली.

५.७.३ रशिया -चीन संबंधांमध्ये कटुता:-

इ.स.१९२७ मध्ये चँग कै शेकनी रशिया सोबतचे संबंध तडकाफडकी तोडून टाकले. त्यांचा दृष्टीकोन साम्यवादी विरोधी होऊन त्यांनी साम्यवादयांचा छळ करणे सुरु केले कारण त्यांना पश्चिमी साम्राज्यवादयांची सहानुभूती व पाठींबा मिळवायचा होता. म्हणूनच नानकींग घटनेनंतर झालेले नुकसान भरुन काढण्याचे प्रयत्न त्यांनी केले. त्यामुळे त्यांचा एक फायदा नक्कीच झाला आणि तो म्हणजे चीन परकीयांच्या बंधनातून मुक्त झाला. चीनच्या सार्वभौमतेवर जे जोखड या पश्चिमी देशांनी ठेवले होते त्या जोखडातून चीनची सुटका करण्यात तो काही प्रमाणात यशस्वी झाला.

५.७.४ पश्चिमी देशांशी करारांचे पुनरुज्जीवन:-

राष्ट्रीय सरकारने चीनचे एकीकरण व पुनर्बांधणी करतानाच पश्चिमी देशांनी चीनवर लादलेले अन्यायकारक तह-करार सुध्दा पुनर्विचारार्थ ठेवले. सर्वात प्रथम पहिल्या महायुद्धाने विजयी(पश्चिमी) राष्ट्रांची एकी विस्कळीत झाली होती. जर्मनीचा दारुण पराभव झाल्यामुळे चीनमधील आपले विशेष हक्क मिळविण्यास ती अजिबात समर्थ नव्हती. सोव्हिएत रशियाने तर स्वेच्छेनेच झारच्या काळात मिळविलेले चीनमधील विशेष हक्क व सवलती सोडून देण्याचा निश्चय व्यक्त केला होता. बेल्जियम व हॉलंड सारख्या कमकुवत राष्ट्रांना तर त्यांचे चीनमधील विशेष हक्क सोडण्यास जबरदस्तीने भाग पाडले जाऊ शकत होते. आता उरलेल्या बलाढ्य पश्चिमी देशांपैकी इंग्लंड,फ्रान्स आणि अमेरिका यांनी चँग कै शेकच्या राष्ट्रीय सरकाराच्या साम्यवादी विरोधी मोहीमेत अगोदरच संपूर्ण सहानुभूती व पाठींबा व्यक्त केला होता. जपानमधील उदारमतवादी सरकारसुद्धा चीनच्या महाभिंतीच्या दक्षिणेला असलेल्या अठरा प्रांतांबाबत (China Proper) काहीसे तडजोडवादी होते.

डिसेंबर १९२६ च्या सुरुवातीला इंग्लडने सर्व कराराबद्ध राष्ट्रांना असे सुचविले होते की, चीनच्या राष्ट्रीय सरकारबाबत अधिक सलोख्याचे धोरण स्विकारावे आणि जेव्हा कधी चीनी जकात कायदा अस्तित्वात व अंमलात येईल तेव्हा आपण सर्वांनी जकात स्वायात्तता (Tariff Autonomy) स्विकारावी. त्यामुळे चीनी राष्ट्रीय सरकारने जकात स्वायत्तता लागू केली व ती १जानेवारी १९२९ पासून अंमलात आली. जपानने सुद्धा सदर पश्चिमी राष्ट्रांना दुजोरा दिला आणि ६ मे १९३० रोजी प्रदीर्घ चर्चा व बोलणी करुन चीन-जपान जकात करारावर सही केली. अशा प्रकारे चीनने बऱ्याच वर्षांनी प्रथमच चीनमध्ये परकीय मालावर आपला स्वतंत्र जकात कर लागू केला. त्यामुळे चीनला अतिरिक्त महसूल मिळू लागला आणि आपल्या स्वदेशी उद्योगांना परकीय मालाच्या तुलनेमध्ये संरक्षण देता आले.

चीनचे परकीयांच्या विशेष हक्क- सवलतीचे विलीनीकरण करण्याचे प्रयत्न व त्यांचे करार यांचा पुनः विचार करण्याची योजना अंशतःच यशस्वी झाली. इ.स. १९३० पर्यंत एकूण नऊ देश आपले विशेष हक्क सोडून देण्यास तयार झाले. परंतू इंग्लड, फ्रांन्स आणि अमेरिका यांनी हे हक्क एकदम सोडून न देता हळूहळू व टप्प्याटप्प्याने सोडून देण्यास संमती दर्शविली . एकीकडे जपान विरुद्धच्या मोहीमेमध्ये सदर देशांची आपणास मदत होईल या दृष्टीने चँग कै शेकच्या राष्ट्रीय सरकारनेसुद्धा हे हक्क एक दशकभर हळूहळू चालूच ठेवण्यास मान्यता दिली. दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान इंग्लड.फ्रांन्स आणि अमेरिका या देशांनी इ.स.१९४३ साली एक संयुक्त घोषणापत्राद्वारे स्वेच्छेनेच चीनमधील आपले विशेष हक्क – करार सोडून देण्याचे जाहिर केले. अशाप्रकारे इ.स. १९३१ मध्ये चीनला जकात स्वायतता मिळाली आणि पुढे अनेक भाडेतत्वावरील प्रदेश, परकीय विशेष हक्क व सवलती रद्द होऊन परकीय वसाहती मुक्त झाल्या आणि तेथे चीनची स्वतःची सत्ता स्थापन झाली.

५.७.५ मांचुरियन समस्याः-

चँग कै शेक यांस सर्वात कडवे आव्हान हे अंतर्गत शत्रूंपासून नव्हे तर जपानच्या साम्राज्यवादाचे होते. १८ सप्टेंबर १९३१ रोजी मुकडेन प्रांताच्या बाहेरच एक बॉम्बस्फोट झाला व त्याने रेल्वे मार्गाचे मोठे नुकसान केले. हा स्फोट जपानी फौजेने योजनाबद्ध पद्धतीने केलेला होता.त्या घटनेनंतर जपानने ताबडतोब मांचुरियावर ताबा मिळविला ज्यामध्ये चीनचे ईशान्य भागातील तीन प्रांत आणि जवळजवळ ३० दशलक्ष चीनी लोकांचा समावेश होता. जपानच्या लष्करी ताकदीपुढे चीन प्रतीकार करु शकत नव्हता त्यामुळे राष्ट्रीय नेता (लष्करी) म्हणून चँग कै शेकच्या सामर्थ्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. पुढे काही वर्षे चीनवर जपानचा दबाव कायम राहीला आणि या शत्रूचे आव्हान प्रत्यक्ष पेलवणे चँग कै शेकना शक्य नव्हते. त्यामुळे चँगनी सदर प्रश्न राष्ट्रसंघाकडे (League of Nations) नेला. राष्ट्रसंघाने असा ठराव केला की, जपानने मांचुरियातून आपल्या फोजा मागे घेऊन पूर्वीच्याच ठिकाणी परत न्याव्यात. परंतु त्याकडे जपानने दुर्लक्ष केले. त्यानंतर चँगने अशी घोषणा केली, "प्रथम अंतर्गत शांतता प्रस्थापित करु या आणि मग बाह्य समस्यांवर लक्ष केंद्रीत करु या".याचा दुसरा अर्थ प्रथम देशांतर्गत साम्यवादयांचा निःपात करु या आणि मग जपानकडे लक्ष देऊ या असा होता.

चीनच्या राष्ट्रीय सरकार विरुद्ध जनतेमध्ये तीव्र नाराजी पसरली होती. जपानचा मुकाबला करण्यात राष्ट्रीय सरकार असमर्थ असल्यामुळे मग जपानला वेठीस धरण्यासाठी लोकांनी जपानी उद्योग धंद्यांमध्ये संप करणे आणि जपानी मालावर बहिष्कार टाकणे यांसारख्ये कार्यक्रम सुरु केले. इ.स.१९३२ मध्ये पू यी हा पदच्यूत चीनी सम्राट तिएन्तसीन या जपानच्या वर्चस्वाखालील

प्रदेशात राहत होता. त्यालाच मांचुकुओ प्रजासत्ताकाचा प्रमुख शासक म्हणून घोषित केले आणि पुढे दोन वर्षांनी त्याला त्याच राज्याचा सम्राट म्हणून राज्याभिषेक केला. हे मांचुकुओ राज्य दुसऱ्या महायुद्धापर्यंत अस्तित्वात होते. त्यानंतर राष्ट्रसंघाच्या शिफारशीनुसार स्थापना झालेल्या लिटन आयोगाने चीनच्या सर्वभौमत्वाखाली मांचुरियास स्वायत्ताता (Autonomy) बहाल केली. परंतु या शिफारशीची कडेकोट अंमलबजावणी करण्यास पश्चिमी राष्ट्रे तयार नव्हती. कारण त्यांच्या मते, रशियाचा मांचुरिया मधील हस्तक्षेप रोखण्यासाठी शक्तीशाली लष्करी जपानचे मांचुरियातील आस्तित्व आवश्यक आहे.

५.७.६ चीन – जपान युद्ध(१९३७-१९४५) :-

इ.स.१९३७ च्या जुलै महिन्यात पेकींगजवळील मार्को पोलो पूलाजवळ गंभीर समस्या निर्माण होऊन चीनी व जपानी फौजांमध्ये घनघोर युध्दास सुरुवात झाली. चँग कै शेकनी समझोत्याची बोलणी चालू ठेवली खरी परंतू जपानच्या फौजांना मोठ्या तयारीने तोंड दिले. चीनी फौजांना औद्योगिक तळ, प्रशिक्षित सैन्य व अधिकारी आणि पुरसे संख्याबळ नसल्यामुळे ते मागे पडत होते. जपानी फौजांनी नानकींग या राष्ट्रीय सरकारच्या राजधानीसह चीनची महत्वाची शहरे काबीज केबी. इ.स.१९३८ मध्ये जपानी फौजांनी मध्य चीनमधील हँकाव्ह शहरावरही कब्जा केला आणि दक्षिण चीनमधील कँटन शहर आपल्या ताब्यात घेतले.

चँग कै शेकनी आपल्या सैन्याचे नेतृत्व करीत आंतरचीनच्या पश्चिमेकडे आपला मोर्चा वळविला व सिचुआन प्रांतामध्ये चुंकीगं येथे नवीन युध्दकालीन राजधानी स्थापन केली. जपानने चीनची अर्थव्यवस्था विस्कळीत केली आणि चीनचा संपूण किनारी पट्टा ताब्यात घेऊन चीनी फौजांना वेगळे पाडले. तसेच आंतरचीनशी त्यांचा संपर्क तोडून टाकला. तरीही चीनी फौजांनी जपानी फौजांचा प्रतिकार सुरुच ठेवला.

जुलै १९३७ ते डिसेंबर १९४१ चीनने जपानचा एकाकीच प्रतिकार केला. जपानने हवाई बेटांतील पर्लहार्बर या अमेरिकी नावीक तळावर हल्ला केला तेव्हा दुसरे महायुद्ध संपूर्ण पॅसिफिक महासागरामध्ये पसरले. अशा वेळी चीन हे मित्र राष्ट्रांचा (Allied Powers) भाग बनले.चीनअंतर्गत जरी चँग कै शेकची स्थिती नगण्य असली तरी परराष्ट्र स्तरावर त्यांची प्रतिष्ठा वाढली. त्यामुळे ते सर्व श्रेष्ठ चार (Big Four) राष्ट्रप्रमुखांच्या (Franklin D. Roosevelt, Winston Churchill, Stalin) गटामध्ये सामील झाला. त्यांनी रुझवेल्ट आणि चर्चिल यांच्याबरोबर शांतता चर्चेसाठी कैरो (इजिप्त)येथे नोव्हेंबर १९४३ रोजी भेट दिली.

५.७.७ चीनी गृह-युद्ध (यादवी), इ.स. १९४५-४९:-

चीनला एक राष्ट्र म्हणून व चँग कै शेकना एक राष्ट्रप्रमुख म्हणून दुसऱ्या महायुद्धानंतर प्रतिठा प्राप्त झाली असली तरी सरकारमध्ये भ्रष्टाचार व महागाई वाढ यांनी थैमान घातले होते.इ.स.१९४४ पर्यंत जपानचे चीनवरील हल्ले चालूच होते.दूसऱ्या बाजूला या परिस्थितीचा फायदा उठवीत चीनमधील साम्यवादयांनी आपल्या गनीमी संगटनांचे जाळे संपूर्ण उत्तर चीन मध्ये विणले. जेव्हा इ.स.१९४५ मध्ये युद्ध समाप्त झाले त्यावेळी जवळजवळ संपूर्ण ग्रामीण चीनच्या भागावर साम्यवादयांनी आपले नियंत्रण बसवले होते. अमेरिकेने जरी चीनमधील साम्यवादी आणि राष्ट्रीय सरकार यांच्यामध्ये सलोखा राखण्यासाठी बोलणी सुरु केलेली असली जरी चीनमध्ये यादवी युद्ध टाळणे अशक्य होते. सुरुवातीला चँगच्या फोजांनी साम्यावादयांवर

वर्चस्व मिळविण्याचा प्रयत्न केला होता. परंतु इ.स.१९४८ च्या शेवटी व इ.स. १९४९ च्या सुरुवातीला त्यांस भीषण पराभवांस सामोरे जावे लागले होते. इ.स. १९४९ च्या उन्हाळ्यामध्ये राष्ट्रीय सरकारचा प्रतिकार गडगडला आणि ऑक्टोबर १९४९ मध्ये साम्यवादी नेते माओ त्से तुंग यांनी नवीन चीनचे प्रजासत्तक घोषित केले. चँग कै शेकनी आपल्या हाती उरलेल्या फौजेसह तैवान बेटाकडे पळ काढला. तेथेच त्यांनी आपले राष्ट्रीय सरकार स्थापन केले आणि त्यालाच चीनचे अधिकृत सरकार म्हणून घोषित केले.

५.७.८ राष्ट्रीय सरकारचे मूल्यमापन:-

आपणांस राष्ट्रीय सरकारचे संपूर्ण अपयश दिसत असले तरी त्यांच्या अंतर्गत व परराष्ट्र धोरणाचे मूल्यमापन करतांना त्यात जपानी आक्रमण व अंतर्गत युद्ध(साम्यावाद्यांबरोबर) या दोन्ही आघाड्यांवर काम करावे लागले याचाही विचार करावा लागेल. चँग कै शेकचे चीनच्या आधुनिकीकरणामधील योगदान हा तसा वादाचा विषय आहे. त्याच्या अनुयायी व चाहत्यांनी त्यास भरभरुन श्रेय दिलेले आहे तर त्याच्या विरोधकांनी त्याचा अनेक बाबतीत निषेध केलेला दिसतो.

चँग कै शेकनी जेव्हा कोमिंगटांग पक्षाचे व राष्ट्रीय सरकारचे नेतृत्व स्विकारले तो काळ अत्यंत धकाधकीचा व गोंधळाचा होता. तो चीनच्या एकीकरणाचा निदर्शक बनला आणि संपूर्ण चीन त्याने एका छत्राखाली आणला. त्याने लष्करी नेत्याचा नि:पात केला आणि कोमिंगटांगच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय सैन्याचे एकीकरण केले. स्वत:ची इच्छा नसताना देखील केवळ जपान या समान शत्रूचा मुकाबला करण्यासाठी त्याने साम्यावद्यांशी युती केली.त्याचे लष्करी नेतृत्व निर्विवाद होते आणि त्यामुळे त्याच्या नेतृत्वास चीनी साम्यावादयांनी मान्यता दिलीच परंतू सोव्हिएत रशियानेसुद्धा मान्यता दिली आणि जपानी आक्रमणाचा मुकाबला करण्यासाठी रशियाने चँग च्या नेतृत्वाखाली चीनी साम्यावादयांवर दबाव टाकला व जपानचा मुकाबला करण्यास पाठींबा दिला.

चँग कै शेकच्याच नेतृत्वाखाली चीनने स्वत:ची जकात स्वायत्तता प्राप्त केली व पश्चिमी देशांबरोबर अन्यायकारक तह करारांचे पुनरुज्जीवन केले. या प्रतिकूल परिस्थितीतदेखील चँगनी चीनच्या आर्थिक क्षेत्रात आधुनिकीकरणाची सुरुवात केली. तरीदेखील त्या सुधारणांचे फायदे नागरी व ग्रामीण, दरिद्री लोकांपर्यत पोहोचू शकले नाहीत. त्यांनी कामगारांचे व शेतकरी-कष्टकऱ्यांचे राज्यक्रांतीमधील योगदान मान्य केले नाही आणि साम्यवादयांचा सतत तिरस्कार केला. या सर्व चुका चँग कै शेकच्या हातून घडलेल्या असल्या तरी जॉन गुंथेर याने त्यांचे वर्णन करताना असे म्हटले, "अनेक पिढ्यांच्या अंतराने चीनने एका शक्तीशाली व्यक्तिला (चँग कै शेक) जन्म दिला."

५.८. समारोप

डॉ. सन्.यत्.सेन यांच्या तेंग मेंग हुई या संघटनेचे रुपांतर कोमिंगटांग नावाच्या राजकीय पक्षात केले गेले व पुढे त्यालाच राष्ट्रीय लोक पक्ष (National People's Party) म्हटले जाऊ लागले. साम्यवादी पक्ष आणि कोमिंगटांग यांच्यामध्ये युती झाली परंतु डॉ.सेन हयात असे पर्यंतच ती टिकली. पुढे चँग कै शेक साम्यावादयांविषयी साशंक बनले व त्यांनी साम्यवादयांचेच निर्दालन करण्याचा विडा उचलला. परंतु चीन जपान युद्धामध्ये जनतेच्या दबावामुळे पुन्हा राष्ट्रीय सरकारला साम्यवादयांशी नाईलाजाने युती करुन जपानविरुध्द संयुक्त

मोर्चा उघडावा लागला.राष्ट्रीय सरकारने चीनच्या एकीकरणासाठी प्रयत्न केले व आर्थिक ,औद्योगिक, कायदेविषयक, शिक्षणक्षेत्र, शेती, वाहतूक, दळणवळण इ. क्षेत्रांमध्ये सुधारणा करण्याचे प्रयत्न केले.परंतू चँग कै शेकची सर्व भिस्त लष्करावर अवलंबून असल्यामूळे त्यांस यश मिळाले नाही. परराष्ट्र धोरण हवे तेवढे कठोर न ठेवल्यामुळे साम्यवादयांना रशियाने पूर्ण पाठिंबा दिला आणि शेवटी यादवी युद्धामध्ये साम्यावादयांचा विजय झाला.

५.९. प्रश्न

१) चीनच्या राष्ट्रीय सरकारमधील डॉ.सन्.यत्.सेन यांच्या योगदानाचे वर्णन करा.
२) एक लष्करी व राजकीय नेता म्हणून चँग कै शेकच्या व्यक्तिमत्वाचा मागोवा घ्या.
३) चीनच्या राष्ट्रीय सरकारच्या अंतर्गत धोरणावर चर्चा करा.
४) चीनच्या राष्ट्रीय सरकारच्या प्रशासकीय सुधारणांचे विश्लेषण करा.
५) चीनच्या राष्ट्रीय सरकारच्या अपयशास कारणीभूत घटकांचे परीक्षण करा.
६) चीनच्या राष्ट्रीय सरकारचे परराष्ट्र धोरण विशद करा.

❖❖❖

६

चीनी साम्यवादी पक्ष
(COMMUNIST PARTY OF CHINA)

घटक रचना :-

६.० उद्दिष्टचे
६.१ प्रस्तावना
६.२ चीनमधील साम्यवादाचा विकास व कारणे
६.३ माओ त्से तुंग यांचा उदय
६.४ माओ त्से तुंग यांची धोरणे व नीती
६.५ समारोप
६.६ प्रश्न

६.० उद्दिष्टचे

१) चीनमधील साम्यवादाच्या विकासाचा आढावा घेणे.
२) माओ त्से तुंग यांचा चीनमध्ये उदय समजून घेणे.
३) चीनमधील माओ त्से तुंग यांच्या धोरणांचा अभ्यास करणे.

६.१ प्रस्तावना

चीनच्या इतिहासात २०व्या शतकाच्या पहिल्या अर्धकामध्ये चीनचे राजेशाहीमधून लोकशाही प्रजासत्ताकामध्ये आणि अंतिमतः लोकशाही प्रजासत्ताकामामधून एक पक्षीय साम्यवादी राज्य पद्धतीमध्ये स्थित्यंतर हे अत्यंत महत्त्वाचे टप्पे आहेत. इ.स.१९१७ मध्ये रशियामध्ये बोल्शेविक (साम्यवादी) राज्यक्रांती झाली आणि त्यांनी मार्क्सवादाच्या 'कामगारांची हुकुमशाही' (कामगारांची सत्ता) (Proletarian Dictatorship) या सिद्धांताचा प्रत्यक्ष अमल लागू केला. त्यानंतर काही वर्षांनी चीनमध्ये साम्यवादी पक्षाची स्थापना करण्यात आली. सुरूवातीच्या काळात चीनमधील साम्यवादी पक्षाने वरवर का होईना कोमिंगटांग पक्षाबरोबर युती केली होती. परंतु चँग कैशेकचा साम्यवाद्यांविषयी सततचा तिरस्कार व त्यांना नेस्तनाबूत करण्यासाठी त्याने योजलेल्या लष्करी मोहिमा यामुळे साम्यवाद्यांनी गनिमी युद्धाद्वारे बचावात्मक पवित्रा घेतला होता. परंतु साम्यवाद्यांनी माओ त्से तुंग यांच्या नेतृत्वाखाली दरिद्री ग्रामीण भागामध्ये आपला जम बसविला व तेथे ते लोकप्रिय झाले. चँग कै शेकचे राष्ट्रीय सरकार आणि साम्यवादी यांच्यातील

गृहयुद्धामध्ये (Civil War) शेवटी साम्यवाद्यांचा जय झाला आणि इ. स. १९४९ (ऑक्टोबर) मध्ये 'चीनी प्रजासत्ताकाची' (साम्यवादी-People's Republic of China) माओ त्से तुंग यांच्या नेतृत्वाखाली स्थापना करण्यात आली व चँगला तैवान येथे पळून जावे लागले. साम्यवादी राजवटीखाली 'चीनी प्रजासत्ताक' आर्थिक व लष्करी दृष्टया आशियामध्ये एक बलाढ्य राष्ट्र म्हणून उदयास आले.

६.२ चीनमधील साम्यवादाचा विकास व कारणे.

६.२.१ कोमिन्टर्नचा प्रभाव (Influence of Comintern) :-

इ.स. १९१७ मधील रशियाच्या राज्यक्रांतीनंतर बोल्शेविक पक्षाने 'साम्यवादी पक्ष' असे नाव धारण करून रशियन सरकारचे सर्व नियंत्रण आपल्या ताब्यात घेतले. त्यांनी मार्क्सवादाच्या 'वर्ग -संघर्ष' (Class Struggle) या तत्वज्ञानाचा पुरस्कार केला व अंतिमतः रंजला - गांजलेला, दारिद्र्यात पिचलेला गरीब, श्रीमंतांकडून आर्थिक नियंत्रण स्वतःकडे घेतो आणि अशाप्रकारे समाजवादी अर्थरचना निर्माण करतो यावर भर दिला. बोल्शेविकांनी केवळ ही राज्यक्रांती रशियापुरती मर्यादित न ठेवता तीचा अवलंब सर्व जगात होऊ शकतो अशी भावना निर्माण केली. त्यामुळे जगातील इतर देशांमध्ये साम्यवादी क्रांती आणण्यासाठी त्यांनी ''आंतरराष्ट्रीय साम्यवाद'' (Comintern or Communist International) नावाची संघटना स्थापन केली. तिलाच 'तिसरे आंतरराष्ट्रीय मंडळ' असे आणि 'कोमिन्टर्न' असेही संबोधिले जाऊ लागले. कोमिन्टर्न (Comintern) या इंग्रजी शब्दांमध्ये Communist म्हणजे 'Com' आणि International साठी 'Intern' असा शब्दप्रयोग केला आहे. ही संघटना एक जागतिक संघटना असून तिचे सभासदत्व ज्या ज्या देशांमध्ये अस्तित्वात असलेल्या 'असाम्यवादी' सरकारविरूद्ध क्रांतीवादी चळवळी चालू आहेत त्यांनी स्वीकारावे व रशिया आपल्या मुख्य ठिकाणापासून त्यांना सर्व प्रकारची मदत करत असे. त्यामुळे चीनसहीत अनेक देशांमध्ये साम्यवादी चळवळींचे अनुयायी मिळू लागले. या साम्यवादी (मार्क्सवादी) तत्वज्ञानाने मानवजातीच्या सर्व समस्या सोडवता येतील असा दावा केला. तशातच अनेक शतके चीनवर परकीय पाश्चिमात्य भांडवलशाही देशांनी कब्जा करून चीनचे आर्थिक शोषण चालवले होते आणि रशियाचा (साम्यवादी) या भांडवलशाही देशांना व त्यांच्या आदर्शांना कडवा विरोध होता. त्यामुळेच या परकीयांच्या जोखडातून चीनला मुक्त करण्यासाठी चीनमध्ये युरोपियन साम्राज्यवादाविरोधात चीनी साम्यवादी पक्षाची स्थापना झाली आणि त्यास भरमसाठ प्रतिसादही मिळाला.

६.२.२ ''४ मे ची चळवळ'' (The May Fourth Movement) :-

४ मे ची चळवळ (The May Fourth Movement) किंवा ''नव संस्वृती'' (New Culture) या नावाने चीनमध्ये इ.स.१९१६ रोजी जी चळवळ सुरू झाली तिचा चीनच्या साम्यवादी पक्षाचा पाया रोवण्यामध्ये महत्त्वाचा वाटा आहे. ज्यावेळी इ.स. १९११ची चीनची राज्यव्रांती प्रजासत्ताक सरकार चालवण्यामध्ये अपयशी ठरली त्याबरोबरच ही ४ मे ची चळवळ सुरू झाली आणि पुढे १९२०च्या दशकभर सुरू राहिली. त्या चळवळीचे महत्त्व कोणत्याही राज्य व्रांतीपेक्षा वरचढ नसले तरी त्या शतकातील राज्यव्रांतीवादी चळवळींशी या चळवळीची तुलना करता येणे शक्य आहे.

४ मे च्या चळवळीमध्ये बुद्धिवंत वर्गाचा विशेषत: शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्तिचा पुढाकार होता. त्या चळवळीचे मुख्य स्पूर्तिस्थान हे सहभागी विद्यार्थी व प्राध्यापक होते. ४ मे १९१९ रोजी पेकींगमध्ये विद्यार्थ्यांनी जी निदर्शने केली तेथूनच ही चळवळ सुरू झाली. विद्यार्थ्यांनी ही जी निदर्शने केली ती पहिल्या महायुद्धानंतर जी पॅरिस शांतता परिषद संपन्न झाली व त्यांच्या शिफारशीनुसार चीनच्या शांटूंग प्रांतातील विशेष हक्क जर्मनीकडून काढून घेतले व ते जपानकडे हस्तांतरीत केले त्याच्या निषेधार्थ होती. या राष्ट्रव्यापी देशभक्ती चळवळीने व्हर्सायच्या तहाचा जाहीर निषेध केला आणि जपानी मालावर बहिष्कार घालण्याचे चीनी जनतेला आवाहन केले. एका व्यापक अर्थाने पाहिल्यास, ४ मे ची चळवळ ही सांस्वृतिक पुनरूज्जीवन आणि सामाजिक व्रांती यासाठी पुढाकार होता. या चळवळीने राजकीय निषेधाबरोबर साहित्यिक आणि वैज्ञानिक विकासावर (पाश्चिमात्य संकल्पना) भर दिला. हळूहळू ही चळवळ संपूर्ण चीनभर पसरली व जवळजवळ तीन वर्षे चालू होती.

४ मे च्या चळवळीने चीनी राष्ट्रवादाला बळकटी दिली आणि लोकशाहीच्या संकल्पनेला उचलून धरले त्यामुळे ही चळवळ बुद्धिवंत वर्गामध्ये अधिकच लोकप्रिय झाली. सुशिक्षित वर्ग 'समता' या पाश्चिमात्य संकल्पनेने अत्यंत प्रभावित झाले. त्यामुळे स्त्रियांचा दर्जा सुधारून त्यांना औपचारिक शिक्षण मिळण्यास सुरूवात झाली. तसेच 'पदबंधन' (Foot Binding) प्रथा नष्ट होऊ लागली. साहित्य क्षेत्रातील बुद्धिवंतांनी सामान्यांच्या भाषेत लिखाण करण्यास सुरूवात केली. त्यामुळे पूर्वीपेक्षा औपचारिक शिक्षण सामान्यांच्या आवाक्यात येऊ लागले. याचा परिणाम असा झाला की आधुनिक आर्थिक विकासास उत्तेजन मिळाले आणि अधिक समतावादी समाजाची निर्मितीकडे वाटचाल सुरू झाली.

४ मे च्या चळवळीने राष्ट्रवाद, प्रगती, लोकशाही आणि विज्ञान या संकल्पनांवरील विश्वासास चालना दिली. चीनच्या पारंपारिक आदर्श युरोपियन आधुनिक मूल्यांचे सुसंगती साधण्याचे प्रयत्न करण्यात आले चीनी आदर्श व मूल्ये कालबाह्य झालेली आहेत या प्रचाराने पर्याय म्हणून परकीय

आदर्श व मूल्यांचा शोध घेण्यात आला. आधुनिक चीनी बुद्धिवंत वर्गाच्या चालण्या-बोलण्या-राहण्या-वागण्यात पावलोपावली पाश्चिमात्य प्रतिके व लक्षणांचा प्रत्यय येत होता. 'संपूर्ण पाश्चिमात्यीकरण'सारखी घोषणा ही कायमचीच होती. पाश्चिमात्य पुस्तकांचे चीनी भाषेत भाषांतर केले जात होते. ४ मे च्या नावाने निघणारे नियतकालीके दोन विभागांमध्ये प्रसिद्ध केली जात होती. त्यामधील एक भाग भाषांतरासाठी राखून ठेवला गेला होता.

अशाप्रकारे ४ मे ची चळवळ ही व्यापक अर्थाने सांस्कृतिक क्रांती आणि राष्ट्रवादाचे प्रकटीकरण या स्वरूपात होती. ४ मे १९१९ चे पेकींग येथील विद्यार्थ्यांची निदर्शने हे एक बदलते बौद्धिक परिवर्तन होते. पेकींगमधून ही चळवळ शांघाय व कँटन येथे पसरली. आपल्या या प्रयत्नांमध्ये चळवळीने देशातील अनेक समाजघटकांना एकत्रित आणले. थोड्याच अवधीत ही चळवळ एक राष्ट्रव्यापी आंदोलन बनले.

ही चळवळ पॅरिस शांतता परिषदेच्या निर्णयाच्या निषेधार्थ सुरू केली असली तरी तिने चीनी राष्ट्रवादाला जागृत करून ती राष्ट्रव्यापी बनली. परंतु ती बऱ्याच जणांना नीट समजली नाही. या चळवळीनेच परकीय साम्राज्यविरोध, राष्ट्रीय ऐक्य आणि मुकलेल्या हक्काचे परत मिळवणे या गोष्टी चीनी जनतेसमोर मांडल्या. त्यामुळेच माओ त्से तुंग यांनी ४ मे च्या चळवळीचे वर्णन पुढील शब्दात केले आहे.

''४ मे च्या चळवळीचे ऐतिहासिक महत्त्व म्हणजे इ.स. १९११च्या राज्यक्रांतीमध्ये नसलेले वैशिष्ट्य आणि ते म्हणजे साम्राज्यवादास व्यापक आणि निर्विवाद विरोध आणि सरंजामशाहीस (Feudalism) व्यापक व निर्विवाद विरोध होय.''

या चळवळीने चीनच्या हलाखीस जबाबदार असलेल्या पाश्चिमात्य देशांच्या साम्राज्यवादास विरोध करत असतानाच साम्यवादी सोव्हिएत रशियाने आपल्याला झार राजवटीमध्ये मिळालेले चीनमधील विशेष हक्क सोडून देण्याचे घोषित केले त्याचा या चळवळीच्या अनुयायांवर अधिकच प्रभाव पडला व रशिया आपल्या चळवळीस सहानुभूतीपूरक वाटू लागला.

६.२.३ मार्क्सवादी अभ्यास गट :

इ.स. १९१७च्या रशियन बोल्शेविक राज्यक्रांतीचा परिणाम सुरूवातीला चीनवर नगण्य होता. कारण पेट्रोग्रॅड आणि मास्को (रशियाची शहरे) ही चीनपासून अधिकच अंतरावर होती. तरीही साम्यवादी तत्वज्ञानाचा चीनवर प्रभाव पडला. थोड्याच अवधीमध्ये मार्क्स व लेनिन यांच्या महत्त्वाच्या साहित्याचे चीनी भाषेत भाषांतर करण्यात आले. इ.स. १९१८ मध्ये ली ता चाओ आणि चेन तू सू या पेकींग विद्यापीठातील प्राध्यापकांनी विद्यापीठामध्ये 'मार्क्सवादी अभ्यास गट' स्थापन केला. त्या अभ्यास गटामध्ये माओ त्से तुंग सह अनेक तरुणांनी नोंदणी केली. मूलतः या अभ्यास गटाने मार्क्सवादी

तत्वज्ञानाकडे प्रत्यक्ष अंमलबजावणीपेक्षा एक विद्याशाखीय अभ्यास या दृष्टीकोनातून पाहिले होते. परंतु ४ मे च्या चळवळीचे स्वरूप आणि मार्क्स - लेनिनचे अधिकाधिक साहित्य विशेषतः लेनिनचा 'साम्राज्यवादी सिद्धांत' अभ्यासल्यावर १९२० मध्ये ली ता चाओ आणि चेन तू सू दोघेही कट्टर मार्क्सवादी बनले.

६.२.४ चीनी साम्यवादी पक्षाची स्थापना (CCP) :

चीनच्या अनेक शहरांमध्ये मार्क्सवादी छोटे छोटे गट कार्यरत होते. 'कोमिन्टर्न'चा पहिला गुप्तहेर, व्हॉईटन्स्की इ.स.१९२० मध्ये रशियामधून चीनमध्ये आला. त्याने ली ता चाओ आणि चेन तू सू यांची भेट घेतली व वर्षभरातून मार्क्सवादी गटांच्या अनेक सभा घेतल्या. १ जुलै १९२१ रोजी पन्नास सभासदांची बारा शिष्टमंडळे शांघाय येथे आपल्या पहिल्या अधिवेशनामध्ये एकत्र आली त्यावेळी चीनी साम्यवादी पक्षाची (Chinese Communist Party-CCP) औपचारिक स्थापना करण्यात आली. चीनी साम्यवादी पक्ष स्थापनेनंतर बरीच वर्षे हजारपेक्षाही कमी सभासदत्व असलेला एक लहान पक्ष राहिला होता. त्याचे बहुतेक सभासद हे सुशिक्षित वर्गातील होते व मध्यम व उच्च वर्गातील होते. मार्क्सवादाने प्रेरित झालेल्या या तरुण बुद्धिवंत वर्गाने लवकरच औद्योगिक कामगारांना राज्यक्रांतीसाठी संघटित करण्याचे प्रयत्न सुरू केले.

जगातील कामगारांप्रमाणेच चीनी कामगारांना सुद्धा जादा कामाचे तास, कमी पगार व हलाखीची कामाची परिस्थिती यासारख्या समस्यांना तोंड द्यावे लागत होते. त्यांच्यामध्ये मालकवर्गाविषयी असंतोष निर्माण झाला होता. त्यामुळे चीनी साम्यवादी पक्षाला त्यांना संघटित करणे सोपे गेले. या ठिकाणी एक महत्त्वाची गोष्ट नमूद केली पाहिजे ती म्हणजे चीनी कामगारांची (Proletariat) संख्या अतिशय कमी होती व त्याचे कारण औद्योगिक विकासाचा अभाव होय. त्यामुळे चीनी साम्यवादी पक्षाला कामगार सभासद जे मालकवर्गाविरूद्ध क्रांती करू शकतील कमी प्रमाणात मिळाले. अशा परिस्थितीत, चीनमध्ये सरकार (साम्यवादी) स्थापन करणे तर फारच दूरची गोष्ट होती. इ.स. १९२२ मधील रेल्वेमार्ग कामगारांच्या संपाला चीनी साम्यवादी पक्षाने पाठींबा दिला खरा परंतु लष्करी नेत्यांच्या फौजांनी तो कठोरपणे चिरडून टाकला. अशाप्रकारे चीनी कामगार वर्ग चीनी मार्क्सवादी बुद्धिवंताना राज्यक्रांतीसाठी पायाच उभारून देऊ शकला नाही. किंबहुना, चीनी साम्यवादी पक्ष, काही काळ तर चीनच्या राजकारणामध्ये नगण्य गट असलेला दिसून येतो.

चीनमध्ये ''समाजवादाची'' (Socialism) स्थापना करण्यामध्ये शहरी कामगारवर्गाचा अभाव होता आणि त्यामुळे चीनी साम्यवादी पक्षास मार्क्सवादी कार्यक्रम राबविणे शक्य नव्हते. लेनिनच्या मते, ज्यावेळी वसाहती व मागास देशांमध्ये 'शहरी कामगारवर्गाचा' (Urban Proletariat) अभाव असतो त्यावेळी तेथील स्थानिक साम्यवादी गटांनी तत्कालीन मध्यवर्गीय -

लोकशाही चळवळींबरोबर तात्पुरती युती करणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना इतरांच्या बरोबर जनमताचा पाठींबा मिळेल आणि त्यांचे स्वत:चे संघटन वाढविता येईल. दरम्यान औद्योगिक कामगार शक्तीची वाढ होत जाईल.

जुलै १९२२ च्या दुसऱ्या अधिवेशनामध्ये चीनी साम्यवादी पक्षाने लेनिनच्या प्रस्तावचा स्वीकार केला. त्यामुळे चीनी साम्यवादी पक्षाने डॉ. सन यत् सेन यांच्या कोमिंगटांग पक्षाबरोबर युती केली. कॉमिन्टर्नच्या मतानुसार, कोंमिंगटांग पक्षाला चांगलाच जनाधार असून डॉ. सन् यत् सेन हे चांगले क्रांतीकारी नेते होते.

६.२.५ कोमिंगटांग व चीनी साम्यवादी पक्ष - (CCP) युती :

सुरूवातीला डॉ. सेन यांनी कोमिन्टर्नचा युतीचा प्रस्ताव नाकारला होता. तरीसुद्धा त्यांनी व्यक्तिगत रित्या साम्यवादी नेत्यांना कोमिंगटांगमध्ये घेतले आणि काहींना उच्च पदेसुद्धा बहाल केली. 'चीनी साम्यवादी पक्षा'ला आपले बाह्यस्वातंत्र्य हवे होते. या व्यवस्थेनुसार चीनमध्ये रशियन हेतूंना पूर्ण करण्यासाठी कोमिंन्टर्न ने कोमिंगटांग पक्षाचा एक माध्यम म्हणून वापर केला. एवढेच नव्हे तर भविष्यात कोमिंगटांग पक्षाचे नियंत्रण 'चीनी साम्यवादी पक्षा'च्या ताब्यात येईल अशी योजना होती. एका बाजूला पश्चिमी सत्तांनी चीनला दिलेली अन्यायकारक वागणूक आणि डॉ. सेन यांच्या सरकारला मान्यता देण्यास दिलेला नकार यामुळे डॉ. सेन यांचा भ्रमनिरास झाला होता. तशातच चीनच्या एकीकरणाच्या प्रयत्नांमध्ये डॉ. सेन यांना रशियाकडून बलाढ्य लष्कर उभारणीसाठी शस्त्रास्त्रे व अर्थपुरवठा यांची गरज होती. शिवाय, कोमिंगटांग पक्षामध्ये 'चीनी साम्यवादी पक्षा'च्या सभासदांना आपण दुय्यम स्थान देऊ डॉ. सेन यांनी असे ठरवले होते.

६.२.३ कोमिंगटांगचे पुन र्संघटन :

इ.स. १९२३ च्या दरम्यान कोमिन्टर्नचे प्रतिनिधी सल्लागार अडॉल्फ जोफे यांच्याशी भेट झाल्यानंतर डॉ. सेन यांनी कोमिंगटांगचे रशियन बोल्शेविक पक्षाच्या धर्तीवर पुनर्संघटन करण्यास संमती दर्शविली. ऑक्टोबर १९२३ मध्ये मायकल बोरोदीन व इतर रशियन सल्लागार कोमिंगटांग पक्ष आणि राष्ट्रीय सैन्य यांचे संघटन करण्यासाठी कँटन येथे दाखल झाले.

कोमिंगटांग, कोमिन्टर्न आणि 'चीनी साम्यवादी पक्ष' यांची झालेली युती परस्परांना अनेक प्रकारे फायद्याची वाटत होती. कोमिंन्टर्नची 'चीनी साम्यवादी पक्षा' वर अत्यंत मदार असल्यामुळे, रशियन तज्ज्ञांच्या मते, बराच मोठा चीन 'चीनी साम्यवादी पक्षा'च्या प्रभावाखाली येऊ शकत होता. अन्यथा ज्या कोमिंगटांगशी युती केलेली आहे त्यांच्या जरी अंमलाखाली आला तरी चालू शकत होते. त्यांचा असा ठाम विश्वास होता की, कोणतीही घटना ज्यामुळे चीनी राष्ट्रवादाच्या भावनेस बळकटी मिळेल त्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. असे झाले तरच पश्चिमी सत्तांना चीनमध्ये विरोध होऊन त्यांची

सत्ता खिळखिळी होईल कारण ते रशियाचे (साम्यवादी) शत्रू आहेत. छोट्या) 'चीनी साम्यवादी पक्षा'ला डॉ. सेन यांच्याशी युती केल्यामुळे व त्यांचे सहकार्य मिळाल्यामुळे एक प्रतिष्ठा प्राप्त झाली. डॉ. सेन यांनी चांगल्या साम्यवाद्यांना कोमिंगटांगमध्ये सदस्य म्हणून घेतले, कोमिंन्टर्नद्वारा शस्त्रास्त्रे व अर्थपुरवठा मिळवला आणि राजकीय पक्ष व सैन्य संघटना कशी चालवावी याचे धडे व सेवा रशियन सल्लागारांकडून प्राप्त करून घेतल्या. इ.स.१९२६ मध्ये कोमिंगटांग पक्षास सल्लागार म्हणून केमिन्टर्नचे जवळजवळ साठ तज्ज्ञ कार्यरत होते. व्हॅम्पुआ लष्करी अकादमीमध्ये प्रशिक्षक म्हणून कोमिन्टर्न सल्लागार, साम्यवादी व असाम्यवादी तज्ज्ञ व्यक्तिंचा भरणा होता. त्यांनी उत्तर चीनच्या लष्करी नेत्यांच्या सैन्यापेक्षाही निष्णात व तरबेज असे उच्च गुणवत्तेचे लष्करी अधिकारी घडविले.

६.२.७ साम्यवादी आणि चँग कै. शेक :

इ.स.१९२५ (मार्च) मध्ये डॉ. सन् यत् सेन यांच्या मृत्यूनंतर त्यांचे वारस म्हणून चँग कै शेक आणि वांग चींग वाई या दोन व्यक्ति समोर आल्या. चँग कै शेकला लवकरच राष्ट्रीय सैन्याचा सरसेनापती आणि व्हॅम्पुआ लष्करी अकादमी, कँटनचा प्रमुख म्हणून नेमण्यात आले. त्याने रशियन तज्ज्ञ आणि चीनी साम्यवाद्यांप्रती विश्वास दाखविण्यास नकार दिला असला तरी त्याला हे माहित होते की, लष्करी मोहिमा राबवूनच चीनचे एकीकरण करणे शक्य आहे आणि त्यासाठी रशियाची मदत मिळत राहणे आवश्यक आहे. परंतु तरीही मार्च १९२६ मध्ये रशियन सल्लागार मायकल बोरोदिन यांच्या चीनमधील (पेकींग) अनुपस्थितीचा फायदा उठवत चँग ने कँटन येथे अनेक साम्यवादी नेते-कार्यकर्त्यांना तुरुंगात डांबले आणि इतर रशियन सल्लागारांना नजरकैदेत ठेवले. एवढे करूनही कोमिन्टर्नने 'चीनी साम्यवादी पक्षा'ला कोमिंगटांगशी युती टिकविण्याचा सल्ला दिला. मायकल बोरोदिन यांनी कोमिंगटांगमध्ये साम्यवाद्यांच्या कारवायांना पायबंद घालण्यास संमती दिली आणि चँगच्या बाबत नरमाइचे धोरण ठेवण्याचे आश्वासन दिले. रशियन सल्लागार आणि शस्त्रास्त्रे व दारूगोळा यांचा रशियाने पुरवठा केल्यामुळे चँगनी जुलै १९२६ मध्ये उत्तरेमधील मोहिम सुरू केली. मा ओ त्से तुंग यांनी मोहिमेतील लष्कराला आपल्या सहकाऱ्यांसमवेत संपूर्ण मदत केली आणि शेतकरी चळवळीचे संघटन करून कोमिंगटांग सैन्याला पाठींबा दिला.

६.२.८ आपली प्रगती तपासा :-

१) चीनमधील साम्यवादाच्या विकासास कारणीभूत घटक सांगा.

२) कोमिन्टर्नने चीनी साम्यवादी पक्षाला कोणता सल्ला दिला ?

_____

_____

_____

_____

_____

६.३ माओ त्से तुंग यांचा उदय

६.३.१ पार्श्वभूमी :

माओ त्से तुंग हे चीनी साम्यवादी पक्षाचे (CCP) सर्वेसर्वा बनले आणि त्यांनी जो संघर्ष उभा केला त्यामुळे चीनमध्ये साम्यवादी क्रांती (Communist Revolution) होऊन इ.स. १९४९ मध्ये चीन हे राष्ट्र संपूर्ण साम्यवादी राष्ट्र बनले. साम्यवादी राज्यक्रांती यशस्वी झाल्याने राष्ट्रीय सरकार व चँग कै शेक तैवान बेटावर पळून गेले व तेथेच त्यांनी आपले राष्ट्रीय सरकार स्थापन करून पुढे चालू ठेवले. माओ त्से तुंग स्वतः चीनी प्रजासत्ताकाचे (साम्यवादी) अध्यक्ष बनले आणि जगातील महत्त्वाच्या नेत्यांमध्ये त्यांची गणना होऊ लागली.

६.३.२ पूर्वायुष्य :

माओ यांचा जन्म २६ डिसेंबर १८९३ रोजी हुनान प्रांतातील शाओशान खेड्यामध्ये झाला. पूर्वी त्यांचे वडील एक गरीब शेतकरी होते पण नंतर ते धनवान शेतकरी व धान्याचे व्यापारी बनले. माओस दोन लहान भाऊ व एक बहीण होती. बालपणाच्या काळात आठ वर्षांचा होईपर्यंत माओ जवळच्याच खेड्यात आपल्या आजोळी राहिला. तो ज्या वातावरणात मोठा झाला त्या काळी शिक्षणाचे महत्त्व फक्त नोंदणी करून हिशोब ठेवणे एवढ्या पुरतेच मर्यादित होते. आठव्या वर्षापासून आपल्या जन्मगावी त्याने प्राथमिक शिक्षणाचे धडे घेतले व कन्फ्युशियन विचारधारेचा पाया अभ्यासला. वयाच्या १३व्या वर्षी त्याला शिक्षण अर्धवट सोडावे लागले व आपल्या वडीलोपार्जित शेतीमध्ये काम करावे लागले.

शेतीच्या कामामध्ये त्याचे मन रमेना म्हणून त्याने जबरदस्तीने कुटुंब सोडले व उच्च प्राथमिक शिक्षण घेण्यासाठी जवळच्याच काऊंटीमध्ये दाखल झाला. पुढे चँगशा या प्रादेशिक राजधानीमध्ये माध्यमिक शिक्षण घेतले. त्याचवेळेस त्याचा परिचय पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाशी आला. त्याने राजकीय व सांस्कृतिक समाजसुधारक लियांग चीचावो आणि राष्ट्रीय क्रांतीकारी डॉ. सन् यत् सेन यांच्या विचारांचा सुद्धा अभ्यास केला. क्रांतीकारी तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्या अगोदरच त्याच्या डोळ्यांसमक्ष प्रत्यक्ष क्रांती घडलेली (१९११) त्याने पाहिली. १० ऑक्टोबर १९११ रोजी मांचू घराण्याविरूद्ध क्रांती होऊन (वुचांग प्रांत) दोन आठवड्यातच ती चँगशा पर्यंत पसरली.

६.३.३ इ.स. १९११ च्या क्रांतीमधील माओ त्से तुंग यांची भूमिका :-

इ.स. १९११ च्या क्रांतीमध्ये माओ हुनान प्रांतातील क्रांतीकारी सैन्यामध्ये भरती झाला आणि सैनिक म्हणून सहा महिने त्याने काम केले. त्याला मिळालेल्या या अनुभवाने लहानपणापासूनच त्याचा लष्करी नेता म्हणून व लष्करी लढवय्या म्हणून योग्य कारकीर्द होईल याची शाश्वती त्याला मिळाली. त्याच्या शालेय जीवनात त्याच्या थोरांच्या यादीमध्ये प्राचीन

चीनमधील महान योद्धांचा समावेश तर होताच परंतु नेपोलियन आणि जॉर्ज वॉशिंग्टन यांचाही आदर्श त्याच्या समोर होता.

इ.स. १९११च्या यशस्वी चीनी राज्यक्रांतीनंतर डॉ. सन् यत् सेन यांनी १९१२ मध्ये कोमिंगटांग (KMT) पक्षाची स्थापना केली. त्यालाच 'नॅशनल पिपल्स पार्टी' किंवा 'नॅशनॅलिस्ट पार्टी' म्हणून ओळखले जाऊ लागले. इ.स.१९१३ मध्ये (फेब्रुवारी) संसदेच्या दोन्ही सभागृहांसाठी झालेल्या निवडणुकीमध्ये सदर पक्षास पूर्ण बहुमत मिळाले. परंतु नाईलाजाने कोमिंगटांग पक्षास युआन शि काई यास अध्यक्ष बनवावे लागले आणि शेवटी तो हुकूमशहा बनला. आंतरराष्ट्रीय मान्यता मिळविण्यासाठी नवीन सरकारने बाह्य मंगोलिया आणि तिबेट यांना स्वायत्तता बहाल केली कारण हे प्रदेश ब्रिटिश प्रभावाखाली होते. नोव्हेंबर १९१३ मध्ये युआनने सर्व सत्ता आपल्या हाती केंद्रित केली. कोमिंगटांग पक्षाचे विलीनीकरण केले, त्याच्या सदस्यांना संसदेतून काढून टाकले आणि आपणांस आजीवन राष्ट्रप्रमुख बनविणारी नवीन घटना तयार केली. इ.स.१९१६ मध्ये जेव्हा युआनचे निधन झाले त्यावेळी चीन हे प्रांतिक लष्करी नेत्यांच्या संघर्षाचे एक घर बनले होते.

६.३.४ माओ त्से तुंग यांचा पुढील अभ्यास :

इ.स. १९१२ मध्ये चीनी प्रजासत्ताक व नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर माओंची लष्करी सेवा समाप्त झाली. त्यानंतर एक वर्षभर ते पोलिस शाळा, कायदे विद्यालय, व्यापारी विद्यालय इकडे येणे जाणे करत राहिले. त्यांनी माध्यमिक शाळेमध्ये इतिहासाच्या अभ्यास केला आणि प्रांतिक ग्रंथालयामध्ये बसून पाश्चिमात्य उदारमतवादी विचारांच्या साहित्याचा अनेक महिने अभ्यास केला. इ.स. १९०५ मध्ये चीनची अधिकृत नागरी सेवा परीक्षा पद्धती रद्द करण्यात आली आणि आधुनिक शाळांमध्ये पश्चिमी शिक्षण पद्धतीचा खंडशः परिचय केला गेला. त्याचा परिणाम असा झाला की, कोणत्या प्रकारचे प्रशिक्षण? चीनी की पाश्चिमी? आपल्या देशाला चांगली सेवा देण्यासाठी कोणते शिक्षण उपयोगी होईल? यांसारख्या अनेक प्रश्नांनी तरुणांच्या मनात गोंधळ निर्माण करून ठेवला.

सरतेशेवटी इ.स.१९१८ मध्ये पहिल्या प्रांतिक साधारण शाळेमधून ते पदवीधर झाले. प्रांतिक साधारण शाळा ही उच्च शिक्षण देणारी नसली आणि मूलतः माध्यमिक शाळा असली तरी तेथे चीनी इतिहास, साहित्य आणि तत्वज्ञान आणि पाश्चिमात्य तत्वज्ञान यांचे सर्वांत उत्तम शिक्षण दिले जाई. शाळेमध्ये असतानाच माओने विद्यार्थी संघटना स्थापन करून राजकीय जीवनाचा अनुभव घेतला होता. त्यामध्ये इ.स.१९१७-१८ च्या हिवाळ्यामध्ये स्थापन केलेल्या 'न्यू पिपल्स स्टडी सोसायटी' या संघटनेचे महत्त्व विशेष आहे. पुढे या संघटनेचे अनेक सभासद समाजवादी पक्षाचे सदस्य बनले.

६.३.५ माओ त्से तुंग पेकींगमध्ये दाखल:

साधारण शाळेमधून माओ चीनचे प्रमुख वैचारिक केंद्र असलेल्या पेकींग विद्यापीठामध्ये दाखल झाले. त्यांनी सहा महिने तेथील ग्रंथपाल सहाय्यक म्हणून जे काम केले, त्याने त्यांच्या कारकीर्दीला एक वळण मिळाले. पेकींग विद्यापीठामध्ये असताना चीनी समाजवादी पक्षाचे दोन संस्थापक, दोन अत्यंत प्रमुख प्रभावशाली व्यक्तिमत्त्वांच्या सान्निध्यात माओ आले. ते अत्यंत प्रभावित झाले आणि ती व्यक्तिमत्त्वे म्हणजे ली ता चाओ आणि चेन तू सू होत. ४ मे १९१९ची चळवळ सुरू झाली तेव्हा सुद्धा माओ पेकींग विद्यापीठातच होते. या चळवळीने पुढील अर्धा शतक चीनवर आपला प्रभाव पाडला होता व माओ त्याचे प्रत्यक्ष साक्षीदार होते.

६.३.६ माओ आणि ४ मे ची चळवळ :

ही चळवळ व तीची वाटचाल आपण मागील भागात पाहिली आहे. पॅरिस शांतता परिषदेने जर्मनीचे चीनच्या शांटूंग प्रांतातील विशेष हक्क जपानला हस्तांतरित केले की जे खरे पाहता चीनलाच परत मिळावयास हवे होते. त्याच्या निषेधार्थ पेकींगमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे निदर्शने केली आणि राजकीय व सांस्कृतिक चळवळीस सुरूवात झाली. चीनी राष्ट्रवादाला चालना मिळून आधुनिकीकरण, लोकशाहीकरण यासाठी जनतेने आंदोलन सुरू केले.

या चळवळी दरम्यान जुलै १९१९ मध्ये माओंनी ने एक संपादकीय लेख लिहिला व त्यामध्ये असे म्हटले, ''हे जग आमचे आहे. हे राष्ट्र आमचे आहे. हा समाज आमचा आहे. जर आपण बोललो नाही तर कोण बोलेल? जर आपण कृती केली नाही तर कोण करेल?'' इ.स.१९१९च्या उन्हाळ्यामध्ये माओंनी चँगशा प्रांतामध्ये अनेक संघटना बांधल्या. त्यामध्ये विद्यार्थ्यांना तर एकत्र केलेच पण व्यापारी, कामगार यांनासुद्धा जपानविरूद्धच्या निदर्शनांमध्ये सामील होण्यास प्रेरित केले. अजून शेतकरी वर्गास या चळवळीमध्ये सहभागी करून घेतले नव्हते. त्यावेळेच्या माओंच्या लिखाणांमध्ये, 'सर्व जगभर लालबावट्याची सेना आणि रशियन राज्यक्रांतीचा विजय असो' या घोषणांचा भरणा होता. जानेवारी १९२१ पर्यंत रशियन राज्यक्रांतीस मार्क्सवादी तत्वज्ञान कारणीभूत होते हे त्याला माहित नव्हते परंतु त्यानंतर ते सुद्धा संपूर्ण मार्क्सवादी बनले.

६.३.७ माओ आणि चीनी साम्यवादी पक्ष (CCP) :

सप्टेंबर १९२० मध्ये माओ लीन चँगशा प्राथमिक शाळेचे प्राचार्य झाले. ऑक्टोबर महिन्यात त्यांनी चँगशा येथे 'सोशॅलिस्ट युथ लिग' या संघटनेची शाखा उघडली. हिवाळ्यामध्ये त्यांनी आपले पूर्वीचे नीतीशास्त्राचे शिक्षक यांची मुलगी यांग कै हुई हिच्याशी विवाह केला. जुलै १९२१ मध्ये मॉस्को येथील कोमिन्टर्नचे दोन सल्लागार आणि चीनमधील इतर समाजवादी गटांच्या प्रतिनिधींसमवेत चीनी साम्यवादी पक्षाच्या पहिल्या अधिवेशनात माओंनी भाग घेऊन आपले निरीक्षण नोंदविले. त्यामध्ये माओंनी नोंदणी

सचिव म्हणून काम पाहिले. त्यांची हुनान प्रांतासाठी पक्षाचा महासचिव म्हणून नेमणूक करण्यात आली आणि त्या प्रांतात त्यांनी कामगार संघटना तयार करणे व संप करण्याच्या कामात लक्ष दिले.

कोमिंगटांग (KMT) पक्षाची लष्करी नेत्यांबरोबरची (Warlords) युती जेव्हा गडगडली तेव्हा पक्षाने रशियाकडे मदतीचा हात मागितला. राष्ट्रीय एकीकरणाच्या संघर्षामध्ये कोमिंगटांग आणि चीनी साम्यवादी पक्षास संपूर्ण मदत करण्याचे आश्वासन सोव्हिएत रशियान दिले. इ.स.१९२३ मध्ये चीनी साम्यवादी पक्षाने डॉ. सेन यांच्या कोमिंगटांग बरोबर युती केली तेव्हा माओ हे पहिले साम्यवादी म्हणून भरती झाले व कोमिंगटांग अंतर्गत काम पाहू लागले. इ.स.१९२४च्या अर्धकात ते आपली पत्नी आणि दोन लहान मुलगे यांच्यासोबत शांघायमध्येच वास्तव्यास होते आणि त्याचवेळी ते कोमिंगटांग कार्यकारी मंडळाचे एक महत्त्वपूर्ण सदस्य बनले.

६.३.८ शेतकरी व कामगार संघटनांची स्थापना :

इ.स.१९२३ मध्ये डॉ. सेन यांनी कोमिंगटांगचा होतकरू तरुण चँग कैशेक यास लष्करी व राजकीय प्रशिक्षणासाठी मास्कोला पाठविले. दरम्यान माओ चीनी साम्यवादी पक्षाचे पूर्णवेळ काम करू लागले. त्यांनी शेतकरी व औद्योगिक कामगारांच्या संघटना बांधल्या. जून १९२३ मध्ये ग्वांगझाऊ येथे भरलेल्या साम्यवादी पक्षाच्या तृतीय राष्ट्रीय अधिवेशनामध्ये माओ यांची पक्षाच्या केंद्रीय समितीमध्ये निवड करण्यात आली. ऑक्टोबर १९२५ मध्ये ते कोमिंगटांग पक्षाच्या प्रचार विभागाचे हंगामी प्रमुख बनले होते.

इ.स.१९२४-२५च्या हिवाळ्यामध्ये माओ शाओशान या आपल्या जन्मगावी विश्रांतीसाठी आले. मे आणि जून १९२५ मध्ये परकीय देशांच्या पोलिसांनी शेतकऱ्यांच्या निदर्शकांवर शांघायमध्ये गोळीबार केला आणि अनेक डझन निदर्शकांना ठार केले. त्यामुळे त्या शेतकरी वर्गामध्ये राजकीय जाणीव जागृती आहे, त्यांच्यामध्ये सुप्त क्रांतीकारी भावना आहे याची माओंना अचानक जाणीव झाली. माओ स्वतः एका शेतकरी कुटुंबात जन्मले होते. परंतु आपल्या शालेय जीवनामध्ये त्यांचा संपर्क बुद्धिवंत - विचारवंत वर्गाशी आला व त्यांच्या मताप्रमाणेच 'कामगार व शेतकरी हे अज्ञानी व घाणेरडे असतात' असेच त्यांचेही मत तयार झाले होते. पुढे जेव्हा त्यांनी मार्क्सवादाचा अभ्यास करून स्वतःही मार्क्सवादी बनले तेव्हा त्यांनी शहरी कामगारवर्गाबद्दलचे आपले मत बदलले. परंतु अतिमागास शेतकरी वर्गाबद्दल असलेला मार्क्सचा तिरस्कार त्यांना मान्य होईना. म्हणून चीनच्या पुनर्बांधणीसाठी माध्यम म्हणून आपल्या तरुणाईच्या काळातील ग्रामीण शेतकरी वर्गाच्या संघटन बांधणीकडे माओंनी आपले लक्ष केंद्रीत केले. शेतकऱ्यांच्या संघटन कार्यासाठी अगोदरच काम करीत असलेल्या इतर समाजवादी नेत्यांचे उदाहरण डोळ्यासमोर ठेवून माओंनी आपले लक्ष हुनानी शेतकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे केलेल्या बंडांच्या धर्तीवर त्यांनी शेतकरी संघटनांचे जाळे बांधण्यास सुरूवात केली.

डॉ. सन् यत् सेन यांचा इ.स. १९२५ मध्ये मृत्यू झाला आणि कोमिंगटांग पक्षाचे नेतृत्व चँग कै शेकने स्वत:च्या हातात घेतले. त्याने नऊ महिने चीनच्या एकीकरणासाठी लष्करी मोहिम राबविली आणि उत्तरेकडील लष्करी नेत्यांना नेस्तनाबूत केले. त्याचबरोबर चीनी साम्यवादी पक्षाशी असलेली कोमिंगटांग पक्षाची युतीसुद्धा धोक्यात आली.

इ.स.१९२७ मध्ये कोमिंगटांग व चीनी साम्यवादी पक्ष यांची युती फुटली. त्याबरोबरच चँग कै शेकने चीनी साम्यवादी पक्षाच्या नेते व कार्यकर्त्यांचा छळ सुरू केला. अनेक नेत्यांना त्याने यमसदनी पाठविले तर जवळजवळ ३५०० कार्यकर्त्यांना ठार केले. त्यानंतर सोव्हिएत रशियाने चीनी साम्यवाद्यांना छुपी रसद पुरविली आणि छोटी मोठी बंडे चीनमध्ये साम्यवाद्यांकडून सतत चालू राहिली.

६.३.९ आपली प्रगती तपासा :

१) माओ त्से तुंग यांच्या पूर्वायुष्यावर प्रकाश टाका.

२) ४ मे च्या चळवळीमध्ये माओ त्से तुंग यांची कोणती भूमिका होती ?

_____

_____

_____

_____

६.४ माओ त्से तुंग यांची धोरणे व नीती

६.४.१ प्रत्यक्ष शेतकरी क्रांतीकारी सेना (Peasant's Real Revolutionary Force) :

चीनमधील वास्तवतेचे विश्लेषण करताना, माओ त्से तुंग यांची अशी खात्री झाली होती की, राज्यक्रांतीच्या यशस्वीतेसाठी शेतकरी वर्गाचा पाठींबा असणे अत्यंत जरूरीचे आहे. पारंपारिक मार्क्सवादी विचारवंताच्या उलट त्याला अशी जाणीव झाली की, शेतकरी वर्गाचे बहुसंख्याबळ हीच खरी शक्ती आहे आणि तिचाच एक क्रांतीकारी शक्ती म्हणून आपण वापर करू शकतो. अशाप्रकारे माओंनी शेतकरी वर्गाला एकत्र आणून संघटित ठेवण्यासाठी आपली रणनीती आखली. मार्च १९२६ मध्ये माओंनी ''चीनी समाज वर्गांचे विश्लेषण'' या शीर्षकाखाली एक लेख लिहिला आणि शेतकरी संघटनांचे समर्थन केले. त्यांनी पुढे असे म्हटले की, चीनमध्ये कठोर जमीन धोरण राबविणे आवश्यक असून जमीनदार वर्गाकडील अतिरिक्त जमीन काढून घेऊन तिचे भूमिहीन शेतकऱ्यांमध्ये वाटप करणे आवश्यक आहे. त्यांनी खेड्यापाड्यांमध्ये शेतकऱ्यांची वास्तव स्थिती जाणून घेण्यासाठी अनेक दौरे काढले. हुनान प्रांतातील दौऱ्यांनंतर माओंनी आपले संस्मरणीय लेख 'हुनान प्रांतातील शेतकरी चळवळींचा अहवाल' या शीर्षकाने प्रकाशित केले.

हुनान प्रांतातील शेतकऱ्यांच्या स्थितीचा सखोल अभ्यास केल्यानंतर ते या मुद्याप्रत आले की, चीनी राज्यक्रांतीचे नेतृत्व शेतकरी वर्गाकडेच असले पाहिजे. माओंची ही नीती मार्क्सवाद, साम्यवादी पक्ष आणि कोमिन्टर्न यांच्याशी विरोधाभास दाखविणारी होती. कारण मार्क्सच्या तत्वज्ञानाने शहरी कामगारवर्गावर राज्यक्रांती करण्यासाठी भीस्त ठेवली होती. त्या वर्गाच्या संघटनानंतरच दुसऱ्या स्थानी शेतकरी वर्गास स्थान देण्यात आले आहे. दुसऱ्या बाजूला माओंच्या असे निदर्शनास आले की, रशियाप्रमाणे चीनमध्ये शहरी कामगार वर्ग संख्येने अत्यंत कमी व कमजोर आहे, त्यामुळेच येथे त्यांच्याकडून क्रांतीची अपेक्षा करणे चुकीचे आहे. शेतकरी संघटनांनी परिवर्तनवादी यशस्वी चळवळी केलेल्या आहेत आणि शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न त्यांनी मार्गी लावलेले आहेत यावर माओंनी अधिक भर दिला.

६.४.२ शेतकरी वर्गाचे संघटन :

ज्यावेळी पारंपारिक विचारसरणीचे साम्यवादी नेते शहरी कामगार वर्गाचे अयशस्वी संघटन करू पाहात होते त्याच वेळी माओंसारखे काही साम्यवादी नेते चीनच्या समाजाचा बहुसंख्य भाग हा शेतकरी वर्ग आहे यावर विचार करीत होते. तसेच त्यांच्या मते, कामगार वर्गापेक्षाही शेतकरी वर्ग चळवळीमध्ये साम्यवाद्यांच्या वर्गसंघर्षाच्या आवाहनास फारच लवकर व चांगला प्रतिसाद देतो.

इ.स.१९२४-२७ दरम्यान कोमिंगटांग - साम्यवादी संयुक्त आघाडी असताना माओंनी हुनान प्रांतात शेतकरी चळवळ संघटीत केली. चीनच्या ग्रामीण भागामध्ये शेतकरी वर्गास वेठीस धरून ठेवणारी सरंजामशाही पद्धती नष्ट करणे व ग्रामीण राज्यक्रांती करणे याची माओंनी योजना तयार केली. हुनान प्रांतातील शेतकऱ्यांच्या उठावाबद्दलच्या अहवालामध्ये माओंनी असे निरीक्षण नोंदविले, ''फारच थोड्या अवधीत चीनच्या मध्य, दक्षिण आणि उत्तर प्रांतांमधून शेकडो दशलक्ष शेतकरी एका वादळाप्रमाणे उभे राहतील आणि ती त्यांची तत्कद एवढी वेगवान आणि हिंसक असेल की कोणतीही शक्ती, कितीही मोठी असली तरी त्यांचे दमन करू शकणार नाही. ते लवकरच सर्व साम्राज्यवादी, लष्करी नेते, भ्रष्ट अधिकारी यांना त्यांच्या थडग्यामध्ये गाडतील. म्हणूनच बहुसंख्य गरीब शेतकरी वर्गाच्या सहभागाशिवाय क्रांती अशक्य आहे.''

चीनचा बहुसंख्य शेतकरी वर्ग अडाणी व गरीब होता. त्यांच्यावर कर्ज व करांचे भरमसाठ ओझे होते. ते भ्रष्ट चीनी अधिकाऱ्यांकडून नाडलेले होते. लष्करी नेते (Warlords) शेतकऱ्यांकडून अनेक वर्षांचा आगाऊ महसूल जमा करून ठेवत असत. जवळजवळ दोन तृतियांश जमिन निवासी व अनिवासी जमिनदार वर्गाच्या हाती केंद्रित झालेली होती. त्यातच धनाढ्य शेतकरी व भ्रष्ट अधिकाऱ्यांचाही कब्जा होताच. या संपूर्ण वर्गांची टक्केवारी फक्त १०% होती.

माओ त्से तुंग यांच्या नेतृत्वाखाली साम्यवाद्यांनी कियांग्सी, फुकीएन आणि हुनान या प्रांतांमध्ये शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था काढल्या. त्यांनी शेती सुधारणा, कर सुधारणा, कुळ सुधारणा, शेतकरी परिषदांची स्थापना, शाळा बांधणी इत्यादी आश्वासने शेतकरी वर्गास दिली व त्यामुळे ते त्या वर्गामध्ये अत्यंत लोकप्रिय झाले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांचे गनिमी गट स्थापन झाले व शहरी भागातील कोमिंगटांग सरकारच्या दंडेलशाहीशी निरंतर लढा त्यांनी चालू ठेवला. याच काळामध्ये माओ त्से तुंग यांचा निकटचा सहकारी चू तेह यांच्या नेतृत्वाखाली चीनी लाल सेनेच्या (Chinese Red Army) निर्मितीची प्रक्रिया चालू झाली होती.

६.४.३ सुगीच्या हंगामातील उठाव, १९२७ (The Autumn Harvest Uprising) :

साम्यवाद्यांनी एकाच वेळी शहरी कामगारांचे उठाव आणि ग्रामीण शेतकऱ्यांचे उठाव सुरू केले. माओ त्से तुंग यांना सदर उठावाची तयारी करण्यासाठी पक्षाच्या केंद्रिय समितीने हुनान प्रांतात पाठविले होते. त्यांनी सप्टेंबर १९२७ मध्ये सुगीच्या हंगामातील उठावास मूर्त स्वरूप दिले. शरद ऋतूचा हंगाम, (सुगीचा हंगाम), ही वेळ निवडण्यामागे काही मूलभूत कारण होते. हा हंगाम सराईचा होता. याचवेळी महसूल जमा केला जायचा. त्यामुळे आपल्या फायद्यासाठी जर चळवळ चालू झाली तर त्यामध्ये हा शेतकरी पटकन उडी घेईल. माओंच्या कार्यक्रमामध्ये मोठ्या जमिनदार वर्गाकडून अतिरिक्त जमीन घेऊन ती भूमिहीन शेतकऱ्यांमध्ये वाटप करणे याचाही समावेश होता. तसेच क्रांतीकारी सैन्याची निर्मिती करणे व त्यांचे प्रतिनिधीमंडळ (रशियन Soviets) स्थापन करण्याचाही उद्देश होता. परंतु स्थानिक पाठिंब्याचा अभाव, चँग कै शेकच्या राष्ट्रीय सैन्यापुढे साम्यवाद्यांचा पराभव यामुळे ९ सप्टेंबर १९२७ चा सुगीच्या हंगामातील उठाव अयशस्वी झाला. त्यानंतर माओ त्से तुंग आपल्या निवडक १००० सहकाऱ्यांसह चिंगनागशान या पर्वतीय प्रदेशामध्ये आश्रय मिळविण्यासाठी पळून गेले. सुगीच्या हंगामातील उठावाचे अपयश आणि शेतकऱ्यांचे सोव्हिएत स्थापन करण्याचे अकाली आश्वासन यामुळे नोव्हेंबर १९२७ मध्ये माओ त्से तुंग यांस चीनी साम्यवादी पक्षाच्या केंद्रीय समितीवरून हटविण्यात आले.

६.४.४ कोमिंगटांगमधील गटबाजी (Leftists & Rightists) :

सैद्धांतिक आदर्श आणि इतर मतभेद यामुळे हळूहळू कोमिंगटांग पक्षाच्या सदस्यांमध्ये दोन गट पडले. वांग चिंग वाई याने कोमिंगटांगच्या डाव्या गटाचे नेतृत्व केले तर उजव्या गटाचे नेतृत्व चँग कै शेक करीत होता. या फूटीस अनेक कारणे असली तरी या दोन नेत्यांमधील व्यक्तिगत शत्रूत्व होते. त्यातच साम्यवाद्यांशी युती ठेवणे यावर मतभेद होतेच परंतु वांग यास चँग च्या लष्करी यंत्रणेची भिती वाटत होती. जानेवारी १९२७ मध्ये वांग चिंग वाई याने आपले कोमिंगटांग राष्ट्रीय सरकार वूहान प्रांतामध्ये नेले. चँग कै शेकने नानकींग येथेच आपली राष्ट्रीय सरकारची राजधानी ठेवली. मार्च

१९२७ मध्ये वूहान सरकारने चँग वैक शेकच्या लष्करी आणि राजकीय अधिकारावर नियंत्रण लागू केले.

६.४.५ शांघायमध्ये साम्यवाद्यांचे दमन :-

चँग वैक शेक ने नानकींग मधून आपला मोर्चा शांघाय कडे वळविला. त्यावेळी चौ एन लाय यांच्या नेतृत्वाखाली साम्यवाद्यांनी कामगारवर्गास एकत्र करून शांघाय शहरावर आपले नियंत्रण स्थापित केले होते. कोमिंगटांग व चीनी साम्यवादी पक्षाशी असलेली प्रदीर्घ काळची युती निरर्थक असल्याचे लक्षात आल्यावर चँग वैक शेक ने शांघायमधील साम्यवाद्यांचे निर्दालन करण्यासाठी आपल्या फौजेसह तिकडेच कूच केले. या आपल्या मोहिमेमध्ये चँग ला बँका, उद्योगपती, व्यापारी आणि जमीनदार वर्गाने पूर्ण पाठींबा दिला. १२ एप्रिल १९२७ रोजी चँगने चीनी साम्यवादी पक्षाच्या संशयित कार्यकर्त्यांची कत्तल केली. चौ एन लाय आपल्या पत्नीसमवेत कसाबसा जीव वाचवित पळून गेला.

६.४.६ कोमिंगटांगमधील साम्यवाद्यांचे निर्दालन :

दुसऱ्या बाजूला कोमिंगटांगमधील डावा गट आणि चीनी साम्यवादी यांच्यातील मैत्री जास्त काळ टिकली नाही. डाव्या गटाचा प्रमुख वाँग चिंग वाई यास संशय होता की, साम्यवादी कोमिंगटांग पक्षावर कब्जा करण्याची वाट पाहत आहेत. परंतु कोमिंन्टर्न प्रतिनिधी एम्.एन्.रॉय यांनी त्यास स्टॅलिनची कोमिंगटांगवर ताबा मिळविण्याबाबत केलेली तार (telegram) दाखविली तेव्हा त्याची खात्रीच झाली. त्यामुळे जुलैच्या मध्यावर वूहान सरकारने कोमिंगटागमधील छुप्या साम्यवाद्यांची कत्तल केली आणि बोरोदीनसह कोमिंन्टर्नच्या सल्लागारांना मास्कोला परत पाठविले.

रशियाच्या स्टॅलिनला मजबूत व एकीकृत आणि रशियाबरोबर मित्रत्व ठेवणारा चीन पाहायचा होता. परंतु त्याच्या अपेक्षांना सुरूंग लागला कारण चीनी साम्यवादी कोमिंगटांगवर संघटनात्मक नियंत्रण मिळवू शकले नाहीत. याशिवाय, स्टॅलिन चीनपासून हजारो मैल दूर होता आणि त्याला चीनमधील घडामोडींची पुरेशी माहिती मिळत नव्हती. तशातच स्टॅशिनला चीनी साम्यवाद्यांपुढे चँग वैक शेक चे आव्हान फारसे शक्तीशाली वाटले नाही. राष्ट्रीय सैन्याला शहरी भागात तोंड देण्यास असमर्थ ठरल्यामुळे चीनी साम्यवाद्यांनी चीनच्या ग्रामीण व डोंगराळ भागात पळ काढला व तेथूनच गनिमी युद्ध चालू ठेवले. शेवटी कोमिंन्टर्नच्या सल्ल्याशिवायच त्यांनी पुढे आपली स्वतंत्र नीती राबविली आणि इ.स. १९४९ मध्ये ते यशस्वी झाले.

६.४.७ आपली प्रगती तपासा :-

१) इ.स. १९२७ साली कोणता उठाव झाला ?

२) कोमिंगटांग पक्षात कोणते दोन गट निर्माण झाले ?

६.५ समारोप

इ.स.१९१७ मध्ये रशियामध्ये बोल्शेविक क्रांती झाली आणि रशियामध्ये विकासाच्या युगाचा प्रारंभ झाला. रशियाने मार्क्सवादाचा जगभर प्रसार करण्यासाठी कोमिंन्टर्न (Communist International) नावाने संघटना स्थापन केली. त्यांनी चीनमध्ये रशियन सल्लागार पाठविले. चीनमध्ये इ.स.१९२१ साली चीनी साम्यवादी पक्षाची (Chinese Community Party) स्थापना करण्यात आली. चीनी साम्यवादी पक्ष आणि कोमिंगटांग (राष्ट्रीय पक्ष) यांच्यात तात्पुरती युती झाली. परंतु नंतर संशयाच्या कारणावरून चँग कै शेकने साम्यवाद्यांचा छळ सुरू केला. साम्यवादी पक्षाचे नेतृत्व माओ त्से तुंग यांच्याकडे आल्यावर त्यांनी शेतकरी, कामगार वर्गाचे संघटन केले आणि राष्ट्रीय सरकारविरूद्ध आंदोलन चालवून आपले समांतर सरकार ग्रामीण भागामध्ये स्थापन केले.

६.६ प्रश्न:

१) चीनमधील साम्यवादाच्या विकासाचा मागोवा घ्या.
२) चीनी साम्यवादी पक्षाच्या स्थापनेस कारणीभूत झालेल्या घटकांची चर्चा करा.
३) चीनच्या राज्यकारणात माओ त्से तुंग यांचा उदय कसा झाला? परीक्षण करा.
४) इ.स.१९११-१९२६ दरम्यान चीनच्या इतिहासात माओ त्से तुंग यांची भूमिका स्पष्ट करा.
५) इ.स. १९२६ पर्यंतची माओ त्से तुंग यांची धोरणे व नीती यांचे विश्लेषण करा.
६) टिपा लिहा.
   अ) ४ मे ची चळवळ
   ब) माओ त्से तुंग यांचा कार्यकाळ (१९११-१९२६)
   क) सुगीच्या हंगामातील उठाव (The Autumn Harvest Uprising)

❖❖❖

७

चीनमधील यादवी युद्ध
(CIVIL WAR OF CHINA)

घटक रचना :

७.० उद्दिष्टये
७.१ प्रस्तावना
७.२ प्रदीर्घ मोर्चा
७.३ लोक प्रजासत्ताक चीनचा जन्म
७.४ साम्यवाद्यांच्या विजयास कारणीभूत घटक
७.५ समारोप
७.६ प्रश्न

७.० उद्दिष्टये

१) 'प्रदीर्घ मोर्चा'ची कारणे व परिणाम यांचा मागोवा घेणे.
२) लोक प्रजासत्ताक चीनच्या स्थापनेमागील घडामोडी समजून घेणे.
३) साम्यवाद्यांच्या चीनमधील सत्तास्थापनेचे विश्लेषण करणे.

७.१ प्रस्तावना

सदरच्या पाठामध्ये आपणास मुख्यत: तीन गोष्टींचा अभ्यास करावयाचा आहे. त्यामध्ये प्रदीर्घ मोर्चा, चीनी प्रजासत्ताकाचा उदय आणि साम्यवाद्यांची चीनमधील सत्तास्थापना यांचा समावेश होतो. ज्यावेळेस चँग कै शेकच्या लष्करी ताकदीपुढे साम्यवाद्यांचा निभाव लागला नाही त्यावेळी ते डोंगराळ भागामध्ये पळून गेले व तेथेच त्यांनी आपली रणनीती आखली. शेवटी लाखो साम्यवाद्यांना एकत्र करून त्यांनी उत्तर चीनची वाट धरली व येनान येथे पोहोचले. चीनच्या नव्हे जगाच्याच इतिहासात माओ त्से तुंग यांच्या या प्रदीर्घ मोर्चास अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. पुढे त्यांनी राष्ट्रीय सरकारला पळवून लावले आणि इ.स.१९४९ मध्ये चीनची सत्ता हस्तगत केली. ती खऱ्या अर्थाने एक साम्यवादी क्रांती (Communist Revolution) होती. साम्यवादी सरकार माओच्या नेतृत्वाखाली स्थापन झाल्यावर त्यांनी आपली ध्येये व धोरणे राबविण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये राजकीय, आर्थिक, प्रशासकीय भ्रष्टाचार निपटून काढण्यापासून राष्ट्रीय सरकारच्या कार्यकाळात निर्माण झालेले गोंधळाचे वातावरण दूर करण्याची मोठी कामगिरी माओवादी सरकारला पार पाडावी लागली.

७.२ प्रदीर्घ मोर्चा (The Long March)

७.२.१ पार्श्वभूमी :

चँग कै शेकने जेव्हा साम्यवाद्यांचे निर्दालन करण्याचे ठरवले तेव्हा त्याने आपल्या लष्करी फौजेसह साम्यवाद्यांविरूद्ध मोहिम आखली. त्यांच्यापासून बचाव करण्यासाठी माओ त्से तुंग यांच्या नेतृत्वाखाली साम्यवादी पक्षाने व त्यांच्या अनुयायांनी जी पदयात्रा (उत्तरचीनच्या दिशेने) 'प्रदीर्घ मोर्चा' (Long March) नावाने सुरू केली ती मानवी निश्चयाचे एक उत्तम उदाहरण आहे. हा मोर्चा काही एकच नव्हता तर अनेक साम्यवादी गटांनी आपल्या सैन्यासह दक्षिण चीनकडून उत्तर व पश्चिम चीनकडे कूच केले. या सर्वांमध्ये ऑक्टोबर १९३४ मध्ये कियांग्सी प्रांतामधून सुरू झालेला प्रदीर्घ मोर्चा अत्यंत प्रसिद्ध आहे. चीनी साम्यवाद्यांनी वर्तुळाकार मार्गाने पश्चिम व उत्तरेकडे जी वाटचाल केली त्याने जवळजवळ ६००० मैलांचे अंतर कापले.

७.२.२ कियांग्सी सोव्हिएत :

जेव्हा राष्ट्रीय सरकारच्या फौजांनी चँग कै शेकच्या नेतृत्वाखाली साम्यवाद्यांचा छळ करून त्यांचे पूर्ण निर्दालन करण्याचे ठरविले तेव्हा चीनी साम्यवादी पक्षाची (CCP) राष्ट्रीय पक्षाशी (KMT) असलेली युती एप्रिल १९२७ मध्ये संपुष्टात आले. चौ एन लाय सह काही साम्यवादी नेते कियांग्सी प्रांतामध्ये पळून गेले. हा प्रदेश राष्ट्रीय सरकारच्या राजधानीपासून इ.स.१९३०च्या दशकात एवढा दूर होता की, तेथे नियंत्रण ठेवणे अशक्यच होते. त्या काळी या प्रदेशात रस्त्यांचा अभाव होता. त्यामुळे या डोंगराळ प्रदेशा जाताना केवळ पायी जावे लागे आणि लोक आपल्या पाठीवर, घोडे व गाढवांच्या पाठीवर सामान लादून टोळ्या-टोळ्यांनीच पायी प्रवास करू शकत असत. याच परिस्थितीचा फायदा उठवत साम्यवाद्यांनी या प्रदेशात आपले बस्तान बसविले आणि राष्ट्रीय सैन्याला गनिमी पद्धतीने युद्ध करून सळो की पळो करून सोडले व शेतकऱ्यांचे उठाव संघटीत केले. भौगोलिक दुर्गमतेमुळे कियांग्सी प्रांतात निरक्षरता, रोगराई, गरीबी, अज्ञानी यांनी थैमान घातले होते. त्याच ठिकाणी माओ त्से तुंग यांनी आपले नवीन सोव्हिएत साम्यवादी क्षेत्र निर्माण केले व तेथूनच समांतर सरकार चालवण्यास सुरूवात केली.

७.२.३ लाल सेनेचे संघटन :

इ.स. एप्रिल १९२८ रोजी चीनी लाल सेनेचे मुख्य शिल्पकार चू तेह माओ त्से तुंग यांना जाऊन मिळाले. लाल सैन्यामध्ये जवळ जवळ १०००० सैनिकांचा भरणा होता. त्या दोघांनी एकत्रितपणे स्थानिक सोव्हिएत (Local Body) स्थापना केले आणि कठोर जमीन धोरण अवलंबिले. त्याद्वारा जमिनदारांची अतिरिक्त जमीन ताब्यात घेऊन तिचे भूमिहीन शेतकऱ्यांमध्ये वाटप करण्यास सुरूवात केली. एवढे करूनही चँग कै शेकच्या राष्ट्रीय सैन्याने जानेवारी १९२९ मध्ये साम्यवाद्यांची आर्थिक नाकेबंदी करून सशस्त्र

हल्ले करण्यास सुरूवात केली. त्यामुळे चिंगकांगशान प्रांतामधूनही माओ आणि चू तेह यांना पळ काढावा लागला. मग त्यांनी दक्षिण कियांग्सी येथे आपला नवीन तळ उभारला आणि तेथेच चीनी सोव्हिएत स्थापन करण्याचे ठरवले. कियांग्सी सोव्हिएतमध्ये माओंची संपूर्ण नीती उघडपणे दिसू लागली. यामध्ये ग्रामीण तळ व तेथे जमीन सुधारणा करून शत्रूशी गनिमी युद्ध करून लालसैन्यामध्ये शिस्त पाळणे व साम्यवादी पक्षातर्फे नियंत्रण करणे या बाबींचा समावेश होता.

७.२.४ माओ त्से तुंग व चीनी साम्यवादी पक्ष (CCP) यांमधील मतभेद

खरे पाहिल्यास, इ.स.१९२८ मध्ये मास्को येथे भरलेल्या कोमिंन्टर्न च्या ६व्या अधिवेशन आणि चीनी साम्यवादी पक्षाच्या (CCP) ६व्या अधिवेशनच्या मार्गदर्शक तत्वांच्या एकदम उलट धोरण व नीती माओ त्से तुंग यांनी अवलंबली होती. सहाव्या अधिवेशनाच्या ठरावानुसार, चीनी राज्यक्रांतीचा मुख्य भर हा शेतकऱ्यांच्या क्रांतीवर होता. परंतु त्यासाठी शहरी कामगारवर्गाचे संघटन करणे ही चीनी साम्यवादी पक्षाची (CCP) प्रथम जबाबदारी होती. त्यानुसार असे ठरले होते की, ग्रामीण सोव्हिएतची मदत शहरी कामगारांच्या संघर्षासाठी घेण्यात यावी आणि शेतकरी वर्गावर पक्षाचे संपूर्ण नियंत्रण असावे. अशाप्रकारे, राज्यक्रांतीवर नियंत्रण हे शहरी कामगार वर्गाचे असेल यावर भर सहाव्या अधिवेशनाने दिला तर माओ त्से तुंग यांच्या मते, कोणत्याही राज्यक्रांतीवर शेतकरी वर्गाशिवाय कोणाचेही नियंत्रण चालणार नाही. सहाव्या अधिवेशनाने भविष्यात सशस्त्र उठावावर सुद्धा भर देण्याचे ठरवले. याउलट माओ ने शेतकऱ्यांच्या ग्रामीण भागातच चळवळीचा विस्तार व दृढीकरण यावर प्रत्यक्ष भर दिला. अशाप्रकारे चीनी साम्यवादी पक्ष (CCP) आणि माओ यांच्यामध्ये सैद्धांतिक मतभेद निर्माण झाले.

७.२.५ साम्यवाद्यांना कोंडीत पकडण्याच्या मोहिमा (Bandit Encirclement Campaigns) :

पक्षांतर्गत मतभेदांना तर माओला सामोर जावे लागलेच पण इ.स. १९३० च्या शेवटी चँग कै शेकच्या 'कोंडीत पकडण्याच्या मोहिमांना' (Bandit Enirclement Campaigns) सुद्धा माओ व त्यांच्या साम्यवादी सैन्याला मोठ्या धैर्याने तोंड द्यावे लागले. लाल सैन्याने जेव्हा शहरी भागांवर इ.स.१९३० च्या उन्हाळ्यामध्ये हल्ले करण्यास सुरूवात केली तेव्हा चँग कै शेकने साम्यवाद्यांचे कायमचेच निर्दालन करण्याची प्रतिज्ञा केली. परंतु लाल सैन्य हे गनिमी काव्याने लढत असल्यामुळे चँगच्या पहिल्या दोन मोहिमा अपयशी ठरल्या. इ.स.१९३१च्या उन्हाळ्यातील चँग कै शेक ने स्वत:च्या नेतृत्वाखाली सुरू केलेली तिसरी मोहिम काहीशी यशस्वी ठरली. कियांग्सी प्रांताच्या सोव्हिएतचे मुख्य ठाणे जुइचिन हे कोमिंगटांग फौजांच्या तडाख्याखाली येणार होते. त्याचवेळी चँगचे लक्ष मांचुरिया कडे वळवण्यात आले. कारण १८ सप्टेंबर १९३१ रोजी मुकडेन घटनेमुळे जपानी फौजांनी संपूर्ण मांचुरियावरच कब्जा केला होता. त्यामुळे चँग कै शेकला कियांग्सी

सोव्हिएत विरोधातील आपली तिसरी मोहिम थांबवावी लागली व जपानने मांचुरियावर कब्जा केला होता तिकडे आपले लक्ष द्यावे लागले.

चँग कै शेकने जरी चार मोहिमा साम्यवादी कार्यकर्त्यांना कोंडीत पकडून त्यांचे कायमचे निर्दालन करण्यासाठी राबविल्या असल्या तरी पुढील सात वर्षांमध्ये माओ आणि त्यांच्या साम्यवादी पक्षाने झालेले सर्व नुकसान भरून काढले. किंबहुना, ते अधिकच मजबूत बनले. या दरम्यान साम्यवाद्यांनी 'गनिमी युद्धाद्वारे हल्ला करा व जंगलात पळून जा' या तत्त्वांचा अवलंब केला होता. त्यांनी त्यांच्या वर्चस्वाखालील प्रदेशातून राष्ट्रीय सैन्याला सळो की पळो करून सोडले व त्यांचे अतोनात नुकसान केले. साम्यवाद्यांनी राष्ट्रीय फौजांकडून शस्त्रास्त्रे, बंदुका, दारूगोळा हस्तगत केला, हजारोंना कैदी बनविले आणि आपले झालेले नुकसान भरून काढले.

७.२.६ राष्ट्रीय सरकारला जर्मनीची मदत :

इ.स.१९३३ च्या शरद हंगामा दरम्यान चँग कै शेकने आजपर्यंतची सर्वांत भव्य आणि तत्पर अशी पाचवी मोहिम साम्यवाद्यांविरूद्ध राबविण्याचे ठरविले. त्यावेळी साम्यवादी आग्नेय चीनच्या फुकीएन आणि कियांग्सी या प्रांतात तळ ठोकून होते. त्यावेळी जर्मनीचा हिटलर हा सुद्धा साम्यवाद विरोधी असल्यामुळे सदरच्या मोहिमेमध्ये राष्ट्रीय सैन्याला सल्ला देण्यासाठी त्याने आपला एक जर्मन तज्ज्ञ व सेनापती हॅन्स वोन सीक्ट यास चीनमध्ये पाठविले. त्याने चँग कै शेकला कियांग्सी प्रांतावर एकदम पुढच्याच दिशेने हल्ला न करण्याचा सल्ला दिला. त्याऐवजी ५ लाख राष्ट्रीय सैन्यास कियांग्सी सोव्हिएतची राजधानी जुईचिनला घेराव घालण्यास सांगितले ज्यामुळे सर्व साम्यवादी कोंडीत सापडतील. राष्ट्रीय सैन्याची हालचालींची पद्धती अत्यंत धीमी होती. कारण ते प्रथम सैन्याच्या बचावासाठी खंदक खोदून, सरक्षक भिंती उभारून मगच हल्ल्यास सुरूवात करीत असत. जर्मन सेनापती सल्लागार सीक्ट याच्या युद्ध नीतीप्रमाणे समोरच्या शत्रूस प्रथम युद्ध करून थकवून टाकावे, त्यांची संपूर्ण ऊर्जा-शक्ती संपल्यावर आपण त्यांच्यावर नव्या दमाने हल्ला करावा. साम्यवाद्यांशी कमीत कमी संपर्क ठेवावा आणि त्यांच्याशी प्रत्यक्ष युद्ध करण्यापेक्षा त्यांना अधिक काळ झगडत ठेवावे, त्यांची रसद संपून त्यांची उपासमार होईल अशी परिस्थिती निर्माण करावी.

सीक्ट हा निष्णात सेनापती व लष्करी तज्ज्ञ असल्यामुळे त्याची रणनीती सफल ठरली. त्याची 'धीमी पण खात्रीलायक' अशा युद्धपद्धतीमुळे साम्यवाद्यांच्या नियंत्रणाखालील संपूर्ण प्रदेश जलद गतीने चारही दिशांनी आवळला गेला. एक वर्षाच्या युद्ध कालावधीमध्ये साम्यवाद्यांचा ५०% प्रदेश हातातून निसटला आणि त्यांचे ६०००० लाल सैन्य धारातीर्थी पडले. अशा परिस्थितीत, साम्यवाद्यांना संपूर्ण नष्ट करण्यासाठी स्पष्ट मार्ग दिसू लागला. हॅन्स वोन सीक्ट याने राष्ट्रीय फौजांना हळूहळू आगेकूच करण्यास सांगितले आणि सिमेंट काँक्रीटचे संरक्षक अडथळे, खंदक आणि भिंती उभारल्या. त्यामुळे राष्ट्रीय सैन्याने बाहेर जाण्याच्या प्रत्येक रस्त्यावर नियंत्रण मिळविले.

लालसैन्याच्या गळ्याभोवती हळूहळू पण खात्रीलायकरित्या गळफास आवळला जाऊ लागला. आता लाल सैन्यास राष्ट्रीय सैन्याशी समोरासमोर युद्ध करणे भाग पडले. यामुळे चँग कै शेक च्या राष्ट्रीय सैन्याच्या हाती लाल सैन्याचा कायमचा नि:पात जवळ आला आणि त्याने मोठ्या गर्वाने तो करून दाखवला.

७.२.७ माओ त्से तुंग यांना तात्पुरता शह :-

साम्यवादी सैन्याने आपली रणनीती व डावपेच बदलले. माओंच्या सल्ल्याच्या विरूद्ध रशियन सल्लागार ओटटो ब्राऊन याच्या सल्ल्याने राष्ट्रीय सैन्यावर समोरासमोर हल्ला करण्यासाठी माओच्या पेक्षा कनिष्ठ साम्यवादी नेत्यांना विश्वास दिला. त्याने माओंची नीती कशी चूकीच्या होती हेही समजावले. त्याने माओंना राजकीयदृष्टयासुद्धा चुकीचे सिद्ध केले. कारण कियांग्सी प्रांतामध्ये शेतकऱ्यांवर जोरदार हल्ले झाले व त्यात अनेक शेतकरी मृत्यूमुखी पडले आणि लाल सैन्य त्यांच्या मदतीस जाऊ शकले नाही. माओंची पक्षावरील पकड सैल करण्यासाठी त्यांना चीनी साम्यवादी पक्षाच्या केंद्रीय समितीमधून सुद्धा दूर करण्यात आले.

परंतु ओट्टो ब्राऊनची रणनीती साम्यवादी लाल सैन्यास अत्यंत महागात पडली. राष्ट्रीय सैन्याने कियांग्सी प्रांताला वेढा दिल्यामुळे त्यांची मानवी हानी झाली आणि शस्त्रे व दारूगोळा नष्ट झाला. एवढेच नाही तर हुनानसारख्या साम्यवादी केंद्रांकडूनसुद्धा रसद येणे बंद झाले.

साम्यवाद्यांची निराशाजनक अवस्था पाहून माओंनी साम्यवादी निष्ठावान गटाचा पाठींबा मिळविण्यासाठी राष्ट्रीय फौजांवर पाठीमागच्या बाजूने हल्ले करून लाल सैन्याला उसंत देण्याची योजना आखली. परंतु ती योजना फेटाळली गेली आणि ब्राऊनची योजना स्वीकारली गेली. त्याच्या योजनेनुसार हुनान प्रांतामध्ये चीनी साम्यवादी पक्षाची दुसरी तयार लष्करी फळी आहे आणि म्हणूनच आता त्या प्रांताकडे जाण्यासाठी सदर युद्धातून संपूर्ण माघार घेणे आवश्यक आहे. ही माघार म्हणजे 'प्रदीर्घ मोर्चा' (Long March) असून आक्टोबर १९३४मध्ये त्याची सुरूवात झाली.

७.२.८ प्रदीर्घ मोर्चास प्रारंभ :-

साम्यवादी पक्षाच्या लाल सैन्याने आपल्या सोबत जेवढे वाहून नेता येईल तेवढे सामान घेऊन मोर्चास सुरूवात केली. जवळजवळ ८७००० सैन्याने माघार घेण्यास सुरूवात केली व आपल्यासोबत फर्निचर, टंकलेखन यंत्रे, छपाई यंत्रे घेतली. त्यांनी ३३००० बंदुका आणि दोन दशलक्ष काडतुसे व स्फोटके घेतली. कियांग्सी प्रांताच्या वेढ्यामधून बाहेर पडण्यासाठी लाल सैन्याला जवळजवळ ४० दिवस लागले. जसे ते कियांग्सी मधून निसटले तसे त्यांच्यावर झियांग येथे राष्ट्रीय सैन्याने हल्ले चढवले. झियांग येथील युद्धात लाल सेनेचे ४५००० सैन्य मेले म्हणजेच जवळजवळ एकूण लष्करी बळाच्या ५०% लढाऊ सैन्य गमवावे लागले.

यानंतर ब्राऊन याची चुकीची रणनीतीच लाल सेनेच्या एवढ्या मोठ्या ऱ्हासाला कारणीभूत आहे याची जाणीव झाली. ब्राऊनने लाल सैन्यास सरळ रांगेमध्येच आगेकूच करण्याचे आदेश दिले. त्यामुळे लाल सैन्य कोठे आहे आणि पुढे कुठपर्यंत असेल यांचा अंदाज राष्ट्रीय सैन्यास बांधता येत होता. पळून जाणाऱ्या सैनिकांकडे सामानसुमान असल्यामुळे त्यांच्या माघार घेण्यातसुद्धा अडथळे निर्माण झाले. छपाई यंत्रे, टंक लेखन यंत्रे, आणि इतर साहित्य हे युद्धाच्या व जीवाच्या दृष्टीने महत्त्वाचे नव्हते आणि त्यामुळे जलद हालचाली करण्यामध्ये अडचणी येणे स्वाभाविक होते. झियांग युद्धानंतर ब्राऊनला दोष देण्यात आला. परंतु झालेले नुकसान परत भरून येणारे नव्हते. जानेवारी १९३५ मध्ये लाल सेनेचे नियंत्रण पुन्हा माओ त्से तुंग यांच्या हवाली करण्यात आले व ब्राऊनला काढून टाकण्यात आले.

७.२.९ माओत्से तुंग यांची पुढील रणनीती :-

माओ त्से तुंग यांनी चू तेह यांच्या पाठींब्याने नवीन रणनीती व डावपेच आखले. त्यांच्या मते, लाल सेनेच्या हालचालींचा मागमूस राष्ट्रीय सैन्यास लागता कामा नये. त्यांनी आपल्या अनुयायांना वेगवेगळ्या दिशांना पाठवले जेणेकरून चँग कै शेकला नक्की ठावठिकाणा कळू नये व कोणती टोळी साम्यवादी माओची - लाल सैन्याची आहे याचा अंदाज लागू नये. कारण यांगत्से नदीच्या किनाऱ्यावर उत्तरेकडे जाणाऱ्या लाल सेनेला रोखण्यासाठी चँग कै शेकचे राष्ट्रीय सैन्य ५,००००० ते ७,५०००० या संख्येने दबा धरून बसले होते. लाल सैन्याने जसे झियांग मधून निघण्यास सुरूवात केली तसे त्यांचे सैन्य वेगवेगळ्या दिशांना दिसू लागले. त्यामुळे राष्ट्रीय सैन्यास नेमके लाल सैन्य कोणते याचे भाकीत करणे कठीण जाऊ लागले. माओंनी लाल सैन्याच्या छोट्या छोट्या तुकड्या तयार केल्या. सैद्धांतिक दृष्टया, हल्ला करण्यासाठी राष्ट्रीय सैन्यास सोपे जाणार होते. परंतु वास्तविक पाहता, खुल्या मैदानामध्ये ते दिसणार नव्हते.

७.२.१० प्रदीर्घ मोर्चादरम्यान अडचणी :

माओंनी उत्तर चीनच्या शेन्सी प्रांताकडे सुद्धा जाण्याची योजना आखली. तसे पाहिल्यास हा प्रवास अत्यंत खडतर व वातावरण अत्यंत प्रतिकूल होते. लाल सैन्यास जगातील उच्च पर्वतांपैकी काही उंच असे बर्फाचे पर्वत पार करावे लागले. समुद्रसपाटीपासून १४००० ते १५००० फूट उंचीवर ऑक्सिजनच्या कमतरतेपायी अनेक जणांचे प्राण गमावण्याची शक्यता होती. नव्हे, शिखरावर मुक्काम करणे तर घातकीच होते. विश्रांती घेणे आवश्यक असले तरी ते मात्र मृत्यूला आमंत्रण होते. त्यामुळे सर्वांत सोपा उपाय म्हणजे बसणे आणि घसरत येणे हाच होता. त्यामुळे पर्वताच्या पायथ्याशी बर्फच तुम्हाला घेऊ जाईल. याचा परिणाम असा झाला की, काही जण मेले, काहींचा कपाळमोक्ष झाला, काहींची हाडे मोडली तर काही मात्र जिवंत पोहोचले. बहुतांशी लाल सेनेला प्रदीर्घ मोर्चा दरम्यान बर्फाळ पर्वतांचा अनुभव हा सर्वांत वाईट व दुष्कर अनुभव होता.

चीनी गवताळ प्रदेश पार करताना त्या प्रदेशात जागोजागी खोल दलदलीचा भाग होता. त्यामुळे लाल सेनेच्या शेकडो सैनिकांना आपले प्राण गमवावे लागले. लाल सैन्याला केवळ राष्ट्रीय सैन्याचाच नुकाबला करायचा नव्हता तर उत्तर चीनमधील लष्करी नेत्यांशी सुद्धा (जमीनदार) संघर्ष करावयाचा होता. एवढेच नव्हे तर राष्ट्रीय सैन्यसुद्धा या लष्करी नेते व जमिनदार वर्गाच्या पुढे टिकाव धरू शकले नव्हते. त्यामुळेच आपल्या प्रभावाखालील प्रदेशात लाल सेनेच्या आगमनाने ते खूष झाले नाहीत.

७.२.११ सोव्हिएतची स्थापना:

प्रदीर्घ मोर्चाच्या दरम्यान अनेक संकटांना साम्यवाद्यांना सामोरे जावे लागले असले तरी त्यांनी चिंगकांगशान आणि कियांग्सी प्रांताच्या धर्तीवर उत्तरेकडील खेड्यापाड्यांत आपले साम्यवादी सोव्हिएत स्थापन केले. त्यांनी जमीनदार वर्गांकडून अतिरिक्त जमीनी ताब्यात घेऊन त्यांचे भूमीहीन शेतकऱ्यांमध्ये वाटप केले. या शेतकऱ्यांना स्वरक्षणार्थ आणि आपल्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी शस्त्रास्त्रे देण्यात आली. खेड्यापाड्यातील आदिवासी स्थानिक लोकांनी पर्वतरांगा पार करत असताना लाल सेनेला वाटाडे म्हणून मदत केली होती. त्यांचा विश्वास माओंनी जिंकला व त्यांच्याशी मैत्रीचे व भावनिक संबंध प्रस्थापित केले.

७.२.१२ प्रदीर्घ मोर्चाचा शेवट :

इ.स. १९३५ च्या ऑक्टोबर महिन्यामध्ये आपल्या ८७००० लाल सैन्यासह साम्यवाद्यांनी कियांग्सी प्रांतामधून प्रदीर्घ मोर्चास सुरूवात केली व जवळजवळ एक वर्ष खडतर पायी प्रवास करून ते शेन्सी प्रांतातील आपले लक्ष्य येनान येथे पोहोचले आणि मोर्चाचा येथे शेवट झाला. प्रदीर्घ मोर्चाच्या शेवटी ८७००० सैन्यापैकी फक्त १०००० सैनिकच जिवंत व सहिसलामत पोहोचले. त्यांनी जवळजवळ ९००० किलोमीटर पायी प्रवास केला होता आणि ३६८ दिवसांचा कालावधी त्यांना लागला होता. त्यामुळे २०व्या शतकातील एक महत्त्वपूर्ण घटना म्हणून प्रदीर्घ मोर्चास महत्त्व प्राप्त झाले.

वायव्य चीनच्या शेन्सी प्रांतामध्ये आल्यावर माओ त्से तुंग यांच्या नेतृत्वाखाली साम्यवाद्यांनी आपल्या विखुरलेल्या गटांचे संघटन व पुनर्बांधणी करण्यास सुरूवात केली. जे जे सैनिक येनान येथे जिवंत आले त्यांनी अगोदर पोहोचलेल्या साम्यवादी लाल सैन्यास मिळून पुन्हा ८०००० ची फौज उभी करण्याचे ठरविले व राष्ट्रीय सैन्याशी लढा देण्याचा निश्चय केला. हळूहळू त्यांनी आजूबाजूच्या प्रदेशावर आपले नियंत्रण वाढविण्यास सुरूवात केली. साम्यवाद्यांच्या प्रभावाखाली तेथील स्थानिक शेतकऱ्यांचा दृष्टीकोन बदलला व ते सुद्धा आक्रमक बनले. जमिनीचे भूमिहीनांमध्ये पुनर्वाटप, कर शोषणाचे निर्मूलन आणि शोषक वर्गांचे निर्मूलन या व इतर आर्थिक सुधारणांमुळे साम्यवाद्यांना शेतकरीवर्गाचा संपूर्ण पाठींबा मिळाला.

७.२.१३ प्रदीर्घ मोर्चाचे महत्त्व:

तसे पाहिल्यास प्रदीर्घ मोर्चा साम्यवादी पक्षास महाग पडला खरा परंतु आपल्या सैन्याच्या पुनर्बांधणीसाठी व प्रशिक्षणासाठी जो एकांतपणा हवा होता तो उत्तर चीनमध्ये मिळाला. तसेच हयात असलेल्या प्रदीर्घ मोर्चामधील सैनिकांचा दृढनिश्चय, समर्पण व खडतर प्रवास याने तेथील स्थानिक शेतकऱ्यांच्या मनामध्ये एक आदर व प्रतिष्ठा निर्माण केली. प्रदीर्घ मोर्चाचे महत्त्व विशद करताना इ.स.१९३५ मध्ये माओंनी लिहिले, - ''प्रदीर्घ मोर्चा हा एक पक्षाचा जाहिरनामा आहे. त्याने सर्व जगाला ठासून सांगितले आहे की, साम्यवाद्यांचे लाल सैन्य हे महापराक्रमी आहे तर साम्राज्यवादी व त्यांचे सैन्य हे पळणाऱ्या कुत्र्याप्रमाणे आहे. चँग कै शेक सारखे सेनापती तर नपुंसक व षंढ आहेत. प्रदीर्घ मोर्चाने हे सिद्ध केले आहे की, साम्यवादी लाल सैन्याला घेराव घालणे, त्यांचा पाठलाग करणे, अनंत अडचणी निर्माण करणे आणि त्यांचा लक्ष्यभेद करणे यांमध्ये राष्ट्रीय सैन्य पूर्णपणे अपयशी ठरले आहे. प्रदीर्घ मोर्चा ही एक प्रचारशक्ती आहे. लाल सैन्य ११ प्रातांमधील २०० दशलक्ष जनतेला असे आवाहन करीत आहे की, लाल सैन्याने निवडलेला मार्ग हाच त्यांच्या मुक्तिचा मार्ग आहे.''

माओ त्से तुंग यांनी आपल्या सैन्यासाठी काही आदेश दिले व नीती आखली. त्यामध्ये ज्या आठ कलमांचा समावेश होता त्यांच्यात सर्वांत महत्त्वाची ताकीद सैनिकांना दिलेली होती ती म्हणजे अन्न व त्याच्या पुरवठ्याची कितीही गरज निर्माण झाली तरीदेखील शेतकरी वर्गास इजा करणे किंवा त्यांचा अनादर करू नये. या धोरणामुळेच साम्यवाद्यांना ग्रामीण भागात शेतकऱ्यांचा भरभरून पाठींबा मिळाला.

प्रदीर्घ मोर्चानंतर चीनी साम्यवादी पक्षाची प्रतिष्ठा व दर्जा, त्यांची ऊर्जा - शक्ती व साहस द्विगुणीत झाले. साम्यवादी लाला सेना गनिमी युद्धामध्ये एवढी अजिंक्य व तरबेज झाली की, राष्ट्रीय सैन्य असो किंवा जपानी फौजा असोत, कोणाचेही आव्हान नीडरपणे, समर्थपणे पेलण्यास तयार झाली. त्यामुळेच माओ त्से तुंग यांनी लाल सैन्याचे वर्णन 'जगज्जेत्यांचे सैन्य' (Army of heroes) म्हणून केले.

प्रदीर्घ मोर्चा ही घटना चीनच्या इतिहासातील एक सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखी घटना होती. ते एक महान मानवी साहस होते. ज्यामध्ये ८७००० लोकांनी ३६८ दिवस ९००० किलोमीटर अंतर पायी कापले होते. या लोकांना मानवी वस्तीस अयोग्य प्रदेशातून, रानटी टोळ्यांच्या तावडीतून निसटून आणि राष्ट्रीय सैन्यापासून दूर दूर जावे लागले होते. प्रदीर्घ मोर्चाचे वर्णन करताना एडगर स्नो आपल्या 'Red star over China' या पुस्तकात लिहितो, ''एकूण त्यांनी १८ पर्वत रांगा ओलांडल्या, त्यांच्यापैकी पाच तर पूर्णपणे बर्फाच्छादित होत्या आणि त्यांनी २४ नद्या पार केल्या. त्यांनी १२ प्रांतामधून प्रवास केला त्यापैकी अनेक प्रांत एखाद्या युरोपियन देशाच्या क्षेत्रफळापेक्षाही मोठे होते. त्यांनी दहा वेगवेगळ्या लष्करी नेते व त्यांच्या

सैन्याचा पराभव केला, त्यांनी ३ लाखापेक्षाही जास्त कोमिंगटाँग पक्षाच्या सैन्यास हुलकावणी देऊन पराभूत केले. त्यांनी सहा वेगवेगळ्या आदिवासी जिल्ह्यात प्रवेश करून ओलांडले आणि त्यांच्यातून सहिसलामत निसटले, ज्या प्रदेशातून अनेक वर्षे कोणत्याही सैन्याने जाण्याची हिंमतही दाखवली नव्हती.''

७.२.१४ आपली प्रगती तपासा :

१) प्रदीर्घ मोर्चास कोणत्या घटना कारणीभूत झाल्या ?

२) प्रदीर्घ मोर्चा दरम्यान साम्यवाद्यांनी कोणत्या अडचणींना तोंड दिले ?

३) प्रदीर्घ मोर्चाचे महत्त्व थोडक्यात लिहा.

_____

_____

_____

_____

७.३ लोक प्रजासत्ताक चीनचा जन्म (Birth of People's Republic of China) :

७.३.१ पार्श्वभूमी :

प्रदीर्घ मोर्चानंतर माओ त्से तुंग यांच्या नेतृत्वाखाली साम्यवाद्यांना आपले स्थान वायव्य चीनमध्ये बळकट करायचे होते आणि चँग कै शेकच्या राष्ट्रीय सैन्याशी अंतिम युद्ध करायचे होते. त्यामुळे साम्यवाद्यांचे मुख्य उद्देश शेतकरी वर्गाचे संघटन करणे, लाल सेनेची बांधणी करणे आणि साम्यवादी नियंत्रणाखाली राज्यक्रांतीद्वारे प्रजासत्ताक चीनची स्थापना करून राजकीय सत्ता हस्तगत करणे हे होते. परंतु साम्यवाद्यांना आपले हे लक्ष्य गाठण्यासाठी जवळ जवळ १५ वर्षे प्रयत्न करावे लागले. या कालावधीत चीनला जपानी आक्रमणाचा सामना करावा लागला. त्यासाठी साम्यवाद्यांना जपान विरोधात दुसरी आघाडी स्थापन करून इ.स.१९३७ मध्ये दुसरे चीन-जपान युद्ध पुकारावे लागले आणि पुढे त्याचे दुसऱ्या महायुद्धात इ.स. १९३९मध्ये विलीनीकरण झाले. दुसऱ्या महायुद्धाचा शेवट इ.स.१९४५ मध्ये झाल्यावर चीनमध्ये साम्यवादी व राष्ट्रीय सरकार (चँग कै शेक) यांच्यामध्ये गृहयुद्धास सुरूवात झाली आणि शेवटी त्याची परिणती साम्यवादी पक्षाच्या विजयामध्ये झाली. इ.स.१९४९ मध्ये चीनी प्रजासत्ताकाचा जन्म झाला. ही एक 'साम्यवादी क्रांती' (Communist Revolution) होती.

७.३.२ मांचुरियन समस्या (१९३१):

मांचुरियातील मुकडेन प्रांतामध्ये जी घटना घडली त्यामुळे जपानने मांचुरियावर कब्जा करून आपल्या मर्जीतले सरकार तेथे स्थापन केले.

इ.स.१९०४-०५ मध्ये रशिया-जपान युद्धात जपानने बलाढ्य रशियाचा पराभव केला व दक्षिण मांचुरियावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. इ.स. १९२०च्या दशकामध्ये चँग कै शेकने कोमिंगटाँग पक्षांर्तगत राष्ट्रीय सरकारच्या मार्फत चीनच्या एकीकरणासाठी लष्करी मोहिमा राबवण्यास सुरूवात केली होती. परंतु जपानला आपल्या मांचुरियातील हितसंबंधाबाबत त्यामुळे भिती वाटत होती. ज्यावेळी मांचुरियाचा सेनापती चँग सू लियांग ज्याने नुकताच कोमिंगटाँग पक्षात प्रवेश केला होता त्याने रेल्वेमार्ग आणि बंदर विकासाच्या सुविधांचे काम थांबविण्यास जपानला नकार दिला, त्यावेळी जपानची सदर मुद्याबाबत खात्रीच झाली. मुकडेन जवळच्या जपानी रेल्वेमार्गावर बॉम्बस्फोट झाल्याच्या निमित्ताचा फायदा घेण्याचे ठरवून सप्टेंबर १९३१ मध्ये जपानने संपूर्ण मांचुरियावरच ताबा मिळविला आणि ''मांचुकुओ'' नावाने तेथे आपले अंकीत राष्ट्र घोषित केले.

७.३.३ दुसरी संयुक्त आघाडी:-

इ.स.१९३५ च्या ऑगस्टमध्ये माओ त्से तुंग यांनी जपानी आक्रमणाचा मुकाबला करण्यासाठी राष्ट्रीय सरकारपुढे संयुक्त आघाडीचा प्रस्ताव ठेवला होता. त्यामुळे पुढील साम्यवादीविरोधी मोहिमांपासून काही काळ उसंत मिळेल असाही उद्देश साम्यवादी पक्षाचा होता. म्हणून कोमिन्टर्ननेसुद्धा या प्रस्तावास संमती दर्शविली होती. एवढेच नव्हे तर जनमताचा कौलसुद्धा या प्रस्तावाच्या बाजूनेच होता. चँग कै शेकने मात्र 'सियान घटनेनंतरच' या प्रस्तावास संमती दिली. कारण मांचुरियाचा सेनापती चँग सू लियांग याच्या नेतृत्वाखाली चँग कै शेकच्या स्वत:च्याच फौजांनी चँग कै शेकला ओलिस ठेवले होते. कारण त्यांनीसुद्धा जपानी आक्रमणाचाच सर्वात प्रथम प्रतिकार करण्याचा आग्रह धरला होता. चौ एन लाय यांनी मध्यस्थी केल्यावरच चँग कै शेकला सोडण्यात आले. कोमिंगटाँग आणि साम्यवादी पक्ष यांच्यामध्ये झालेल्या करारानुसार साम्यवाद्यांनी चँग कै शेकचे नेतृत्व स्वीकारून आपले लाल सैन्यसुद्धा त्याच्याच आज्ञेखाली ठेवण्याचे ठरले. एवढेच नव्हे तर साम्यवाद्यांनी भूमी पुनर्वाटप धोरणावर सुधा स्थगिती आणण्यास व उद्योगावरील नियंत्रण कमी करण्यास संमती दर्शवली.

७.३.४ दुसरे चीन-जपान युद्ध :-

मार्को पोलो पुलावरील हल्ल्याचे निमित्त करून ७ जुलै १९३७ रोजी जपानने चीनवर हल्ला केला. जपानी फौजा आणि युद्धबोटींनी चीनमध्ये प्रवेश करून चीनचे पाच प्रांत ताब्यात घेण्याचा व दुसरे 'मांचुकुओ' राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. ऑक्टोबर पर्यंत जपानने पेकींग, शांघाय, वूहान आणि कँटनसारखी महत्त्वाची शहरे ताब्यात घेतली. डिसेंबर १९३७ मध्ये त्यांनी राष्ट्रीय सरकारची राजधानी नानकींग ताब्यात घेतली. निर्वासितांचे लोंढेच्या लोंढे पाहिल्यावर राष्ट्रीय सैन्याने नानकींग जपानच्या स्वाधीन करून पळ काढला. सहा आठवड्यांच्या कालावधीत लाखो चीनी मारले गेले, स्त्रियांवर बलात्कार झाले आणि नानकिंगची अवस्था एवढी

भयानक झाली की, तिचे वर्णन 'नानकिंगवरील बलात्कार' (Rape of Nanking) असे केले गेले.

जेव्हा जपानी फौजांनी चीनच्या अंतर्भागात प्रवेश केला आणि चीनचा मोठा भाग काबीज केला त्यावेळी साम्यवादी आणि राष्ट्रीय सैन्याचे गनिमी सैनिक विरळ जपानी भागामध्ये मागे लपून राहिले. चँग कै शेक व त्याचे अनुयांयी यांनी सिचुआन प्रांताच्या चुंकींग येथे प्रयाण केले. इ.स.१९३९ साली जेव्हा युरोपमध्ये दुसऱ्या महायुद्धाची ठिणगी पडली तेव्हा चीनसुद्धा दोस्त राष्ट्रांच्या बाजूने लढू लागला व चीनचे युद्ध इ.स.१९४५च्या महायुद्धाच्या समाप्तीपर्यंत म्हणजे जवळजवळ आठ वर्षे चालले. चीनची या युद्धात दोन दशलक्ष मानवी हानी झाली तर रोगराई आणि दुष्काळाने थैमान मांडले. जपानने चीन जिंकल्याचे जाहीर केले. परंतु वास्तवतः त्यांना कोणत्याही दिशेने विजय मिळाला नव्हता. चँग कै शेकने साम्यवाद्यांवर अविश्वास दाखवला व त्यांच्याविरूद्ध आपले सैन्य पाठवले.

साम्यवादी सैनिकांना गनिमी युद्धपद्धतीचा चांगला सराव व अनुभव होता. त्यामुळे जपानविरूद्ध ते चांगलाच लढा देऊ शकले. साम्यवाद्यांनी स्थानिक पातळीवर सरहद्द प्रदेशात स्थानिक सरकारे स्थापन केली आणि इ.स.१९३६ ते १९४५ पर्यंत त्यांच्यावर नियंत्रण ठेवले. इ.स.१९४१ च्या पर्ल हार्बरवरील जपानच्या हल्ल्याने अमेरिकेने जपानविरूद्ध युद्ध पुकारले व चीन-जपानयुद्ध हे आता दुसऱ्या महायुद्धाचाच भाग बनले.

राष्ट्रीय सैन्य - साम्यवादी पक्ष यांच्या संयुक्त आघाडीमुळे साम्यवाद्यांना काहीशी उसंत मिळाली आणि आपले लाल सैन्य बळकटीसाठी आणि ग्रामीण भागात सत्ताविस्तारासाठी त्यांना संधी मिळाली. थोडा काळ का होईना आपसातले कट्टर शत्रुत्व विसरून हे दोन्ही गट जपानविरूद्धच्या आक्रमणात एकत्र आले. परंतु कोणताही पक्ष आपले मूळे सिद्धांत विसरण्यास तयार नव्हता. इ.स.१९४१ पर्यंत ही संयुक्त आघाडी संपुष्टात आली आणि त्यांनी परस्परांविरूद्ध आरोप-प्रत्यारोप करण्यास सुरूवात केली. आघाडी करताना जरी साम्यवाद्यांनी आपले लाल सैन्य चँग कै शेकच्या नियंत्रणाखाली आणण्याचे ठरवले असले तरी जपानविरूद्धच्या लढाईमध्ये साम्यवाद्यांनी आपल्या लाल सैन्यावर आपलेच नियंत्रण प्रस्थापित केले. लाल सैन्यास संपूर्ण राजकीय प्रशिक्षण मिळाले आणि चू तेह याच्या नेतृत्वाखाली दिवसेंदिवस त्यांची वाढ होऊ लागली. दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटी साम्यवादी लाल सैन्याची संख्या नियमित सैनिक, गनिमी सैन्य आणि लष्करी प्रशिक्षित नागरिक मिळून ८०००० वरून जवळजवळ तीन दशलक्षापर्यंत वाढली. अशाप्रकारे जपानचा पराभव आणि सर्वनाश होण्याच्या वेळेस चीनी साम्यवादी पक्ष चीनच्या राजकारणात निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी विशाल शिस्तबद्ध व विशिष्ट तत्वज्ञानाने प्रेरित सैन्य, कार्यक्षम पक्ष यंत्रणा आणि लोकप्रिय घोषणा 'जमीन पुनर्वाटप आणि शेती सुधारणा' यांनी सुसज्ज झालेला होता.

७.३.५ दुसऱ्या महायुद्धाचा शेवट :

ऑगस्ट १९४५ मध्ये जपानने शरणागती पत्करल्यावर, रशिया व अमेरिकेकडून सहकार्य व खुल्या पाठींब्याची खात्री मिळाल्यावर चँग कै शेकने मोठ्या आत्मविश्वासाने चीनच्या सुधारणा व पुनर्बांधणी यांचा विचार केला. आर्थिक दिवाळखोरी, सर्वदूर भ्रष्टाचार आणि आपल्या सरकारची अकार्यक्षमता याबाबत चँग कै शेकला अजिबात माहिती नव्हती. त्याचा सर्व भर आपल्या लष्करी ताकदीवर होता. त्यामुळे युद्धानंतर साम्यवाद्यांशी कोणत्याही प्रकारची भागीदारी करून सरकार चालवण्यास त्याची अजिबात इच्छा नव्हती. अमेरिकेने साम्यवाद्यांशी युती करून देशाच्या एकीकरणासाठी व युद्धोत्तर आर्थिक पुनर्बांधणी साठी दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. याउलट चँग कै शेकने साम्यवादी लाल सेनेच्या बरखास्तीची मागणी केली आणि त्यांना सूट म्हणून त्यांनी आपल्या मूळच्या वायव्य प्रांतात पुन्हा जावे असे सांगितले.

७.३.६ राष्ट्रीय सरकार व साम्यवाद्यांमध्ये संघर्ष :-

आपली ताकद आणि जनतेचा पाठींबा याबद्दल खात्री असलेल्या साम्यवाद्यांनी चँग कै शेकच्या अटींना भीक घातली नाही. त्याचा परिणाम असा झाली की, राष्ट्रीय सैन्य आणि साम्यवादी यांच्यामध्ये जपानने सोडून दिलेली महत्त्वाची शहरे, प्रांत, रेल्वेमार्ग यावर लवकरात लवकर नियंत्रण मिळविण्यासाठी स्पर्धा चालू झाली. अमेरिकेने चँग कै शेकला हवाई मार्गे मदत केली व त्याच्या फौजांना साम्यवाद्यांच्या पुढे नानकींग आणि शांघाय येथे पोहोचवले. एका वर्षाच्या कालावधीत दोन्ही फौजांमध्ये जवळजवळ ११ प्रांतामध्ये संघर्ष सुरू झाला होता. मांचुरियातील स्पर्धा अत्यंत तीव्र होती. साम्यवाद्यांनी उत्तर चीनच्या महत्त्वाच्या शहरांमध्ये प्रवेश केला आणि मांचुरियाच्या ग्रामीण भागात आपला जम बसविला. त्यांनी आपल्याविरूद्ध फौजा पाठविल्यास चँग कै शेकला यादवी युद्धाची धमकी दिली. साम्यवाद्यांनी मांचुरिया व मांचुकुओ फौजांवर नियंत्रण प्राप्त केल्यामुळे यादवी युद्धात त्यांची सरशी झाली आणि शेवटी राष्ट्रीय सैन्यास साम्यवाद्यांपुढे शरणागती पत्करून तैवानला पळून जावे लागले.

७.३.७ अमेरिकेची शटल नीती (धरसोड नीती) :

अमेरिकेने साम्यवादी पक्ष व राष्ट्रीय पक्ष यांच्यामध्ये आघाडी सरकार स्थापन व्हावे यासाठी आतोनात प्रयास केले, की जेणेकरून यादवी युद्ध टळावे व देशाची एकता व अखंडता कायम राहील. इ.स. १९४५ च्या पूर्ण वर्षभर अमेरिकेचा राजदूत पॅट्रीक हर्ले यांने दोन्ही पक्षातील मतभेद मिटवून संयुक्त सरकार स्थापन करावे यासाठी चुंकींग व येनान येथून सतत ये-जा केली. ज्याप्रमाणे शटल रेल्वे सेवा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नियमित चालू असते. त्याप्रमाणे त्याने वर्षभर प्रयत्न केले. माओ त्से तुंग 'लोकशाही संयुक्त सरकार' स्थापनेच्या बाजूने होते. परंतु चँग कै शेक त्याबाबतीत अजिबात समझोता करण्यास तयार नव्हता व अमेरिकन शटल नीतीला (The Shuttle Diplomacy of U.S.) यश आले नाही.

७.३.८ अमेरिकेची मार्शल शिष्टाई (Marshall Mission) :

अमेरिकेचे अध्यक्ष ट्रुमन यांचे वैयक्तिक प्रतिनिधी म्हणून जनरल जॉर्ज मार्शल यांनी पॅट्रीक हर्ले यांच्यानंतर चीनमधील वाद मिटविण्यासाठी डिसेंबर १९४५ मध्ये आगमन केले. चीनमधील यादवी युद्ध रोखणे आणि 'शांतीपूर्ण लोकशाही मार्गांनी चीनचे एकीकरण करणे' अशा सूचना मार्शल यांस देण्यात आल्या होत्या. आशिया खंडासाठी युद्धोत्तर नीती ठरविण्यासाठी एक कळीचा मुद्दा म्हणून अमेरिकेच्या ट्रुमन यांस बळकट व एकीकृत चीन हवा होता आणि त्याचे अमेरिकेशी मित्रत्वाचे व सहकार्याचे संबंध असावेत अशी त्याची अपेक्षा होती.

साम्यवाद्यांचा मुख्य आक्षेप जो एकपक्षीय सरकार दूर करण्याचा होता, त्यासाठी मार्शल मिशन चीनमध्ये आले होते. इ.स.१९४६ च्या सुरूवातीस मार्शल यांस साम्यवादी, कोमिंगटांग आणि कोमिंगटांग विरोधातील इतर प्रतिनिधींचा समावेश असलेली 'लोक सल्लाविषयक परिषद' (People's Consultative Council) स्थापन करण्यात यश आले. परंतु ही परिषद केवळ तीन हप्ते टिकली आणि त्यानंतर संपूर्ण उत्तर चीन आणि मांचुरिया येथे साम्यवादी व राष्ट्रीय सैन्य यांच्यामध्ये यादवी युद्धास सुरूवात झाली. मार्शलने लागू केलेली युद्धबंदी मोडली गेली. त्यामुळे त्याने रागातच चीन सोडले. कारण चँग कै शेकच्या हट्टी स्वभावामुळे संपूर्ण चीनला यादवी युद्धास तोंड द्यावे लागले.

७.३.९ साम्यवाद्यांचा विजय :

यादवी युद्धाच्या सुरूवातीला राष्ट्रीय फौजांना काही प्रमाणात यश मिळत होते. परंतु इ.स.१९४७ च्या मध्यापासून साम्यवाद्यांची सरशी होऊ लागली. विशेषतः मांचुरिया आणि ईशान्य चीनमध्ये चँग कै शेकला पराभव स्विकारावा लागला. महागाईचा भस्मासूर, लष्करी पिछेहाट आणि अमेरिकेची गमावलेली सहानुभूती यांमुळे राष्ट्रीय सैन्याचा आत्मविश्वास कोसळला. गरीब - कष्टकरी वर्गाचा पाठींबाही नष्ट झाला. त्यातच गनिमी युद्धात निष्णात असल्यामुळे साम्यवाद्यांना ठिकठिकाणी यश मिळत होते.

साम्यवादी लाल सैन्याने संदेश यंत्रणा नष्ट केली, रसद थांबविली आणि विखुरलेल्या राष्ट्रीय सैन्याची कत्तल केली किंवा त्यांना शरणागती पत्करावयास लावले आणि त्यामुळेच राष्ट्रीय सैन्याने बचावात्मक धोरण स्वीकारले. युद्धभूमीतून पलायन, सैन्यप्रमुखांची फितुरी, मनोधैर्य खच्चीकरण यामुळे राष्ट्रीय सैन्य संकटाच्या व पराभवाच्या खाईत लोटले गेले. नानकींग आणि शांघाय तर कोणत्याही प्रतिकाराशिवाय साम्यवाद्यांच्या हातात पडले. २१ जानेवारी १९४९ रोजी चँग कै शेक ने अधिकृतरित्या चीनी प्रजासत्ताकाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आणि त्याच्या जागी नामधारी म्हणून उपाध्यक्ष ली त्सूँग जेन याने अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारला. परंतु चँग कै शेकने खरी सत्ता मात्र आपल्याच हाती ठेवली होती. जेव्हा आपली लष्करी स्थिती चीनच्या मुख्य भूमीमध्ये निराशाजनक

होत चालली आहे असे लक्षात आल्यावर आपल्यासोबत घेता येईल तेवढी फौज घेऊन त्याने तैवान बेटाकडे प्रयाण केले. १ मार्च १९५० रोजी, चँग कै शेकने पुन्हा तैवान येथे प्रजासत्ताक चीन चीनचा अध्यक्ष म्हणून स्वत:स घोषित केले.

७.३.१० चीनी लोक प्रजासत्ताकाची स्थापना :-

माओच्या साम्यवादी पक्षाचे लाल सैन्य, यादवी काळात 'लोकांची मुक्ती सेना' म्हणून नामांतरित केले होते ते एप्रिल १९४९ मध्ये यांगत्से नदी पार करून ऑक्टोबर १९४९ मध्ये दक्षिण किनाऱ्यावरील कँटन येथे पोहोचले. या सुमारास यादवी युद्ध जवळजवळ संपुष्टातच आलेले होते. १ ऑक्टोबर १९४९ रोजी, पेकींग या जुन्या पारंपारिक राजधानीमध्ये, माओ त्से तुंग यांच्या नेतृत्वाखाली चीनी साम्यवादी पक्षाने (CCP) 'लोक प्रजासत्ताक चीनची' (People's Republic of China) स्थापन केली.

७.३.११ आपली प्रगती तपासा :

१) चीनी साम्यवादी पक्ष आणि राष्ट्रीय सरकार यांच्यामध्ये आघाडी होण्यास कोणती घटना
कारणीभूत झाली ?
२) कोणत्या घटनेमुळे चीन-जपान युद्ध दुसऱ्या महायुद्धात विलीन झाले ?
३) अमेरिकेने संयुक्त आघाडी करून चीनमधील यादवी टाळण्यासाठी कोणते प्रयत्न केले ?

७.४ साम्यवाद्यांच्या विजयास कारणीभूत घटक :

७.४.१ पार्श्वभूमी :

चँग कै शेक सारख्या लष्करी सेनापती असलेल्या अनुभवी लढवय्याच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय सैन्याचा पराभव करण्यात साम्यवाद्यांना जो विजय मिळाला त्या पाठीमागे त्यांचा दृढनिश्चय, चिकाटी, त्यागाची भावना आणि माओ त्से तुंग सारख्या साम्यवादी नेत्यांचे नेतृत्व हे मुख्य घटक कारणीभूत होते. प्रदीर्घ मोर्चाच्या दरम्यान लाल सैनिकांचे संख्याबळ त्यांच्या मूळच्या संख्येच्या १०% फक्त उरले असले तरीही माओ आणि चू तेह यांच्या समर्थ नेतृत्वाने त्यांचे पुनरूज्जीवन केले. नवीन तरुणांची भरती केली, त्यांना प्रशिक्षण दिले, शस्त्रास्त्रे पुरवली. म्हणूनच त्यांनी जपानी आक्रमणाचा मुकाबला करून चँग कै शेक च्या राष्ट्रीय सैन्याचा पाडाव केला.

७.४.२ दुसऱ्या चीन-जपान युद्धाचे परिणाम :

चीन-जपान युद्ध जवळजवळ आठ वर्षे चालू होते. त्यामुळे चीनच्या राष्ट्रीय सरकारचे लष्करी व आर्थिकदृष्टया आतोनात नुकसान झाले होते. त्यामुळे हे युद्ध जर झाले नसते तर कदाचित साम्यवाद्यांना विजय मिळणे कठीण झाले असते. कारण चीन-जपान युद्धातील खडतर अनुभवांनी राष्ट्रीय फौजांचे

मनोबल खच्चीकरण झाले होते व त्याचा परिणाम साम्यवाद्यांविरूद्धच्या लढायांवर होत होता. जपानी सैन्याबरोबर बाह्य युद्ध आणि घरच्या शत्रूविरूद्ध (साम्यवादी) यादवी युद्ध या दोन आघाड्यांवर लढाई करावी लागल्यामुळे चँग कै शेकच्या राष्ट्रीय पक्षाची सत्ता हळूहळू कमजोर होऊ लागली होती. युद्ध म्हटले म्हणजे त्यास मनुष्यबळ, शस्त्रास्त्रे, दारूगोळा, पैसा, लोकांची इच्छाशक्ती, सैनिकांचे मनोबल या सर्व गोष्टींची आवश्यकता असते. परंतु त्यासाठी पुरे पडता पडता राष्ट्रीय सरकार आर्थिकदृष्टया दिवाळखोरीत निघाले. त्याच्या सैनिकांनीसुद्धा त्यास सोडून जाण्यास सुरूवात केली व दुसरीकडे साम्यवादी पक्षाची शक्ती वाढू लागली.

७.४.३ राष्ट्रीय सैन्याची चुकीची रणनीती :

चँग कै शेकने आपली भली मोठी फौज मांचुरियामध्ये पाठविली. त्यापैकी चार-साडेचार लाख फौज जपानने युद्धकैदी म्हणून संपविली तर काही अनेक जण धारातीर्थी पडले. त्यानंतर साम्यवाद्यांचा पाठलाग करून त्यांचे मुख्य ठाणे येनानवर कब्जा करण्यासाठी मोठी फौज आवश्यक असताना त्याने कमी फौज पाठवली. जपानविरूद्धच्या युद्धामध्ये मनोधैर्य खचलेले आणि उद्ध्वस्त झालेल्या राष्ट्रीय सैन्याला योग्य मार्गदर्शन लाभले नाही. त्यामुळे राष्ट्रीय सैन्याचा पराभव झाला.

७.४.४ राष्ट्रीय सरकार व सैन्यामध्ये भ्रष्टाचार :

सत्तारूढ राष्ट्रीय पक्षाने राष्ट्रीय पुनर्रचनेचा कार्यक्रम हाती घेतला तरी त्यांच्या अधिकारी वर्गामध्ये भ्रष्टाचार व अकार्यक्षमता यांचा सुळसुळाट झाला होता. उच्च अधिकारी वर्गाने जनतेच्या गरजा भागविण्यासाठी पुरविण्यात आलेला साठा आपल्या फायद्यासाठी खाजगी व्यापाऱ्यांच्या गोदांमांमध्ये पोहोचविला. दुसऱ्या महायुद्धकाळात अमेरिकेचा सैन्य प्रमुख जनरल जोसेफ स्टीलवेल यांच्याकडे चीनमधील मित्र राष्ट्रांच्या सैन्याची धुरा देण्यात आली होती. त्यावेळी स्टीलवेलने चँक कै शेक सरकारच्या सर्वदूर भ्रष्टाचार, साम्यवाद्यांचा छळ व समन्वयाचा आणि प्रशिक्षणाचा अभाव याबाबत कठोर टीका केली होती. त्या टीकेने चँग कै शेक चांगलाच दुखावला गेला. म्हणून त्याने अमेरिकेचे अध्यक्ष फ्रँकलीन डी. रूझवेल्ट यांना स्टीलवेलच्या जागी ब्रिटिश जनरल लॉर्ड लुई माऊंटबॅटन यांची नेमणूक करण्याची विनंती केली. अशा परिस्थितीत राष्ट्रीय सरकारने चीनी जनतेला साम्यवाद्यांशी लढण्यासाठी केलेले सैन्यभरतीचे आवाहन प्रेरणा देऊ शकले नाही. एवढेच नाही तर, राष्ट्रवाद्यांनी जनतेवर अविश्वास दाखवला आणि जमिनदार वर्ग, धनदांडगे व्यापारी आणि भष्ट्राचारी नोकरशहा यांच्या पाठींब्यावर अवलंबून राहिले. अशाप्रकारे राष्ट्रीय पक्षाचे सरकार सामान्य जनतेचा पाठींबा हरवून बसले.

७.४.५ आर्थिक संकट व महागाई वाढ :

चँग कै शेकच्या राष्ट्रीय सरकारपुढे महागाई वाढ आणि आर्थिक संकट यांनी भर घातली. एका आर्थिक पाहणीनुसार, इ.स.१९४५-४८ या तीन

वर्षाच्या काळात चीनमध्ये महागाई वाढीचा दर व त्यामुळे वस्तूंच्या किंमतीमधील वाढ ही दर महिन्याला ३०% एवढी होती. चलन फुगवटा, आर्थिक अनागोंदी यांच्या जोडीला भ्रष्टाचाराचा कळस यांनी राष्ट्रीय सरकारचे कंबरडेच मोडले व त्यांची प्रतिमा जनमानसात मलीन झाली. अनेक लोकांना आपले रोजचे जगण्याचे उद्योग गमवावे लागले आणि याचे सर्व खापर त्यांनी राष्ट्रीय सरकारच्या नाकर्तेपणावर फोडले.

७.४.६ जनतेचा राष्ट्रीय सरकारवर अविश्वास:

राष्ट्रीय सरकारच्या अधिकाऱ्यांचा भ्रष्टाचार, नियंत्रणाबाहेरची चलनवाढ आणि आर्थिक संकट यामुळे राष्ट्रीय सरकारची लोकप्रियता अगोदरच कमी झाली होती. तसेच दुसऱ्या महायुद्धात जपानचा पराभव झाल्यानंतर चीनमधील जपानने पूर्वीच्या कब्जा केलेल्या प्रांतांमध्ये जेव्हा राष्ट्रीय सरकारचे अधिकारी गेले तेव्हा त्यांनी सुद्धा राष्ट्रीय सरकारची प्रतिमा गमावली. ते तेथे आल्यावर काही विजयी सरकार सारखे वागू लागले आणि जनता जशी काही फितूर किंवा विश्वासघातकी असल्याप्रमाणे त्यांना अपमानास्पद वागणूक देण्यास सुरूवात केली. या अधिकाऱ्यांनीच शत्रू सैन्याची संपत्ती (जपानची) हडप करण्यास सुरूवात केली. याउलट ही संपत्ती सामान्य जनता व गरीब शेतकरी यांच्यात वाटप केली असती तर त्यांच्या तात्पुरत्या का होईना अडचणी सुटल्या असत्या. जी सामान्य जनता जवळजवळ आठ वर्षे आपल्या राष्ट्रीय सरकारची जिंकण्याची वाट पाहात होती त्या जनतेच्यासाठी सरकारने जे पुनर्वसनाचे उपाय योजले व त्यासाठी जे धान्य, पैसा, सामानसुमान पाठविले ते लोभी व भष्ट्राचारी अधिकाऱ्यांनी स्वत:च लाटले. त्यामुळे जनतेचा राष्ट्रीय सरकारवरील विश्वास पुरता उडाला.

७.४.७ आर्थिक व सामाजिक सुधारणांकडे दुर्लक्ष :-

साम्यवाद्यांना यादवी युद्धामध्ये विजय मिळण्याचे आणखी एक कारण म्हणजे राष्ट्रीय सरकार आपल्या कर्तव्यापासून दूर राहिले. साम्यवाद्यांनी फायदा घेण्याअगोदरच राष्ट्रीय सरकारने ग्रामीण भागामध्ये आर्थिक व सामाजिक सुधारणा कार्यक्रम हाती घेणे गरजेचे होते. हे खरे होते की, राष्ट्रीय सरकारला अंतर्गत व बाह्य समस्यांना एकाच वेळी तोंड द्यावे लागत होते. त्यांना देशाचे एकीकरण करायचे होते व साम्यवाद्यांशीही मुकाबला करायचा होता. त्याचवेळी जपानी आक्रमणाला सुद्धा तोंड द्यायचे होते. या सर्व गोष्टींसाठी चँग कै शेक च्या राष्ट्रीय सरकारला जनतेचा पाठिंबा मिळणे आवश्यक होते. परंतु त्यांनी आर्थिक व सामाजिक सुधारणांकडे दुर्लक्ष केल्यामुळे त्यांचा पराभव झाला व या गरीब शेतकरी कष्टकरी वर्गाने साम्यवाद्यांनाच पाठिंबा दिला.

७.४.८ साम्यवाद्यांचे जनतेस आवाहन :

एकीकडे राष्ट्रीय सरकारने सामान्य जनतेकडे दुर्लक्ष केलेले असताना साम्यवाद्यांनी आपल्याकडे शेतकरीवर्ग आणि सामान्य जनतेला आवाहन

करून लक्ष वेधून घेतले. सरकारविरोधी प्रचार व आपल्या पुढील सुधारणांचा व साम्यवादी तत्वज्ञानाचा प्रचार सुरू केला. त्यांनी आपल्या साधेपणावर भर दिला. तसेच स्वच्छ व भ्रष्टाचार मुक्त प्रशासन देऊन लोकांची गरीबी व समस्या निवारण करण्याचे आश्वासन देऊन लोकांची मने जिंकली. ज्या प्रदेशामध्ये साम्यवाद्यांचे नियंत्रण होते त्या प्रदेशात त्यांनी स्वत:च्या फायद्यापेक्षा तेथील शेतकरी वर्गाची परिस्थिती सुधारण्याचे प्रयत्न केले. त्यांच्या फौजांनी कधीही स्त्रियांवर किंवा नागरीकांवर कोणताही अन्याय केला नाही अथवा त्रास देऊन लूटले नाही. त्यांच्या फौजा कायदा पाळणाऱ्या आणि शिस्तबद्ध होत्या. याउलट परिस्थिती राष्ट्रीय सरकारची, त्यांच्या सैन्याची व अधिकाऱ्यांची होती. त्यामुळे राष्ट्रीय सरकार हे शोषक आहे तर साम्यवादी पक्ष खऱ्या अर्थाने जनतेचे कल्याण करणारा आहे असा समज चीनी जनतेमध्ये सर्वदूर पसरला व साम्यवादी पक्षाची लोकप्रियता अधिकच वाढली. त्यातच राष्ट्रीय पक्षाच्या नेत्यांमध्ये अंतर्गत मतभेद होते. चँग कै शेकची सर्व मदार ही सैन्य बळावर होती आणि म्हणूनच त्याने जनमताची अजिबात पर्वा केली नाही. शिवाय इ.स.१९४५ नंतर साम्यवादी रशियाकडून आर्थिक व लष्करी मदत ही साम्यवादी पक्षासच मिळत होती आणि तो अधिकच बळकट होत होता.

७.४.९ आपली प्रगती तपासा :-

१) दुसऱ्या महायुद्धकाळात चीनमधील मित्रराष्ट्रांच्या अमेरिकन सैन्य प्रमुखाचे नाव काय होते ?

२) साम्यवाद्यांनी जनतेस कोणते आवाहन केले ?

_____

_____

_____

_____

७.५ समारोप :

अशाप्रकारे माओ त्से तुंग व त्यांच्या सहकाऱ्यांची त्यागी वृत्ती आणि चँग कै शेक व त्याच्या राष्ट्रीय सरकारचे अपयश यामुळे माओ आणि त्यांच्या पक्षाचे चीनमधील स्थान बळकट झाले. दुसरे चीन - जपान युद्ध दुसऱ्या जागतिक महायुद्धात विलीन झाले आणि अमेरिकेकडून जपानचा पराभव झाला. त्यामुळे जपानच्या चीनमधील प्रांतांचा ताबा घेण्यासाठी राष्ट्रीय सरकारचे अधिकारी व सैन्य गेले पण त्यांनी सामान्य जनतेचा, गरीब शेतकरी वर्गाच्या समस्या सोडविण्याबाबत विचार केला नाही. त्यामुळे साम्यवाद्यांना जनतेचा पूर्ण पाठींबा मिळाला व चीनची सत्ता सुद्धा त्यांच्या ताब्यात आली.

७.६ प्रश्न:

१) प्रदीर्घ मोर्चाचे विस्तारित वर्णन करा.
२) प्रदीर्घ मोर्चाची कारणे, व्याप्ती व परिणाम यावर चर्चा करा.
३) चीनच्या लोक प्रजासत्ताक स्थापनेचा आढावा घ्या.
४) चीनमधील साम्यवादी पक्षाच्या विजयास कोणते घटक कारणीभूत झाले ? विश्लेषण करा.

❖❖❖

८

लोक प्रजासत्ताक चीन -१

(PEOPLE'S REPUBLIC OF CHINA)

घटनात्मक आव्हाने

घटक रचना :

८.० उद्दिष्ट्ये
८.१ प्रस्तावना
८.२ संघटनात्मक कायदे
८.३ पहिली राष्ट्रीय लोक महासभा
८.४ संविधान निर्मिती प्रक्रीया
८.५ चीनी लोक प्रजासत्ताक राज्यघटनेची वैशिष्ट्ये
८.६ शासनप्रणाली
८.७ चीनी साम्यवादी पक्षाची भूमिका (CCP)
८.८ चीनची नवीन राज्यघटना
८.९ समारोप
८.१० प्रश्न

८.० उद्दिष्ट्ये

१) चीनची नवीन राज्यघटना तयार करताना साम्यवादी पक्षासमोरील आव्हानांचा अभ्यास करणे.
२) चीनच्या नवीन राज्यघटनेच्या टप्प्यांचा आढावा घेणे.
३) चीनच्या नवीन राज्यघटनेची (१९७८) वैशिष्ट्ये समजून घेणे.

८.१ प्रस्तावना

यादवी युद्धामध्ये राष्ट्रीय सरकारवर साम्यवाद्यांनी विजय मिळविल्यानंतर त्यांनी चीनमध्ये 'लोक प्रजासत्ताक चीन'ची स्थापना केली. सुरूवातीच्या काळात लोक प्रजासत्ताक हे साम्यवादी पक्षाच्या नेतृत्वाखाली युती सरकार होते. सप्टेंबर १९५४ पर्यंत नियमित संविधान अंमलात येईपर्यंत चीनचा राज्यकारभार 'संघटनात्मक' (सेंद्रीय - Organic Laws) कायद्यांप्रमाणे चालत असे. परंतु सप्टेंबर १९५४ मध्ये नवीन राज्यघटनेनुसार साम्यवादी सरकार काम करू लागले. नवीन राज्य घटनेने साम्यवादी सरकारला मान्यता

दिली आणि पुढे राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे 'समाजवादी स्थित्यंतर' करण्यासाठी एक कायदेशीर आधार बनली.

८.२ संघटनात्मक (सेंद्रीय - The Organic Laws) कायदे

इ.स. १९४९ ते १९५४ म्हणजे लोक प्रजासत्ताक चीनच्या स्थापनेपासून ते नवीन राज्यघटनेची अंमलबजावणी होईपर्यंत चीनची शासनपद्धती 'संघटनात्मक' कायद्यांप्रमाणे चालत असे. चीनी लोक प्रजासत्ताकाची स्थापना होण्याच्या दहा दिवस अगोदर म्हणजे २१ सप्टेंबर १९४९रोजी 'लोक राजकीय सल्लागार परिषद' (People's Political Consultative Conference) भरली होती. या परिषदेमध्ये एकूण ६६२ साम्यवादी आणि त्यांच्या मित्रपक्षांच्या प्रतिनिधींनी भाग घेतला होता. या लोक राजकीय सल्लागार परिषदेने नवीन नियमित राज्यघटना अंमलात येईपर्यंत कारभार पाहण्यासाठी तीन मूलभूत कायदे पारित केले. या मूलभूत कायद्यांनाच 'संघटनात्मक कायदे' (Organic Laws) म्हटले जाऊ लागले. या कायद्यांचा उपयोग सरकार चालवण्यासाठी हंगामी राज्यघटना म्हणून केला गेला.

८.३ पहिली राष्ट्रीय लोक महासभा (First People's National Congress)

सप्टेंबर १९५४ मध्ये पहिली राष्ट्रीय लोक महासभा भरेपर्यंत 'लोक राजकीय सल्लागार परिषद' (People's Political Consultative Conference) हीच चीनमधील सर्वोच्च कार्यकारी मंडळ होते. संपूर्ण चीनवर नियंत्रण प्राप्त झाल्यावर साम्यवादी पक्षाने सप्टेंबर १९५४च्या पहिल्या राष्ट्रीय लोक महासभेसाठी प्रतिनिधी पाठवण्यासाठी सार्वत्रिक निवडणूका घेतल्या. माओ त्से तुंग यांच्या नेतृत्वाखालील (Chairmanship) समितीने तयार केलेली राज्यघटना पहिल्या राष्ट्रीय लोक महासभेने स्वीकारली.

८.४ संविधान (राज्यघटना) निर्मिती प्रक्रीया

इ.स.१९५४ ची लोक प्रजासत्ताक चीनची राज्यघटना पूर्णतः तयार होण्यापूर्वी अनेक टप्प्यांतून गेली. १३ जानेवारी १९५३ रोजी माओ त्से तुंग यांच्या अध्यक्षतेखाली 'केंद्रीय लोक सरकार मार्फत' (Central People's Government) राज्यघटना तयार करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली होती. मार्च १९५४ मध्ये चीनी साम्यवादी पक्षाच्या (CCP) केंद्रीय समितीने राज्यघटनेचा पहिला मसुदा स्विकारला. या मसुद्याचे विस्तारीत वाचन, त्यावर चर्चा, सूचना, शेरेबाजी करण्यात आली व त्यामध्ये अनेक संघटनांच्या वेगवेगळ्या तज्ज्ञांनी भाग घेतला आणि पुढे अधिक सुधारणा आणण्यासाठी शिफारशी करण्यात आल्या. ज्या सूचना स्वीकारण्या योग्य होत्या त्यांचा

स्वीकार करण्यात आला आणि १४ जून १९५४ रोजी नवीन घटनेचा सुधारित मसुदा वेंद्रीय लोक सरकार परिषदेमार्फत (Central People's Government Council) स्वीकारण्यात येऊन संपूर्ण राष्ट्रासाठी तो छापून प्रकाशित करण्यात आला.

राष्ट्रीय अल्पसंख्याकांच्या सोयीसाठी अंतिम मसुदा वेगवेगळ्या प्रादेशिक भाषांमध्ये भाषांतरित करण्यात आला. या राज्यघटनेच्या मसुद्यावर चर्चा घडवून आणल्या गेल्या आणि त्यामध्ये दुरूस्त्या, सूचना, सुधारणा पुन्हा सरकारकडे पाठविण्यात आल्या. वेंद्रीय लोक सरकारने पुन्हा सदर दुरूस्त्या व सूचनांचा विचार वेला आणि ९ सप्टेंबर १९५४ रोजी या राज्यघटनेचा स्विकार करण्यात आला. १५ सप्टेंबर १९५४ रोजी पहिल्या राष्ट्रीय लोक महासभेचे पहिले अधिवेशन भरले तेव्हा राज्यघटनेचा अंतिम मसुदा चर्चा करण्यात आला, सूचनांचा स्वीकार, दुरूस्त्या करण्यात आल्या. त्यावर विस्तारित चर्चा करण्यात आली आणि शेवटी २० सप्टेंबर १९५४ रोजी तिची अंमलबजावणी करण्यात आली.

८.५ चीनी लोक प्रजासत्ताक राज्यघटनेची ठळक वैशिष्ट्ये

८.५.१ राज्यघटनेची चौकट (Structure) :

लोकप्रजासत्ताक चीनच्या राज्यघटनेमध्ये सरनाम्या शिवाय (Preamble) १०६ कलमे वेगवेगळ्या चार प्रकरणामध्ये विभागणी गेली आहेत. या प्रकरणामध्ये ज्या सामान्य तत्त्वांवर चीनी राज्यघटना आधारित आहे त्यांचा समावेश आहे व त्यांच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न करण्याच्या पद्धतीचा ही समावेश आहे. पहिल्या प्रकरणात एवूण २० कलमांचा समावेश असून त्यामध्ये चीन लोक प्रजासत्ताकाच्या यशस्वी कार्यासाठी मार्गदर्शक ठरणाऱ्या सामान्य तत्वांचा समावेश आहे. दुसरे प्रकरण हे सर्वांत मोठे असून त्यामध्ये ८४ कलमे आहेत व ती ६ भागांमध्ये विभागली गेली आहेत. ती कलमे राज्यकारभाराच्या चौकटीशी संबंधित आहेत. तिसरे प्रकरण हे नागरीकांचे मूलभूत हक्क आणि कर्तव्ये यांच्याशी संबंधित आहेत. शेवटचे प्रकरण अतिशय छोटे असून त्यामध्ये फक्त तीन कलमे आहेत. ती चीनचा राष्ट्रध्वज, राजमुद्रा आणि राजधानी यांची माहिती देतात.

८.५.२ सरनामा (Preamble) किंवा प्रस्ताविक :

लोक प्रजासत्ताक चीनच्या राज्यघटनेचा (१९५४) सरनामा म्हणतो, ''लोक प्रजासत्ताक चीनची स्थापना ते समाजवादी समाजरचनेचे ध्येय गाठणे हा एक स्थित्यंतराचा कालावधी आहे. या स्थित्यंतराच्या कालावधी मध्ये, शेतीक्षेत्राचे, हस्तोद्योगाचे, भांडवलशाही उद्योगांचे आणि व्यापार धंद्यांचे टप्प्याटप्प्याने समाजवादी स्थित्यंतर करणे ही राज्याची मूलभूत जबाबदारी आहे.'' चीनच्या या समाजवादी स्थित्यंतरासाठी तसेच राजकीय व आर्थिक

विकासासाठी जवळ जवळ राज्य घटनेने वीस वर्षांचा कालावधी नियोजित केलेला होता.

८.५.३ समाजवादी राज्याची स्थापना:

लोक प्रजासत्ताक चीनच्या राज्यघटनेमध्ये समाजवादी राज्याच्या स्थापनेप्रती लोकांच्या आशा - आकांक्षा प्रतिबिंबित झालेल्या आहेत आणि या वास्तवतेचा मागोवा या राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये घेण्यात आलेला आहे. त्यानुसार 'आम्ही चीनी जनता, साम्राज्यवाद, सरंजामशाही आणि नोकर वर्गाची भांडवलशाही याविरूद्ध प्रदीर्घ क्रांतीकारी संघर्ष करून पूर्ण विजय मिळविला आहे. आमच्या लोकशाही राज्याने कामगार आणि शेतकरी वर्गाचे नेतृत्व स्वीकारून मजबूत संयुक्त सरकार स्थापन केले आहे. आमच्या सरकारमध्ये समाजवादी तत्वाने आर्थिक स्थित्यंतर आणण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले आहे आणि त्यासाठी व समाजवादी समाजरचनेचे ध्येय संपादन करण्यासाठी पद्धतशीर सामाजिक स्थित्यंतराचा मार्ग स्वीकार करत आहोत.' असे म्हटले आहे. राज्यघटनेने ध्येय निश्चिती केलेली असून कलम ४ नुसार राज्याच्या प्रशासनावर औद्योगिकीकरण याद्वारे आम्ही समाजवादी समाजरचनेने ध्येय प्राप्त करणार आहोत. कलम ६ असे म्हणते की, राज्याचे आर्थिक क्षेत्र हे सामाजिक क्षेत्र असून त्यावर लोकांची मालकी असेल. सर्व खनिज, संपत्ती, जलस्त्रोत, वनक्षेत्र यांवर जनतेची मालकी असेल. अशा प्रकारे इ.स.१९५४च्या राज्यघटनेने चीनमध्ये समाजवादी समाजरचनेचे ध्येय आपल्यासमोर ठेवून वाटचाल सुरू केली.

८.५.४ लोकांची सार्वभौमता (Sovereignty of the People) :

इ.स.१९११ पर्यंत चीनमध्ये मांचू घराण्याची राज्य सत्ता होती. परंतु इ.स. १९५४च्या राज्यघटनेने चीनवर लोकांची सार्वभौमता बहाल केली. कलम १च्या तरतूदीनुसार चीनचे राज्य हे लोकशाही प्रजासत्ताक राज्य असून त्यावर कष्टकरी वर्गाची सत्ता राहील आणि कामगार वर्ग व शेतकरी वर्ग एकत्र येऊन चीनवर सत्ता स्थापन करतील. पुढे कलम १ असे म्हणते, ''संविधान राज्याची सर्व सत्ता लोकांच्या हवाली करीत आहे.'' इ.स. १९५४ च्या राज्यघटनेने सार्वभौम सत्ता आणि अधिकार लोकांना बहाल केलेला आहे. लोकांवर लोकशाही मार्गानेच राज्य केले पाहिजे आणि लोकांसाठी राबविले जाणारे धोरण हे तयार करताना व राबविताना लोकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. राष्ट्रीय लोक महासभा (National People's Congress) आणि स्थानिक लोक महासभा (Local People's Congresses) याद्वारे लोक आपले सत्ताधिकार बजावतील.

८.५.५ जनकल्याणकारी राज्याची संकल्पना : (Concept of Welfare State) :

लोकप्रजासत्ताक चीनची इ.स. १९५४ ची राज्यघटनासुद्धा भारतीय राज्यघटनेप्रमाणेच आपल्या सरकारसमोर 'जनकल्याणकारी राज्य' निर्माण

करण्याचे उद्दिष्ट्य ठेवते. म्हणून ती राज्यघटना सरकारला राष्ट्रहिताचे कार्यक्रम आणि नागरीकांच्या हिताचे कार्यक्रम राबविण्याचे मार्गदर्शन करते. कलम १७ मधील तरतुदींनुसार - ''राज्याच्या सर्व मंडळांनी नेहमीच लोकांशी प्रत्यक्ष संपर्क ठेवला पाहिजे, त्यांच्या मतांचा आदर केला पाहिजे, त्यांची पर्यवेक्षिता स्वीकार केली पाहिजे. त्यासाठी लोकमतांवर भर दिला पाहिजे. लोकांना सरकारविरूद्ध आरोप, टिका करण्याचा अधिकार आहे आणि सरकार जर त्यांच्या अपेक्षांची पूर्तता करीत नसेल, त्यांचे हितसंबंध जपण्यात यशस्वी होत नसेल तर तो अधिकार जनतेला वापरता येईल.''

८.६ शासनप्रणाली (Structure of the Government)

८.६.१ राष्ट्रीय लोक महासभा (National People's Congress) :-

लोकप्रजासत्ताक चीनची १९५४ ची राज्यघटना आणि त्यातील दुसरे प्रकरण ही शासन रचना किंवा शासनप्रणालीशी संबंधित आहे. त्यातील पहिला विभाग हा 'राष्ट्रीय लोक महासभा' असून लोक प्रजासत्ताक चीनची सर्वोच्च अधिकार मंडळ आहे. ते एकगृही कायदेमंडळ आणि चीनचे सर्वोच्च कायदेमंडळ आहे.

राष्ट्रीय लोक महासभेसाठी सदस्य (Deputies) हे प्रांतांमधून, स्वायत्त प्रदेशातून, महानगरांतून निवडले जातात. ते प्रत्यक्षपणे केंद्र सरकारच्या लष्करी दलाच्या आणि अनिवासी चीनी जनतेच्या अख्त्यारित काम करतात. १८ ते २८ सप्टेंबर १९५४ रोजी राष्ट्रीय लोक महासेभेचे पहिले अधिवेशन भरले व त्यामध्ये एकूण १२२६ प्रतिनिधी (Deputies) निवडले गेले. सध्याच्या आकडेवारीनुसार एकूण ३००० प्रतिनिधी सदर सभागृहाचे सदस्य (Deputies) आहेत. त्यांची मुदत ४ वर्षे असून मुदत संपण्याच्या दोन महिने अगोदर पुढील ४ वर्षांसाठी स्थायी समितीमार्फत सदस्याची निवड केली जाते. आणिबाणीच्या परिस्थितीत सभागृहाची मुदत अनिश्चित कालासाठी वाढवली जाते.

राष्ट्रीय लोक महासभेचे अधिवेशन वर्षातून एकदा भरते व ते स्थायी समिती बोलावते. तशीच आपत्कालीन परिस्थिती उदभवल्यास हे अधिवेशन एकापेक्षा जास्त वेळ बोलावले जाऊ शकते. ही महासभा अधिवेशन चालवण्यासाठी आपले स्वत:चे कार्यकारी मंडळ (Presidium) स्थापन करते.

एक सर्वोच्च संस्था म्हणून राष्ट्रीय लोक महासभा राज्यकारभाराची काही कामेसुद्धा करते. कलम २७ मध्ये महासभेच्या अधिकार व कार्यांची माहिती दिलेली आहे. यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो.

१) २/३ बहुमताने राज्यघटनेमध्ये दुरूस्ती करणे.
२) साध्या बहुमताने वेगवेगळे आवश्यक कायदेकानून पारित करणे.
३) संविधानिक कायद्यांची अंमलबजावणी होते किंवा नाही यांचे निरीक्षण करणे.
४) चीनच्या लोक प्रजासत्ताकाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड करणे.
५) राष्ट्राध्यक्षाच्या शिफारशीनुसार पंतप्रधानांची निवड करणे.
६) राष्ट्राध्यक्षांच्या शिफारशीनुसार उपाध्यक्ष आणि राष्ट्रीय सुरक्षा परिषदेच्या सदस्यांची निवड करणे.
७) सर्वोच्च लोकन्यायालयाच्या अध्यक्षाची (न्यायाधिशाची) निवड करणे.
८) सर्वोच्च लोक प्रॉक्युरेट मंडळाचा मुख्य प्रॉक्युरेटर निवडणे.
९) राष्ट्रीय आर्थिक योजना संमत करणे.
१०) राज्य अर्थसंकल्प आणि आर्थिक अहवाल संमत करणे.
११) प्रत्यक्ष केंद्र सरकारच्या अख्त्यारितील स्वायत्त प्रदेशांची सरहद्द व दर्जा निश्चित करणे.
१२) युद्ध व तह (शांती) याबाबत निर्णय देणे.
१३) सार्वत्रिक माफीविषयी निर्णय घेणे.
१४) काही विशेष प्रश्नांविषयी चौकशी आयोग नेमणे.
१५) राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, उपपंतप्रधान आयोगांचे अध्यक्ष, राज्य परिषदेचे महासचिव यांसारख्या व्यक्तिंना पदावरून दूर करण्याचा अधिकार आहे.

राष्ट्रीय लोक महासभेच्या सदस्यांना (Deputies) जनतेच्या प्रश्नांवर राज्य परिषद, मंत्री, आयोगाचे अध्यक्ष, यांना प्रश्न विचारण्याचा आणि त्यांना त्याविषयी उत्तरे मिळण्याचा अधिकार आहे. या सदस्यांवर (Deputies) त्यांना निवडून देणाऱ्या मतदार संघांचे (Units) नियंत्रण असते आणि त्यांचे सदस्यत्व कोणत्याही वेळी रद्द करून दुसऱ्याची नेमणूक करण्याचा सुद्धा (लोक प्रतिनिधींना परत बोलावण्याचा अधिकार) अधिकार आहे.

स्थायी समिती (Standing Committee) ही राष्ट्रीय लोक महासभेची कायमची कार्यकारी समिती आहे. महासभेच्या गैर हजेरीत स्थयी समिती तिचे कार्य सांभाळते. प्रत्येक महासभेच्या पहिल्या बैठकीतच स्थायी समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, महासचिव आणि इतर सदस्यांची निवड केली जाते. स्थायी समिती ही महासभेस जबाबदार असते आणि आपल्या सर्व निर्णयांचा अहवाल महासभेत द्यावा लागतो.

स्थायी समितीची कार्ये दोन प्रकारची असतात. पहिल्या प्रकारामध्ये सामान्य परिस्थितीत, महासभेच्या सदस्यांच्या (Deputies) निवडणूका घेणे, महासभेचे अधिवेशन बोलावणे, कायद्यांचा अर्थ लावणे (व्याख्या करणे), ठरावांची अंमलबजावणी करणे, राज्य परिषदेच्या व इतर संस्थाच्या कामांचे पर्यवेक्षण करणे इ. प्रकारची कामे करावी लागतात. तर दुसऱ्या प्रकारात, आणीबाणीच्या काळात, जेव्हा महासभेचे अधिवेशन चालू नसते त्या वेळी

करावयाची कामे मोडतात. उदा. सार्वत्रिक व निवडक भागात संचारबंदी लागू करणे, लष्करी कायद्याची अंमलबजावणी करणे इ.

आपली कामे कार्यक्षम व सुरळीत चालण्यासाठी राष्ट्रीय लोक महासभेकडे अनेक प्रकारच्या समित्या असतात. त्यामध्ये राष्ट्रीयत्व समिती, देयक समिती, अर्थसंकल्प समिती आणि क्रिडेन्शियल समिती इ.

८.६.२ लोक प्रजासत्ताक चीनचे अध्यक्ष :

चीनी लोक प्रजासत्ताकाचे अध्यक्षाची निवड राष्ट्रीय लोक महासभा करते. अध्यक्षपदासाठी कमीत कमी ३५ वर्षे वय आणि मतदानाचा अधिकार असलेला नागरिक पात्र असतो. त्यांचा कार्यकाल चार वर्षाचा असतो. त्यांच्या गैरहजेरीमध्ये, ते अकार्यक्षम, आजारी असल्यास त्यांच्या जागी उपाध्यक्ष कार्यभार सांभाळतात.

राष्ट्रीय लोक महासभेने घेतलेले निर्णय किंवा स्थायी समितीने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी राष्ट्राध्यक्ष वटहुकूम काढू शकतात. उपपंतप्रधान मंत्री, आयोगांचे अध्यक्ष, राज्य परिषदेचे महासचिव, उपाध्यक्ष, राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे सदस्य यांच्या नेमणूका करू शकतात किंवा त्यांना पदावरून दूर करू शकतात. चीनी लोक प्रजासत्ताकाचे अध्यक्ष हुकूम काढू शकतात, सन्मान - पुरस्कार देऊ शकतात.

चीनी लोक प्रजासत्ताकाचे अध्यक्ष हे तिन्ही सैन्य दलांचा सर्वोच्च प्रमुख असतात आणि राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. काही संकट कालीन परिस्थितीत, ते सर्वोच्च राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करू शकतात व स्वतः तिचे अध्यक्षपद भूषविण्याचा अधिकार त्यांना आहे. परराष्ट्र संबंधामध्ये, ते स्वतः देशाचे प्रतिनिधी असतात, राजकीय, शिष्टाचार पाळतात व परदेशी दूतांचे स्वागत करतात, तह, करारांवर सही करतात.

८.६.३ राज्य परिषद :

राज्य परिषद हे चीनी लोक प्रजासत्ताकाचे (Central People's Government) सर्वोच्च कार्यकारी व अधिकारी मंडळ आहे. देशाच्या प्रशासन विभागाची मुख्य जबाबदारी राज्य परिषदेची असते.

राज्य परिषदेमध्ये पंतप्रधान, उपपंतप्रधान, मंत्रिमंडळ, आयोगांचे अध्यक्ष आणि महासचिव यांचा समावेश होतो. राज्य परिषदेमध्ये ४८ मंत्रिमंडळे आणि आयोग असतात. कोणत्याही मंत्रिमंडळाची किंवा आयोगाची निर्मिती करणे, ते बरखास्त करणे याची जबाबदारी राष्ट्रीय लोक महासभा किंवा तिच्या अनुपस्थितीत पंतप्रधानांच्या शिफारशीनुसार स्थायी समितीवर असते. प्रत्येक मंत्रिमंडळामध्ये एक मंत्री आणि एक उपमंत्री असतो.

प्रशासकीय उपाय योजना तयार करणे, निर्णय व हुकूमांची अंमलबजावणी करणे, राष्ट्रीय लोक महासभेस देयके जमा करणे, मंत्रिमंडळे व आयोग यांचे समन्वयन करणे, संपूर्ण देशभर स्थानिक प्रशासनाचा घटक म्हणून काम करणे, अंतर्गत व परदेशी व्यापारावर नियंत्रण ठेवणे राष्ट्रीय आर्थिक योजना, राज्यांचे अर्थसंकल्प, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सार्वजनिक आरोग्य, परराष्ट्र संबंध याविषयी मार्गदर्शन व दिशा निर्देश इ. प्रकारची कार्ये राज्य परिषदेस पार पाडावी लागतात.

८.६.४ न्याय यंत्रणा :

चीनी लोक प्रजासत्ताकामध्ये 'लोकांचे' (People's) या शब्दावर अधिक भर असलेला दिसतो. कारण बहुतेक प्रशासन यंत्रणेमध्ये ती लोकांची आहे असे दर्शविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. त्यामुळे न्यायिक यंत्रणा ही 'लोक न्यायालयांमार्फत' (People Courts) राबविली जाते. लोकशाही यंत्रणा सुरक्षित ठेवण्यासाठी, लोक सुव्यवस्था राखण्यासाठी, लोक मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी आणि नागरीकांचे कायदेशीर हक्क आणि हितसंबंध जोपासण्याच्या उद्देशाने हीच लोक न्यायालये फौजदारी व दीवाणी अशी दोन्ही प्रकारची न्यायालयीन कामे पाहते व दोन्ही प्रकारच्या गुन्हेगारांना शिक्षा करते. चीनमधील सामाजिक स्थित्यंतरामधील दुवा म्हणून देखील न्याय यंत्रणा काम करते.

चीनमधील न्याययंत्रणेमध्ये सर्वोच्च लोक न्यायालय, स्थानिक लोक न्यायालय आणि विशेष लोक न्यायालय (Supreme People's Court, Local People's Courts and Special People's Courts.) असे स्तर आहेत. इ.स. १९५४ च्या राज्यघटनेनुसार सर्वोच्च लोक न्यायालय आणि स्थानिक लोक न्यायालय यांच्या अध्यक्षांचा कार्यकाल चार वर्षांचा असतो. सर्वोच्च लोक न्यायालय सरळसरळ राष्ट्रीय लोक महासभेला जबाबदार असते व आपल्या कार्यवाहीचा अहवाल महासभेस किंवा तिच्या गैरहजेरीत स्थायी समितीस सादर करते. तर स्थानिक लोक न्यायालये हे स्थानिक लोक महासभेला जबाबदार असतात आणि त्यांनाच आपल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करतात. सर्वोच्च लोकन्यायालय स्थानिक लोक न्यायालयांच्या कामकाजावर लक्ष ठेवते.

कोणत्याही कायद्याची व्याख्या करणे, अंमलबजावणी करणे अथवा खटल्यांबाबत निर्णय देणे याविषयी लोक न्यायालये ही विनाहस्तक्षेप स्वतंत्रपणे व नि:पक्षपातीपणे कार्य करतील अशी अपेक्षा असते. चीनचा प्रत्येक नागरीक हा कायद्यासमोर समान असून राष्ट्रीयत्व, धर्म, व्यवसाय, सामाजिक परिस्थिती, लिंग, भाषा इ. बाबत भेदभाव करता येत नाही. खटल्यांचा निकाल आणि कायद्याची व्याख्या याबाबत एक प्रक्रीया असून त्याबाबत कायदेसंहिता लागू केली आहे. प्रत्येक आरोपीला बचावाचा अधिकार आहे. चीनमध्ये गुन्ह्याचे निर्णय प्रामाणिकपणे, नि:पक्षपातीपणे

आणि त्वरित दिले जातात. एडगर स्नो यांच्या मते, ''चीनमध्ये न्यायधिश अधिक कार्यक्षम असून त्वरित खटल्यांबाबत निर्णय देतात.''

८.६.५ नागरिकाचे मूलभूत अधिकार व कर्तव्ये :

चीनी राज्यघटनेच्या तिसऱ्या प्रकरणातील कलम ८५ ते १०३ मध्ये नागरिकांच्या मूलभूत अधिकार आणि कर्तव्यांचे विस्तृत स्पष्टीकरण दिलेले आहे. हे अधिकार व कर्तव्ये सर्वसमावेशक असून कोणत्याही भेद भावाशिवाय सर्व नागरिकांना बहाल करण्यात आलेले आहेत. त्यांनी राष्ट्रीय जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श केला असून त्यामुळे देशाचे उज्ज्वल आर्थिक, राजकीय व सामाजिक व्यवस्थापन करण्याची जबाबदारी नागरिकांवर देण्यात आली आहे. चीनी नागरीकांच्या मूलभूत अधिकारांमध्ये कायद्यासमोर समानता, स्त्रियांना संपत्तीमध्ये समान अधिकार, राष्ट्रीयत्वामध्ये भेदभावास बंदी यांचा समावेश आहे. कोणताही भेदभाव न बाळगता प्रत्येक नागरिकाला मतदानाचा आणि निवडणूका लढविण्याचा अधिकार आहे. धर्म, भाषण, अभिव्यक्ती, एकत्रीकरण, जमाव, संघटन, मिरवणुका,मोर्चे, आंदोलन यांचे स्वातंत्र्य चीनी नागरिकाला बहाल करण्यात आले आहे. चीनी जनतेला कामाचा, विश्रांती व फावल्या वेळाचा सुद्धा मूलभूत अधिकार आहे. तसेच त्यांना म्हातारपण, आजारपण व अपंगत्व या वेळी भौतिक (आर्थिक) मदत मिळण्याचा अधिकार आणि सांस्कृतिक अधिकारसुद्धा चीनी नागरिकांस राज्यघटनेने बहाल केलेले आहेत. कौटुंबिक जीवन आणि संपत्ती यांबाबतीत, तसेच राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक बाबतीत चीनी लोक प्रजासत्ताकातील स्त्रीला पुरूषांच्या बरोबरीनेच समान अधिकार आहेत.

चीनी नागरिकांच्या कर्तव्यांमध्ये पुढील बाबींचा समावेश होतो. त्यामध्ये राज्यघटना आणि कायद्याचे काटेकोर पालन करणे, कामाच्या ठिकाणी शिस्त बाळगणे, सार्वजनिक सुव्यवस्था राखणे, सामाजिक मूल्यांचा आदर करणे, सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे आणि कायद्यानुसार कर भरणा करणे इ. चा समावेश होतो. त्याचप्रमाणे चीनच्या लोक प्रजासत्ताकाच्या राज्यघटनेनुसार प्रत्येक चीनी नागरिकाने आपल्या जन्मभूमीचे (देशाचे - Homeland) रक्षण करणे आणि कायद्यानुसार लष्करी सेवा देणे हे महत्त्वाचे कर्तव्य आहे.

८.६.६ आपली प्रगती तपासा :

१) इ.स. १९५४ च्या राज्यघटने अगोदर चीनचा राज्यकारभार कोणत्या कायद्याने चालत होता ?

२) चीनची न्यायिक यंत्रण कोणत्या तीन न्यायालयांमार्फत चालते ?

३) चीनच्या १९५४च्या राज्यघटनेनुसार चीनी नागरिकांची कोणतीही तीन मूलभूत अधिकार व कर्तव्ये सांगा.

८.७ चीन साम्यवादी पक्षाची (चीसाप - CCP) भूमिका

चीनी साम्यवादी पक्षाची (चीसाप - CCP) स्थापना इ.स. १९२१ साली झाली. माओ त्से तुंग आणि त्यांच्या नेत्यांच्या मार्क्सवाद आणि लेनिनवादी सिद्धांतांच्या अन्वयार्थाप्रमाणे समाजवाद आणि साम्यवादाचे उद्दिष्ट संपादित करण्यावर ''चीसापचा'' विश्वास होता. 'चीसाप' ची शक्ती आणि प्रभाव हळूहळू वाढत गेला. देशाच्या क्रांतीकारी आणि अंतिमतः यादवी युद्धामध्ये साम्यवादी पक्षाने जनतेचे नेतृत्व केले. यादवी युद्ध (१९४५-४९) जिंकून 'चीसाप'ने साम्राज्यवाद, सरंजामशाही, भांडवलशाही आणि चँग कै शेकचे राष्ट्रीय सरकार यांस उलथवून टाकले आणि इ.स.१९४९ मध्ये (October) 'लोक प्रजासत्ताक चीनची' स्थापना केली.

चीनच्या राजकारणात 'चीसाप' व त्याचे नेते हे आजही महत्त्वाची भूमिका बजावतात. माओंच्या तत्वज्ञानावर निष्ठा व पक्षाशी एकनिष्ठ असलेल्यांना 'चीसाप'चे सदस्यत्व मिळते. व्यक्तिगत हितसंबंधांपेक्षा पक्षीय हितसंबंध महत्त्वाचे मानणे हे 'चीसाप' चे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

राष्ट्रीय लोक महासभा (National People's Congress) ही 'चीसाप'ची सर्वोच्च संघटना आहे व तिचे सदस्य पक्षाकडून निवडले जातात. हीच महासभा केंद्रीय समितीची निवड करते व पुढे केंद्रीय समिती पोलिट ब्यूरोची निवड करते. हे पोलिटब्यूरो, सहा ते सात सदस्यीय स्थायी समितीची निवड करते आणि तिला सर्वोच्च सत्ता प्राप्त झालेली असते. ज्याचे 'चीसाप'वर प्रभुत्व असते शक्यतो तोच संपूर्ण सरकारवर प्रभुत्व ठेवतो. 'चीसाप' चे नेते हेच चीनचे नेते असतात, आणि ही प्रथा इ.स. १९३५च्या 'प्रदीर्घ मोर्चा' पासूनच पडली आहे. प्रदीर्घ मोर्चाचे नेते माओ त्से तुंग, लियो शाओची, चौ एन लाय आणि चू तेह या सर्वांना सरकार प्रमुख बनण्याची संधी प्राप्त झाली होती.

माओ त्से तुंग हे स्वतः 'चीसाप'च्या पोलिटब्यूरोचे आणि स्थायी समितीचे अध्यक्ष होते. लिओ शाओ ची उपाध्यक्ष, चौएन् लाय पंतप्रधान आणि चू तेह हे लष्कर प्रमुख होते. परंतु माओंनी मात्र सर्वोच्च पद भोगले. ते चीनचे सर्वोच्च प्रमुख होते. त्यांच्यानंतर इ.स.१९५९ मध्ये लियो शाओची अध्यक्ष बनले. तरीही माओंनी पोलिटब्यूरो आणि स्थायी समितीचे अध्यक्षपद आपल्याकडेच ठेवले होते. इ.स.१९६६च्या सांस्कृतिक क्रांतीदरम्यान माओंनी लियो शाओची आणि पुनरूज्जीवनवादी यांचे हक्क सिमित करण्याचे प्रयत्न केले. 'चीसाप'चे विशाल जाळे संपूर्ण चीनभर पसरले आहे. तीन किंवा चार सदस्य मिळून 'चीसाप'ची 'सेल' तयार होते. काही 'सेल' मिळून पक्षाची शाखा तयार होते. ही शाखा पक्षाचे काम कारखाने, खाणी किंवा इतर ठिकाणी करते. ह्या शाखांवर शहर, कम्यून किंवा राष्ट्रीय शाखेचे नियंत्रण असते. प्रांतिक शाखा या शहर, कम्यून किंवा स्थानिक शाखांवर नियंत्रण ठेवतात आणि प्रांतिक शाखांवर राष्ट्रीय पक्षाचे नियंत्रण असते.

सर्वात खालच्या शाखेपासून साम्यवादी पक्षाचा कार्यक्रम कारखाने, खाणी, सैन्य यांमध्ये राबवला जातो. आपल्या सदस्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम चालवले जातात. साक्षरतेचा प्रसार होईपर्यंत 'चीसाप'च्या पातळीवरचे नेते व कार्यकर्ते हे अशिक्षित शेतकरी आणि कामगार वर्गातील होते व त्यांनी मोठ्या निष्ठेने पक्षाची आदर्श विचारसरणी राबविली.

सरकारच्या दळणवळणाची सर्व साधने 'चीसाप'च्या नियंत्रणा खाली असतात. वर्तमानपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन आणि चित्रपट यांवर 'चीसाप'चेच नियंत्रण असते. चीसापने मान्यता दिलेल्या कल्पनांचेच फक्त प्रक्षेपण करावे लागते. चीसापच्या सरकारची प्रचारयंत्रणा एवढी कडक आहे की, लोकांच्या दृष्टिकोनातच त्यामुळे परिवर्तन झाले आहे. त्यामुळे चीनी साम्यवादाशिवाय सदसदविवेकबुद्धी किंवा वस्तूनिष्ठ मूल्यमापन या गोष्टींना चीनमध्ये थारा नाही.

८.८ चीनची नवीन राज्यघटना, १९७८

माओ त्से तुंग यांच्या मृत्युनंतर ५ मार्च १९७८ रोजी लोक प्रजासत्ताक चीनच्या पाचव्या राष्ट्रीय लोक महासभेच्या पहिल्या अधिवेशनामध्ये चीनची नवीन राज्यघटना स्वीकारण्यात आली. चीनच्या राजकीय व आर्थिक विकासाचे पुनरूज्जीवन हा त्यामागे उद्देश होता.

नवीन राज्यघटनेने समाजवादी समाजरचना, कामगार वर्गाच्या अधिपत्याखाली क्रांतीचे संरक्षण करणे आणि वर्ग संघर्ष, उत्पादन साधनांसाठी संघर्ष व वैज्ञानिक प्रयोग या तीन चळवळींना प्रोत्साहन देणे यावर मुख्य भर दिला. या नवीन राज्यघटनेचा मुख्य उद्देश चीनला शक्तीशाली समाजवादी राष्ट्र बनविणे व त्यासाठी आधुनिक शेती, उद्योग, राष्ट्रीय सुरक्षा, विज्ञान व तंत्रज्ञान यांचा २०व्या शतकाच्या अखेरपर्यंत विकास करणे हा होता.

चीनची नवीन राज्यघटना साधी व थोडक्यात असून सरनामा आणि चार प्रकरणे ज्यामध्ये ६० कलमांचा अंतर्भाव आहे ती अतिशय साध्या व सुलभ भाषेमध्ये लिहिली असून कामगार वर्ग व कष्टकरी सामान्य मनुष्य यांना सहज समजणारी आहे. तिच्यामध्ये असमर्पक बाबींना टाळण्यात आलेले असून मुख्य भर घटनेची तत्वे, मूलभूत अधिकार व कर्तव्ये आणि सरकारच्या चौकटीचे (रचनेचे) मूलभूत पण थोडक्यात विश्लेषण यांवर आहे. कलम ६० मध्ये राष्ट्रध्वज, राजमुद्रा आणि राजधानी यांचे स्पष्टीकरण आहे. राज्यघटना लोकप्रजासत्ताक चीनचे वर्णन 'समाजवादी राज्य' असे करत असून त्यांवर कामगार वर्गाचे अधिपत्य (कामगार - शेतकरी यांची युती) असेल. नवीन राज्यघटना गेल्या २५ वर्षातील 'चीसाप'ने मिळविलेल्या सुधारणा व केलेली प्रगती यांचे चीनमध्ये दृढीकरण करण्याचे आश्वासन देते.

नवीन राज्यघटनेचा सरनामा (Preamble) किंवा प्रास्ताविक तिच्या पहिल्या प्रकरणाची सुरूवात आहे. 'चीसाप' आणि माओ त्से तुंग यांच्या नेतृत्वाखाली साम्राज्यवाद सरंमजामशाही आणि नोकरशाही - भांडवलशाही यांच्या विरोधात जनतेने केलेल्या क्रांतीकारी आंदोलनास व त्यात सहभागी - शहीद झालेल्या लोकांप्रती कृतज्ञता नवीन राज्यघटनेच्या प्रास्ताविकामध्ये व्यक्त केलेली आहे. प्रास्ताविकामार्फत पुनरूज्जीवनवाद, भांडवलशाहीस विरोध, देशात राष्ट्रीय एकतेस प्रोत्साहन, क्रांतीकारी संयुक्त आघाडीचे दृढीकरण व विस्तार आणि त्यासाठी कामगार - शेतकरी यांची युती यासाठी काम करण्याची विनंती जनतेला करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर इतर देशांशी 'पंचशील' तत्वज्ञानावर आधारित (शांतीपूर्ण सहअस्तित्वाची पंचतत्वे Five Principles of Co-existence) संबंध स्थापन करावेत आणि ते वाढवावेत असे नवीन राज्यघटनेच्या प्रास्ताविकात म्हटले आहे.

इ.स. १९७८च्या नवीन राज्यघटनेचे मूल्यमापन केल्यास आपणास असे दिसून येते की, ही घटना इ.स.१९५४च्या घटनेशी मिळतीजुळती आहे. परंतु चीनी लोक प्रजासत्ताकाचे अध्यक्ष आणि नैतिक संस्था - चीनी लोक राजकीय सल्लागार परिषद यांचा समावेश नवीन राज्यघटनेत केलेला नाही. इ.स. १९३६च्या रशियन राज्यघटनेनुसार राष्ट्रीय लोक महासभेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष हेच देशाचे प्रमुख असतील असे दुरूस्त करण्यात आले. चीनी साम्यवादी पक्षाला घटनात्मक मान्यता देण्यात आलेली असून सर्वोच्च स्थान दिलेले आहे. त्याच पक्षाचे अध्यक्ष हे चीनी लष्कराच्या तिन्ही दलांचे प्रमुख असतील अशी तरतूद केलेली आहे.

८.८.१ आपली प्रगती तपासा :-

१) चीनी साम्यवादी पक्षाची सर्वोच्च संघटना कोणती ?

२) चीनच्या नवीन राज्यघटनेत आंतरराष्ट्रीय स्तरावर संबंधांसाठी कोणते तत्वज्ञान स्विकारण्यात

आले आहे ?

_____

_____

_____

_____

८.९ समारोप

चीनच्या लोक प्रजासत्ताकाची स्थापना (१९४९) झाल्यापासून राज्यघटना अस्तित्वात येईपर्यंत चीनमध्ये संघटनात्मक (Organic Laws) कायदे पाळले जात. माओ त्से तुंग यांच्या नेतृत्वाखालील समितीने लोक प्रजासत्ताकाची राज्यघटना तयार केली. भारताच्या राज्यघटनेप्रमाणेच या

घटनेचा सरनामा असून चीनी जनतेच्या आशा-आकांक्षांचे प्रतिबिंब त्यामध्ये आहे. या राज्यघटनेद्वारे चीनमध्ये खऱ्या अर्थाने समाजवादी राज्याची स्थापना झाली. राज्यघटनेच्या वैशिष्ट्यांमध्ये राष्ट्रीय लोक महासभा ही सर्वोच्च संस्था निर्माण करण्यात आली व तिची स्थायी समिती राज्यांविषयी सर्व निर्णय घेत असे. चीनी साम्यवादी पक्षाने साम्राज्यवाद व भांडवलशाहीला विरोध करून शेतकरी - कामगार यांच्या सत्तेला वाट मोकळी करून दिली. परंतु माओ त्से तुंगच्या मृत्यूनंतर पुन्हा पूर्वीची राज्यघटना रद्द बातल ठरवून ५ मार्च १९७८ रोजी नवीन राज्यघटना स्वीकारण्यात आली. त्यामध्ये महत्त्वाच्या अशा 'पंचशील' तत्त्वज्ञानाचा म्हणजेच शांतीपूर्ण सहअस्तित्वाचा (Peaceful Co-existence) स्वीकार करण्यात आला.

८.१० प्रश्न

१) चीनी लोकप्रजासत्ताकाची राज्यघटना तयार करण्यामागची पार्श्वभूमी विशद करा.
२) इ.स. १९५४च्या राज्यघटनेची ठळक वैशिष्ट्ये लिहा.
३) इ.स. १९५४च्या राज्यघटनेअंतर्गत कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाचे संघटन आणि कार्ये यांवर चर्चा करा.
४) टीपा लिहा.
   अ) राष्ट्रीय लोक महासभा
   ब) राज्य परिषद
   क) चीनमधील साम्यवादी पक्षाची भूमिका
   ड) इ.स. १९७८ ची नवीन राज्यघटना

❖❖❖

९.

लोक प्रजासत्ताक चीन - २
(PEOPLE'S REPUBLIC OF CHINA)
पुनर्रचना व सांस्कृतिक क्रांती

घटना रचना :

९.० उद्दिष्टये
९.१ प्रस्तावना
९.२ शेतीक्षेत्राची पुनर्रचना
९.३ औद्योगिक पुनर्रचना
९.४ पंचवार्षिक योजना
९.५ 'शंभर फुले फुलू द्या' कार्यक्रम
९.६ 'भविष्याप्रत हनुमान उडी'
९.७ सामाजिक रचना व बदल
९.८ नेतृत्व संघर्ष
९.९ सांस्कृतिक क्रांती
९.१० समारोप
९.११ प्रश्न

९.० उद्दिष्टये

१) कृषी व उद्योग यांमध्ये पुनर्बांधणीचा चीनी साम्यवादी पक्षाने सुरू केलेला कार्यक्रम अभ्यासणे.
२) चीनमधील नेतृत्व स्पर्धेचे विश्लेषण करणे.
३) सांस्कृतिक क्रांती आणि तिचे परिणाम यांचा आढावा घेणे.

९.१ प्रस्तावना

साम्यवादी राजवटीचा मुख्य उद्देश चीनमधील शेतीक्षेत्र, हस्तोद्योग, भांडवलशाही, उद्योगक्षेत्र आणि व्यापार यांचे समाजवादी स्थित्यंतर घडवून आणणे हा होता. नवीन राज्यघटनेने चीनी साम्यवादी राजवटीला मान्यता तर दिलीच, त्याबरोबर राष्ट्रीय अर्थव्यवस्था, नैसर्गिक संपत्तीचे राष्ट्रीयीकरण आणि केंद्रीकृत नियोजनाची सुरूवात यांच्यासाठी सामाजिक स्थित्यंतराच्या दृष्टीने एक पाया तयार केला. माओ त्से तुंग हे साम्यवादी राजवटीची

चीनमध्ये पाळेमुळे रूजवत असताना व आपली सत्ता दृढ करीत असताना त्यांनी समाजवादी प्रयोग, चीनी अर्थव्यवस्था, शेतीक्षेत्र व उद्योग यामध्ये कठोरपणे राबविण्यास सुरूवात केली.

९.२ शेतीक्षेत्राची पुनर्रचना (Reconstruction of Agriculture)

९.२.१ कृषी क्षेत्राची अवस्था :

शेती व उद्योग क्षेत्रामध्ये समाजवादी स्थित्यंतर घडवून आणण्याच्यादृष्टीने चीनी साम्यवादी सरकारने चीनी अर्थव्यवस्थेच्या अनेक पैलूंचा विचार केला होता. उदा. एका अंदाजानुसार त्या काळी चीनची लोकसंख्या ५४० दशलक्ष होती आणि दरसाल दोन टक्क्यांनी वाढत होती. चीनचे भू क्षेत्रफळ अमेरिकेच्या क्षेत्रफळापेक्षा थोडे जास्त होते परंतु फक्त १५% जमीन लागवडीखाली होती आणि कृषीप्रधान क्षेत्रांमध्ये लोकसंख्येची घनता सर्वात जास्त होती. शेतकरी वर्ग आपली उपजीविका कशीबशी करीत होता त्यामुळे उद्योग धंद्यांत गुंतवणूक करण्यासाठी बचत किंवा अतिरिक्त धन उपलब्ध होऊ शकत नव्हते. ही परिस्थिती जर बदलायची असेल तर नवीन शेतीपद्धती, तंत्रज्ञान, यांत्रिकीकरण आणि सुधारित संघटन यांचा प्रयोग करावा लागेल. म्हणूनच चीनमध्ये आर्थिक स्थित्यंतर घडवून आणण्यासाठी चीनी साम्यवादी पक्षाने शेवटचा उपाय म्हणजे सुधारित संघटन करण्याचे ठरविले.

९.२.२ जमिनीचे पुनर्वाटप (Redistribution of Land) :

इ.स. १९४९ मध्ये साम्यवादी पक्षाने राष्ट्रव्यापी जमीन पुनर्वाटप धोरण सुरू केले. ही योजना इ.स.१९४९ पूर्वी साम्यवादी प्रभावित क्षेत्रांमध्ये अगोदरच अंमलात आणलेली होती. जून १९५० मध्ये कृषी सुधारणा कायदा पारित केला (Agrarian Reform Law) व ही योजना संपूर्ण देशभर लागू केली. श्रीमंत शेतकरी व जमिनदार यांची जमीन, प्राणी, हत्यारे - अवजारे आणि इतर संपत्ती जप्त करण्यात आली व मग भूमीहीन शेतकरी व गरीब कष्टकरी यांच्यामध्ये पुनर्वाटप करण्यात आली. मध्यमवर्गीय शेतकऱ्यांना सूट देण्यात आली.

९.२.३ जमिनदार वर्गाचे उच्चाटन (Elimination of Landlords) :

वरकरणी पाहता जमिनीचे पुनर्वाटप शेतीची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी दिसत असला तरी त्याच्यामागे राजकीय हेतू जमिनदार वर्गाचे वर्चस्व कमी करणे हा होता. त्यातही आपली जमिन हस्तांतरित करण्यास नकार देण्याऱ्या बऱ्याच मोठ्या जमिनदार वर्गाचे उच्चाटन करण्यात आले. त्यामुळे राजकीय दृष्टया जमिन पुनर्वाटप हे यशस्वी पाऊल असले तरी आर्थिक व राजकीयदृष्टया जमिनदार वर्गाचे उच्चाटन करणे हा उद्देश त्यामागे होता. परंतु आर्थिकदृष्टया ह्या कार्यक्रमास फारसे यश मिळाले नाही.

पुनर्वाटप कार्यक्रमामुळे शेतकऱ्यांचे सरासरी क्षेत्र घटले. त्यामुळे उत्पादन क्षमता घटली. ही उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी आणि केंद्रीकृत योजनेमध्ये सुधारणा आणण्यासाठी, 'चीनी साम्यवादी पक्षा'ने सहकारी - सामूहिक शेतीचा (Collectivization) प्रयोग राबविण्यास सुरूवात केली.

९.२.४ परस्पर सहकारी समूहांची स्थापना (Establishment of Mutual - Aid Teams) :

सामूहिक शेतीची पहिली पायरी म्हणून 'चीनी साम्यवादी पक्षा'ने परस्पर सहकारी समूहांची स्थापना केली. पेरणी व सराईसारख्या हंगामामध्ये अतिरिक्त जनावरे-अवजारे व मजूर यांची देवाणघेवाण करण्याची प्रथा ही चीनमधील परंपरागत प्रथा होती. सरासरी तीन ते पाच कुटुंब मिळून सहकारी समूह स्थापन होत असत. हळूहळू त्यांचे प्रमाण सहा ते दहा कुटुंबाचा एक समूह व तोही कायम करण्यात आला. परंतु अजूनही शेतकरी आपली खाजगी मालमत्ता म्हणूनच जमीन, जनावरे आणि अवजारे यांकडे पाहात होते.

९.२.५ कृषि उत्पादक सहकारी संघ (Agricultural Producer's Cooperatives-APCs) :

शेतीच्या सामूहिकीकरणाची (Collectivization) दुसरी पायरी म्हणजे कृषी उत्पादक सहकारी संघाची स्थापना (APCs) होय. प्रत्येक APC संघामध्ये अंदाजे चाळीस कुटुंबांचा समावेश होता. आपली जमीन, मजूर आणि जनावरे हे सामूहिक व्यवस्थापनाखाली ठेवण्यात आले होते. परंतु एवढे असूनही निदान सैद्धांतिक दृष्ट्या तरी जमीनीची मालकी त्या शेतकऱ्यांकडेच असून ते कधीही सहकारी संघातून बाहेर पडत असत. त्यामुळे हे संघांचे स्वरूप अर्ध - समाजवादी (Semi-Socialist) होते. शेतकऱ्यांना आपले खर्ची पडलेले श्रम व एकूण जमीन यानुसार त्यांचे उत्पन्न मिळत असे.

पुढे अशी अपेक्षा केली की, 'प्रगत' संघाची स्थापना केल्यास शेती उत्पादनात भरमसाठ वाढ होईल. इ.स. १९५३-५७च्या पहिल्या पंचवार्षिक योजनेची उद्दिष्टे गाठण्यासाठी ते आवश्यक होते. प्रगत सहकारी संघांमध्ये जमिनीची मालकी सामूहिक होती. शेतकऱ्यांना त्यातील उत्पन्न दिले जात नव्हते, परंतु त्यांनी केलेल्या श्रमानुसार त्यांना मजूरी दिली जात असे. प्रत्येक शेतकऱ्याला खाजगी जमिनीचे छोटेसे भूखंड (Plots) दिले होते. त्यांवर त्यांनी भाजीपाला करायचा अथवा कुक्कुटपालन करणे अपेक्षित होते. इ.स. १९५६ च्या मध्यात जवळजवळ ९०% शेतकरी कुटुंबांनी सहकारी संघांमध्ये सदस्यत्व घेतले होते.

९.२.६ कम्युनची स्थापना (Communes) :

इ.स.१९५८ मध्ये 'चीनी साम्यवादी पक्षा'ने सामाजिक व आर्थिक रचनेमध्ये क्रांतीकारी बदल करण्यासाठी 'कम्युनची' स्थापना केली. हे

कम्युन चीनी समाजाचे काही मूलभूत घटक मानले जात. वर्षाच्या शेवटी चीनमध्ये २४००० कम्युनचे संघटन करण्यात आले. त्यामध्ये ५०० दशलक्ष शेतकरी वर्गाचा सहभाग होता. एका कम्युनमध्ये १००० ते १०००० कुटुंबांचा समावेश होता. छोटे सहकारी शेती क्षेत्रांचे विलीनीकरण करून कम्युनची निर्मिती केली होती. ह्या कम्युनचा उपयोग प्रशासकीय घटक म्हणूनही केला जायचा जेणेकरून केंद्रसरकारला त्याच्या अनेक कामांमध्ये मदत होईल. शेती उत्पादन वाढवणे आणि साम्यवादी राष्ट्र म्हणून चीनचे स्थित्यंतर लवकर घडवण्याच्या अपेक्षेने कम्युनची सुरूवात करण्यात आली होती. शेतकऱ्यांचे खाजगी भूखंड परत घेतले गेले व इतर मालमत्तासुद्धा सहकारी संघात विलीन केली गेली. सर्व शेतकरी वर्गाच्या जीवनाचेच सामूहिकीकरण हे साम्यवादी राजवटीचे अंतिम ध्येय राहिले होते. शेतकऱ्यांनी आपले खाणे पिणे सहकारी खाणावळींमध्ये केले आणि त्यांना अर्ध्या कामाची मजूरी, अर्ध्या पुरठ्याचा सिद्धांत स्विकारून देण्यात आली.

परंतु कम्युन जीवनामध्ये एक प्रकारे कठोर शिस्त निर्माण झाली आणि अचानक संपूर्ण देशामध्ये व्यक्तिगत बंधने लादल्यामुळे विरोध व मतभेद निर्माण झाले. डिसेंबर १९५८ मध्ये व्यक्तिगत मालमत्तेचे काही अधिकार पुन्हा देण्यात आले. काही प्रोत्साहनपर प्रलोभने देण्यात आली. शेतकऱ्यांना खाण्यासाठी व विश्रांतीसाठी बारा तासांचा वेळ देण्यात आला. एप्रिल १९५९ मध्ये शेतकऱ्यांना त्यांचे छोटे भूखंड पुन्हा परत करण्यात आले. हळूहळू कम्युनचे कृषी उत्पादक सहकारी संघाच्या (APCs) पातळीपर्यंत विकेंद्रीकरण करण्यात आले. काही कम्युन मार्फत स्थानिक शासनाची कामे करण्यात येऊ लागली आणि काही छोटे औद्योगिक व जल संवर्धन प्रकल्पांचे व्यवस्थापन सुद्धा करू लागले.

९.३ औद्योगिक पुनर्रचना :

९.३.१ चीनमधील उद्योगांची स्थिती :

इ.स.१९४९ मध्ये साम्यवाद्यांनी चीनवर राजकीय व लष्करी नियंत्रण मिळविले त्यावेळी चीनची अर्थव्यवस्था पूर्णपणे विस्कळीत झालेली होती. जवळ जवळ ३७ वर्षे चीनमध्ये (१९१२-१९४९) मांचू राजवटीच्या अस्तानंतर ते इ.स. १९४९च्या यादवी युद्धापर्यंत सतत युद्धजन्य परिस्थिती, नैसर्गिक आपत्ती, जसे पूर, दुष्काळ यांनी चीनची अर्थव्यवस्था विशेषतः उद्योगक्षेत्र दुरूस्तीच्या पलिकडे कोलमडलेले होते.

चीनी साम्यवादाचा उगम शहरांमधून झाला होता. परंतु इ.स. १९२७ पासूनच ती एक ग्रामीण चळवळ होती. ज्यावेळी इ.स.१९४९ मध्ये साम्यवादी पक्षाने पेकींग, शांघाय, वूचांग आणि वँटन या शहरामध्ये प्रवेश केला तेव्हा त्यांना चुकल्यासारखे वाटत होते. कारण शहरी अर्थकारण चालविण्यासाठी व नंतर तिचा विस्तार व विकास करण्यासाठी फक्त कामगार वर्गाचा पाठींबा असणे आवश्यक नसून तंत्रज्ञ, व्यवस्थापक, प्रशासक यांचाही पाठींबा

आवश्यक असून त्यांच्या कौशल्यांचा सुद्धा उपयोग करणे आवश्यक आहे याची साम्यवादी पक्षाला जाणीव झाली. त्यामुळे साम्यवादी पक्षासमोर ग्रामीण अर्थकारणापेक्षा शहरी अर्थकारणावर अधिक भर देणे आवश्यक होते.

९.३.२ सोव्हिएत रशियाचे अनुकरण :

चीनमध्ये कोळसा व पाणी या नैसर्गिक संपत्तीची मुबलकता होती. तेल आणि लोखंडाचे साठेसुद्धा मुबलक होते. आधुनिक औद्योगिक विकासासाठी चीनची भूमी खनिजसंपत्तीने संपन्न होती. परंतु या नैसर्गिक साधनसंपत्तीचे उत्खनन व विकास करायचा झाल्यास त्यासाठी फार मोठी भांडवली गुंतवणूक करावी लागेल व त्यावेळी चीनमध्ये त्याचाच अभाव होता. अशा परिस्थितीत, सुरूवातीच्या शांततेच्या काळात, साम्यवाद्यांनी यादवी युद्धापूर्वीची औद्योगिक व कृषिविषयक उत्पादन क्षमता पुनर्पदावर आणण्यासाठी योजना आखल्या. चलनवाढ रोखणे आणि वाहतूकीचे जाळे निर्माण करून एक आर्थिक स्थिरता आणण्यासाठी उपाययोजना केल्या. त्यानंतर चीनी साम्यवादी पक्षाने रशियाच्या आर्थिक धोरणानुसार चीनमध्ये आर्थिक विकासाच्या योजना राबविण्याचे ठरवले. उदा. शेतीचे सामूहिकीकरण (Collectivization) औद्योगिकीकरण आणि खाजगी उद्योगांचे निर्मूलन इ.

९.३.३ आर्थिक पुर्नस्थापना :-

सुरूवातीला चीनी साम्यवादी पक्षाला चांगले यश मिळाले. इ.स. १९४९-५२ या दरम्यान एकूण आर्थिक उत्पादन युद्धपूर्वीच्या उत्पादनाएवढे वाढले. याशिवाय चलनवाढ कमी झाली, रेल्वेचे जाळे मोठ्या प्रमाणात पूर्वपदावर आले व नवीन मार्गाचे काम हाती घेण्यात आले. नाममात्र नियंत्रणामुळे खाजगी भांडवलदारांनी आपले उद्योग चालवल्यामुळे व त्यांच्याबाबत सरकारने नरमाईचे धोरण स्वीकारल्यामुळे आर्थिक स्थिती बऱ्यापैकी पूर्वपदावर आली. चीनी लोक प्रजासत्ताकाची स्थापना झाल्यानंतर ताबडतोब 'चीनी साम्यवादी पक्षा'ने शहरी समाजव्यवस्थेवर हल्ला करण्याचे टाळले. त्यांना उत्पादन व सेवा यांची गरज होती. चीनला एक आधुनिक राष्ट्र बनवायचे असल्यास औद्योगिक क्षेत्राचा विस्तार व त्यात सुधारणा करणे आवश्यक होते. सामाजिक रचनेबाबत 'चीनी साम्यवादी पक्षा'ने आपले धोरण लपून ठेवले नव्हते परंतु साम्यवादी राजवटीस पाठींबा देण्याच्या बदल्यात विशेष कौशल्यप्राप्त लोकांना आपले समाजातील उच्च स्थान कायम ठेवण्याची संधी सुद्धा उपलब्ध करून दिली.

९.३.४ राज्याचे औद्योगिक नियंत्रण :

साम्यवाद्यांनी शहरी भागांमध्ये आगमन केल्यानंतर पूर्वीच्या राष्ट्रीय सरकारच्या मालकीचे आणि कोमिंगटांग पक्षातील उच्च पदाधिकारी व काही संबंधित नोकरवर्गांच्या मालकीच्या उद्योगधंद्यांवर आपला ताबा मिळविला. हे जुने उद्योग तसेच १९४९ नंतर चीनी साम्यवादी पक्ष सरकारने सुरू केलेले नवीन उद्योग यांनी इ.स. १९५० च्या दशकात तयार माल व व्यापार

याबाबतीत चांगलीच प्रगती केली. अर्थ व्यवस्थेचे काही महत्त्वाचे क्षेत्र जसे वाहतूक आणि जड उद्योग हे पूर्णतः सरकारच्या नियंत्रणाखाली होते. काही ठराविक चीजवस्तूंच्या व्यापाराबाबत खाजगी व्यापाऱ्यांना पर्याय म्हणून सरकारी व्यापाराचे जाळे तयार करण्यात आले होते. तरीसुद्धा राष्ट्रीय स्तरावर जे उद्योगपती किंवा उच्चवर्गीय चीनी साम्यवादी पक्षाच्या शत्रूंच्या यादीमध्ये नव्हते ते आपले खाजगी उद्योग अजूनही सांभाळून होते. सर्वात प्रथम, 'चीनी साम्यवादी पक्षा'ने खाजगी क्षेत्र चालू ठेवले आणि नंतर त्यांना काही काळासाठी सवलती दिल्या. परंतु जसजसे 'चीनी साम्यवादी पक्षा'च्या राष्ट्रीय कार्यकारिणीत बुद्धिवंत वर्गाचा भरणा वाढत गेला तसतशी त्यांची देशाच्या राजकारणात पकड मजबूत झाली आणि त्यांनी खाजगी उद्योग क्षेत्रावर कडक निर्बंध लादण्यास सुरूवात केली.

९.३.५ वापर, निर्बंध आणि स्थित्यंतर धोरण (Use, Restrict & Transform Policy) :

राज्यघटनेच्या दहाव्या कलमामध्ये भांडवलशाही उद्योग आणि व्यापार याबाबत राज्याची नीती स्पष्ट करण्यात आली आहे. ही नीती म्हणजे 'वापर, निर्बंध आणि स्थित्यंतर' होय. यातील तीन टप्प्यांपैकी पहिल्या टप्प्यामध्ये 'वापर' (Use) याचा अवलंब करण्यात आला व तो कालावधी इ.स. १९४९ ते १९५१ पर्यंत चालू होता. यादरम्यान खाजगी उद्योगाने अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आणि अर्थव्यवस्थेचे पुनर्जीवीकरण केले.

दुसऱ्या टप्पा 'निर्बंध' (Restriction) इ.स.१९५२-१९५३ या कालावधीत चालू होता. या कालावधीत सरकारने उत्पादन, विक्री व नफा यांबाबतीत खाजगी उद्योगांवर काही निर्बंध लादले. इ.स.१९५२ च्या 'चीनी साम्यवादी पक्ष' मार्गदर्शित 'पंच-विरोधी मोहिमेने' (Anti - Five Campaign) या 'निर्बंध' अवस्थेमध्ये अधिकच मदत झाली. या मोहिमेमध्ये जे पाच प्रमुख मुद्दे घेतले होते त्यामध्ये १) लाचखोरी २) कर चुकवेगिरी (कर चोरी) ३) राष्ट्रीय संपत्तीची चोरी ४) आर्थिक रहस्यांची चोरी आणि ५) सरकारी कंत्राटांचे उल्लंघन यांचा समावेश होता. भांडवलदार वर्गाची सर्वव्यापी मक्तेदारी रोखण्यासाठी या उपयांचा अवलंब केलेला होता व प्रत्येक मालकांना सुद्धा दंड करण्यात आला. उद्योगपती, व्यापारी आणि व्यावसायिक यांचा जाहीर खटल्यांमध्ये निषेध करण्यात आला. त्यामुळे अनेकांनी आत्महत्या केल्या व अनेकांना फाशी देण्यात आले. काहींना मात्र दंड करण्यात आला किंवा मजूर कॅम्पमध्ये काही काळासाठी पाठवून त्यांचा जीव वाचला. अंतिम विश्लेषण केल्यास, ही 'पंच-विरोधी मोहिम' बऱ्याच प्रमाणात भांडवलदार वर्गाची आर्थिक व राजकीय सत्ता कमी करण्यामध्ये यशस्वी झाली.

आर्थिक पुनर्रचनेच्या तिसऱ्या टप्प्यातील 'स्थित्यंतर' (Transformation) इ.स. १९५४-१९५७ पर्यंत चालू होते. हा टप्पा पुढे दोन पायऱ्यांत विभागला गेला. पहिल्या पायरीमध्ये खाजगी उद्योगांचे 'संयुक्त

राज्य - खाजगी उद्योगांमध्ये' (Joint State - Private Enterprises) हळूहळू परिवर्तन करण्यावर भर दिला. उद्योगांतील गुंतवणूकदार व त्यांचे मालक यांना त्यांच्या उद्योगातील गुंतवणुकीसाठी दरसाल ५% दराने व्याज दिले जाई. इ.स.१९५५च्या दुसऱ्या अर्धक आणि इ.स. १९५६चे सुरूवातीस या कार्यक्रमास अधिक गती देण्यात आली आणि त्याचवेळी दुसऱ्या पायरीस सुरूवात करण्यात आली. ती अवस्था 'संपूर्ण व्यापाराचे संयुक्त संचलन' म्हणून प्रसिद्ध आहे. या अवस्थेमध्ये समाजवादी उद्योग व्यवस्थेच्या बाहेरचे जवळजवळ ९०% उद्योग 'संयुक्त राज्य - खाजगी उद्योग' म्हणून गणले गेले. अशाप्रकारे इ.स.१९५६ पर्यंत फक्त शेतीचेच सामूहिकीकरण झाले नाही तर उद्योग सुद्धा पूर्णपणे सरकारी नियंत्रणाखाली आणले गेले.

९.४ पंचवार्षिक योजना

९.४.१ पहिली पंचवार्षिक योजना (१९५३-५७) :

पहिल्या पंचवार्षिक योजनेची घोषणा इ.स. १९५५पर्यंत केलेली नव्हती. कारण पहिली अडीच वर्षे वार्षिक योजनांच्या उद्दिष्टांनुसार चीनने राज्यकारभार केला व अर्थव्यवस्थेच्या योजनाबद्ध प्रयोगाची सुरूवात केली. माओ त्से तुंग यांच्या मतानुसार, चीनचे समाजवादी सामजरचनेचे ध्येय गाठण्यासाठी व अर्थव्यवस्थेच्या 'स्थित्यंतराचा' टप्पा गाठण्यासाठी चीनला कमीत तीन पंचवार्षिक योजना राबविणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे समाजवादी, औद्योगिक व शक्तीशाली देश म्हणून उदयास येण्यासाठी चाळीस ते पन्नास वर्षांचा कालावधी आवश्यक होता.

९.४.२ जड उद्योगधंद्यांचा विकास :

इ.स. १९५०च्या दशकातील चीनचे आर्थिक धोरण हे पूर्णपणे सोव्हिएत रशियाच्या आर्थिक विकासाचे अनुकरण होते. त्यामुळे पहिल्यांदा त्यांनी लोखंड, पोलाद, यांत्रिक उद्योग यांवर अधिक भर दिला. या अवजड उद्योगधंद्याच्या विकासामध्ये गुंतवणूक करण्यासाठी सामूहिक शेतीमधून (Collectivization) मिळणारे अतिरिक्त उत्पादन वापरावे लागत होते. बऱ्याच प्रदेशांमध्ये अवजड उद्योग उभारणी करण्यासाठी रशियन तंत्रज्ञांनी आखणी व बांधणी करण्यासाठी मदत केली. त्यानंतर हलके उद्योग व कृषी क्षेत्राला दुसरी पसंती देण्यात आली. अशाप्रकारे इ.स.१९५३-५७ दरम्यान जवळजवळ ५६% गुंतवणूक उद्योगधंद्यांच्या विकासासाठी व त्यातही ८७% अवघड व १३% हलक्या उद्योगांसाठी करण्यात आली. वाहतूक व दळणवळण क्षेत्रात १८.२% तर ८.२% शेती क्षेत्रामध्ये गुंतवणूक केली गेली.

पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये अवजड उद्योगात चीनने चांगली प्रगती केली. त्यातही विशेष करून लोखंड व पोलाद, इंधन (पेट्रोलशिवाय) कच्चामाल, विद्युत शक्ती आणि यांत्रिक उद्योग यांचा समावेश होता. चीनने पहिल्यांदाच मोटारगाड्या, मालवाहतूक वाहने, जेट विमाने आणि जहाजे यांचे उत्पादन केले. या दरम्यान, (१९५३-५७) औद्योगिक उत्पादनाचा वृद्धि दर

सरासरी १४-१९ टक्क्यांच्या दरम्यान होता. नवीन रस्ते, रेल्वे मार्ग बांधले गेले. त्यांचा लष्करी, राजकीय, आर्थिक दृष्टीने फायदाच झाला.

९.४.३ वृषी क्षेत्रातील संथ गती :

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात अवजड उद्योगांवर अधिक भर दिल्यामुळे हलके उद्योग किंवा वृषी क्षेत्र मागे पडले. शेती उत्पन्न फक्त वार्षिक ४.५% सरासरीने वाढले. या संथ गतीला अनेक घटक जबाबदार होते. त्यामध्ये लागवडीखालील क्षेत्र ३% तर लोकसंख्या दरवाढ १०% हा फरक महत्त्वाचा आहे. तसेच इ.स.१९५३-५४ दरम्यान कमी उत्पादन क्षमता आणि कमी उत्पन्न झाल्यामुळेसुद्धा शेतीउत्पन्न संथ गतीने चालत होते. शेती क्षेत्रातील चढउतारामुळे उद्योग क्षेत्रामध्ये सुद्धा चढउतार येऊ लागले. शेती उत्पादन कमी झाल्यामुळे निर्यात कमी झाली व औद्योगिक साधनांची आयात कमी झाली. त्याचप्रमाणे हलक्या उद्योगांची भिस्त सुद्धा शेती क्षेत्रातील उत्पादनावर अवलंबून होती व त्यामुळे कापड उद्योग, तंबाखू आणि साखर उद्योग यांना कच्चामाल मोठ्या प्रमाणात उपलब्ध होऊ शकला नाही. वृषी क्षेत्र व हलक्या उद्योगातील संथ गती असली तरी एवूणच पहिली पंचवार्षिक योजना ही बऱ्याच प्रमाणात यशस्वी म्हणावी लागेल.

९.४.४ आपली प्रगती प्रगती तपासा:-

१) वृषी पुनर्रचनेच्या कोणकोणत्या अवस्था होत्या ?

२) 'वापर, निर्बंध व स्थित्यंतर' म्हणजे काय ?

_____

_____

_____

_____

९.५ 'शंभर फुले फुलू द्या' कार्यक्रम (Let Hundred Flowers Bloom) :

साम्यवादी सरकारची चीनमध्ये स्थापना झाल्यावर, जनता आणि चीनी साम्यवादी पक्ष यांच्या सहानुभूतीबद्दल माओ त्से तुंग यांना पूर्ण आत्मविश्वास होता. त्यामुळे जनतेला थोड्याफार प्रमाणात भाषण स्वातंत्र्य देण्याची त्यांची इच्छा होती. २ मे १९५६ रोजी माओ यांनी जे भाषण दिले त्यामध्ये त्यांनी 'शंभर फुले फुलू द्या, शंभर विचार - प्रवाह रूजू द्या' (Let Hundred flowers Blossom; a Hundred schools of thought Contend) अशी घोषणा केली. खरे पाहता फेब्रुवारी १९५६मध्ये सोव्हिएत रशियाच्या ख्रुश्चेव्हने 'स्टॅलिन-मुक्त' रशियाविषयी भाषण केले होते आणि ऑक्टोबर १९५६ हंगेरियामध्ये उठाव झाला. त्याच्या पार्श्वभूमीवर हे भाषण माओ त्से तुंग व त्यांच्या पक्षाने केले व अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा उद्घोष केला. २७ फेब्रुवारी १९५७ रोजी माओंनी 'लोकांमधील विरोधाभासाचे योग्य निराकरण

करणे' या विषयावर भाषण केले. या भाषणामध्ये त्यांनी 'शंभर फुले' कार्यक्रमास प्रोत्साहन दिले. पक्षाच्या केंद्रीय समितीच्या बैठकीत पक्षाच्या या धोरणाविषयी वाहवा केली व तसा ठरावसुद्धा पारित केला. एवढेच नव्हे तर पक्षाच्या बाहेरील सदस्यांना पक्षाच्या चुकीच्या धोरणांवर टीका करण्यास सांगण्यात आले आणि त्यातील दोष दूर करण्यास बजावले.

परंतु पक्षाने अपेक्षा केल्याच्या पलिकडे लोकांनी टीकास्त्र सोडले. बुद्धिवंत आणि विद्यार्थी यांनी संधीचा फायदा उठवला आणि साम्यवादी सरकारवर कठोर टीका केली व तशी कृती करण्यास सुरूवात केली. त्यांनी पश्चिमी देशांतील लोकशाहीचा बोलबाला केला, 'चीनी साम्यवादी पक्षा'च्या सत्तेतील मक्तेदारीच्या निषंधार्थ भिंतीवर चित्रे व संदेश चिकटवून प्रदर्शित केले आणि पक्षाच्या सदस्यांच्या उदध्ट व उद्दाम वागण्यावर सुद्धा टीकास्त्र सोडले. साम्यवादी राजवटीच्या सर्व पैलूंविषयी निषेध करण्याची आणि ते उद्ध्वस्त करण्याची मोहिम जनतेने राबविली. परंतु 'चीनी साम्यवादी पक्ष' आपल्या सत्तेवरील मक्तेदारीस दिलेले आव्हान सहन करू शकत नव्हता. अशा प्रकारे 'सुगंधित फुले विषारी बनली.' त्यामुळे प्रक्षेपणावर बंदी घातली आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य नष्ट केले. विरोध, टीका करणारे बुद्धिवंत - विचारवंत यांना बऱ्याच संख्येने ग्रामीण भागामध्ये शेतमजुरीची कामे करण्यासाठी पाठवण्यात आले व त्यांचे दमन केले गेले.

९.६ भविष्याप्रत हनुमान उडी (The Great Leap Forward) :

पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये उद्योगक्षेत्र मुख्यत: अवजड उद्योगांचा विस्तार झाला असला तरी शेतीक्षेत्राचा विकास कमी झाला होता. उत्पादन वाढीसाठी इ.स.१९५७ साली सामूहिक शेतीचा प्रयोग हाती घेण्यात आला असला तरी त्यामुळे उत्पादन व वाढती मागणी व पुरवठा यांतील तफावत मात्र वाढत होती. सोव्हिएत रशियाकडून येणारी मदत कमी झाल्यामुळे ही समस्या अधिक गुंतागुंतीची झाली आणि उद्योग क्षेत्राच्या विस्ताराची गतीसुद्धा कमी झाली.

अशा परिस्थितीत, फेब्रुवारी १९५८ रोजी राष्ट्रीय लोक महासभेच्या बैठकीमध्ये माओ त्से तुंग यांनी 'भविष्यप्रत हुनुमान उडी' या नावाने आर्थिक विकासाच्या गतीचा कार्यक्रम घोषित केला. या कार्यक्रमाने ग्रामीण भाग आणि शारीरिक श्रमास पुन्हा महत्त्व दिले. अनेक उद्योगांसाठी उच्च उत्पादनासाठी लक्ष्ये समोर ठेवली. भविष्यातील केवळ पंधरा वर्षामध्येच चीन इंग्लंडच्या औद्योगिक विकासाला मागे टाकील असे लक्ष्य ठेवले. हे लक्ष्य गाठण्यासाठी शेतीची उत्पादन क्षमता वाढविणे गरजेचे असून त्यासाठी जलसिंचन प्रकल्प आणि कठोर शेतीलागवड करणे आवश्यक होते. व्यक्तिगतरित्या प्रत्येकाने आपल्या नियमित कामामध्ये तत्परता दाखवून नेहमीपेक्षा अधिक श्रम व वेळ देऊन अतिरिक्त उत्पादन करणे आवश्यक होते. त्यासाठी शेकडो दशलक्ष शेतकरी दिवसभर शेतीवर काम करीत आणि

रात्री कारखान्यांमध्ये आपला थोडासा वेळ कामासाठी देत असत. शिवाय त्यांना आपल्या घरा पाठीमागील आवारामध्ये (Backyard) लोखंडाची भट्टी उभारण्याचे आदेश देण्यात आले. त्याचवेळी शेती क्षेत्रांच्या 'कम्युन्स'ला सुद्धा सुरूवात करण्यात आली. व्यवस्थापन सुधारण्यासाठी कृषी उत्पादक सहकारी संघांचे (Agricultural Producers Cooperatives - APCs) मोठ्या कम्युन्समध्ये विलीनीकरण करण्यात आले.

इ.स.१९५८ च्या शेवटी, साम्यवादी पक्षाने कृषी उत्पादनामध्ये १००% वाढ झाल्याचा दावा केला. लोखंड व पोलादाचे उत्पादन दुप्पट झाल्याचे सांगितले. इतर उद्योगांमध्ये सुद्धा लक्ष्य १००% गाठल्याचे दावे करण्यात आले. तरीसुद्धा काळाच्या ओघात सरकारचे उत्पादन वाढीचे अंदाज चुकीचे दिसू लागले.

हा 'भविष्या प्रत हनुमान उडी'चा कार्यक्रम (शीघ्र आर्थिक वाढीचा) अयशस्वीच झाला. कारण एवढ्या मोठमोठ्या उत्पादन वाढीच्या घोषणा थोड्याच कालावधीत खोट्या असल्याचे दिसू लागले. शेतकरी वर्गास झोप व विश्रांतीचा अभाव असल्यामुळे त्यांच्या कामावर उलट परिणाम झाला. कम्युन्सच्या खाणावळीमध्ये दिलेले जेवण निकृष्ट दर्जाचे होते आणि थकवा, खाजगी भूखंडांवर गंडांतर, कौटुंबिक जीवनात दुय्यम स्थान या सर्वांमुळे शेतकरी वर्गाचे मनोधैर्य खचले. त्यांनी मोठ्या जीवापोटावर शेतीवर काम केले आणि आपली स्वतःच्या पाळीव जनावरांची कत्तल केली. त्यामुळे शेतीची उत्पादन क्षमता घटली. घरांच्या पाठीमागच्या आवारातील लोखंडी भट्ट्यांमधून लाखो टन कच्चे लोखंड तयार झाले परंतु त्यांची गुणवत्ता व दर्जा अतिशय खालचा होता. क्षमतेबाहेरचे लक्ष्य गाठण्यासाठी कारखान्यातील यंत्रांचा अतिरिक्त वापर केला गेला व त्यांच्या वेळच्या वेळी दुरूस्तीकडे लक्ष दिले गेले नाही. यामुळे ही यंत्रे बंद पडली व उत्पादनच बंद झाले. इ.स. १९५९ च्या सुरूवातीस, चीनच्या अर्थव्यवस्थेस फार मोठा शह बसला. औद्योगिक उत्पादन घटले व त्याहीपेक्षा शेतीचे उत्पादन घटले. इ.स. १९६० मध्ये चीनला ऑस्ट्रेलिया, कॅनडा आणि इतर देशांकडून गहू आयात करणे भाग पडले.

'भविष्याप्रत हनुमान उडी' कार्यक्रमाने निर्माण झालेल्या समस्यांवर तोडगा म्हणून साम्यवादी सरकारने लोकांना काही सोयी सवलती देणे क्रमप्राप्त होते. त्यामुळे सरकारने कार्यक्रमाची तीव्रता कमी केली. केंद्रीकृत नियोजनावर पुन्हा भर दिला. शेती उत्पादनाला प्राधान्य दिले व औद्योगिक गुंतवणूक काहीशी कमी केली. कम्युनचे जीवनमान थोडे सोपे केले. शेतकरी वर्गाला काही प्रमाणात खाजगी मालमत्तेचे अधिकार दिले गेले आणि त्यांना त्यांचे छोटे खाजगी भूखंड परत करण्यात आले.

इ.स. १९५८ पर्यंत अवजड उद्योगांवर भर देऊन चीनने सोव्हिएत रशियाच्या आर्थिक विकासाच्या प्रयोगाचे अनुकरण केले होते. दुसऱ्या

पंचवार्षिक योजनेच्या (१९५८-६२) बदल्यात सुरू केलेल्या 'भविष्याप्रत हनुमान उडी' कार्यक्रमा-अंतर्गत आधुनिक तंत्रज्ञान आणि अवजड उद्योगांवर भर दिला. परंतु त्याच्या जोडीला लघुउद्योगांचा विकास, पारंपारिक स्वदेशी तंत्रांचा वापर आणि कठोर परिश्रम तंत्रज्ञान यांवरही भर दिला गेला. या कार्यक्रमाला 'दोन्ही पायांवर चालणे' (Walking with two legs Policy) असे नाव दिले गेले.

जानेवारी १९६१ रोजी, १९६० च्या सुगीच्या हंगामात कृषिउत्पादन कमी झाल्यामुळे सरकारने अवजड उद्योगांतील गुंतवणूक कमी केली. कृषि उत्पादनवाढीतील दोष व चुका कबूल केल्यानंतर साम्यवादी चीनी सरकारने 'भविष्याप्रत हुनमान उडी' कार्यक्रम रद्द केल्याची घोषणा केली. शेतीक्षेत्रावर अधिक लक्ष केंद्रीत करण्याची नवीन योजना तयार केली गेली. सप्टेंबर १९६२ मध्ये दहाव्या केंद्रीय समितीच्या महासभेने 'कृषीक्षेत्र हाच चीनच्या अर्थव्यवस्थेचा पाया आहे.' यावर भर दिला. अशाप्रकारे चीनी सरकारने इ.स. १९५८ मध्ये अनुकरण केलेल्या सोव्हिएत रशियाच्या आर्थिक प्रयोगापासून फारकत घेतली.

९.७ सामाजिक रचना व बदल :

इ.स. १९७०च्या दरम्यान साम्यवादी सरकारने सामाजिक क्षेत्रात विशेषत: कौटुंबिक जीवनात काही मूलभूत बदल केले. साम्यवादी सरकारपूर्वी कुटुंब हा सर्वात पहिला घटक होता. सर्वांत वरिष्ठ सदस्यांचा सर्व इतर सदस्यांवर अधिकार असायचा. त्यामुळे प्रत्येक माणसाची निष्ठा ही त्याच्या कुटुंबाशी होती आणि राष्ट्राशी नव्हती. कुटुंबातील स्त्रियांचे स्थान पुरूषांच्या मानाने दुय्यम दर्जाचे होते. त्यांना आपले जीवनसाथी निवडण्याचे स्वातंत्र्य नव्हते.

१९व्या शतकाच्या शेवटापासून चीनी कुटुंबसंस्थेचे स्वरूप (पारंपारिक) नष्ट होऊ लागले. यास औद्योगिकीकरण, व्यक्तिगत स्वातंत्र्य आणि व्यक्तिगत अधिकार या पाश्चिमात्य कल्पना जबाबदार होत्या. इ.स.१९११ मध्ये मांचू राजवटीचा अंत होऊन त्याची जागा नवीन राजवटीने घेतली आणि चीनी लोक प्रजासत्ताकाचा यादवी युद्धामुळे झालेला ऱ्हास यामुळे ही पारंपारिक कौटुंबिक व्यवस्था कोलमडण्याची गती अधिकच वाढली. राष्ट्रीय सरकारने समाजरचना, सुधारण्याचे प्रयत्न केले. तरीही फक्त शहरी भागातील श्रीमंत वर्गामध्येच पाश्चिमात्यीकरण सिमित राहिले.

चीनी साम्यवादी पक्षाने राजकीय सत्ता हस्तगत केल्यानंतर पारंपारिक कुटुंबपद्धतीतील सरंजामी स्वरूप नष्ट करून कुटुंब हा सर्वांत प्राथमिक घटक म्हणून पूर्वपदावर आणण्याचे प्रयत्न सुरू केले. या नव्या कुटुंबपद्धतीमध्ये स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने अधिकार प्रदान करण्यात आले. स्त्रियांचे बरेच पारंपारिक उत्सव साजरे करण्याची जबाबदारी सरकारने उचलली. त्यामुळे शेतीच्या उत्पादनक्षम कामामध्ये व उद्योगांमध्ये त्यांना

आपले श्रम देण्यास स्वातंत्र्य मिळाले. त्यांना विवाहस्वातंत्र्य बहाल करण्यात आले. अशाप्रकारे व्यक्तिगत निष्ठा ही केवळ कुटुंबाप्रती न राहता ती सामूहिक व राष्ट्राप्रती (सरकारप्रती) राहील अशी भावना व्यक्त केली गेली.

इ.स.१९५० च्या विवाह कायद्यानुसार स्त्रियांना विवाह, घटस्फोट आणि संपत्तीची मालकी याबाबतीत पुरूषांच्या बरोबरीने अधिकार देण्यात आले. रखेल ठेवणे, बालविवाह आणि हुंडा यासारख्या चालीरिती बंद करण्यात आल्या. पुरूष व स्त्रियांना विवाहाचे वय अनुक्रमे वीस आणि अठरा वर्षे असे निश्चित करण्यात आले. लग्नसमारंभ अत्यंत साध्या पद्धतीने करून त्याची नोंदणी स्थानिक सरकारी कार्यालयात केली जाई. (All-China Federation of Democratic Women) 'अखिल चीनी लोकशाही स्त्री संघटनेची' उपाध्यक्षा चौ एन लाय यांची पत्नी तेंग यींग चाओ ही होती व विवाह कायद्यांची अंमलबजावणी ही या संघटनेची प्रमुख जबाबदारी होती. त्या संघटनेचे मुख्य काम मागास व दूरच्या प्रदेशांत सुद्धा या कायद्याची अंमलबजावणी होत आहे किंवा नाही यावर लक्ष ठेवणे हे होते.

९.७.१ आपली प्रगती तपासा:

१) 'शंभर फुले फुलू द्या' यामागची मुख्य संकल्पना कोणती होती ?

२) 'भविष्याप्रत हनुमान उडी' यावर पाच ओळीत भाष्य करा.

_____

_____

_____

_____

९.८ नेतृत्व संघर्ष (Leadership Crisis) :

इ.स.१९५९ पासूनची तीन वर्षे (१९५९-६०-६१) ही चीनच्या इतिहासात 'नैसर्गिक आपत्तीची तीन वर्षे' (Three Years of Natural Disasters) म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यामुळे अन्नधान्याचे उत्पादन घटले व तुटवडा निर्माण झाला. त्या तीन वर्षांनंतर पाहिल्यास व्यापक दुष्काळजन्य परिस्थितीमुळे आणि 'भविष्याप्रत हनुमान उडी' कार्यक्रमाच्या अपयशामुळे लोकांची उपासमार झाली व त्यात जवळजवळ २० दशलक्ष लोक मृत्युमुखी पडले.

माओंनी प्रत्यक्ष राजकारणातून निवृत्ती घेतल्यानंतर लिओ शाओ ची, लेनिनवादी चीनच्या सरकारचा प्रमुख बनला. इतर पक्षाचे लोक जे पूर्वी माओंच्या पाठीमागे होते, आता लिओ ची कडे वळले. लिओ समाजामध्ये पक्षाची अधिकृत प्रतिमा पुर्नस्थापित करण्याच्या विचारांचा होता. त्याने माओंच्या कारकीर्दीत राबविण्यात आलेले अनेक धोरणात्मक कार्यक्रम रद्द

करण्याचे ठरवले. उदा. ग्रामीण कम्युन्स. त्याने 'भविष्याप्रत हनुमान उडी' कार्यक्रम रद्द करून त्याच्या पूर्वीच्याच कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याचे ठरवले.

लिओ शाओ ची ला त्याच्या आर्थिक कार्यक्रमामध्ये चांगलेच यश मिळाले त्यामुळे त्याची प्रतिष्ठा वाढली आणि इतर पक्ष आणि जनतेमध्ये तो लोकप्रिय झाला. चीनी साम्यवादी पक्षाचा महासचिव डेंग झायोपिंग आणि लिओ शाओ ची यांनी एकत्रितपणे माओ त्से तुंग यांची वास्तव सत्ता नष्ट करून त्यांची जनमानसातील प्रतिमा हळूहळू पुसून टाकण्याची योजना तयार केली.

माओ त्से तुंग यांनी नोकरवर्गाची पुर्नसत्ता, आणि लिओ शाओ ची व त्याच्या मंत्र्यांची धोरणे ही क्रांतीकारी परंपरा जोपासणारी नाहीत म्हणून त्यांचा निषेध केला. त्यांनी त्यांना 'भांडवलशाहीचे पाठीराखे' संबोधिले. नोकरवर्गाने क्रांतीकारी चळवळीचे चैतन्य सोडून दिलेले असून त्यांच्या सवया व कल धनाढ्य वर्गासारख्या होत चालला आहे. त्यांनी इ.स. १९६५ मध्ये क्रांती विरोधी नोकर वर्गावर हल्ला चढवला. इस. १९६३ मध्ये आपले राजकीय पुनरागमन करून विरोधकांना दूर करण्याच्या दृष्टीने माओ त्से तुंग यांनी समाजवादी शिक्षण चळवळ सुरू केली. या समाजवादी शिक्षण चळवळीमधील विरोधाभास असा की, ही चळवळ तळागाळाच्या लोकांसाठी, लोकांनीच चालवायची होती. परंतु अजूनही तिचे दिशानिर्देशन माओ त्से तुंग स्वत:च करीत होते. ह्या चळवळीचा रोख शालेय मुलांकडे होता. त्यामुळे त्याचा राजकारणावर कोणताही तत्कालीन परिणाम दिसून आला नाही. परंतु त्याचा तरुण पिढीवर नक्कीच प्रभाव पडला आणि माओ त्से तुंग यांच्याकडून त्यांना भविष्यात पाठींबा प्राप्त झाला.

इ.स. १९६३ मध्ये, माओंनी लिओ शाओ ची यांच्यावर उघडपणे हल्ला करण्यास सुरूवात केली. त्यांनी म्हटले की, वर्गसंघर्षाचा आदर्शवाद प्रथमत: पूर्णपणे समजून घेतला पाहिजे आणि मग त्याचे उपयोजन केले पाहिजे. इ.स. १९६४ पर्यंत ही 'समाजवादी शिक्षण चळवळ' 'चतु:सफाई चळवळ' (Four Cleanups Movement) या नावाने परिवर्तीत झाली. त्या चळवळीने आपल्यासमोर चार क्षेत्रांची सफाई किंवा शुद्धीकरण (Cleaning) करण्याचे लक्ष्य ठेवले. त्यामध्ये (अ) राजकारण (ब) अर्थशास्त्र (क) विचारप्रणाली आणि (ड) संघटन या चार क्षेत्रांचा समावेश होता. खरे पाहता, ही चळवळ लीओ शाओ ची यांच्या सरकारला विरोध करण्यासाठी होती.

इ.स.१९६०च्या दशकाच्या सुरूवातीच्या काळात 'भविष्याप्रत हनुमान उडी'चा कार्यक्रम अयशस्वी झाल्यावर आपली सत्ता व प्रभाव कमी होत चाललोच माओंच्या लक्षात येऊ लागले. तरीसुद्धा आपल्या जुन्या सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी लष्करी दलावर आपले वर्चस्व पुन्हा स्थापन केले व त्यात त्यांना युद्धमंत्री ली पाओ याने मदत केली. बुद्धिवंत - विचारवंत वर्गाकडून सतत होणाऱ्या टिकेमुळे चिडलेल्या माओंनी, सप्टेंबर

१९६५ रोजी पक्षाच्या वेंद्रीय समितीच्या गुप्त बैठकीमध्ये, प्रतिव्रांतीवादी कल्पनांचा नायनाट करण्यासाठी कडक पावले उचलण्याची सूचना वेली. पेंग चेन यांच्या नेतृत्वाखाली, वेंद्रीय समितीच्या बहुसंख्य सदस्यांनी माओंची सूचना पाळण्यास नकार दिला. माओंना असुरक्षित असल्यासारखे व आपल्याविरूद्ध कट शिजत असल्याचे वाटू लागले. विरोध वाढत गेल्याचे पाहून त्यांच्यासमोरच माओ ताडकन शांघाय येथे पळून गेले.

९.९ सांस्वृतिक व्रांती (Cultural Revolution)

माओ त्से तुंग यांनी इ.स. १९६६-७६ या दहा वर्षांच्या काळात चीनमध्ये 'चीन समाजवादापासून दूर जात आहे आणि लिओ शाओ ची यांची धोरणे भांडवलशाही व्यवस्थेच्या पुर्नस्थापनेसाठी आहेत' यासाठी साम्यवादी पक्षातर्फे 'महान कामगार सांस्वृतिक व्रांती' सुरू वेली. ह्या मोहिमेचे सुरूवातीला उत्साहाच्या भरात मोहिमेच्या कर्त्यांनी 'एक महान व्रांती जी लोकांच्या हृदयास स्पर्श करते' असे वर्णन वेले होते आणि काही प्रमाणात पॅरिस पासून ते बर्वलेपर्यंत जहाल विद्यार्थ्यांवर प्रभाव निर्माण वेला होता. त्याच व्रांतीचे वर्णन आता 'चीनी राष्ट्रासाठी एक भयानक संकट' असे करण्यात येऊ आले.

९.९.१ सांस्वृतिक व्रांतीचा उगम :

ज्यावेळी इ.स.१९४९ मध्ये 'चीनी साम्यवादी पक्ष' सत्तेवर आला व माओ त्से तुंग समाजवादी स्थित्यंतर (साम्यवादी व्रांती) करण्याचा गंभीरपणे विचार करू लागले त्याचवेळी इ.स.१९५०च्या दशकात सामाजिक - सांस्वृतिक व्रांतीची बीजे रोवली गेली. माओंची खरी चिंता ही होती की, 'चीनी साम्यवादी पक्षा'वर नोकर शाहीचे वर्चस्व वाढत चालले होते, लोक सैद्धांतिक विचारापासून दूर गेले होते आणि आधुनिक चीनबरोबर सामाजिक - आर्थिक विषमता वाढत चालली होती. म्हणून इ.स.१९६०च्या दशकाच्या सुरूवातीला ही व्रांतीपासून दूर म्हणजे पूर्वीच्याच चीनकडे चाललेली व्यवस्था दूर करण्यासाठी व 'पुनरूज्जीवन' थांबविण्यासाठी, पक्षाला आणि चीन राष्ट्राला दूषित करण्यापासून वाचविण्यास माओंनी ही सांस्वृतिक व्रांतीची मोहिम सुरू वेली.

माओंच्या मते, आपल्या पक्षातील सहकाऱ्यांच्या चुकीच्या व स्वार्थी मतप्रदर्शनांमुळे समाजवादाच्या ओझ्याखाली 'वर्ग संघर्ष' थांबलेला आहे आणि चीनची राजकीय अवनती झालेली आहे. जमीनदार व भांडवलदार वर्गांचे निर्मूलन झाल्यावर देखील कामगार वर्ग व उच्च मध्यम वर्गामध्ये संघर्षाने नवीनच रूप धारण वेले आहे. माओंचा खरा रोष एका बाजूला पक्ष आणि सरकारी अधिकाऱ्यांवर होता की, ज्यांनी लोकांच्यापासून फारकत घेतलेली आहे आणि दुसऱ्या बाजूला बुद्धिवंत - विचारवंत की ज्यांच्यामध्ये मध्यमवर्ग आणि सरंजामशाही मूल्ये अजूनही जीवंत आहेत त्यांच्यावर होता.

सांस्वृतिक व्रांतीस सुरूवात करण्यास अजूनही एक प्रभावशाली घटक कारणीभूत होता आणि तो म्हणजे रशियाने भांडवलशाहीसाठी अगोदरच समाजवादास सोडचिट्ठी दिलेली आहे, असे माओंनी केलेले विश्लेषण होय. माओ त्से तुंग आपल्या कारकीर्दीतील काही योजनांच्या अपयशामुळे आपली अधिकारशाही आणि प्रतिष्ठा जी पक्षातील विरोधकांसाठी हरवून बसले होते ती पुन्हा मिळवणे आणि त्यासाठीच सांस्वृतिक व्रांती हा एक संघर्ष होता. ज्या लोकांनी व्रांती करून चीनी साम्यवादी पक्षाला (CCP) आज सत्तेवर आणले आहे त्यांचेच अनुकरण करणारी एक नवीन 'व्रांतीकारी पिढी' तयार करण्यासाठी सांस्वृतिक व्रांती ही एक मोठी संधी आहे असे माओंचे विचार होते.

सांस्वृतिक व्रांतीला काही धोरणात्मक पैलू होते. ज्या लोकांनी चीनला 'भांडवलशाही' मार्गावर नेण्याचे प्रयत्न केले त्यांना समाजाच्या सर्व पातळ्यांमधून, सत्तेपासून दूर जावे लागले होते. त्यामुळेच खऱ्या समाजवादी संस्थांची स्थापना आणि समाजवादाच्या रोपट्याला पुन्हा सांस्वृतिक व्रांतीचे खतपाणी घालून जीवंत राखण्याची प्रव्रीया करणे आवश्यक होते. उदा. शिक्षण क्षेत्रातील उच्चभ्रूपणाच्या जागी (Elitism) सुधारित शाळा, राजकीय अभ्यासव्रम, जनाधारित प्रशासन आणि प्रगत आराखडा, चांगल्या वर्गखोल्या, राजकीय कार्यकुशलता आणि सैद्धांतिक, वैचारिक सुधारणा यांचे रोपण करणे आवश्यक आहे.

९.९.२ सांस्वृतिक व्रांतीचा अन्वयार्थ :

माओ त्से तुंग यांच्या प्रदीर्घ कारकीर्दीमध्ये अनेक घटना घडल्या. परंतु सांस्वृतिक व्रांतीपेक्षा समजण्यास कठीण व वादग्रस्त अशी दुसरी कोणतीही घटना नव्हती. जेव्हा इ.स.१९६६ मध्ये व्रांतीस सुरूवात झाली तेव्हा वेगवेगळ्या अर्थाने तिचे स्पष्टीकरण देण्यात आले. त्याचा अर्थ माओ आणि राष्ट्राध्यक्ष लिओ शाओ ची यांच्यामधील सत्तासंघर्ष आहे असाही लावण्यात आला. त्याचा असाही अन्वयार्थ केला की, पक्षातील वरीष्ठ नेत्यांच्या वर्चस्वाविरूद्ध तरुण वर्गाने केलेले बंड होय. मांचू राजवटीच्या अस्तानंतर शेवटी झालेला राष्ट्रवादाचा भडका होय. यांवर काहींनी विश्वास ठेवला. काहींच्या मते, सांस्वृतिक व्रांती म्हणजे इ.स.१९४९ मध्ये साम्यवादी पक्षाने विजय मिळवून निर्माण केलेली एकता मोडीत काढून नवीन प्रकारची लष्करी कादकीर्द नवे रूप घेत आहे.

९.९.३ सांस्वृतिक व्रांतीचे समर्थन :

माओ त्से तुंग यांनी सांस्वृतिक व्रांतीचे समर्थन केले. त्यांच्या मते, कोणत्याही व्रांतीचे काही टप्पे असतात. अवस्था असतात. पहिल्या टप्प्यामध्ये 'मध्यमवर्गीय सत्ता' (Bourgeoisie) नष्ट करून साम्यवादी पक्ष लोकांच्या कल्याणासाठी सत्तेवर आला. दुसऱ्या टप्प्यामध्ये 'आर्थिक व्रांती' असते आणि चीनमध्ये भांडवलशाही अर्थव्यवस्था आणि 'सरंजामशाही' जमीन व्यवस्था यांच्यामध्ये सुधारणा करण्यात आली आणि शेवटी त्यांच्या

जागी समाजवादी अर्थव्यवस्था आणि नवीन जमीन व्यवस्था आणण्यात आली. पुढील अवस्थेमध्ये 'कम्युन' पद्धती किंवा सामूहिक शेती पद्धती राबविण्यात येऊन उद्योगधंदे व व्यापाराचे पूर्णपणे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. माओंच्या मते, अजूनही क्रांतीची पुढची अवस्था किंवा टप्पा पूर्ण व्हायचा आहे. कारण सरकारमध्ये बदल (सत्ताबदल) झाला आणि अर्थव्यवस्थेचे पूर्ण स्थित्यंतर झाले परंतु चीनी लोकांची विचारपद्धती, त्यांची आवडनिवड, त्यांचा जीवनविषयक दृष्टीकोन आणि व्यक्तिगत आशा आकांक्षा यांमध्ये अजूनही बदल झालेले नाहीत. म्हणूनच क्रांतीची परिपूर्णता होण्यासाठी शेवटचा टप्पा गाठणे आवश्यक असून तो टप्पा म्हणजेच 'सांस्कृतिक क्रांती' होय.

९.९.४ 'हाई रूई डिसमिस्ड फ्रॉम ऑफीस' नाटकाचा परिणाम : (Hai Rui Dismissed from Office)

इ.स.१९६६ मध्ये माओ व त्यांचे विरोधक यांच्यातील संघर्ष अधिकच पेटला. पेकींग शहराचा महापौर, वू हान हा एक साहित्यिक व शिक्षणतज्ञ होता. तो इतर बुद्धिवंत वर्गाच्या जोडीला इ.स.१९५० च्या दशकापासून साम्यवादी चळवळीमध्ये सामील झाला होता. इ.स.१९६१ मध्ये वू हान ने 'Hai Rui Dismissed from office' या शीर्षकाचे नाटक लिहिले. या नाटकाचे कथानक असे होते की, मिंग घरण्यातील एक हुशार व कर्तबगार अधिकार हाई रूई हा लोकांच्या कल्याणकारी झटत होता. परंतु त्याचा राजा अहंकारी असल्यामुळे त्याने हाई रूई यास पदावरून काढून टाकले होते. या नाटकाचा संबंध माओंच्या धोरणावर टीका करण्यासाठी आहे असा जोडला गेला. कारण 'भविष्याप्रत हनुमान उडी' कार्यक्रमाच्या दरम्यान माओचें संरक्षणमंत्री पेंग ते हुआई यांनी माओंच्या कार्यक्रमावर टीका केली व अधिक सौम्य सुधारणांसाठी वादविवाद केला म्हणून त्यांस माओंनी पदावरून काढून टाकले होते.

९.९.५ सांस्कृतिक क्रांतीची सुरूवात :

वू हान यांच्या उपरोधीक नाटकावर प्रत्यूत्तर म्हणून माओच्या पत्नी चियांग चिंग यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली असलेल्या वृत्तपत्र 'वेन हुई पाओ' मध्ये जोरदार टीका करण्यात आली. फेब्रुवारी १९६६ मध्ये चियांग चिंग ने वू हान चे नाटक 'प्रतिक्रांतीवादी विषारी तृण' असल्याचे घोषित केले आणि माओंच्या धोरणांना विरोध करणाऱ्या इतर सांस्कृतिक हालचालींवर हल्ला करण्याचे आवाहन केले. एप्रिल १९६६ मध्ये लष्कराचे मुखपत्र 'जेईफंगजून बाओ' (Jeifangjun Bao-Liberation Army Daily) मध्ये 'सांस्कृतिक क्रांतीसाठी' चळवळ करण्याचे आवाहन प्रकाशित केले. मे १९६६ मध्ये त्यामध्ये अधिकच भर पडली आणि चीनच्या प्रतिष्ठीत पेकींग विद्यापीठाच्या तत्वज्ञान विभागाच्या प्राध्यापिका आणि साम्यवादी पक्षाच्या सचिव नीह युआन त्सू यांनी मध्यमवर्ग (Bourgeoisie or elite) किंवा उच्च वर्गाने पेकींग विद्यापीठावर नियंत्रण मिळवले आहे असे इशारा देणारी भीत्तीपत्रके लावली आणि सांस्कृतिक क्रांतीच्या सुरूवातीस पाठींबा दिला. या पत्रकामध्ये मध्यम

- उच्च वर्गावर सर्व बाजूंनी हल्ला करण्यात आलेला होता. माओंच्या आदेशाने हे पत्रक १ जून १९६६ रोजी राष्ट्रीय आकाशवाणीवर वाचले गेले.

माओंनी साम्यवादी पक्षाच्या मुखपत्रांमधील संपादकीयांद्वारे उच्च मध्यम प्रवृत्तींवर टीका करण्यास सांगितले. याद्वारे त्यांनी सांस्कृतिक क्रांतीची सुरूवात झाल्याचे दाखवले. काहींनी असे मत प्रादर्शित केले की, आता यापुढे दहा वर्षे तरी चीनमध्ये अनागोंदी आणि हिंसाचार धुमसत राहील.

९.९.६ लाल रक्षक (Red Guards) :

माओंच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून पेकींग मधील माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांनी 'लाल रक्षक' नावाने आपले गट स्थापन केले. माओंनी या गटांना मान्यताही दिली. त्यामुळे माध्यमिक शालेय व विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी संपूर्ण चीनमध्येच अशा प्रकारचे गट (Red Guards) स्थापन करण्यास सुरूवात केली. असे जवळ जवळ अकरा दशलक्ष 'लाल रक्षक' तयार झाले व त्यांनी सांस्कृतिक क्रांतीची धुरा सांभाळली. परंतु त्यामध्ये अगणित जीवित हानी झाली. कला, मंदिरे आणि चीनच्या सांस्कृतिक वारशाचे ठसे दाखविणारी सर्व प्रतिके (Symbols) नष्ट करण्यात आली. या विद्यार्थ्यांनी (Red Guards) शिक्षक, शाळा, प्रशासक आणि सरकारी नेते यांच्यावर कठोर टीका केली. १८ ऑगस्ट १९६६ रोजी तिएनानमेन चौकातील (पेकींग) जाहीर सभेमध्ये माओंना लक्षावधी लाल रक्षक येऊन मिळाले. शाळा बंद करण्याचे आदेश देण्यात आले आणि देशभरातून विद्यार्थीवर्ग माओंना भेटण्यासाठी, ज्यांची ते ईश्वराप्रमाणे पूजा करत होते, पेकींग येथे आले. शाळा व विद्यापीठे इ.स.१९६६-६९ दरम्यान बंद ठेवण्यात आली होती. माओंनी विद्यार्थ्यांना (१) जुने विचार - कल्पना (२) जुनी संस्कृति (३) जुन्या चालीरिती आणि (४) जुन्या सवयी या चार जुन्या कल्पनांना फेकून देण्याचे आवाहन केले.

९.९.७ बुद्धिवंत - विचारवंतांवर हल्ले (Attacks on intellectuals) :

मंदिरे, कलावुकसरीच्या वस्तू व वास्तू, पुस्तके, ग्रंथ (साहित्य) आणि जे जे काही पारंपारिक व परदेशी संस्कृतींशी निगडीत असेल ते सर्व विद्यार्थ्यांच्या लाल रक्षकांनी नष्ट केल्यामुळे चीनमध्ये अनागोंदी अराजक व कायदाउल्लघंन यांनी थैमान घातले होते. त्यांनी प्राध्यापक आणि इतर बुद्धिवंत - विचारवंत वर्गांच्या राहत्या घरी धाडी टाकल्या, त्यांचे पश्चिमी धाटणीचे कपडे ताब्यात घेतले किंवा नष्ट केले, पुस्तके व रंगचित्रे, कलेच्या वस्तू नष्ट केल्या. जहाल नेते आणि लाल रक्षकांनी कलाकार, लेखक आणि परकीयांशी संबंधितांचा अतोनात छळ केला. ज्यांना पकडले गेले होते त्यांच्यावर जाहीर टीका करण्यात आली, अपमानित करण्यात आले आणि शारीरिक छळ करण्यात आला. बुद्धिवंत वर्गामध्ये प्रसिद्ध लेखक लाओ शी (Lao she) आणि इतिहासकार वू हान यांनी लाल रक्षकांच्या छळाला कंटाळून एक तर आत्महत्या केली किंवा छळातच मेले. बऱ्याच जणांना

तुरूंगात डांबण्यात आले किंवा शारीरिक कामांना जुंपण्यात आले. पोलिस खाते व लष्कराला यामध्ये हस्तक्षेप न करण्याचे आदेश होते.

९.९.८ मवाळ सरकारी अधिकाऱ्यांविरूद्ध कार्यवाही:

५ ऑगस्ट १९६६ पासून सांस्कृतिक चळवळीची दिशा बदलण्यास सुरूवात झाली. माओंनी स्वतःच 'मुख्य ठाण्यावर हल्ला' (Bombard the Headquarters) या शीर्षकाने विधान केले. या विधानाद्वारे असे सूचित केले गेले की साम्यवादी पक्षामध्ये (CCP) सर्व पातळ्यांवर प्रतिक्रांतीवादी मध्यमवर्गीय धोरणे राबविणारे आहेत. त्यामुळे जहाल लाल रक्षकांनी मवाळ सरकारी अधिकाऱ्यांवर हल्ले करणास सुरूवात केली. माओंचा निवडलेला वारस आणि तत्कालीन चीनचा अध्यक्ष लीयो शाओ ची हा स्वतः एक मवाळ नेता होता. त्याच्या प्रत्यक्षवादी धोरणांमुळे त्याची गणती 'चीनमधील प्रथम क्रमांकाचा भांडवलशाहीचा पाठीराखा आणि माओंचा विश्वासघात करणारा' अशी केली गेली. इ.स.१९६९ मध्ये त्याचे तुरूंगातच निधन झाले. लिओ शाओ ची यांच्या धोरणांना पाठिंबा देणाऱ्या तेंग सियो पिंग सारख्यांना त्यांच्या पदावरून दूर करण्यात आले, तुरूंगात टाकले किंवा हद्दपार केले. माओंच्या सांस्कृतिक क्रांतीचा समर्थक व त्यांचा राजकीय वारस म्हणून इ.स.१९६९ मध्ये लष्करी नेता लीन पियाओ यास घोषित करण्यात आले.

९.९.९ लोक मुक्ति सेने तर्फे सुव्यवस्थेची पुनर्स्थापना:

सांस्कृतिक क्रांतीच्या ओझ्याखाली साम्यवादी पक्षाची संरचना कोलमडली आणि अनागोंदी व अराजक माजले. लोक मुक्ति सेना (People's Liberation Army) ही एकमेव शिस्तबद्ध संरचना देशामध्ये उरली होती. इ.स.१९६७ मध्ये हे अराजक व अनागोंदी आणि लाल रक्षक गटांनी सुरू केलेला सार्वत्रिक हिंसाचार याला आळा घालण्यासाठी आणि लाल रक्षक गटांमधील संघर्ष रोखण्यासाठी परिस्थिती नियंत्रणात आणणे गरजेचे होते म्हणून लोक मुक्ति सेनेला पाचारण करण्यात आले. इ.स.१९६७ ते १९६९ दरम्यान लाल रक्षक गटबाजीमध्ये आणि लाल रक्षक व लष्कर यांच्यातील चकमकींमध्ये हजारो लोकांचा बळी गेला. ही अनागोंदी नियंत्रणात आणण्यासाठी माओ आणि त्यांच्या समर्थकांनी बहुतेक सरकारी संस्था लोक मुक्ति सेनेच्या नियंत्रणाखालीच ठेवून दिल्या.

९.९.१० वर्गव्यवस्था शुद्धीकरणाची मोहिम (Campaign to Purify Class Ranks) :

'वर्गव्यवस्था शुद्धीकरणाची मोहिम' या नावाने माओंनी सांस्कृतिक क्रांतीचा नवा टप्पा सुरू केला. इ.स. १९६९ पासून सरकारी अधिकारी आणि बुद्धिवंत विचारवंत वर्गांना ग्रामीण भागामध्ये कष्टाची कामे करण्यासाठी आणि माओंचे तत्त्वज्ञान अभ्यासण्यासाठी पाठविण्यात आले. १६ ते १९ वयोगटातील तरुणांना शहरी भागातून खेड्यापाड्यात पाठविले व तेथे शेतकऱ्यांकडून शेतीची कामे शिकण्यास सांगितले. कुटुंबातील सदस्यांना एकमेकांपासून वेगळे करून हजारो मैल दूर पाठवून कष्टाची कामे करण्यास व खडतर

राहणीमान जगण्यास भाग पाडले. अनेक शहरी तरुण आपल्या राहत्या शहरांत परतण्याची परवानगी न मिळाल्यामुळे बरीच वर्षे खेड्यापाड्यांतच जीवन व्यतीत करीत होते.

९.९.११ 'अनवाणी वैद्य' (Barefoot Doctors) :

इ.स.१९७० च्या दशकाच्या सुरूवातीला माओ ने शहरी व ग्रामीण यांमधली आर्थिक तफावत दूर करण्याचे आपले उद्दिष्ट सुरू ठेवले. शहरी उच्च वर्गांची मुले ग्रामीण शेतकऱ्यांच्या मुलांमध्ये राहून काम करू लागली. शेतकरी, कामगार आणि सैनिक यांची मुले पुन्हा सुरू झालेल्या शाळांमध्ये जाऊ लागली आणि त्यांनी माओंचे कार्य आणि शेतकऱ्यांची कामे यांचा अभ्यास केला. हजारो विद्यार्थ्यांना थातूरमातूर प्राथमिक वैद्यकिय प्रशिक्षण दिले गेले आणि ते खेड्यापाड्यात 'अनवाणी वैद्य' (Barefoot Doctors) म्हणून जाऊ लागले. त्यांनी कोणत्याही वैद्यकीय सुविधा नसलेल्या खेड्यातील शेतकऱ्यांना मूलभूत औषधोपचार करून आरोग्य सवयी शिकवल्या. शहरी संस्कृतिच्या जागी नवीन क्रांतीकारी बॅले नृत्य, ऑपेरा नाटक आणि साहित्य निर्माण केले गेले व त्यातील बरेच साहित्य चियांग चिंग यांच्या आश्रयाने प्रदर्शित करण्यात आले. या नवीन साहित्यामध्ये शेतकरी वर्गाचा संघर्ष आणि अध्यक्ष माओ यांची स्तुती करण्यात आली होती.

९.९.१२ लीन पियाओ पायउतार आणि मृत्यू :-

ज्यावेळी सार्वत्रिक सुव्यवस्था आणि पक्षीय यंत्रणा पूर्वपदावर आल्यावर माओंना लष्कर व त्याचा सेनापती यांची आवश्यकता भासेनाशी वाटू लागली. त्यांनी मग लीन पियाओ ह्याचे अधिकार कमी करण्यास सुरूवात केली. माओ काय करतील याची खात्री नसल्यामुळे आणि सर्वोच्च सत्ता सोडण्याची इच्छा नसल्यामुळे लीन पियाओ माओविरोधी उघडपणे कारस्थाने करू लागला. त्या दोघांमधील सत्ता संघर्षामध्ये सप्टेंबर १९७१ मध्ये लीन पियाओस सत्तेतून पायउतार व्हावे लागले. तो आणि त्याच्या काही सहकऱ्यांनी विमानाद्वारे सोव्हिएत रशियाला पळून जाण्याचा प्रयत्न केला. परंतु बाह्य मंगोलियामध्ये त्यांचे विमान कोसळले आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला. या विमान अपघाताचे कारण अजूनही अज्ञात आहे.

९.९.१३ तेंग सियाओं पिंग यांचे पुनवर्सन :

सांस्कृतिक क्रांती दरम्यान हंगामी नियुक्ती असलेल्या अनेक सरकारी कर्मचाऱ्यांना माओंनी कामावरून काढून टाकले. माओंनी लीन पियाओ ह्याची उणीव भरून काढण्यासाठी व आपल्या कार्यास समर्थक वाढविण्यासाठी माओवादी सोडून इतरांना पक्षामध्ये व सरकारमध्ये आणण्याचे प्रयत्न सुरू केले. इ.स. १९७० च्या दशकात सांस्कृतिक क्रांतीदरम्यान ज्या लोकांवर गंभीर गुन्हे दाखल होते. त्यांनासुद्धा पक्षाच्या व सरकारच्या अख्त्यारित महत्त्वाच्या पदांवर घेण्यात आले. त्यांच्यापैकी सर्वांत महत्त्वाची व्यक्ती म्हणजे तेंग सियाओं पिंग, ह्याचे इ.स. १९७३मध्ये पुनर्वसन करण्यात आले.

इ.स.१९७५ मध्ये माओ त्से तुंग आणि चौ एन लाय हे दोघेही राज्यकारभाराचा वाढता व्याप सांभाळण्यास असमर्थ होते व ते आजारीसुद्धा झाले होते. त्यामुळे त्यांनी साम्यवादी पक्षाच्या वेंद्रीय समितीचे दैनंदिन काम पाहण्याची जबाबदारी तेंग सियाओ पिंग याच्याकडे सोपविली.

९.९.१४ 'चांडाळ चौकडीचा अंत' :

इ.स.१९७०च्या मध्यात सांस्वृतिक व्रांतीमधील अतिरेकी कारवाया काहीशा थंडावल्या होत्या. परंतु इ.स.१९७६ मध्ये माओंचा मृत्यु झाल्यावर देखील भाषण - लेखनामधून त्यांची नीती अजूनही काही प्रमाणात सुरूच होती. चियांग चिंग, ही माओंची पत्नी आणि तिची 'चांडाळ चौकडी' (Gang of Four) यांना त्याच वर्षी अटक करण्यात आली. त्यांच्या अटवेनंतर सांस्वृतिक व्रांतीचा शेवट झाला. इ.स. १९८१ मध्ये 'चांडाळ चौकडीच्या' सदस्यांवर त्यांच्या गुन्ह्यांबद्दल आरोप निश्चित करण्यात आले. एवढेच नाही तर तेंग सियाओ पिंग यांच्या नेतृत्वाखालील साम्यवादी राजवटीने अधिवृतरित्या 'सांस्वृतिक व्रांती'चा निषेध वेला.

९.९.१५ सांस्वृतिक व्रांतीचे परिणाम :

१) चीनी अर्थव्यवस्थेत मंदी :

सांस्वृतिक व्रांतीने चीनी समाजाच्या सर्वच स्तरांवर दूरगामी परिणाम वेले. इ.स.१९६६ ते १९६९ या अराजकाच्या काळात चीनच्या अर्थव्यवस्थेत मंदी निर्माण झाली नव्हे ती पूर्णपणे विस्कळीत झाली. ग्रामीण बाजारपेठांवर बंदी असल्यामुळे शेतकऱ्यांवर आपला माल राज्यासच विकण्याची सक्ती करण्यात आली. चीनने 'स्वावलंबना वर भर दिला होता, परकीयांची भीती आणि त्यांचा चीनी संस्वृती भ्रष्ट करण्यात हातभार यामुळे पश्चिमी देशांबरोबर आर्थिक सहकार्याची शक्यता नष्ट झाली. यामुळे आर्थिक मंदी आणि अलिप्तता निर्माण झाली. याउलट याच दरम्यान जपान, तैवान आणि दक्षिण कोरिया यांच्या अर्थव्यवस्थेने अधिकाधिक व उल्लेखनीय प्रगती वेली.

२) शिक्षणास शह :

सांस्वृतिक व्रांतीने शिक्षणास मोठा शह बसला. चीनमधील संपूर्ण तरुण पिढीचे शिक्षणच बरबाद झाले. फार मोठ्या प्रमाणात शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी 'लाल रक्षक' म्हणून भरती झाले आणि माओंसाठी व्रांतीमध्ये उतरले. इ.स.१९६६ रोजी महाविद्यालयीन प्रवेश परीक्षा ज्या रद्द वेल्या होत्या त्या इ.स.१९७७ पर्यंत सुद्धा सुरू झाल्या नव्हत्या. सांस्वृतिक व्रांती दरम्यान अमूल्य ग्रंथसाठा, कलाकसुरीच्या वस्तूसंग्रह नष्ट वेले गेले. लाल रक्षकांच्या हल्ल्यांमध्ये व हिंसाचारामध्ये चीनच्या प्रसिद्ध शाळा व महाविद्यालयातील विद्वान मरण पावले.

३) चीनी साम्यवादी पक्षाच्या प्रतिष्ठेचा ऱ्हास :

सांस्वृतिक व्रांतीमुळे चीनी साम्यवादी पक्षाची प्रतिष्ठा कमी झाली. पक्षाचे अस्थिर धोरण आणि उच्च पातळीवरील सत्ता संघर्ष यामुळे समाजाची सर्व पातळ्यांवर निराशा झाली. परंतु 'चीनी साम्यवादी पक्षाने' पुन्हा सत्तेवर नियंत्रण प्राप्त केले. तेंग सियाओं पिंग याने सुरू केलेल्या आर्थिक सुधारणांनी (१९८०-९०) सांस्वृतिक व्रांतीच्या खाणाखूणा पुसून टाकण्याचा प्रयत्न झाला.

एवढेच नव्हे तर, एके काळी 'महान कर्णधार' आणि 'लाल सूर्य' म्हणून वर्णिलेल्या नेत्यास सांस्वृतिक व्रांती दरम्यान झालेल्या चुकांमुळे अधिवृतपणे टीकेस सामोरे जावे लागले. परंतु अजूनही त्यांची जपानविरूद्ध युद्ध आणि यादवी युद्धात यशस्वी नेतृत्वाबद्दल स्तुती केली जाते. चीनी लोक खाजगी मध्ये जरी माओंबद्दल वाईट बोलत असले तरी आजही देशातील एक शक्तीशाली प्रभावी राष्ट्रीय नेता म्हणून त्यांची वाहवा केली जाते.

९.९.१६ आपली प्रगती तपासा :-

१) चतु:सफाई चळवळ काय आहे ?

२) वू हान ने कोणते नाटक लिहिले ?

_____

_____

_____

_____

९.१० समारोप

माओ त्से तुंग यांच्या नेतृत्वाखाली चीनचे लोक प्रजासत्ताक स्थापन झाले आणि त्यांनी प्रत्येक क्षेत्रात चीनमध्ये सुधारणा करण्याचे कार्यव्रम हाती घेतले. शेती क्षेत्राच्या पुनर्रचनेमध्ये जमीनदार वर्गाचे उच्चाटन करून परस्पर सहकारी समूह वृषी उत्पादक संघ, कम्युन्स इ. नवनवीन प्रयोग उत्पादन वाढीसाठी केले. औद्योगिक पुनर्रचनेमध्ये त्यांनी रशियाचे अनुकरण केले व 'वापर, निर्बंध व स्थित्यंतर' या धोरणाचा अवलंब केला. आर्थिक पुनर्रचनेसाठी चीनी लोक प्रजासत्ताक सरकारने पंचवार्षिक योजनासुद्धा राबविली. माओंनी 'शंभर फुले फुलू द्या' व 'भविष्याप्रत हनुमान उडी' सारखे कार्यव्रम राबविण्याचे अयशस्वी प्रयत्न केले. माओंच्या मते, सर्वांत महत्त्वाचा धोरणात्मक कार्यव्रम म्हणजे सांस्वृतिक व्रांती होय. या व्रांतीने जरी काही सकारात्मक बदल झाले असले तरी पक्षाची व माओंची व्यक्तिगत लोकप्रियता घटली व पुढे त्यांच्या मृत्यूनंतर व्रांतीचे खंडन केले गेले.

९.११ प्रश्न:

१) इ.स.१९४९ च्या साम्यवादी क्रांतीनंतर कृषि क्षेत्रातील पुनर्रचनेवर चर्चा करा.
२) माओंच्या नेतृत्वाखाली चीनमधील औद्योगिक पुनर्बांधणीचे परीक्षण करा.
३) 'भविष्याप्रत हनुमान उडी' (Great Leap Forward) यावर भाष्य करा.
४) सांस्कृतिक क्रांतीची कारणे सांगून त्याचे परिणाम स्पष्ट करा.
५) सांस्कृतिक क्रांतीची कारणे, व्याप्ती आणि परिणाम यांचा मागोवा घ्या.
६) टीपा लिहा.
अ) कम्युन्स
ब) 'शंभर फुले फुलू द्या.'
क) नेतृत्वसंघर्ष
ड) सांस्कृतिक क्रांतीचे परिणाम.

❖❖❖

१०

डेंग झायोपिंग युग - १

(इ.स.१९०४-१९९७)

(DENG XIAOPING ERA-I)

घटक रचना :

१०.० उद्दिष्टये
१०.१ प्रस्तावना
१०.२ डेंग झायोपिंगचा जीवन परिचय
१०.३ डेंग झायोपिंगचा पुर्नउदय
१०.४ डेंग झायोपिंग यांचा सुधारणा कार्यक्रम
१०.५ तिनानमेन स्क्वेअर हत्याकांड
१०.६ डेंग झायोपिंगची निवृत्ती व दक्षिण दौरा
१०.७ डेंग झायोपिंगचा मृत्यू आणि त्यांचे योगदान
१०.८ समारोप
१०.९ प्रश्न

डेंग झायोपिंगचा उदय आणि चीनचे नवे प्रशासन

१०.० उद्दिष्टये

१) माओ त्से तुंग नंतर चीनच्या राजकारणात डेंग झायोपिंगचा कसा उदय झाला याचा मागोवा घेणे.
२) चीनला महासत्ता बनवण्यासाठी डेंग झायोपिंगने चीनमध्ये केलेल्या सुधारणांचा अभ्यास करणे.
३) चीनच्या इतिहासात डेंग झायोपिंग यांच्या कारकीर्दीची देणगी म्हणून आढावा घेणे.

१०.१ प्रस्तावना

डेंग झायोपिंग (इ.स. १९०४-१९९७) हे प्रमुख चीनी क्रांतीकारक राजकारणी, कृतिशील समाजसुधारक आणि चीनी साम्यवादी पक्षाचे (CCP-Chinese Communist Party) एक नेते होते. डेंगनी कधीही चीनचा राज्यकारभार एक सत्ताधिश म्हणून किंवा प्रशासन प्रमुख म्हणून पाहिला नाही

तर इ.स. १९७९-१९९० दरम्यान त्यांनी चीनची एक 'कुशल कार्यवाह' म्हणून सेवा केली आणि प्रजासत्ताक साम्यवादी चीनला प्रगतीपथावर नेले.

डेंग झायोपिंग हे चीनमधील दुसऱ्या पिढीतील नेते असून माओ त्से तुंगच्या शासनाने जो काही चीनचा गाडा सांभाळला आणि त्या दरम्यान जे काही सामाजिक व संस्थात्मक पातळीवरील समस्या निर्माण झाल्या, उदा. सांस्कृतिक क्रांती आणि इतर राजकीय चळवळी यांच्यावर सकारात्मक उपाय करण्याची जबाबदारी डेंगवर आलेली होती. डेंग हे चीनमध्ये एक नवीन सामाजिक विचारप्रणालीची सुरूवात करणारे नेते होते. त्यांनी चीनच्या परिस्थिती संदर्भातील समाजवाद विकसित केला आणि आर्थिक सुधारणांच्याबाबतीत 'समाजवादी अर्थव्यवस्थेच्या' (Socialist Market Economy) तत्वाचा पुरस्कार करून हळूहळू चीन जागतिक बाजार पेठेशी जोडला. जगातील सर्वांत जलद गतीने विकास पावणारी बाजारपेठ म्हणजे चीनची बाजारपेठ याचे श्रेय डेंग यांना द्यावे लागले आणि त्यातच चीनी जनतेच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्याचे श्रेय सुद्धा त्यांनाच जाते. आर्थिक विश्लेषकांच्या मते, सामान्यपणे डेंग झायोपिंग यांची आर्थिक सुधारणा नीती म्हणजे साम्यवादी नीतीची आणि त्याअंतर्गत आर्थिक धोरणांची पुनरावृत्तीच असल्याचे दिसते.

१०.२ डेंग झायोपिंगचा जीवन परिचय

डेंग झायोपिंग यांचा जन्म २२ ऑगस्ट १९०४ रोजी सिचुआन प्रांतातील गुआंग जिल्ह्यात हक्का कुटुंबामध्ये झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण चीनमध्येच झाले. इ.स.१९१९ च्या उन्हाळ्यात डेंग चुंकींग प्रिपरेटरी शाळेतून पदवीधर झाले. त्यानंतर आपल्या ८० महाविद्यालयीन सहकाऱ्यांसोबत कार्य - अभ्यास करण्यासाठी डेंग फ्रान्सला गेले. त्या ठिकाणी त्यांनी अनेक नोकऱ्या केल्या. परंतु त्यामधून कसे बसे जगण्या एवढे उत्पन्न त्यांना मिळत होते. ते ज्या ठिकाणी कामे करत असत तेथील परिस्थिती अत्यंत धोकेदायक असल्यामुळे अनेक वेळा कामे करताना जखमी व्हायची पाळी येई. त्यामुळे डेंग यांचा नंतरच्या काळातील असा समज झाला की, भांडवलशाही समाजव्यवस्थेमुळेच फ्रान्समध्ये असताना हे सर्व घडू शकत होते.

फ्रान्समध्ये शिक्षणाबरोबरच काम करीत असताना डेंगवर इतर चीन विचारवंताबरोबर चौ एन लाय चा अधिक प्रभाव झाला. शिकत असतानाच त्यांनी मार्क्सवादाचा सखोल अभ्यास केला आणि त्याचाच राजकीय प्रचार केला. इ.स.१९२१मध्ये त्यांनी युरोपमधील चीनी साम्यवादी युवा संघाचे सदस्यत्व स्वीकारले. इ.स.१९२३ मध्ये त्यांनी चीनी साम्यवादी पक्षाचे सदस्यत्व घेतले आणि युरोपातील चिनी साम्यवादी युवा संघाचे महत्त्वाचे पदाधिकारी बनले. सोव्हिएत संघातील मास्कोमध्ये अभ्यास पूर्ण केल्यानंतर डेंग १९२६ च्या सुरूवातीस चीनमध्ये परतले.

१०.२.१ क्रांतीकाळामध्ये डेंग झायोपिंगची भूमिका :

चीनमध्ये परतल्यावर डेंगनी राजकारणात (प्रामुख्याने साम्यवादी पक्षाच्या) सक्रीय सहभाग घेतला. हळूहळू ते पक्षामध्ये वरच्या पातळीवर चढू लागले. लाँग मार्चच्या वेळी ते प्रमुख नेत्यांच्या रांगेत अग्रेसर होते आणि साम्यवादी पक्षाच्या वेंद्रीय समितीचे महासचिव म्हणून काम पाहात होते. जपानबरोबर युद्धाच्यावेळी त्यांनी अनेक मोहिमा आखल्या होत्या आणि यादवी युद्धावेळी चीनच्या राष्ट्रीय सैन्याविरूद्ध लढले होते. नोव्हेंबर १९४८च्या शेवटी सिचुआन प्रांतातील चँग वैं शेकच्या प्रत्यक्ष नेतृत्वाखाली असलेल्या राष्ट्रीय सरकारच्या सैन्याबरोबर त्यांनी निकराचा अंतिम लढा दिला. चुंकींग शहर साम्यवादी प्रजासत्ताक सैन्याच्या ताब्यात आले (१ डिसें. १९४८) आणि डेंग यांना चुंकींग शहराचे महापौर व राजकीय प्रमुख म्हणून नेमण्यात आले. चँग वैं शेकने आपले मुख्य ठाणे चुंकींगमधून हलवले आणि प्रादेशिक राजधानी चेंगडू या ठिकाणी ते पळून गेले. पुढे चीनी मुख्य भूमीतील शेवटचे शहर चेंगडूसुद्धा १० डिसेंबर १९४८ ला साम्यवादी प्रजासत्ताक सैन्याच्या ताब्यात आले आणि चँग वैं शेक सरळ तैवानला पळून गेले. इ.स.१९४९मध्ये जेव्हा साम्यवादी प्रजासत्ताक चीनची स्थापना झाली तेव्हा डेंग यांना नैऋत्य प्रांताचा पर्यषेक्षक आणि प्रथम सचिव म्हणून नेमण्यात आले.

१०.२.२ डेंग झायोपिंगचा राजकीय उदय:

डेंग झायोपिंग माओ त्से तुंगचा समर्थक असल्याने साम्यवादी प्रजासत्ताक चीन सरकारमध्ये त्यांना वेगवेगळ्या उच्च पदांवर काम करण्याची संधी मिळाली. इ.स.१९५७ मध्ये माओंनी जेव्हा साम्यवादी उजव्या-गटाविरोधी मोहिम राबविली तेव्हा डेंगनी अधिवृत्तारित्या माओंचे समर्थन वेले आणि ते साम्यवादी लोक प्रजासत्ताक पक्षाचे महासचिव झाले व चीनचे दैनंदिन कामकाज राष्ट्राध्यक्ष लिओ शाओ ची यांच्याबरोबर यशस्वीपणे चालवले. परंतु माओंच्या 'भविष्याप्रत हनुमान उडी' (Great Leap Forward) कार्यक्रमास हवे तेवढे यश आले नाही आणि त्यामुळे डेंग आणि लिओ शाओ ची यांचा चीनी साम्यवादी पक्षामध्ये प्रभाव अधिक वाढू लागला. त्यांनी आर्थिक सुधारणावर भर दिल्यामुळे पक्षात आणि जनतेमध्ये त्यांची प्रतिष्ठा अधिकाधिक वाढली. माओंच्या पारंपारिक जहाल आर्थिक धोरणांच्या जागी डेंग व लिओ यांनी अधिक वृतिशील आर्थिक धोरणांचा पुरस्कार वेला. इ.स. १९६१च्या ग्वांगझाऊ परिषदेमध्ये डेंगनी एक सुप्रसिद्ध विधान वेले ज्याद्वारे त्यांचे राजकीय तत्वज्ञान आपणास स्पष्ट होते. त्यामध्ये ते म्हणाले - "I don't care if it's a white cat or a black cat. It's a good cat so long it catches mice." ''मांजर काळी आहे की पांढरी आहे याची मला पर्वा नाही. पण जोपर्यंत ती उंदीर पकडते तो पर्यंत ती चांगली मांजर आहे.'' याचा अर्थ असा की, तुम्ही कोणत्याही तत्वज्ञानावर विश्वास ठेवा, मग ते साम्यवादी असेल वा भांडवलशाही असेल. त्यातून मिळणारे फलित किंवा उत्पादन क्षमता हे महत्त्वाचे आहे. त्यामुळेच माओंच्या तत्वज्ञानावर विश्वास ठेवताना किंवा समर्थन करताना आंधळा विश्वास नको तर त्यातून

सकारात्मक बदल, उत्पादन क्षमता, सुपरिणाम हेच महत्त्वाचे आहे असे डेंगच्या विधाना वरून स्पष्ट होते.

१०.२.३ सांस्कृतिक क्रांती आणि डेंग झायोपिंगचा छळ :

डेंग झायोपिंग आणि लिओंची साम्यवादी पक्षातील शक्ती वाढत होती व माओंना त्याची कूणकूण लागली होती. त्यांना असुरक्षित वाटू लागले आणि उभयतांपासून भितीही वाटू लागली. कारण आपण फक्त नावापुरतेच पक्षात राहू. म्हणून आपले सर्वोच्च स्थान आणि पक्षाच्या लोकांचा आपल्यावर ठाम विश्वास याचा पुर्नआढावा घेण्यासाठी तसेच आपले पारंपारिक जहाल आर्थिक सुधारणांचेच तत्वज्ञान कसे योग्य आहे हे जनतेला पुन्हा उजाळा देण्यासाठी तसेच पुनरूज्जीवनवाद्यांवर हल्ला करण्यासाठी माओंनी १९६६मध्ये सांस्कृतिक क्रांतीचा नारा दिला. त्यादरम्यान डेंग पूर्णपणे माओंच्या खात्रीतून उतरले आणि त्यांना सर्व शासकीय कार्यालयांतून पायउतार व्हावे लागले. त्यांना जियांग्सी प्रांतातील ग्रामीण भागातील झिंग्जीयन जिल्हा ट्रॅक्टर कारखान्यात सामान्य कामगार म्हणून काम करण्यास पाठवले. त्याठिकाणी काम करताना त्यांनी फावल्या वेळात लेखन करण्याचे काम केले. हे जरी असले तरी लिओ शाओ ची पेक्षा त्यांची अवस्था बरी होती.

सांस्कृतिक क्रांतीदरम्यान, डेंग आणि त्यांचे कुटुंबिय यांचा लाल सैन्यामार्फत छळ केला गेला. त्यांच्या मुलाला डेंग पुफांग याला तुरूंगात टाकले, त्याचा शारीरिक व मानसिक छळ केला आणि शेवटी चार मजली इमारतीच्या खिडकीतून त्याला बाहेर फेकून दिले त्यामुळे तो कायमचा जायबंदी (Paraplegic) झाला.

१०.२.४ डेंग झायोपिंगचे पुनरागमन :

डेंग सक्रीय राजकारणातून आणि पक्ष कार्यकारणीमधून जरी हद्दपार केले गेले होते तरीही त्यांनी अनेक चीनी नेत्यांमध्ये व जनतेमध्ये आपल्याविषयी सदिच्छा व संतुलन राखण्याचे काम केले होते. चौ एन लाय सारखा उच्च नेता जेव्हा कॅन्सरने आजारी झाला तेव्हा त्याने डेंगलाच आपल्या राजकीय वारस नेमले, माओंच्या सुद्धा ही गोष्ट गळी उतरवली आणि त्याला पुन्हा डेंगला राजकारणात बोलावण्यास मन वळविले. इ.स.१९७४ मध्ये डेंग चीनचे पहिलेच उपपंतप्रधान बनले आणि संपूर्ण चीनचा दैनंदिन कारभार पाहू लागले.

१०.२.५ डेंग विरूद्ध चांडाळ चौकडी (‘Gang of Four’) :

चीनचा प्रथम उपपंतप्रधान झाल्यानंतर डेंगनी चीनची आर्थिक पुर्नरचना करण्यावर लक्ष केंद्रीत केले आणि उत्पादनात वाढ होण्यासाठी देशातील एकजूट अत्यंत महत्त्वाची आहे यावर त्यांनी भर दिला. तरीसुद्धा निदान कागदावर तरी माओंच्या विचारप्रणालीचे उल्लंघन होणार नाही याची त्यांनी खबरदारी घेतली. अजूनही सांस्कृतिक क्रांती संपलेली नव्हती आणि चीनी

साम्यवादी पक्षामध्ये सत्ता संघर्षासाठी एक चांडाळ चौकडी (Gang of four) ज्या मध्ये माओंची पत्नी जियांग चिंग नेतृत्व करीत होती, गुप्तपणे कार्यरत होती. ही चौकडी 'परंपरावादी जहाल डावा राजकीय गट' म्हणूनही प्रसिद्ध होती. या चौकडीला डेंग हेच सर्वांत मोठे स्पर्धक असल्याचे समजले. माओंना सुद्धा डेंग विषयी संशय होता. कारण माओंच्या मते, सर्वात महत्त्वाचे धोरण की जी सांस्कृतिक क्रांती आहे त्याचे सर्व सकारात्मक परिणामांना डेंगच्या धोरणांमुळे खिळ बसेल. इ.स.१९७५च्या शेवटी माओंनी डेंगना स्वत:च्या धोरणांवर टीका करण्याची मालिका चालवण्यास सांगितले. डेंगनी आपण जे करत आहोत ते राज्य व पक्षाच्या दृष्टीने योग्य नाही आणि दहशतीमुळे करत आहोत तरीही त्याला आपली धोरणे चुकीची असल्याचे कबूल करावे लागत होते. डेंगचा चांडाळ चौकडीला विरोध पुढे पुढे अधिक स्पष्ट झाला आणि माओंनी मात्र त्या चौकडीचेच समर्थन केले. माओंनी नंतर डेंगची स्वत:च्या धोरणांवरील टीका स्वीकारण्यास नकार दिला आणि साम्यवादी पक्षाच्या केंद्रीय समितीला डेंगच्या चुकांची सखोल चर्चा करण्यास सांगितले.

१०.२.६ डेंग झायोपिंगचा दुसऱ्यांदा छळ

जानेवारी १९७६ मध्ये चौ एन लाय चा मृत्यू झाल्यानंतर पक्षाच्या केंद्रीय समितीमध्ये डेंगना कोणीही पाठीराखा उरला नाही. माओंचा पूर्ण पाठींबा असल्यामुळे चांडाळ चौकडीने 'डेंगवर टीका करा आणि उजव्या गटाच्या पुर्नवसन धोरणांना विरोध करा' अशी मोहिमच उघडली. चौ एन लाय यांनी जरी आपला पंतप्रधान पदाचा वारस डेंग झायोपिंग व्हावा असे म्हटलेले असले तरी चांडाळ चौकडी डेंग ऐवजी गुओफेंगच पंतप्रधान होईल याची काळजी घेत होती. साम्यवादी पक्षाच्या केंद्रीने समितीने एक उच्च प्राधान्य पातळीवर निर्देश दिले आणि डेंग झायोपिंगना अधिकृतरित्या परराष्ट्र मंत्रालय सांभाळण्यास सांगण्यात आले. प्रत्यक्ष हा डाव त्याला सत्ता स्पर्धेतून डच्चू देण्यासाठीच होता. त्यानंतर डेंग काही महिनेच घरीच थांबले. गेल्या काही वर्षापासून डेंगनी सुरू केलेल्या आर्थिक सुधारणा कार्यक्रमाला त्यांच्या गैरहजेरीमध्ये फार मोठा शह बसला. मार्च १९७६ रोजी माओंनी काही अधिकृत निर्देश दिले की, सांस्कृतिक क्रांती हीच योग्य आहे आणि विशेषत: डेंग झायोपिंग हे त्यातील अंतर्गत अडथळा आहे. त्यामुळे पक्षाच्या केंद्रीय समितीने सर्व प्रादेशिक समित्यांना माओंच्या निर्देशांवर विचारविनिमय व्हावा आणि डेंग झायोपिंगवर टीका करण्यात यावी असे निर्देश दिले. थोड्याच कालावधीमध्ये डेंग झायोपिंगवर 'प्रतिक्रांतीवादी' असा शिक्का मारला गेला आणि त्यांना पक्षाच्या सदस्यत्वाव्यतिरिक्त सर्व प्रकारच्या राजकीय व प्रशासकीय पदांपासून वंचित करण्यात आले.

१०.२.७ आपली प्रगती तपासा :-

१) डेंग झायेपिंग आपल्या ८० सहकाऱ्यांसमवेत कोणत्या देशात गेले होते ?

२) डेंग झायेपिंग यांनी ग्वांगझाऊ परिषदेमध्ये कोणते विधान केले ?

१०.३ डेंग झायोपिंगचा पुर्नउदय

दुसऱ्यांदा हकालपट्टी (छळ) झाल्यावर, १९७६ मध्ये माओंचा मृत्यु झाल्यानंतर डेंगना हे हळूहळू चीनच्या राजकारणात निर्विवाद नेते म्हणून पाय रोवू लागले. माओंच्या मृत्युपूर्वी 'डेंग हे चीनचे फक्त उपपंतप्रधान होते. त्यांनी पुढे हळूहळू आपले समर्थक निर्माण करीत पक्षामध्ये महत्त्वाचे स्थान निर्माण केले आणि माओंनी नेमलेला वारस गुओफेंग याला हळूहळू राजकीय शह देत १९८०मध्ये पंतप्रधान पदावरून दूर करण्यात यश मिळविले. या पूर्वीच्या नेत्यांच्या धोरणांऐवजी डेंगने गुओफेंगला केंद्रीय समिती मध्ये सदस्य म्हणून ठेवले. यामागे गुओफेंग आपल्या उच्च पदावरून पायउतार झाल्यामुळे बदला घेऊ नये म्हणून डेंगने ही खबरदारी घेतली होती.

१०.३.१ डेंगचे सत्ता दृढीकरण / सत्ता स्थिरीकरण :

चीनचा सर्वोच्च नेता म्हणून पुर्नउदय झाल्यानंतर डेंग झायोपिंगने आपले सत्तास्थान बळकट करण्यासाठी चतुराईने पावले उचलली. सर्वप्रथम त्यांनी सांस्कृतिक क्रांती ही आपली नव्हती तर ती माओंची होती असे म्हटले आणि इ.स. १९७७ मध्ये त्यांनी सांस्कृतिक क्रांतीदरम्यान जे काही अत्याचार आणि छळ जनतेला सहन करावा लागला त्याविरूद्ध जनतेला आपला राग खुलेपणाने व्यक्त करता यावा म्हणून 'बिजिंग स्पिंग'ची सुरूवात केली. दरम्यान डेंगनी (Class Background System) सुप्रसिद्ध 'वर्ग पार्श्वभूमी पद्धती' रद्द केली. त्या पद्धती अंतर्गत जे चीनी पूर्वीच्या जमिनदार वर्गाशी जोडले गेलेले होते त्यांना शासनामध्ये कोणत्याही प्रकारची नोकरी किंवा काम करण्यास मनाई केली गेली होती. डेंगनी ही मनाई रद्दच केल्यामुळे चीनी भांडवलदार वर्ग मोठ्या प्रमाणात साम्यवादी पक्षाला मिळाला.

डेंगनी हळूहळू आपल्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांना नामोहरम केले. त्यांनी 'सांस्कृतिक क्रांती' दरम्यान झालेल्या अत्याचारांविरूद्ध जनतेला खुलेआम टीका करण्यास प्रोत्साहन दिल्यामुळे आपोआपच शासनामध्ये जे लोक सांस्कृतिक क्रांतीचे साक्षीदार व समर्थक होते त्यांचे स्थान डळमळीत होऊ लागले आणि त्याचवेळी डेंग आणि त्यांचे समर्थक की ज्यांना त्या वेळी छळ सहन करावा लागला होता यांचे स्थान बळकट होत होते. आपल्या या उदार नीतीमुळे डेंग झायोपिंगची लोकप्रियता चीनमध्ये दिवसेंदिवस वाढत चालली होती व पाठींबाही वाढत चालला होता.

हळूहळू डेंग झायोपिंगनी चीनच्या साम्यवादी पक्षावर (CCP) आपले नियंत्रण वाढवले तसे त्यांनी हुआ गुओफेंगला इ.स. १९८० मध्ये बदलले आणि त्याच्या जागी झाओझियांग यांना पंतप्रधान नेमले व हु याओबांग याला १९८१ मध्ये पक्षप्रमुख म्हणून नेमले. डेंगकडे पक्षातील कोणतेही महत्त्वाचे पद नसले तरी पक्षामध्ये त्यांचा अत्यंत प्रभाव होता. इ.स.१९८७ मध्ये त्यांच्याकडे फक्त राज्यखात्याचा आणि साम्यवादी केंद्रीय लष्करी आयोगाचा प्रमुख हा कार्यभार होता.

डेंग झायोपिंगना चीनच्या राजकारणात व जनमानसात क्रमांक एकचे स्थान मिळणे म्हणजे माओ त्से तुंग आणि त्यांची नीती व राजकारण याचे सिंहावलोकन करणे गरजेचे होते. ज्याप्रमाणे डेंगना आपल्या प्रत्यक्ष सुधारणा अंमलात आणावयाच्या होत्या त्यासाठी माओंची कट्टर 'वर्ग-संघर्ष' नीती आणि सार्वजनिक लोक चळवळी चालू ठेवणे अत्यंत अव्यवहार्य होते. इ.स.१९८२ मध्ये चीनी साम्यवादी पक्षाच्या केंद्रीय समितीने एक ऐतिहासिक पत्रक काढले. त्याचे शीर्षक 'प्रजासत्ताक चीनच्या स्थापनेपासून चीनमधील वेगवेगळे ऐतिहासिक प्रश्न' ("On the Varions Historical Issues Since the Founding of the People's Republic of China") असे होते. या ऐतिहासिक पत्रकातील आशयानुसार माओ त्से तुंगचे चीनमधील ''थोर मार्क्सवादी कामगार क्रांतीकारी, लष्करवादी आणि सरसेनापती'' असलेले स्थान, तसेच देशाचा निर्विवाद संस्थापक आणि पिपल्स लिबरेशन आर्मीचा संस्थापक व आधुनिक चीनचा अग्रदूत म्हणून असलेल्या प्रतिष्ठेचा उल्लेख केला गेला. त्या पत्रकाद्वारे माओंना 'सांस्कृतिक क्रांती'च्या प्राथमिक जबाबदारीतून मुक्त केले गेले आणि त्याचे खापर 'चांडाळ चौकडी' (Gang of Four) आणि लिन बियाओ यांच्यावर फोडण्यात आले.

१०.३.२ परराष्ट्र संबंधामध्ये सुधारणा :

आपले राजकीय स्थान बळकट केल्यानंतर डेंग झायोपिंगनी चीनचे परकीय संबंध, विशेषत: पाश्चिमात्य देशांशी संबंध सुधारण्याचे काम हाती घेतले. त्यांनी अनेक पाश्चिमात्य देशांना भेटी दिल्या, त्यांच्या राष्ट्रप्रमुखांशी, शासन प्रमुखांशी शांतीपूर्ण चर्चा केल्या. इ.स.१९७९ मध्ये अमेरिकेस भेट देऊन व्हाईट हाऊस मध्ये अमेरिकन अध्यक्ष जिमी कार्टरबरोबर चर्चा करणारे ते पहिले चीनी नेते ठरले. अमेरिकेने डेंग यांच्या भेटीच्या काही काळ अगोदरच राष्ट्रीय प्रजासत्ताक चीनबरोबरचे (तैवान) आपले परराष्ट्र संबंध तोडले होते आणि नव्याने साम्यवादी प्रजासत्ताक चीनबरोबर ते स्थापन केले.

डेंग झायोपिंग यांची महत्त्वपूर्ण कामगिरी म्हणजे १९ डिसेंबर १९८४ मध्ये इंग्लंड आणि चीनमध्ये एक करार झाला. त्या करारान्वये असे ठरले की, इ.स.१९९७ मध्ये साम्यवादी प्रजासत्ताक चीनला हाँगकाँगचा ताबा दिला जाईल. यावर एकमत झाले. जेव्हा इंग्लंडचा नवीन प्रदेशांवरील ९९ वर्षे भाडे करार संपुष्टात येण्याच्या मार्गावर होता, त्यावेळी डेंग झायोपिंग यांनी असे आश्वासन दिले की, पुढील ५० वर्षे चीन हाँगकाँगच्या भांडवलशाही पद्धतीमध्ये कोणताही हस्तक्षेप करणार नाही. त्यामुळे ह्या कराराची संभावना 'एक देश-दोन राज्यपद्धती' अशी केली गेली. तशाच प्रकार एका करारावर डेंग यांनी मकाऊ वसाहती परत देण्यासाठी पोर्तुगालबरोबर स्वाक्षरी केली.

डेंग झायोपिंग यांच्या पुढाकारामुळे चीन-जपान संबंध सुद्धा चांगल्या प्रकारे सुधारले. चीनमध्ये दूरगामी आर्थिक सुधारणा करण्यासाठी जपान हे एक आदर्श राष्ट्र असल्याचे डेंग यांचे मत होते. तरीसुद्धा डेंग यांनी सोव्हिएत

युनियन बरोबर चीनचे संबंध सुधारण्याच्या दृष्टीने कोणतीही पावले उचलली नाहीत.

१०.४ डेंग झायोपिंग यांचा सुधारणा कार्यक्रम

परराष्ट्र संबंध सुधारण्याच्या नीतीबरोबरच डेंग यांनी कुशल सुधारणा कार्यक्रम विशेषत: अंतर्गत सामाजिक, राजकीय आणि खास करून आर्थिक कार्यक्रम हाती घेतला. डेंग झायोपिंग यांचा सुधारणा कार्यक्रम 'चतुरस्त्र आधुनिकीकरण' म्हणून प्रसिद्धी पावला. त्यात प्रामुख्याने शेती, उद्योग, विज्ञान - तंत्रज्ञान आणि लष्करी आधुनिकीकरण या चार सुधारणांचा समावेश होता. चीनला आधुनिक, उद्योग प्रधान राष्ट्र बनवण्यासाठी जी नीती अवलंबिली होती ती 'समाजवादी अर्थव्यवस्था' म्हणून प्रसिद्ध झाली. यासाठी डेंग झायोपिंगनी असा युक्तिवाद केला की, चीन हे राष्ट्र समाजवादाच्या प्राथमिक अवस्थेत असून पक्षाचे हे कर्तव्य आहे की, प्रसिद्ध समाजवादाची फलश्रुती आणि पूर्तता चीनी देशाच्या वैशिष्ट्यांनुसार करावी आणि वास्तववादी सत्याचा विचार करावा. त्यामुळे मार्क्सवादाला एक 'चीनी समाजवाद' असे परिमाण प्राप्त झाले आणि त्याचा उपयोग आर्थिक निर्णयक्षमता व अवलंबित नितीची परिणामकारकता सिद्ध करण्यासाठी करण्यात आला.

डेंग झायोपिंगच्या मते, 'समाजवाद म्हणजे गरीबी वाटून घेणे नव्हे' किंवा 'गरीबीचे विकेंद्रीकरण नव्हे.' ("Socialism does not mean shared poverty.") त्यामुळे त्यांचे सैद्धांतिक स्पष्टीकरण आपणास पुढीलप्रमाणे करता येते. - ''नियोजन आणि बाजारपेठेतील कारक शक्ती हे समाजवाद व भांडवलशाही यामधील फरक होऊ शकत नाही. त्यामुळे आर्थिक नियोजन हीच केवळ समाजवादाची व्याख्या होऊ शकत नाही. कारण भांडवलशाहीमध्ये सुद्धा आर्थिक नियोजन असते आणि आर्थिक नियोजन हे समाजवादामध्ये सुद्धा असतेच. नियोजन आणि बाजारपेठेतील कारक शक्ती हे आर्थिक प्रक्रीयांना नियंत्रणात ठेवण्यासाठी आवश्यक असते.'' पुढे डेंग आपल्या मतांसाठी आधार देताना म्हणतात, - ''भांडवलशाही देशांमध्ये अंमलात असलेल्या प्रगत व्यवस्थापकीय पद्धतीचे आपण अनुकरण करण्यास घाबरता काम नये. ..... समाजवाद आणि आर्थिक बाजारपेठ हे एकमेकांशी विसंगत नाहीत.... आपल्या विरोधी गटाच्या (उजवा गट) मतांचा विचार करावाच लागेल. परंतु आपल्या स्वत:च्या मतांचा आपल्याला सर्वांत प्रथम विचार करावा लागेल.'' हुआ गुओपेंग याच्या उलट डेंग झायोपिंग यांच्या मते, एखादी नीती किंवा योजना माओ त्से तुंगच्या आदर्शाशी किंवा विचारांशी जुळत नाही म्हणून चांगली असूनही तिचा अस्वीकार करणे अयोग्य आहे.

डेंग झायोपिंग यांनी जरी वैचारिक आणि सैद्धांतिक पार्श्वभूमी चीनच्या आर्थिक सुधारणा कार्यक्रमासाठी तयार केली असली तरीही काही इतिहासकारांच्या मते, थोड्याफार आर्थिक सुधारणा डेंग यांच्या स्वत:च्याच

डोक्यातून निघालेल्या होत्या. डेंग झायोपिंगच्या बरेच अगोदर चीनी पंतप्रधान चौ एन लाय यांनी 'चतुरस्त्र आधुनिकरणाची' संकल्पना मांडली होती. त्यातच स्थानिक नेत्यांनी केलेल्या सुधारणा नेहमीच केंद्र शासनाने मंजुर केलेल्या नव्हत्या. या सुधारणांचे यश पाहता, त्यांचे अनुकरण विस्तीर्ण प्रदेशांमध्ये करण्यात आले आणि राष्ट्रीय स्तरावर त्यांची अंमलबजावणी करण्यात आली. त्यातील बऱ्याच सुधारणा या पूर्व आशियाई देशांमधून घेण्यात आल्या होत्या.

डेंग झायोपिंगच्या सुधारणांमध्ये केंद्रीकृत नियोजन - व्यवस्थापन, दीर्घ-आर्थिक विकास, तांत्रिकदृष्ट्या कार्यकुशल नोकरवर्ग आणि माओंची आर्थिक पुनर्बांधणीसाठी जनचळवळ यांचा अभाव ही प्रमुख वैशिष्ट्ये होती. तरीसुद्धा सोव्हिएत युनियनच्या उलट बाजारपेठ तंत्रप्रणाली द्वारे प्रत्यक्ष व्यवस्थापन केलेले होते.

माओ त्से तुंगच्या धोरणांपासून फारकत घेतली असली तरी डेंग यांनी शेती उत्पादनावर भर दिला आणि ग्रामीण आर्थिक संघ व व्यक्तिगत कृषक गृह बनवण्यासाठी निर्णय प्रक्रीयेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी प्रोत्साहन दिले. स्थानिक पातळीवर, राजकीय आवाहनांपेक्षा डेंगनी भौतिक प्रेरकांवर कामगार शक्ती वाढवण्यासाठी भर दिला. त्यामुळे शेतकऱ्यांना जादा उत्पन्न मिळवणे, आपला खाजगी माल मुक्त बाजारपेठेत विकणे इ. बाबींचा समावेश होता.

डेंग यांनी बाजारपेठ विभाजन करण्यासाठी स्थानिक नगरपरिषदांना आणि प्रांतांना आपल्या अधिक फायदेशीर उद्योगांमध्ये गुंतवणूक करण्यास परवानगी दिली त्यामुळे लघु उद्योगाला उत्तेजन मिळाले. अशाप्रकारे डेंग झायोपिंगच्या सुधारणांनी चीनची विकास नीती हलक्या उद्योगांवर भर देणे आणि निर्यात योग्य वाढ येथपर्यंत पोहोचली. निम्न भांडवल असलेल्या देशांना आर्थिक विकासाकडे नेण्यासाठी हलक्या उद्योगातील उत्पादन अत्यंत महत्त्वाचे ठरते. अल्प कालावधी, निम्न भांडवली गरजा, आणि उच्च परकीय चलन मिळकत, हलक्या उद्योगांतील उत्पादनापासून मिळविलेला महसूल आपल्याला दुसऱ्या उद्योगामध्ये पुनर्गुंतवणूक करण्यास व अधिक प्रगत तंत्रज्ञानाचे उत्पादन करण्यास आणि भांडवली खर्च आणि गुंतवणूक करण्यास सहाय्यभूत ठरतो.

जड उद्योगांमध्ये गुंतवले जाणारे भांडवल हे बँकांकडून व तेही जनतेच्या बचतींद्वारेच गुंतवावे लागते. डेंगच्या सुधारणांचा सर्वात पहिला मुद्दा म्हणजे नफ्याची विभागणी टाळणे होय. ज्यामुळे कोणतेही कर व बँकेचा हप्ता द्यावा लागणार नाही. म्हणूनच, सार्वजनिक (State-Owned) उद्योगातील नफ्याची विभागणी प्रत्यक्ष होत नव्हती कारण त्यामुळे सरकारची त्यामध्ये ढवळाढवळ राहात नव्हती. थोडक्यात, डेंगच्या सुधारणांमुळे चीनमधील औद्योगिक क्रांतीलाच सुरूवात झाली.

ह्या सुधारणा माओंच्या आर्थिक स्वावलंबन धोरणाच्या पूर्णपणे उलट होत्या. चीनने आर्थिक सुधारणांचा वेग वाढवण्याचे ठरवले. त्यासाठी व्यापाराचे क्षेत्र वाढवणे, विशेषत: जपान आणि पाश्चिमात्यांमधून यंत्रे खरेदी करण्यात आली. या निर्यात - योग्य आर्थिक वाढीचा परिणाम म्हणून चीन 'चतुरस्त्र आधुनिकीकरणांकडे' वाटचाल करू लागला. त्यामुळे परकीय चलनसाठा वाढला, बाजारपेठ, प्रगत तंत्रज्ञान आणि व्यवस्थापकीय अनुकरण यामुळे आर्थिक विकासाचा वेग वाढू लागला. डेंग झायोपिंगने 'विशेष आर्थिक क्षेत्रांची (Special Economic Zones)' मालिका उघडून परकीय गुंतवणूकदारांना चीनमध्ये गुंतवणूकीसाठी आकर्षित केले व त्यांना खुल्या बाजारपेठा उपलब्ध करून दिल्या.

डेंगच्या या आर्थिक सुधारणांचा भर कामगारांची उत्पादन क्षमता वाढवण्यावरही होता. कामगारांसाठी नवीन भौतिक प्रेरके आणि बक्षिसांची (Bonus) योजना केली गेली. शेतकऱ्यांचे स्थानिक शेतीउत्पादन विक्री करण्यासाठी आणि त्यांचे अतिरिक्त उत्पादन विकत घेण्यासाठी स्थानिक बाजापेठा आणि कम्युन्सचे पुनरूज्जीवन करण्यात आले. त्यामुळे ग्रामीण बाजारपेठांनी कृषि उत्पादनामध्ये वाढ तर झालीच परंतु त्याने औद्योगिक विकासालाही चालना मिळाली. शेतकऱ्यांना आपले अतिरिक्त उत्पादन खुल्या बाजारपेठेत अधिक नफ्यासाठी विकता येऊ लागले त्यामुळे लोकांची क्रयशक्ती वाढली आणि औद्योगिक विकासाला उत्तेजन मिळून आर्थिक सुधारणांना राजकीय पाठींबा सुद्धा मिळत गेला.

१०.४.१ आपली प्रगती तपासा :-

१) 'बिजिंग स्पिंग' म्हणजे काय ?

२) इ.स.१९८४ च्या इंग्लंड - चीन करारान्वये काय ठरले ?

३) 'चतुरस्त्र आधुनिकीकरणामध्ये' कोणती चार क्षेत्रे येतात ?

_____

_____

_____

_____

१०.५ तिनानमेन स्क्वेअर हत्याकांड

तिनानमेन स्क्वेअर आंदोलनाची परिणती एका मोठ्या हत्यांकांडात झाली. त्याचा चीनच्या संदर्भात 'चार जूनची घटना' म्हणून उल्लेख केला जातो. कारण दोन वेळा तिनानमेन स्क्वेअर आंदोलने झाली होती, त्यातील एक ५ एप्रिल आणि दुसरे ४ जून १९८९ रोजी. ही दोन्ही आंदोलने मुख्यत: बिजिंगच्या विद्यार्थ्यांनी आणि बुद्धीवादी गटाने केलेली होती. ही आंदोलने ज्या वर्षी बऱ्याच देशांतील साम्यवादी सरकारे कोसळली त्याच वर्षी झाली होती.

तिनानमेन स्क्वेअर आंदोलने होण्याचे कारण म्हणजे डेंग झायोपिंगचा पाठींबा असलेला हु याओबांग ह्या आर्थिक बाजारपेठ आणि लोकशाही समर्थक सुधारणावादी अधिकाऱ्याची हत्या होती आणि आंदोलक त्याबाबत आपला शोक व्यक्त करू इच्छित होते. हु याओबांगच्या प्रेतयात्रेमध्ये संध्याकाळच्या वेळी तिनानमेन स्क्वेअर या ठिकाणी जवळजवळ एक लाखाच्या आसपास लोक जमा झाले. या प्रेतयात्रेत जमलेल्या लोकांची मागणी सामान्यपणे शासनाच्या एकाधिकारशाही विरूद्ध होती आणि त्यांनी आर्थिक बदल व शासनांतर्गत लोकशाही सुधारणा करण्याची मागणी केली. परंतु त्यांना निश्चित असा कार्यक्रम नव्हता किंवा त्यांच्या आंदोलनाला बळकट नेतृत्वही लाभलेले नव्हते. हे आंदोलन मुख्यतः बिजिंगमधील तिनानमेन स्क्वेअर भोवती केंद्रीत झालेले होते. तरीही त्याचे पडसाद चीनमधील शांघायसहित इतरही शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात उमटले.

या आंदोलना दरम्यान डेंगचे बाजारपेठ समर्थक मित्र आणि साम्यवादी पक्षाचे महासचिव झाओ झियांगने आंदोलकांना पाठिंबा जाहीर केला आणि पक्षाच्या पोलिट ब्युरोपासून स्वतः दूर झाले. २० मे १९८९ रोजी कट्टर समाजवादी लि पेंग यांनी लष्करी कायदा लागू केला परंतु ४ जून १९८९ पर्यंत कोणतीही कारवाई झाली नाही. ही चळवळ ७ आठवडे चालू होती. पिपल्स लिबरेशन आर्मीचे सैन्य आणि रणगाडे तिनानमेन स्क्वेअर या ठिकाणी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी ४ जून रोजी पाठविण्यात आले. या लष्करी कारवाईने अनेक आंदोलक नागरिक ठार झाले तर अनेकजण जखमी झाले. आंदोलनाला हिंसक वळण प्राप्त झाल्याने सरकारने आंदोलन आणि त्यांचे समर्थक यांची धरपकड करून तुरूंगात टाकण्याची मोहिम चालविली. तिच कारवाई इतर शहरातही करण्यात आली. परदेशी प्रसारमाध्यमांना चीनमध्ये बंदी घातली गेली आणि चीनी माध्यमांवर सुद्धा कोणतेही वृत्त व दृश्य प्रसारित करण्यास बंदी घातली.

बिजिंग मधील सामान्य जनतेला वाटले की, डेंग झायोपिंगनेच हे लष्करी कारवाईचे आदेश दिले. परंतु राजकीय विश्लेषकांना सुद्धा या पाठीमागे कोण होते याचा शोध लागला नाही. तरीसुद्धा डेंग यांच्या मुलाने आपल्या वडीलांच्या आदेशामुळेच ही कारवाई झाली याचे समर्थन केले. तिनानमेन आंदोलकांच्या हितचिंतकांचा छळ करण्याच्या दृष्टीने चीनी साम्यवादी पक्षाने दीड वर्षे उजव्या चळवळी - विरोधी कार्यक्रमाप्रमाणेच कार्यक्रम राबवला. या कार्यक्रमाचा उद्देश प्रतिष्ठीतांच्या उदारीकरणाच्या पक्षांतर्गत प्रवृत्तींविरोधात कठोर कारवाई करणे हा होता आणि त्यासाठी ३०००० पेक्षा जास्त साम्यवादी अधिकाऱ्यांची नेमणूक केली गेली होती.

झाओ झियांग यास कट्टर समाजवाद्यांनी नजरकैदेत टाकले आणि डेंग झायोपिंगना सुद्धा सुधारणा विरोधी साम्यवाद्यांना काही प्रमाणात सवलती देण्यास भाग पाडले. डेंग झायोपिंगनी खाजगीमध्ये कॅनडाच्या पंतप्रधानांना सांगितले की, साम्यवादी पक्षातील गटाने सैन्यातील काही गटांवर नियंत्रण

केले असून कदाचित चीनमध्ये यादवी युद्ध उसळण्याची शक्यता आहे. पुढे दोन वर्षांनी डेंगनी शांघाय शहराचा महापौर झू रोंगजी यास उपपंतप्रधान म्हणून मान्यता दिली. कट्टर समाजवादांचा दबाव असतानासुद्धा शांघाय येथील आंदोलनादरम्यान झू रोंगजी यांनी शांघायमध्ये लष्करी कायदा लागू करण्यास विरोध केला होता.

१०.६ डेंग झायोपिंगची निवृत्ती व दक्षिण दौरा

इ.स.१९८९ मध्ये केंद्रीय लष्करी आयोगाच्या प्रमुखपदावरून पायउतार झाल्यावर डेंगनी अधिकृतरित्या कोणत्याही उच्चपदापासून निवृत्ती घेण्याचे ठरवले आणि इ.स.१९९२ मध्ये ते निवृत्त झाले. तरीही अजूनही डेंग झायोपिंग युगाचा चीनच्या राजकारणात प्रभाव कायम होता. ते आजही पडद्याआड चीनच्या राजकारणात एक सर्वोच्च प्रभावशाली नेते होतेच. डेंग झायोपिंगना अधिकृतरित्या ''चीनच्या आर्थिक सुधारणा आणि चीनच्या समाजवादी आधुनिकीरणाचा मुख्य शिल्पकार'' म्हणून मान्यता मिळाली. साम्यवादी पक्षाच्या मते उतारवयात निवृत्त होण्याऐवजी पक्षामध्ये मरेपर्यंत पदे भोगणाऱ्यासाठी एक उत्तम उदाहरण डेंग झायोपिंग यांनी निवृत्त होऊन दाखवून दिले. त्यांनी स्वत:साठी कोणताही किताब धारण केलेला नव्हता तर ते साधे सरळ कॉम्रेड झायोपिंग म्हणूनच आयुष्यभर राहिले.

१०.६.१ डेंग झायोपिंग यांचा दक्षिण दौरा :

इ.स. १९८९ च्या तिनानमेन स्क्वेअर आंदोलनानंतर डेंग यांची शक्ती थोडी कमजोर झाली होती आणि साम्यवादी पक्षातच डेंग यांच्या सुधारणांना विरोध करणारा एक गट कार्यरत होता. आपला आर्थिक सुधारणा कार्यक्रमाचा पुनरूल्लेख करण्यासाठी इ.स.१९९२ मध्ये डेंगनी आपला सुप्रसिद्ध दक्षिण दौरा (दक्षिण चीन) केला आणि शांघायमध्ये नववर्ष साजरे केले. वास्तविकरित्या, आपल्या दौऱ्यादरम्यान निवृत्तीनंतरही आपल्या आर्थिक सुधारणा कार्यक्रमाचा पुनरूच्चार करण्याची ती एक पद्धती होती. आपल्या दौऱ्यादरम्यान त्यांनी अनेक भाषणे दिली आणि आपल्या आर्थिक सुधारणांसाठी जनमताचा पाठिंबा मिळवला. त्यांनी चीनच्या आर्थिक पुनर्रचनेवर भर दिला आणि खुलेआम आर्थिक सुधारणा विरोधकांवर टीकाही केली.

राष्ट्रीय प्रसारमाध्यमे डेंग यांच्या विरोधकांच्या नियंत्रणात असल्यामुळे त्यांच्या दक्षिण दौऱ्याची दखल बिजिंगने घेतली नाही. अध्यक्ष जियांग झेमिन यांनी अल्प प्रतिसाद नोंदवला. आपल्या आर्थिक सुधारणांना पाठिंबा मिळविण्यासाठी व प्रसाद माध्यमांवरील नियंत्रणाला आव्हान म्हणून त्यांनी शांघायच्या 'लिबरेशन' या दैनिकामध्ये 'हुआंग फ्युपिंग' या टोपण नावाने अनेक लेख लिहिले. त्यामुळे ते दैनिक थोड्याच अवधीमध्ये स्थानिक अधिकारी आणि लोकांमध्ये वाचले जाऊ लागले. पक्षाच्या पोलिट ब्युरोमध्ये असलेल्या विविध गटांमध्ये डेंगच्या या नव्या पद्धतीमुळे मोठे वादळ उठले.

त्यामुळे जियांग झेमिनने डेंग यांची बाजू घेतली. शेवटी अनेक महिने उलटून गेल्यानंतर राष्ट्रीय प्रसारमाध्यमांनी डेंग यांच्या दक्षिण दौऱ्याची दखल घेतली. राजकीय निरीक्षकांच्या मते, झेमीनचे डेंग कडे झुकणे म्हणजे त्यांचा वारस म्हणून आपले स्थान बळकट करणे होय. त्यातच डेंग यांच्या दक्षिण दौऱ्याचा एक परिणाम म्हणून त्यांचे सुधारणावादी समर्थकांचे राष्ट्रीय उच्च पातळीवर स्थान बळकट होत गेले आणि त्यामुळेच आर्थिक सुधारणांच्या दृष्टीने चीनची दिशा कायमची बदलण्यात त्यांना यश आले. त्यात भर म्हणजे त्यांच्या दक्षिण दौऱ्याने डेंगचा प्रभाव आजही चीनमध्ये कायम आहे, हे सिद्ध केले.

१०.७ डेंग झायोपिंगचा मृत्यू आणि त्यांचे योगदान

डेंग झायोपिंग यांचा मृत्यु १९ फेब्रुवारी १९९७ रोजी, वयाच्या ९२व्या वर्षी फुफ्फुसाच्या आणि पार्कीन्सन्स आजाराने झाला. परंतु त्यांचा प्रभाव कमी झाला नाही. जियांग झेमीन यांचे चीनवर पूर्ण नियंत्रण होते. तरीही शासनाच्या धोरणामध्ये डेंग च्याच कल्पना, योजना, विचार पद्धती, दिशा यांचे अनुकरण होत होते. अधिकृतपणे डेंग यांची प्रशंसा एक महान मार्क्सवादी, कामगार क्रांतीकारी, मुत्सद्दी, लष्करी तज्ज्ञ, दूरदृष्टी, चीनी साम्यवादी पक्षाचा एक महान नेता, पिपल्स लिबरेशन आर्मीचा प्रमुख प्रजासत्ताक चीनचा प्रमुख, चीनच्या समाजवादी आणि आधुनिक पुनर्बांधणीचा महान शिल्पकार आणि डेंग झायोपिंग सिद्धांताचा संस्थापक अशाप्रकारे केली जाते.

डेंग यांच्या मृत्युनंतर आंतरराष्ट्रीय स्तरावर अत्यंत स्तुतिपूर्ण प्रतिक्रिया उमटल्या. संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस कोफी अन्नान यांनी डेंग यांना 'चीनच्या आधुनिकीकरणाचे आणि आर्थिक विकासाचे जनक' म्हटले. तर फ्रान्सचे अध्यक्ष जॅक्स शिराक यांनी डेंग यांचा उल्लेख 'फार मोठ्या जनसमुदायाला एका परिवर्तनाच्या प्रवाहात नेणारा' असा केला. ब्रिटनचे पंतप्रधान जॉन मेजर यांनी हाँगकाँग प्रश्नाबाबतचा उल्लेख केला तर कॅनडाचे पंतप्रधान जीन क्रेशियन यांनी डेंग यांना 'चीनच्या इतिहासातील एक महत्त्वाची व्यक्तिरेखा' संबोधले. तैवानच्या शासनाने सुद्धा शोकसंदेश पाठविला.

आधुनिक चीनच्या इतिहासात डेंगची विचारसरणी आणि त्यांचे योगदान याबाबत मतभिन्नता असल्याचे दिसून येते. डेंग यांनी फक्त जनचळवळींनी गच्च असलेल्या चीनला आर्थिक सुधारणांवर लक्ष केंद्रीत करण्यास भाग पाडले. परंतु इ.स.१९८९च्या तिनानमेन स्क्वेअर घटनेवरून डेंग हे आपल्याच साम्यवादी पक्षातील घडामोडींबद्दल अनभिज्ञ असल्याचे आढळते. इ.स. १९८९ च्या तिनानमेन स्क्वेअर हत्याकांडाबद्दल डेंग यांच्यावर जरी टीका झाली असली तरी १९८० आणि १९९० च्या दशकात चीनमधील आर्थिक सुधार कार्यक्रमाचे श्रेय डेंग यांनाच द्यावे लागते.

डेंग झायोपिंग यांच्या औद्योगिकरणाच्या नीतीची भावी इतिहासात फक्त जपान व रशियाच्या औद्योगिक विकासाशी तुलना करता येईल. फक्त ३०

वर्षाच्या काळामध्ये चीनचे औद्योगिक उत्पादन अमेरिकेसारख्या महासत्ता देशानंतर दोन नंबरचे आहे याचे श्रेय डेंग यांच्याकाळातील धोरणांनाच जाते. डेंग यांच्या धोरणांनी चीनला कृषी प्रधानतेवरून एका महासत्तेकडे वाटचाल करण्यास प्रवृत्त केले.

डेंग हे समर्थ मुत्सद्दी होते आणि परराष्ट्र धोरणामध्ये त्यांना बरेच यश मिळाले होते. डेंग यांच्या काळात हाँगकाँग व मकाऊ चीनच्या अधिपत्याखाली आले. त्यांच्याच काळात चीन अमेरिका संबंध सुधारले. एवढेच नव्हे तर जपानसारख्या दुसऱ्या महायुद्धातील देशाने चीनवर अनेक अत्याचार करूनही त्याच्याशी आर्थिक भागीदारी करार मान्य करणे हे केवळ डेंग यांनाच शक्य होते.

१०.७.१ आपली प्रगती तपासा :

१) तिनानमेन स्क्वेअर हत्याकांड कधी झाले ?
२) डेंग झायोपिंग कोणत्या साली निवृत्त झाले ?
३) डेंग झायोपिंग विषयी कोफी अन्नान यांनी काय म्हटले आहे ?

_____

_____

_____

_____

१०.८ समारोप

खरे पाहिल्यास डेंग झायोपिंग हे माओंचे एक खंदे समर्थक होते. परंतु सांस्कृतिक राज्यक्रांतीमध्ये त्यांचाही छळ करण्यात येऊन काही वर्षे ग्रामीण भागातील टॅक्टर फॅक्टरीमध्ये त्यांना मजूरीचे काम करावे लागले व हलाखीचे जीवन कंठावे लागले. परंतु आपले राजकीय संबंध त्यांनी सलोख्याचे ठेवल्यामुळे चौ एन लाय सारख्या वरिष्ठ नेत्यांचा विश्वास त्यांनी संपादन केला. त्यामुळे त्यांचा पुन्हा राजकीय उदय होऊन त्यांनी आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम हाती घेतला. त्यांनी साम्यवाद्यांच्या अंधानुकरणावर टीका केली आणि प्रत्यक्ष कृतीवर भर दिला. त्यांनी सर्व क्षेत्रांमध्ये सुधारणा यशस्वीरित्या राबविण्याचा प्रयत्न केला व चीनला आधुनिक जगामध्ये उभे राहण्यास समर्थ बनविले.

१०.९ प्रश्न

१) एक राजकीय शक्ती म्हणून डेंग झायोपिंग याच्या चीनमधील उदयाचा मागोवा घ्या.
२) डेंग पुढील समस्यांवर चर्चा करा.

३) चीनच्या आर्थिक सुधारणांतील डेंगच्या योगदानाचे मूल्यमापन करा.
४) आधुनिक चीनच्या आर्थिक विकासात डेंगच्या भूमिकेचे परीक्षण करा.
५) टीपा लिहा.
(अ) डेंग झायोपिंग यांची दोनदा हद्दपारी
(ब) डेंग झायोपिंग यांचा सुधारणा कार्यक्रम
(क) तिनानमेन स्क्वेअर हत्याकांड
(ड) डेंग यांची देगणी.

❖❖❖

११

डेंग झायोपिंग युग -२
(DENG XIAOPING ERA-II)
चतु: आधुनिकीकरण / चतुरस्त्र आधुनिकीकरण

घटक रचना :

११.० उद्दिष्टचे
११.१ प्रस्तावना
११.२ चतु: आधुनिकीकरणाचे उद्देश
११.३ मुक्त अर्थव्यवस्था आणि जागतिकीकरण
११.४ चीन आणि इतर पूर्व आशियाई अर्थव्यवस्था
११.५ कामगार-प्रधान अर्थव्यवस्था
११.६ अमेरिकेचे बौद्धिक मालमत्ता अधिकार आणि चीनचे अपयश
११.७ चीन आणि जागतिक व्यापार संघटना
११.८ समारोप
११.९ प्रश्न

११.० उद्दिष्टचे

१) चतु: आधुनिकीकरणाचे उद्देश समजून घेणे.
२) मुक्त अर्थव्यवस्था व जागतिकीकरण याबाबत डेंग यांची भूमिका अभ्यासणे.
३) चीन आणि जागतिक व्यापार संघटना यांच्या संबंधाचे परीक्षण करणे.

११.१ प्रस्तावना

चतुरस्त्र आधुनिकीकरण हा कार्यक्रम डेंग यांच्याशी संबंधित असला तरी त्याची रूपरेषा चौ एन लाय यांनी इ.स.१९७५ मध्येच आखली होती. रशियाने साम्यवादाअंतर्गत आधुनिकीकरणाचा अवलंब केला होता. परंतु चीनमध्ये माओंच्या साम्यवादी तत्वज्ञानाने 'आधुनिकीकरण हा भांडवलशाहीकडे नेणारा मार्ग आहे' असा अर्थ काढला. त्यावेळी चौ एन लाय आजारी होते आणि त्यामुळेच आपले धोरण राबवण्यात असमर्थ होते. परंतु आक्रमक झायोपिंगने

इ.स.१९७५ मध्ये जे तीन महत्त्वाचे दस्तऐवज प्रसिद्ध केले ते म्हणजेच चतु: आधुनिकीकरणाची (Four Modernisations) योजना होती. परंतु चीनी साम्यवादी पक्षामधील चांडाळ चौकडीने त्यांची संभावना ''तीन विषारी झुडपे'' अशी केली आणि डेंगविरूद्ध राजकारण करण्यास सुरूवात केली. त्याचा परिणाम म्हणून इ.स.१९७६ ला डेंगना अनेक महत्त्वाच्या पदांवरून दूर करण्यात आले.

इ.स.१९७५ ला चौ एन लाय यांच्या मृत्यूनंतर १९७८ मध्ये डेंग यांचा चीनी साम्यवादी पक्षामध्ये प्रभाव वाढू लागला आणि दरम्यान चांडाळ चौकडीला अटक करण्यात आली होती. डिसेंबर १९७८ च्या ३ऱ्या केंद्रीय समितीच्या बैठकीत डेंग यांनी चीनच्या सुधारणा काळाची सुरूवात म्हणून 'चतु: आधुनिकीकरण' (Four Modernisations) कार्यक्रम सादर केला. हे चतु:आधुनिकीकरण पुढील प्रमुख ४ क्षेत्रांत होते.

(१) कृषी कार्यक्रम (२) उद्योगधंदे (३) तंत्रज्ञान आणि (४) संरक्षण

११.२ चतु: आधुनिकीकरणाचे उद्देश

चीनला २१ व्या शतकाच्या प्रारंभी एक आर्थिक महासत्ता बनविण्यासाठी चतु: आधुनिकीकरणाची सुरूवात केली गेली.

१) चीनचे आर्थिक स्वावलंबन
२) परदेश व्यापार वाढवणे व बाजारपेठ खुली करणे.
३) जपान आणि पाश्चिमात्यांकडून आधुनिक यंत्रे खरेदी करणे.
४) निर्यात वाढवणे.
५) परदेशी गुंतवणूक विकसित करणे.
६) प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब करणे.
७) व्यवस्थापन अनुभव मिळवणे.
८) ग्रामीण भागात विद्युत पुरवठा
९) औद्योगिक स्वयंचलन
१०) नव आर्थिक दृष्टीकोन
११) संरक्षण शक्ती वाढवणे.

११.२.१ माओच्या धोरणांचा अस्वीकार :

लोकमहासभेची बैठक

१) डिसेंबर १९७८ ची चीनी साम्यवादी पक्षाच्या राष्ट्रीय लोक महासभेच्या केंद्रीय समितीची बैठक म्हणजे डेंग यांचा राजकारणात पुर्नउदय आणि चीनच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक सुधारणांची नांदी ठरली.
२) यामध्ये माओंच्या सर्व धोरणांचा अस्वीकार करण्यात आला.

३) माओंच्या ''वर्ग संघर्ष'' तत्त्वज्ञानाच्या जागी 'चार आधुनिकीकरण' (चतु:आधुनिकीकरण) हा कार्यक्रम या परिषदेमध्ये स्वीकार करण्यात आला.

११.२.२ दशवार्षिक योजना:

१) फेब्रुवारी १९७८ मध्ये चीनी साम्यवादी पक्षाचे अध्यक्ष हुआ गुओफेंग यांनी इ.स.१९७६-८५ दरम्यानची दशवार्षिक योजना जाहीर केली.

२) या योजनेमध्ये एकूण १२० प्रकल्पांचा समावेश असून त्यात लोह - पोलाद १० कारखाने, इतर धातूंचे ९ कारखाने, तेल व वायू १० क्षेत्रे, कोळसा - ८ खाणी, विद्युतकेंद्रे ३०, रेल्वेमार्ग -७, जलमार्ग वाहतूक ५ बंदरे या सर्वांचा समावेश होता.

३) माओंच्या धोरणांनी आणि 'चांडाळ चौकडी'च्या (Gang of Four) धोरणांनी लोह उत्पादनामध्ये वाढ न होता ते नेहमीच घटत राहिले. यावरून 'चतु: आधुनिकीकरणा'ची झेप आपल्याला पुढील क्षेत्रांतील उत्पादन वाढीवरून लक्षात येईल.

११.२.३ पोलाद उद्योग :

१) दशवार्षिक योजनेमुळे पोलाद उत्पादन १९८५ मध्ये ६० दशलक्ष टन तर १९९९ मध्ये १८० दशलक्ष टनापर्यंत वाढले.

२) डेंग झायोपिंग व चीन सरकारने जर्मन पोलाद उत्पादक कंपनीबरोबर १४ अब्ज डॉलर्सचा करार केला व पूर्व हेबेईमध्ये पोलाद उद्योग उभारले.

३) जपानच्या पोलाद कंपनी बरोबर २ अब्ज डॉलरचा करार करून शांघाय जवळ पोलाद कारखाना उभारला.

११.२.४ कोळसा व विद्युत उद्योग :

१) दशवार्षिक योजनेत नवीन दहा वायु क्षेत्रांच्या स्थापनेसाठी ६० अब्ज डॉलर्सची तरतूद करण्यात आली होती.

२) चीन प्रामुख्याने उष्णता ऊर्जेवर (कोळशापासून) अवलंबून असल्यामुळे नवीन ८ कोळसाखाणी खोदून त्याचे उत्पादन दुप्पट म्हणजे ९०० दशलक्ष टनापर्यंत करण्याचे लक्ष्य ठेवले होते.

३) दशवार्षिक योजनेच्या सुरूवातीस चीनची विद्युत क्षमता अल्प होती.

४) दशवार्षिक योजनेने जवळजवळ २० जलविद्युत केंद्रांचा विकास केला आणि १० अन्य विद्युत केंद्रांचा विकास केला.

११.२.५ कृषि क्षेत्रातील सुधारणा:

१) इ.स.१९७७ मध्ये चीनच्या कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा अजिबात उपयोग न केल्यामुळे दरडोई अन्नउत्पादन १९५५ च्या एवढेच होते.

२) दशवार्षिक योजनेमध्ये पाणीपुरवठा आणि शेतीच्या यांत्रिकीकरणासाठी ३३ अब्ज डॉलर्सची तरतूद केली गेली.

३) उत्पादनाची व उत्पादन तंत्राची व्यवस्था व्यक्तिगत पुढाकार घेऊन केली व लवचिकपणे उत्पादन वाढविण्याचे उद्देश ठेवले गेले.

४) कम्युन्समधील (सामूहिक शेती) शेतकऱ्यांना आपल्या छोट्या शेतीक्षेत्रामध्ये उत्पादन काढण्यास उत्तेजन दिले गेले.
५) चतु: आधुनिकीकरणामध्ये लष्करी करणावर भर होता आणि १९७८ पर्यंत चीन आपल्या दरडोई उत्पन्नातील ७-१०% रक्कम खर्च करीत होते. परंतु या कार्यक्रमामध्ये त्यावर प्रचंड म्हणजे ३०० अब्ज डॉलर्सची तरतूद केली होती.

११.२.६ भांडवलाची समस्या:

१) दर्शवार्षिक योजनेच्या वेळी भांडवलाची कमतरता होती. अंदाजपत्रकानुसार १९७८ मध्ये ते भांडवल ३५०-६३० अब्ज डॉलर्सच्या दरम्यान अपेक्षित होते.
२) शासन मुख्यत: महसूलावर अवलंबून होते. शेतकऱ्यांकडून कमी भावात कृषीमाल खरेदी करून तो अधिक भावात विकण्यावर त्यांचा भर होता.
३) त्यामुळे मात्र कृषी उत्पन्नात वाढ न होता कृषी उत्पादन स्थिर राहिले.
४) राज्याच्या शेतीसंस्थांनी शासनास उत्पन्न देण्याऐवजी त्यातील बराचसा भाग शेतीसाठी सवलती देण्यातच खर्च होऊ लागला.
५) दशवार्षिक योजनेमध्ये मग शासनाने पर्यायी महसूलासाठी पर्यटन स्थळांचा विकास, हॉटेल्स, उपाहारगृहे बांधली व पर्यटकांना विविध सुविधा उपलब्ध केल्या. थोडेफार यश मिळाले परंतु पर्यटकांमध्ये अनिवासी चीनी लोकांचाच समावेश अधिक होता.

११.२.७ परकीय गुंतवणूक :

१) चीनने विकासात्मक प्रकल्पांच्या आर्थिक नीधिसाठी परकीय गुंतवणुकीला प्रोत्साहन दिले.
२) नफ्यातील वाटा मिळण्याच्या अटींवर जर्मन व जपानी कंपन्यांनी चीनच्या प्रकल्पांत भांडवल गुंतवणूक केली.
३) डिसेंबर १९७८ मध्ये चीनने ब्रिटिश बँकेकडून १.२ अब्ज डॉलर्सचे कर्ज मिळविले तर एप्रिल १९७९ पर्यंत परदेशी कर्ज - १० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचले.

११.२.८ तांत्रिक कुशल कर्मचाऱ्यांचा तुटवडा:

१) सांस्कृतिक क्रांतीच्या १२ वर्षात चीनमध्ये उच्च शिक्षण व तंत्रज्ञानावर भर नसल्यामुळे १९७८ मध्ये कुशल कर्मचाऱ्यांचा तुटवडा निर्माण झाला होता.
२) १९७०च्या दशकात चीनमध्ये तांत्रिक व वैज्ञानिक कुशल तंत्रज्ञांची संख्या फक्त ६० हजाराच्या आसपास होती. आणि एकूण लोकसंख्या १ अब्ज होती.
३) चतु: आधुनिकीकरणाच्या १९८० च्या दशकाच्या सुरूवातीला ती संख्या ४ लाखापर्यंत वाढली होती. पण तुलनेने कमीच होती.
४) त्याचवेळी चीनमध्ये मध्यम पातळीवरील तंत्रज्ञ आणि कुशल कामगारांचा तुटवडा निर्माण झाला होता.

११.२.९ दशवार्षिक योजनेच्या अंमलबजावणीतील अडचणी :

१) पहिल्याच वर्षी शासनाने १ लाख प्रकल्प हाती घेतले आणि त्यांचा खर्च ४० अब्जापर्यंत होता व चीनच्या दरडोई उत्पन्नाच्या ३६% होता.

२) हा खर्च आर्थिक व तांत्रिकदृष्टया आवाक्यापलिकडचा होता.

३) जपानच्या मदतीने पोलाद उद्योग :

२ अब्ज डॉलर्स गुंतवणुकीचा हा प्रकल्प यांगत्सी नदीच्या जवळ उभारण्यात आला होता. परंतु तेथील जमीन भुसभूशीत असल्यामुळे कारखान्याचा पाया अधिकाधिक खोलवर घ्यावा लागत होता. त्यामध्ये हजारो पोलादाचे खांब खर्च होत होते. शिवाय १९७९ मध्ये विद्युत पुरवठा अपुरा असल्याचे समजले. तसेच कारखाना मुख्य बंदरापासून लांबवर होता. ज्यामुळे ऑस्ट्रेलिया व ब्राझिलमधून कच्चे लोखंड आणताना वाहतुकीचा त्रास होत होता. त्यामुळे प्रकल्पाच्या प्राथमिक टप्प्याचा खर्च २ अब्जांपासून ५ अब्ज डॉलर्सपर्यंत वाढला. त्यामुळे दुसऱ्या टप्प्याचे काम शासनाने थांबविले आणि जपानी कंपनी या आर्थिक अडचणींतही प्रकल्पासाठी तयार असताना करार मोडीत काढला.

४) जर्मनीच्या मदतीने पोलाद उद्योग :

सर्वात मोठा पोलाद प्रकल्प हा जर्मनीच्या मदतीने हेबेई प्रांतात १४ अब्ज डॉलर्स खर्च करून बांधण्यात येणार होता. परंतु त्यातही अडचणी निर्माण झाल्या. ते क्षेत्र भूकंपग्रस्त होते. मग त्याची योजना वूहान प्रांतात केली. परंतु कच्च्या लोखंडाचे पोलादामध्ये रूपांतर करताना उच्च ऊर्जा खर्च करावी लागणार होती. परंतु असे झाल्यास इतर कोणत्याही कामासाठी त्या प्रांतात वीज शिल्लक राहणार नव्हती. शेवटी त्यात कच्च्या लोखंडाचा पुरेसा वेळच्यावेळी पुरवठा करणे सुद्धा शक्य नव्हते.

त्यामुळे दर्शवार्षिक योजनेतील प्रकल्प यशस्वी होऊ शकले नाहीत.

११.२.१० दशवार्षिक योजनेची उजळणी / पुनरावृत्ती :

१) इ.स.१९७९ मध्ये शासनाच्याच अधिकृत वृत्तपत्राने (पिपल्स डेली) दशवार्षिक योजनेचे नियोजनाअभावी अपयशाबाबत माहिती प्रसिद्ध केली.

२) जून १९७९ मध्ये अध्यक्ष हुआ गुओंफेंग यांनी समायोजन, पुनर्बांधणी, दृढीकरण आणि सुधारणा अशी नीती आर्थिक नियोजनासाठी जाहीर केली.

३) जड उद्योगांऐवजी हलक्या उद्योगांना प्राधान्य दिले गेले.

४) शेतीउद्योगांमध्ये २६ अब्जांवरून ५९ अब्ज डॉलर्सपर्यंत वाढ केली.

५) दहा वर्षांतील पोलाद उत्पादनाचे लक्ष्य ६० वरून ४५ दशलक्ष टन ठेवले.

६) निर्यात योग्य व परदेशी चलनयुक्त हलक्या उद्योगांवर भर दिला गेला.

७) बांधकाम व जड उद्योगांतील गुंतवणुकीत कपात केली आणि अनेक प्रकल्पातील लक्ष्ये पुनर्निश्चित केली गेली.
८) जवळजवळ ३४८ मुख्य जड उद्योग थांबवले - जसे पोलाद, यांत्रिकी आणि रासायनिक. इतर ४००० लघुप्रकल्प सुद्धा बंद केले.
९) त्यातच १९७९च्या व्हिएतनाममधील चीनच्या आक्रमणाने चीनच्या भांडवल गुंतवणुकीत तुटवडा निर्माण झाला.

११.२.११ संस्थात्मक व रचनात्मक पुनर्संघटन:-

१) १९८०च्या दशकात साम्यवादी पक्षाच्या नियंत्रणात शिथिलता आली.
२) कम्युन्स व इतर संस्थांना आपले अतिरिक्त उत्पादन शासनाधारित किंमतींपेक्षा अधिक किंमतीस विकण्याची परवानगी मिळाली.
३) कामगारांना आपले निर्णय स्वातंत्र्य देण्यात आले.
४) खाजगी संस्थांना नीधी घेण्यास व परदेशी संस्थांशी करार करण्याची परवानगी देण्यात आली.
५) परदेशी गुंतवणुकदारांसाठी पाच ''विशेष आर्थिक क्षेत्रे'' (Special Economic Zones) निर्माण करण्यात आली.
६) चीनने यासाठी समाजवादी व भांडवलशाही पद्धतीचा सुरेख संगम सांधून यश प्राप्त केलेल्या युगोस्लाव्हिया आणि रूमानिया या देशांच्या आर्थिक धोरणाचे अनुकरण केल्याचे आढळते.

११.२.१२ बेरोजगारीची समस्या:

१) चीनी शासनाने लवचिकतेचे धोरण स्वीकारल्यामुळे स्थलांतरात वाढ होऊन बेकारीची समस्या निर्माण झाली.
२) पूर्वी कोणताही अतिरिक्त कामगार जर बेकार झाला तर त्याला ग्रामीण भागात पाठवले जाई.
३) यामुळे बेकारीचा प्रश्न शहरामध्ये सुटत असला तरी सदर कामगाराला एखाद्या अनुत्पादक किंवा कमी उत्पादक कामावर ठेवणे म्हणजे एक प्रकारची छुपी बेकारीच होती.

वरील प्रकारचे कार्यक्रम व त्यातील यशापयश आपल्याला डेंग यांच्या चतु: आधुनिकीकरण, दर्शवार्षिक योजना, पुर्नसंघटन याद्वारे आपल्याला दिसून येते.

११.२.१३ आपली प्रगती तपासा :-

१) चतु: आधुनिकीकरणाचे उद्देश सांगा.
२) चीनमधील संस्थात्मक व रचनात्मक पुनर्संघटन कसे झाले ?

११.३ मुक्त अर्थव्यवस्था आणि जागतिकीकरण
(Free Market Economy & Globalization)

११.३.१ मुक्त अर्थव्यवस्थेची पार्श्वभूमी (Background) :

आधुनिक चीनचा इतिहास १९४९ पासूनचा आहे जेव्हा साम्यवादी शासनाने चीनचा ताबा घेतला. त्यांनी रशियाचे अनुकरण (Model) केले आणि आर्थिक व औद्योगिक विकासावर भर दिला. चीनने शहरी उद्योगांचा ताबा घेतला. सामूहिक शेतीस सुरूवात केली आणि व्यक्तिगत शेती बंद केली आणि अनिवार्य उत्पन्न भाग (Compulsory Production Quota) लागू केला.

इ.स.१९७०च्या दशकात जागतिक अर्थव्यवस्थेत प्रजासत्ताक चीनला फारसे महत्त्व नव्हते. त्याचे आयात - निर्यात मूल्य १५ अब्ज डॉलर्सपेक्षाही कमी होते आणि चीन ३०वे निर्यातदार राष्ट्र होते. त्यामुळेच आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेत चीन दुर्लक्षितच होता.

परंतु दुसऱ्या सहस्त्रकानंतर चीनच्या अर्थव्यवस्थेत पूर्ण बदल झालेला आपल्याला आढळतो. इ.स.२०००मध्ये चीनची आयात - निर्यात $२०० अब्जाच्या वर गेली आणि चीन १० वा निर्यातदार देश बनला. त्यामुळेच हा एकदम आमूलाग्र बदल चीनमध्ये कसा झाला ते पाहणे आवश्यक आहे.

११.३.२ रशियाचे अनुकरण करणे बंद : -

१) इ.स.१९५० मध्ये चीनने रशियाचे अनुकरण करणे बंद केले आणि जड व अधिक भांडवली उद्योगावरून छोट्या-कामगार युक्त उद्योगांवर लक्ष केंद्रीत केले.
२) कामगारांना अधिक उत्पादनासाठी प्रोत्साहन दिले गेले परंतु सामूहिक शेतीची कल्पना हवी तेवढी यशस्वी झाली नाही.
३) उद्योगधंद्यांचे उत्पादन जरी वाढले तरी त्यांची गुणवत्ता व दर्जा निम्न होता आणि उत्पादन खर्चही अधिक होता.
४) चीनचे कृषी उत्पादन लोकसंख्येच्यामानात अपूरे होते त्यामुळे चीनला मोठ्या प्रमाणात अन्नधान्य, खाद्यतेल व कापूस यांची आयात करावी लागत होती.
५) त्याचा परिणाम म्हणजे व्यवस्थापक, शास्त्रज्ञ, अभियंते, विद्वान लोक यांच्या ज्ञानाचा उपयोग करून घेण्याऐवजी त्यांना सुद्धा शेतीमध्ये काम करण्यास जावे लागले.

११.३.३ डेंग झायोपिंग यांचा पुढाकार :-

१) इ.स.१९७६ नंतर डेंग आणि इतर चीनी साम्यवादी पक्षाच्या नेत्यांनी लोकांची राजकीय सुधारणाची मागणी थोपवण्यासाठी आर्थिक

सुधारणांची गरज असल्याचे प्रतिपादन केले आणि माओंनंतर काही शुद्ध वैचारिक बदल करण्याचे ठरवले.

२) डेंग व त्याच्या सहकाऱ्यांनी शासनाची उद्योगांवरील बंधने शिथिल केली व त्यांना किंमती, पगार, गुणवत्ता नियंत्रण याबाबतीत स्वातंत्र्य दिले.

३) अधिक उत्पादनासाठी बोनस लागू केला.

४) लघु खाजगी उद्योगांना प्रोत्साहन, बेकार तरुणांना उपाहारगृहे, सायकली, रेडिओ दुरूस्ती, हस्तोद्योग इ. व्यवसाय उपलब्ध केले.

११.३.४ शेजाऱ्यांचे अनुकरण :-

१) १९७०च्या दशकात आपली शेजारी राष्ट्रे जपान, सिंगापूर, तैवान आणि दक्षिण कोरिया यांनी भरमसाठ प्रगती केल्याचे चीनला आढळले.

२) त्यांचे धडे चीनने गिरवण्यास सुरूवात केली आणि शेती व उद्योगात सुधारणा करण्याचे ठरवले. व्यक्तिगत कौशल्यांवर भर दिला आणि सरकारचा हस्तक्षेप कमी केला.

३) बरीच उत्पादने बाजार भावानुसार विकली गेली. सरकारी व खाजगी आणि नवीन उद्योगांमध्ये स्पर्धेला उत्तेजन दिले गेले.

४) इ.स.२००० मध्ये बिगर-सरकारी कंपन्यांनी चीनमध्ये ७५% उत्पादन केले होते.

५) परकीय व्यापारावरील सरकारी मक्तेदारी संपुष्टात आणली आणि त्याजागी नवीन विशेष आर्थिक क्षेत्रे निर्माण केली गेली ज्याद्वारे खाजगी कंपन्या कामगारांची नेमणूक व निलंबन स्वत:च करू शकत होत्या.

११.३.५ अधिक सुधारणांची गरज :-

१) सहस्त्रकांमध्ये प्रवेश केल्यानंतर चीनने आपली अर्थव्यवस्था हळूच साम्यवादापासून भांडवलशाहीकडे नेलेली आपल्याला आढळते.

२) शेतकरी आपला माल स्वत:च विकू शकत होते, परकीय गुंतवणूक खुली करण्यात आली होती. तरीही अन्य काही सुधारणा करणे गरजेचे होते.

३) त्यामध्ये सार्वजनिक उद्योगांची पुर्नरचना करणे.

४) दिवाळखोर सार्वजनिक बँका बंद करणे.

५) आयुष्यभर बेकारी येऊ नये यासाठी सामाजिक सुरक्षा यंत्रणा निर्माण करणे.

६) शासन किंवा साम्यवादीपक्षाच्या नियंत्रणाविरहीत केंद्रीय बँकींग पद्धतीद्वारे आर्थिक व्यवस्था प्रस्थापित करणे.

७) तोट्यात चाललेले उद्योग बंद करायचे म्हणजे तेथील कामगार व कर्मचाऱ्यांवर बेकरीची कुऱ्हाड आणि आधीच बेकारी असलेल्या १०० दशलक्ष बेकरांमध्ये भर पडून गंभीर सामाजिक - आर्थिक समस्यांची भीती होती.

११.३.६ राजकीय स्वातंत्र्याचा अभाव :

चीनने केंद्रीय नियोजन रद्द करून मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला असला तरीही राजकीय स्वातंत्र्यामध्ये वाढ झाली नव्हती. इ.स. १९८९च्या

तिनानमेन हत्याकांडाने हे दाखवून दिले की, अजूनही साम्यवादी पक्ष आपले राजकीय नियंत्रण शिथिल करण्यास तयार नाही. त्यामुळे चीनचे भांडवलशाहीकडे स्थलांतर हे साम्यवादी नियंत्रणाखाली असलेले राजकीय धोरण असल्याचे दिसते.

११.४ चीन आणि इतर पूर्व आशियाई अर्थव्यवस्था:

१) इतर आशियाई देशांपेक्षा चीनमध्ये सार्वजनिक मालकी आणि गुंतवणूक अधिक प्रमाणात होती. त्यामुळे सरकारी सवलती त्यांना द्याव्या लागत होत्या.

२) चीन इतर पूर्व आशियाई देशांपेक्षा अधिक प्रमाणात परकीय गुंतवणूकीवर अवलंबून होता. त्यामुळे चीनची मुख्य निर्यात परदेशी कंपन्या आणि संयुक्त कंपन्यांवरच अवलंबून असे.

३) त्यामुळे चीनच्या निर्यातीमध्ये मोठ्या प्रमाणात सार्वजनिक उद्योगांचा सहभाग नव्हता.

४) शेवटी चीनमध्ये उत्पन्न विषमता, विशेषतः नागरी आणि ग्रामीण राहणीमानामध्ये तफावत वाढत गेली.

५) आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये चीनने तुलनात्मक फायद्याचे तत्त्व अनुसरले. निर्यातीत वस्तूंमध्ये चीनने खेळाचे साहित्य, खेळणी, पादत्राणे, कपडे यांच्या निर्यातीवर भर दिला. ही उत्पादने कामगारप्रधान असल्यामुळे चीनमध्ये कामगारांची मुबलकता होती हे आपल्या लक्षात येते.

६) आयात वस्तूंमध्ये यंत्रे, वाहतुकीची साधने आणि इतर भांडवली वस्तू यांचा समावेश होता. इ.स.१९७८ पासून चीनचे बहुतेक आर्थिक विस्तारीकरण हे निर्यातीमध्ये वाढ आणि गुंतवणूक खर्चात वाढीमुळे झालेली आहे.

११.५ कामगार - प्रधान अर्थव्यवस्था

१) सिंगापूर व्यतिरिक्त चीनची इतर भागातील जमीन निम्न दर्जाची आहे. म्हणूनच चीनला शेतीशी संबंधित कामगार - प्रधान उद्योगावर अधिक भर देणे गरजेचे होते.

२) त्याच्या परिणामी चीनला अन्नधान्य आयात करणे आणि त्याची विल्हेवाट निर्यात योग्य उद्योगातील कामगारांमध्ये करणे आवश्यक होते.

३) हा बदल करण्यासाठी उच्च बचत दर भांडवल गुंतवणूकीसाठी वापरणे आवश्यक होते.

४) चीनची निर्यात कामगारांच्या गुणवत्तेवर अवलंबून होती. म्हणून चीनने मध्यम शिक्षित कामगाराऐवजी कुशल कामगारांवर भर दिला व हलके उद्योग उभारले.

५) चीनमध्ये उच्च - शिक्षितांचे प्रमाण कमी होते त्यामुळे चीन कौशल्यावर आधारित आणि त्यातून कुशल कामगार निर्माण करू शकत नव्हता.

११.५.१ आपली प्रगती तपासा :-

१) इ. स. २००० मध्ये चीनची आयात - निर्यात किती रकमेवर पोहोचली ?

२) चीनची कामगार - प्रधान अर्थव्यवस्था कशी होती ?

_____

_____

_____

_____

११.६ अमेरिकेचे बौद्धिक मालमत्ता अधिकार आणि चीनचे अपयश

१) चीनमध्ये परदेशी कंपन्यांचे बौद्धिक मालमत्ता अधिकार उल्लंघनाबाबत चीनला कायद्याने अपयश आलेले दिसते त्यामुळे मुखतः सीडी, ध्वनीपित, व्हिडिओ उद्योगाला याा फटका बसला होता.

२) इ.स.१९९१ मध्ये चीनने त्याबाबत संरक्षण कायदा पारित केला होता परंतु त्याची योग्य अंमलबजावणी झाली नव्हती. न्यायालये सुद्धा शिक्षेची अंमलबजावणी व्यवस्थित करीत नव्हती. तसेच जे उद्योग परदेशी उत्पादनांची नक्कल करीत होते त्यांचे मालक कोणी प्रांतिक प्रमुख, प्रभावी राजकारणी होते. त्यामुळेच चीनने याबाबतीत योग्य कारवाई केली नाही तर अमेरिका व्यापारी मदत बंद करील अशी धमकी चीनला दिली गेली.

३) याचा परिणाम असा झाला की, अमेरिकेने जोपर्यंत चीन मानवी अधिकार, व्यापार, शस्त्रास्त्रांचा व्यापार याबाबती योग्य पावले उचलत नाही तोपर्यंत त्याबरोबर संबंध वाढवू नयेत असे जाहीर केले.

४) अमेरिका चीनचा जवळजवळ १/३ माल खरेदी करते. त्यामुळेच आता चीनला योग्य निर्णय घेणे क्रमप्राप्त ठरले.

५) परंतु अमेरिकन कंपन्यांना सुद्धा चीनबरोबर सामान्य व्यापारी संबंध बंद करणे महाग पडणारे होते. त्यामुळे त्यांचेही कामगार बेकारी, उत्पन्नात घट, भांडवलात नुकसान होणार होते.

६) शेवटी १९९९ मध्ये चीन-अमेरिका द्विपक्षीय व्यापारी करार झाला. त्याद्वारे जकात कमी करणे, कृषि, औद्योगिक उत्पादने व लष्कर यांच्यावरील बंधने हटवणे, परदेशी गुंतवणूकीवरील चीनमध्ये बंधने शिथिल करणे, असे ठरले. शेवटी इ.स.२००० मध्ये अमेरिकेने चीनला कायम सामान्य व्यापारी संबंधाचा दर्जा देऊन टाकला.

११.७ चीन आणि जागतिक व्यापार संघटना :
(China & World Trade Organisation - WTO)

१) इ.स.१९७० च्या नंतरची चीनची अर्थव्यवस्था म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापार आणि गुंतवणूक वाढवणे होय. त्यासाठी चीनने जागतिक व्यापार संघटनेचे सदस्यत्व घेण्याचे ठरवले. त्याची कारणे पुढीलप्रमाणे-
अ) चीनला वाढती जागतिक आर्थिक महासत्ता म्हणून मान्यता मिळणे.
ब) WTO मध्ये व्यापार विषयक नियमांत सहभागी होणे.
क) चीनला वादग्रस्त - व्यापार विषयक प्रक्रीयेमध्ये स्थान मिळणे.
ड) चीनमधील सुधारकांना उदारीकरण आणणे सोपे जावे.

२) विश्लेषकांच्या मते, चीनला बहुपक्षीय व्यापारी पद्धतीचे महत्त्व पटलेले होते आणि त्यामुळे चीनच्या आयात, निर्यातीला उत्तेजन मिळेल यासाठीच चीनने WTO चे सदस्यत्व स्वीकारले होते. परंतु त्यासाठी चीनला आपल्या राजकीय, आर्थिक, सामाजिक व्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल करणे आवश्यक होते.

३) गेल्या ३० वर्षांपासून अमेरिकेने चीनला आंतरराष्ट्रीय स्तरावर सामाजिक आर्थिक पातळीवर व उदार समाजव्यवस्थेसाठी अनेक प्रयत्न केले. त्यामुळेच आपल्याला १९८०च्या अगोदरचा चीन व त्यांनतरचा चीन यामध्ये जमीन आसमानचा फरक आढळतो.

४) तरीही चीनचे आर्थिक स्थित्यंतर पूर्ण झालेले नाही. जे शासकीय / सार्वजनिक उद्योग व्यापारी तत्वावर चालायला हवेत, आजही बुडीत निघत आहेत आणि बेकारीच्या कारणांमुळे त्यांना सरकार बंद करून शकत नाही. म्हणूनच सरकार काही सूट - सवलती देऊन ते चालवित आहे.

५) चीनमध्ये कायदापद्धती मुक्त अर्थव्यवस्थेसाठी पोषक नाही. त्यामुळे व्यापारी करारामध्ये अनिश्चितता, भ्रष्टाचार आणि गुन्हेगारी प्रवृत्तींचा शिरकाव उद्योगधंद्यांमध्ये झालेला दिसतो.

६) १९९९च्या चीन-अमेरिका द्वीपक्षीय करारानुसार चीनला WTO चा सदस्य होणे सोपे गेले आणि कायम व्यापारी सामान्य संबंध असलेले राष्ट्र हा दर्जाही बहाल झाला.

७) चीनचे WTO मध्ये जाणे म्हणजे चीनच्या आर्थिक नीतीबरोबर इतर धोरणांमध्ये आमूलाग्र बदल करणे गरजेचे होते. त्यामध्ये अमेरिकेच्या निर्यातीवर जकात कमी करणे, बंधने शिथिल करणे, नक्कल करण्यापासून संरक्षण देणे, बौद्धिक मालमत्ता अधिकारांचे संरक्षण करणे इ. साठी नियम, कायदे कानून करणे गरजेचे होते.

८) याचे चीनवर दूरगामी परिणाम झालेले दिसतात व त्याच्यावर अनेक बंधने आलेली दिसतात.

ती पुढील प्रमाणे होत –
अ) जागतिक बंधने पाळणे व त्यानुसार उत्पादन नियंत्रण करणे.
ब) मानवी हक्कांचे उल्लंघन रोखणे. उदा. तिनानमेन स्क्वेअर १९८९
क) तिबेटला वाईट वागणूक न देता सौहार्द व शांती राखणे.
ड) कैद्यांद्वारे निर्यात योग्य माल तयार करू नये.
इ) बौद्धिक मालमत्ता अधिकारांचे संरक्षण करणे.
फ) व्यापारी तूट भरून काढण्यासाठी अमेरिकी उत्पादन बाजारपेठेतून हटवणे.
ग) चीनवर एका अमेरिकन राजदूताने आरोप केला की, ''चीन भांडवलशाही राष्ट्राप्रमाणे निर्यात करतो आणि साम्यवादी राष्ट्राप्रमाणे आयात करतो.''

११.७.१ आपली प्रगती तपासा :-

१) चीनच्या किती माल अमेरिका खरेदी करते ?
२) चीनने जागतिक व्यापार संघटनेचे सदस्यत्व का घेतले ?

_____
_____
_____
_____

११.८ समारोप

अशाप्रकारे चीन व चीनची आंतरराष्ट्रीय मुक्त अर्थव्यवस्था याबाबत झालेली प्रगती पाहायची झाल्यास आपणास चतुरस्त्र आधुनिकीकरणाचा विकास पाहीला. त्यामध्ये डेंग यांनी आपल्या कारकीर्दीत कृषी, उद्योग, तंत्रज्ञान आणि संरक्षण क्षेत्राच्या विकासावर भर दिला. त्यासाठी त्यांनी दशवार्षिक योजना राबविल्या. चीनने आधुनिकीकरणा बरोबरच जागतिक मुक्त अर्थव्यवस्था, व्यापारी संघटना यांच्या नियमावलींचे पालन करण्याचा प्रयत्न केला व चीनला प्रगती पथावर नेण्यास हातभार लावला.

११.९ प्रश्न

१) डेंग झायोपिंग यांच्या चतु:आधुनिकीकरणाचे विश्लेषण करा.
२) मुक्त अर्थव्यवस्था व जागतिकीकरण याबाबतीत चीनमधील झालेल्या आर्थिक बदलांचा मागोवा घ्या.
३) चीनच्या कामगारप्रधान अर्थव्यवस्था आणि जागतिक व्यापार संघटना यांमधील बदलांचे परीक्षण करा.
४) टीपा लिहा.
   अ) दशवार्षिक योजना
   ब) अमेरिकेचे बौद्धिक मालमत्ता अधिकार
   क) चीन व जागतिक व्यापार संघटना.

❖❖❖

१२

चीनचे सुरक्षा धोरण आणि परराष्ट्रनीती १
चीनची विश्वसंकल्पना
(World View of China)

घटक रचना :-

१२.० उद्दिष्ट्ये
१२.१ प्रस्तावना
१२.२ ऐतिहासिक वारसा
१२.३ चीनच्या वैश्विक संकल्पनेमध्ये बदल
१२.४ चीनचे संरक्षणविषयक धोरण
१२.५ चीन – अमेरिका संबंध
१२.६ डेंग झायोपिंग यांची अमेरिका भेट
१२.७ समारोप
१२.८ प्रश्न

१२.० उदिदष्ट्ये

१) चीनचा ऐतिहासिक वारसा समजून घेणे.
२) चीनच्या संरक्षणविषयक धोरणाचा अभ्यास करणे.
३) चीन – अमेरिका संबंधांचे परीक्षण करणे.
४) डेंग झायोपिंग यांच्या अमेरिका भेटीचा मागोवा घेणे.

१२.१ प्रस्तावना

फार प्रचीन काळापासून चीन अलिप्ततावादी धोरणाचा पुरस्कर्ता राहीला आहे. चीन हजारो वर्षांपासून आपली पर्वतराजी, नद्या, समुद्र यांनी परिपूर्ण अशी संस्कृती जोपासत आला आहे. चीनला आपल्या प्रचीन संस्कृतीचा अत्यंत गर्व असून जगातील युरोपसह इतर देशांपेक्षा ती श्रेष्ठ असल्याचा चीनचा दावा आहे. अनेक शतकांपासून चीन हा स्वावलंबी आणि बाह्य जगापासून अलिप्त राहीला आहे. परंतु चीनचा पाश्चात्य जगाशी जेव्हा संपर्क आला तेव्हा चीनची जगाच्या बाबतीत असलेली आपली संकल्पना किंवा विश्वसंकल्पना बदलत जाण्यास मदत झाली.

१२.२ ऐतिहासिक वारसा

चीनला जगातील अखंडीत प्रचीन संस्कृतीचा वारसा लाभलेला आहे आणि त्याचमुळे त्यांच्या परराष्ट्रीय धोरणांवरी त्याचा प्रभाव वेळोवेळी पडलेला आपणांस दिसून येतो. गेली अनेक शतके चीनने आव्हानविरहीत आणि महान स्वावलंबी राजेशाही जोपासली होती. चीन हे जागतिक संस्कृतीचे एक केंद्रबिंदू असून सर्व जगाचे लक्ष त्याने वेधून घेतले आहे. बऱ्यास वेळेस चीनने आपल्या देशाबाहेरील जनतेला असंस्कृत किंवा रानटी म्हणूनच पाहिले आणि फक्त चीनी लोक तेवढेच सुसंस्कृत, सभ्य आहेत असे मानले. हे जरी मानले तरी मूळात चीनमध्येच काही असभ्य, असंस्कृत, रानटी, दुष्ट राजवटींनी राज्ये केली. उदा. युआन घराणे (१२७९-१३६८) आणि मांचू घराणे (१६४४-१९११). याउलट परकीय राजवटींनी चीनच्या प्रचीन संस्थांची पुनर्बांधणी केली आणि चीनचा वारसा टिकविण्याचा प्रयत्न केला.

१२.२.१ चीनची स्वयं श्रेष्ठत्वाची संकल्पना:-

चीनी राजवटीने आपल्यांस सर्व मानव जातीचा प्रमुख मानल्यामुळे त्यांनी इतर राष्ट्रांशी जे काही संबंध ठेवले ते एक राष्ट्राचे दुसऱ्या राष्ट्राशी असे नसून एक राष्ट्राचे आपल्या मांडलिक राष्ट्राशी असेच ठेवले. त्यामुळे इतरांना त्यांनी नेहमी कमी लेखले आणि चीनची संस्कृती, त्यांचा इतिहास, त्यांची राज्ये यांना इतर देशांपेक्षा श्रेष्ठ मानले. चीनकडे इतर राष्ट्रांप्रमाणे कोणतेही परराष्ट्र संबंध खाते नव्हते आणि इतर शेजारील राष्ट्रांना जर चीनबरोबर संबंध प्रस्थापित करावयाचे असल्यास त्यांनी चीनी अधिपत्याखालीच ते स्थापित करावेत. चीनचा सम्राट इतर देशांना (असंस्कृत) आपल्या देशापासून, सीमेपासून दूर ठेवण्यासाठी लष्करी मोहीमा हाती घेत असे. त्यामुळे शेजारील राष्ट्रे चीनपासून नेहमीच चार हात लांब राहत होती. ज्या युरोपीयन राष्ट्रांना प्रथम चीन बरोबर व्यापार स्थापन करण्याची संधी मिळाली त्यांनी चीन सम्राटांचे, राजदरबाराचे, तेथील न्यायालयाचे नियम, कायदे-कानून पाळावे लागत आणि मगच त्यांना व्यापारी सवलत मिळत असे. परंतु त्यांचा दर्जा कधीही समकक्ष किंवा चीनी राजवटीशी समतुल्य समजला जात नसे. त्यामुळेच चीनचे स्वत:बद्दलचे मत किंवा स्वयं-श्रेष्ठत्वाची संकल्पना ज्यामध्ये चीन व्यतिरिक्त इतर सर्व असंस्कृत, रानटी आहेत आणि चीन सुसंस्कृत आणि सर्व संस्कृतीचे केंद्र आहे. यालाच चीनची 'स्वयं -श्रेष्ठत्वाची संकल्पना' असे म्हटले जाते.

१२.२.२ चीनचा एका बाजूला कल :-

दुसऱ्या अर्थाने पाहिल्यास चीनची स्वयंश्रेष्ठत्वाची संकल्पना आणि सुसंस्कृतीचे मध्य केंद्र याचा संबंध काट्याने काटा काढणे किंवा रानटी व असंस्कृत समुदायाचा विनाश करण्यासाठी रानटी व असंस्कृत समुदायाची मदत घेणे या संकल्पनेशी निगडीत असल्याचे आपणास दिसून येते. त्यामुळे अधुनिक काळामध्ये दुसऱ्या एखाद्या शक्तीशाली राष्ट्राला रोखण्यासाठी तिसऱ्या एका शक्तिशाली राष्ट्राशी दोस्ती करणे, करार करणे किंवा संबंध प्रस्थापित करणे हे आवश्यक मानले जाते. त्यामुळेच आपल्याला चीनच्या या धोरणाची दोन उदाहरणे पाहाता येतील. एक तर १९५० च्या दशकात आमेरिकेपासून धोका ओळखून चीनने रशियाकडून पाठिंबा मिळविला. तर दुसरे म्हणजे १९७० च्या दशकात त्याच रशियाकडून हानी पोहचू नये म्हणून चीनने(बिजिंग रिप्रोचमेंट) अमेरिकेबरोबर समझोता केला. तरी देखील आपणांस असे दिसून येते की, चीनने आपले स्वांतत्र्य,सार्वभौमत्व अबाधित राखण्यासाठी स्थापन केलेले करार व तह काही जास्त काळ टिकले नाहीत.

१२.२.३ विलगतावादी प्रवृती:-

चीनच्या ऐतिहासीक वारशाचा एक परिणाम म्हणजे त्याचा विलगतावादी प्रवृत्तीकडे कल आणि बाह्यजगताशी संबंध बंद करण्याची प्रवृत्ती चीनमध्ये निर्माण झाली. राजेशाहीच्या काळात चीनचे परराष्ट्र धोरण वेळच्या वेळी बदलत राहीले. जे घराणे चीनवर राज्य करीत होते त्यांची धोरणे त्यानुसार बदलत होती. चीनच्या महानगरकालीन तांग घराणे इ.स.६१८-९०७ पासून ते विलगतावादी काळातील मिंग घराणे इ.स. १३६७-१६४४ यांनी थोड्याफार परदेशीयांना चीनमध्ये येण्यास परवानगी दिलेली होती असे आपणांस आढळते. शेवटी आपणांस असे दिसून येते की, चीनची स्वयंश्रेष्ठत्वाची कल्पना आणि शतकानुशतके चालत आलेले चीनचे स्वावलंबीत्वाचे धोरण त्यांच्या विलगतेच्या सिद्धांताला पोषक ठरले.परंतु त्यामुळे चीनमध्ये जेव्हा पाश्चिमात्यांनी प्रवेश केला(त्यांच्या विस्तारवादी धोरणामुळे) तेव्हा त्यांना तोंड देणे किंवा त्यांचा प्रतिकार करणे चीनला कठीण जाऊ लागले. हे केवळ चीन बाह्य-जगाशी अनभिज्ञ असल्यामुळेच झाले. त्यामुळेच चीनची स्वावलंबित्व, स्वयंश्रेष्ठत्वाची कल्पना, परकीय पश्चिमात्यांचा चीनमधील प्रभाव आणि भ्रष्ट्राचार हे सर्व बाह्यजगताला माहीत झाले आणि आता चीन अचानक जलदगतीने आधुनिकीकरणाकडे झेप घेऊ लागला आहे. त्यामुळे तो वादाचा मुद्दा राहीला गेला आणि सध्या १९८० नंतर सुद्धा परिस्थितीमध्ये फारसा बदल झालेला आपणासं दिसत नाही.

१२.३ चीनच्या जागतीक संकल्पनेमध्ये बदल:-

चीनच्या राजेशाही काळामध्ये चीनने आपले शेजारील तसेच इतर कोणत्याही राष्ट्राला आपल्याशी समतुल्य मानले नाही. इ.स.१९४९च्या साम्यवादी राजवटीमध्ये चीनला आपली नाळ एखादया राष्ट्राशी जुळू शकते असे वाटले नाही. जसजशी चीनची औदयोगिक, आर्थिक प्रगती वाढत गेली तसतशी चीनची जगाकडे बघण्याची दृष्टी बदलत गेली. परंतु आपणच सर्वश्रेष्ठ अशी भावना त्यांच्यामध्ये सतत राहीली आणि पुन्हा एकदा चीन हा सर्व संस्कृतीचा केंद्रबिंदू असल्याची भावना त्यांच्यामध्ये बळावत गेली. त्यांच्यामते, शेजारील राष्ट्रांनी चीनकडे आदराने आणि वडीलधार्जिण्यादृष्टीने व मार्गदर्शक भावनेतून पहावे. त्याचा परिपाक आपल्याला १९६२ मधील भारत आणि १९७९ मधील व्हिएतनाम वरील चीनचे आक्रमण आसल्याचेआपणास दिसून येते.

चीनचे परराष्ट्रीय धोरण अभ्यासण्यासाठी आपल्याला चीनच्या जागतिक संकल्पनेमध्ये, जागतिक दृष्टीमध्ये डोकावून पाहणे जरुरीचे आहे. मार्क्सवादयांमध्ये चीनसुद्धा जागतिक इतिहासाला महत्वाचे मानतो. त्यांच्यामते, जगातील दैनंदिन वास्तव घटना या मूलभूत ऐतिहासीक प्रक्रियांचाच परिपाक असल्याचे आपणास दिसून येते. या ऐतिहासीक घटनांचे विज्ञानवादी विश्लेषण केले जाऊ शकते आणि सध्याच्या सत्तासंघर्षांचे मूळ आपणांस ऐतिहासीक घटनांमध्ये आढळून येईल. शांतीपूर्ण सौहार्द किंवा सत्तासंतुलन हे मानवतेचे केंद्रबिंदू नसून सततचा संघर्ष हाच मानवाच्या प्रगतीचा केंद्रबिंदू आहे यावर त्यांचा विश्वास आहे. या संघर्षामध्ये क्रांतीकारी गट (डावे), प्रतिक्रीयावादी (उजवे)आणि मध्यमगट असे तीन गट असल्याचे आपल्याला आढळते. त्यामुळेच चीनची सुरक्षितता, राष्ट्रवाद आणि राष्ट्रीय आर्थिक गरजा यांच्या बदलांबरोबरच चीनने आपल्या परराष्ट्रीय धोरणात वेळोवेळी बदल केलेले आपल्याला आढळते. म्हणून चीनच्या परराष्ट्र धोरणांतील बदलाने चीनची जागतिक संकल्पना किंवा जागतिक दृष्टी बदलत गेली असल्याचे आपणांस आढळते.

१२.३.१ शीतयुद्धापासून अलिप्त धोरण:-

दुसऱ्या महायुद्धानंतर साम्यवादी रशिया आणि लोकशाहीवादी (भांडवलशाही) अमेरिका यांच्या बरोबर असणारी मित्र राष्ट्रे यांच्यामध्ये दोन गट पडले होते. किंबहुना संपूर्ण जगच या दोन गटांमध्ये विभागले गेले होते. परंतु चीन सुरुवातीला कोणत्याही गटामध्ये सामिल झाले नाही. इ.स.१९४९-५६ दरम्यान चीनची अशी समजूत होती की, चीन आणि रशिया साम्यवादी विचारसरणीचे (साम्यवादी गट) असून भांडवलशाही गटाला (अमेरिकावादी) त्याचा कठोर विरोध आहे. परंतू १९५६ पासून चीन-रशियामध्ये काही कारणांनी वितुष्ट निर्माण झाले आणि १९६६ मध्ये चीनला स्वावलंबित्वाचे धोरण बाळगावे लागले. परंतु १९७० पासून चीनने आपले विलगतावादी धोरण रद्द करुन अमेरिकेशी जवळीक केली. तरीही चीन अमेरिकेच्या पूर्ण प्रभावाखाली न जाता आपल्या सामर्थ्यावर विश्वास ठेवून कोणत्याही एका गटाकडे न जाता स्वत:चे वेगळे अस्तित्व निर्माण करण्याच्या प्रयत्नात होता.

१३.३.२ बदलत्या गरजा – बदलते मित्र धोरण:-

चीनचे परराष्ट्र धोरण आणि त्यांची जागतिक दृष्टी याचा चीनच्या बदलत्या गरजांशी घनिष्ट संबंध असलेला आपणांस आढळून येतो. इ.स. १९४९ नंतरच्या स्वतंत्र अस्तित्वाच्या काळात चीन औदयोगिक विकासाच्या बाबतीत रशियावर आवलंबून होता. नव्या उदयोगधंदयांच्या विकासासाठी चीनने आपल्या तरुणांना रशियामध्ये तंत्रज्ञान प्रशिक्षणासाठी पाठविले. परंतू रशियाबरोबर वितुष्ट आल्यावर चीनने आपल्या तरुणांना अमेरिकेमध्ये आधुनिक तंत्रज्ञान प्रशिक्षणासाठी पाठविण्यास सुरुवात केली व आजही पाठवित आहे. चीनने आपल्या आशियातील प्रतिस्पर्धी जपानबरोबरचे धोरण पूर्णपणे बदलले आणि त्यांच्याशी मैत्रीचे, सहकार्याचे, तंत्रज्ञान, आयात निर्यातीचे, तेलशुद्धीकरण तंत्रज्ञानाचे देवाण घेवाणीचे करार केले. याच्याही पुढे इ.स.१९७२ मध्ये (युनोचा) संयुक्तराष्ट्र संघाचा सभासद झाल्यापासून चीनच्या परराष्ट्र धोरणामध्ये क्रांतीकारी बदल झाल्याचे दिसून येते. त्याचा सर्वात जवळचा मित्र रशिया आता शत्रू झाला आणि अमेरिका जो चीनचा कट्टर शत्रू होता आता चांगला मित्र झाल्याचे चित्र आपल्याला दिसते.

यावरुन आपल्याला असे लक्षात येईल की, परराष्ट्रधोरण अभ्यासावयचे झाल्यास चीनने आपल्या गरजा जसजशा बदलत गेल्या त्यानुसार आपले मित्र बदलले, शत्रू बदलले, परराष्ट्रधोरण बदलले आहे.

१२.४ चीनचे संरक्षणविषयक धोहण

१२.४.१ चीनचे संरक्षणधोरणाचे उद्देश:-

चीनने नेहमीच राष्ट्रीय सुरक्षाविषयक धोरणामध्ये 'स्वसंरक्षणावर' अधिक भर दिला. आपण प्रजासत्ताक चीनच्या राज्यघटनेचा अभ्यास केल्यास आपल्याला सैन्यदलाची जबाबदारी, राष्ट्रीय संरक्षण, आक्रमणाविरोधी लढाई, मातृभूमीचे संरक्षण, लोकांमध्ये शांती सद्भावासाठी उपाय योजणे, देशहीतासाठी राष्ट्रीय कार्यक्रमामध्ये भरीव कामगिरी करणे आणि अंतिमत: लोकांची सेवा करणे हीच असल्याची आपणास दिसून येते. चीनची राष्ट्रीय हितसंबंध, सामाजिक प्रणाली, परराष्ट्र धोरण, ऐतहासिक व सांस्कृतिक परंपरा हेच सांगतात की, चीन हे एक राष्ट्र म्हणून राष्ट्रीय संरक्षणाला आणि देशाच्या विकासालाच प्राधान्य देते.

चीनने नेहमीच देशाची सार्वभौमता एकता, अखंडता, आणि सुरक्षा याच गोष्टींना महत्व दिलेले आहे. आपण इ.स.१८४० च्या अफु युद्धाचा संदर्भ पाहिल्यास चीन एक साम्राज्यवादी परकीय (पाश्चिमात्य) राष्ट्राची मांडलीक वसाहत, एक हक्काची व्यापारी बाजारपेठ म्हणून गणली जात होती. त्याला नेहमीच परकीय आक्रमण, परकीय दमन, अवमानकारक वागणूक सहन करावी लागत होती. परंतू एका क्रांतीकारी स्फूर्तिदायक संघर्षानंतर चीनला आपले स्वातंत्र्य मिळाले आणि चीन एक स्वयंभू राष्ट्र या दर्जाला पोहोचले. अशाप्रकारे चीनने आपल्या मातृभूमीचे रक्षण केले, परकीयांचा प्रतिकार केला, एकजूटीचा वणवा पेटवला, आपापसांत फूट पडू दिली नाही. आपली एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून स्वतंत्र परराष्ट्र नीती प्रस्थापित केली.

१२.४.२ आर्थिक बांधणीसाठी सुरक्षेस दुय्यम स्थान :-

चीन समाजवादाच्या प्राथमिक अवस्थेमध्ये असताना चीनसमोर महत्वाची कामगिरी होती की, समाजवादी आधुनिकीकरणाच्या कार्यक्रमावर आपली शक्ती केंद्रीत करणे. त्यावेळी चीनमध्ये लोकसंख्या फार झपाट्याने वाढत होती. आर्थिक पाया कमजोर, असमतोल प्रादेशिक विकास, उत्पादक शक्तींचा मागासलेपणा इ. समस्या बऱ्याच काळापासून चीनमध्ये अस्तित्वात होत्या. त्यामुळे आर्थिक पुनर्बांधणी करणे ही चीनसमोर सर्वात महत्वाची कामगिरी होती. त्यामुळेच चीनने सुरक्षेकडे लक्ष कमी करुन संपूर्ण आर्थिक पुनर्बांधणीवर भर देण्याचे ठरवले.

यासाठी चीनला जागतिक शांतता त्यातच आपल्या शेजारील देशांशी आणि आपल्या देशामध्ये वातावरण अनुकुल असणे गरजेचे आहे. त्यामुळे चीनने आपली स्वतंत्र परराष्ट्रनीती आणि शांततापूर्ण वातावरण निर्माण करण्याचे ठरवले. आंतरराष्ट्रीय स्तरावरील आपल्या देशांशी प्रत्यक्ष संबंध असणाऱ्या घटनांवरच लक्ष देणे, कोणत्याही एका सामर्थ्यशाली गटाशी करार,तह न करणे अशी नीती चीनने अवलंबिली. चीनच्या मते, आंतरराष्ट्रीय वाद, कलह, समस्या या शांतीपूर्ण सहकार्यानेच सोडवाव्यात. कोणत्याही राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राविरुद्ध बळाचा वापर करु नये, प्रभुत्व गाजवू नये तथा फक्त आंतरराष्ट्रीय राजकारणाचा भाग म्हणून शांती-सौहार्द नष्ट करु नये. चीनने पारदर्शक व विज्ञानवादी आंतरराष्ट्रीय राजकारण आणि आर्थिक नीती, मैत्री, सहकार्य, तसेच शांतीपूर्ण सहअस्तित्वाचे 'पंचशील' यांचा पुरस्कार करण्यास सुरुवात केली.

१२.४.३ चीनची सुरक्षा आणि ऐतिहासिक सांस्कृतिक पार्श्वभूमी :-

चीनचा इतिहास आणि संस्कृती-परंपरा पाहिल्यांस चीनने आपल्या राष्ट्रीय सुरक्षेला नेहमीच महत्वाचे स्थान दिले आहे. चीनला ५००० वर्षापासून अखंडित संस्कृती आणि शांती-प्रेमी परंपरा लाभलेली आहे. चीनी विचारवंतांच्या अनुसार चीनने नेहमीच कल्याणकारी, मैत्री, सौहार्द, सलोखा यांचा पुरस्कार केलेला आहे. चीनी लोकांची प्रचीन संस्कृती ही विश्वशांती.आणि मंगलमैत्रीची राहीली आहे. लष्करी शक्तीचा विचार केल्यास जेवढे शक्य होईल तेवढ्या प्रमाणात वादाचा विषय, मुद्दा चर्चेद्वारे शांतीपूर्वक सोडवण्यावर भर दिला पाहिजे आणि फक्त अत्यंत आवश्यक वेळीच सैन्यबळाचा वापर करावा अशी चीनची नेहमीच भावना राहिली आहे.हजारो वर्षांच्या काळामध्ये आपल्याला असे दिसून येईल की, शांतीप्रियता, सुरक्षा, दबाव, एकीकरणाची चळवळ, राष्ट्रीय एकीस उत्तेजन आणि संयुक्तपणे परकीय आक्रमणाचा मुकाबला करणे ही चीनच्या सुरक्षा विषयक धोरणाची मूलभूत संकल्पना राहिली असल्याचे आपणासं दिसून येते. चीनच्या या ऐतिहासिक व पारंपारिक सुरक्षेच्या तत्वांनी पुढे चीनची भविष्यातील परराष्ट्रीय नीती ठरविण्यास मदत झालेली आहे.

१२.४.४ आपली प्रगती तपासा:-

१) चीनच्या विश्वसंकल्पनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगा.

२) चीनच्या सुरक्षा धोरणाचे उद्देश सांगा.

_____

_____

_____

_____

_____

१२.५ चीन अमेरिका संबंध

१२.५.१ प्रस्ताविक :-

चीन अमेरिका संबंध आपल्याला १९ व्या शतकाच्या शेवटीपासून वाढलेले आढळतात. मांचू राजवटीच्या काळामध्ये जगातील प्रमुख महासत्ताक देशांनी चीनमध्ये आपली प्रभाव क्षेत्रे निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यात फ्रान्स, इंग्लड,जर्मनी,इटली, जपान आणि रशिया यांचा समावेश होता. चीनची अनेक छोट्या छोट्या प्रभावक्षेत्रांमध्ये विभागणी होऊ नये म्हणून अमेरिकेने 'मुक्तद्वार धोरण' अवलंबिले. परंतु १८९० च्या दशकात रशियाने मांचुरिया पादाक्रांत करुन या मुक्तद्वार धोरणाला एक आव्हान उभे केले. त्यामुळे रशिया-जपान युद्ध (१९०४-०५) झाले आणि रशियाचा पराभव झाला. सर्वात मोठा धक्का अमेरिकेच्या मुक्तद्वार धोरणास बसला जेव्हा जपानने मांचुरियावर हल्ला करुन एक छोटेसे 'मांचुकुओ' राज्यच निर्माण केले. अमेरिकेने इतर राष्ट्रांबरोबर या कृतीस कठोर विरोध केला. परंतु प्रत्यक्ष कृती करण्यास कुचराई केला

इ.स.१९३७ च्या दुसऱ्या चीन - जपान युद्धाच्या वेळी चीनच्या प्रजासत्ताक चँग कै शेक सरकारला अमेरिकेच्या फ्रँकलीन डी रुझवेल्ट यांच्याकडून मदतीचा सतत ओघ सुरु झाला. त्यातच युद्धजन्य देशांना अमेरिकन मदत थांबण्यासाठी अमेरिकेमध्ये तटस्थता कायद्यांची मालिका अमेरिकेतील अलिप्तवादी नेत्यांच्या सहकार्याने पारित होत होती.तरीसुद्धा जो पर्यंत चीन-जपान युद्ध घोषित होत नाही तोपर्यंत अमेरिकेच्या रुझवेल्ट प्रशासनाने आपली मदत चीनला चालूच ठेवली.

जपानने पर्लहार्बर बंदरावर हल्ला केला. त्यामुळे दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेस प्रवेश करावा लागला आणि चीनने सुद्धा इ.स.१९४१ मध्ये जपानबरोबर युद्ध घोषित केले. चँग कै शेक सरकारला रुझवेल्ट प्रशासनाने भरघोस अर्थिक सहकार्य केले. चीनमध्ये माओ त्से तुंगची साम्यवादी पक्ष आणि चँग कै शेक चा राष्ट्रवादी पक्ष यांच्यामध्ये अनेक वर्ष संघर्ष चालू होता. त्यामुळे साम्यवाद्यांना नेस्तनाबूत करण्यासाठी चँग कै शेक सरकारने प्रयत्न केले परंतु चीन - जपान युद्धात जपानचा मुकाबला करणे चीनला अवघड जात होते.

१९४५ मध्ये दुसरे महायुद्ध संपल्यानंतर चीनमध्ये राष्ट्रीय पक्ष आणि साम्यवादी पक्ष यांच्यामध्ये यादवी युद्धास प्रारंभ झाला. जनरल डग्लस मॅकआर्थरने चँग कै शेक च्या

नेतृत्वाखालील लष्करी फौजांना जपानची शरणागती स्विकारण्यास तैवानमध्ये जाण्याचे निर्देश दिले आणि तैवानचा लष्करी ताबा घेण्यास सुरूवात झाली. इ.स. १९४६ मध्ये अमेरिकेचा लष्करप्रमुख जॉर्ज सी.मार्शल याने राष्ट्रीय पक्ष व साम्यवादी यांमध्ये समेट घडवून आणण्याचा प्रयत्न केला परंतु त्याला यश आले नाही. परंतु राष्ट्रीय पक्षाला या यादवी मध्ये यश आले नाही आणि शेवटी साम्यवाद्यांचा इ.स. १९४९ मध्ये विजय झाला. त्यांनी राष्ट्रवाद्यांना चीनमधून तैवानमध्ये हाकलून लावले. माओ त्से तुंग यांनी चीनमध्ये प्रजासत्ताक चीन सरकारची स्थापना केली आणि आजही तैवानमध्ये राष्ट्रीय पक्षाचे सरकार अस्तित्वात असल्याचे आढळते.

१२.५.२ लोक प्रजासत्ताक चीनची स्थापना अमेरिकेस अमान्य :

जळवजवळ ३० वर्षे झाल्यानंतरही अमेरिकेने लोक प्रजासत्ताक (People's Republic of China) चीनला मान्यता दिली नाही. याउलट त्यांनी तैवानच्या राष्ट्रीय सरकारशी परराष्ट्र संबंध स्थापित केले आणि त्याच्या चीनी सरकारला अधिकृत शासन म्हणून मान्यता दिली.

इ.स. १९४९ मध्ये जेव्हा प्रजासत्ताक चीनच्या सैन्याने साम्यवादी विजय पूर्ण करण्यासाठी मुख्यभूमीकडे (दक्षिणेकडे) आगेकूच केले, तेव्हा अमेरिकन वकिलातीमधील अधिकाऱ्यांनी चँग कै शेक च्या सरकारचा तायपेई पर्यंत पाठपुरावा केला आणि शेवटपर्यंत सर्व परिस्थितीवर नजर ठेवून चीनच्या मुख्य भूमीतच राहीले. परंतु राष्ट्रीय सरकारला अमेरिकन अधिकाऱ्यांची ही उपस्थिती आवडली नाही आणि ते त्यांना पाण्यात पाहू लागले. शेवटी १९५० मध्ये सर्व अमेरिकन कर्मचाऱ्यांना चीनी मुख्यभूमीतून माघारी बोलवण्यात आले.

१२.५.३ कोरीयन युद्धावेळी चीन – अमेरिका संबंध :-

१ नोव्हेंबर १९५० रोजी जे कोरीयन युद्ध झाले त्यात अमेरिकन फौजा आणि राष्ट्रीय सरकारच्या (चीन) फौजा आमनेसामने एकमेकांविरुद्ध लढले आणि अमेरिका व लोक प्रजासत्ताक चीनचे संबंध सुधारण्याची शक्यता पूर्णपणे मावळली. रशियाच्या पाठींब्याने उत्तर कोरीयाने दक्षिण कोरीयावर आक्रमण केले त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेमध्ये ८२ क्रमांकाचा ठराव पारित केला आणि उत्तर कोरीयाचा एकमताने निषेध करण्यात आला. हा ठराव अंमलात आणण्याचे कारण म्हणजे रशियाही, ज्याला संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेमध्ये नकाराधिकार मिळाला आहे, तो जानेवारी १९५० पासून सुरक्षा परिषदेच्या कामकाजात सहभागी होत नव्हता आणि त्याचे म्हणणे असे होते की, लोक प्रजासत्ताक चीनच्या ऐवजी राष्ट्रीय सरकारचा चीन (तैवान) हा सुरक्षा परिषदेचा कायम सदस्य आहे. जेव्हा अमेरिकेने संयुक्त राष्ट्रांच्या फौजा म्हणून उत्तर कोरीयन सैन्यावर आक्रमण करून त्याला दक्षिण कोरीयातुन समांतर रेषेपर्यंत ढकलले, नव्हे तर उत्तरेकडे ढकलीत चीन – कोरीयाच्या यालू नदीपर्यंत आणले मग मात्र लोक प्रजासत्ताक चीनने यामध्ये ढवळाढवळ करून साम्यवाद्यांची बाजू घेतली. त्यामुळे हा संघर्ष जवळजवळ दोन वर्षे चालू होता आणि मग दोन्ही बाजूंनी चर्चा घडवून आणल्या गेल्या आणि २७ जुलै १९५३ रोजी दोन्ही बाजूंनी युद्धबंदी घोषीत केली गेली. तरीही उत्तर – दक्षिण कोरीयाचा प्रश्न अधिकृतरित्या सुटलेला नसून आजही चीन – अमेरिका संबंधांच्या दृष्टीने तो एक कळीचा मुद्दा आहे. चीनचा कोरीयन युद्धामध्ये प्रवेश झाल्यामुळे अमेरिकेची तैवानच्या राष्ट्रीय सरकारबरोबरची परराष्ट्र नीती एकदम बदलली आणि जी अमेरिका तैवानच्या राष्ट्रीय सरकारला साधा पाठींबा देत होती ते आता लोक प्रजासत्ताक चीनच्या आक्रमणापासून पूर्ण रक्षण करण्याची नीती आखून आहे.

१२.५.४ व्हिएतनाम युद्ध आणि चीन – अमेरिका संबंध :-

इ.स. १९४९ मध्ये जेव्हा साम्यवाद्यांनी संपूर्ण चीनचा ताबा घेतल्यावर लोक प्रजासत्ताक चीनने व्हिएतनाम युद्धामध्ये सहभाग घेतला. चीनी साम्यवादी पक्षाने व्हिएतनामी साम्यवाद्यांना (बंडखोर) आपला संपूर्ण अर्थिक व लष्करी पाठींबा दिला. इ.स. १९६२ मध्ये माओ त्से तुंगनी हनोईला ९०००० रायफल्स आणि बंदुका मोफत पाठवण्याचे मान्य केले. तसेच चीनने उत्तर व्हिएतनाम मध्ये अभियांत्रिकी दुरूस्ती, रस्ते बांधणी, रेल्वे बांधणी, विमान दुरूस्ती करण्यासाठी आपले तंत्रज्ञ व अभियंते धाडले आणि विमानविरोधी क्षेपणास्त्रेही पाठविली जेणे करून अमेरिकन बॉम्बहल्याने झालेले नुकसान त्वरीत भरून येईल. यामुळे उत्तर व्हिएतनाममधील साम्यवादी गटाने दक्षिण व्हिएतनामी सैन्यावर हल्ले करण्यास सुरूवात केली. इ.स. १९६५ – ७० च्या दरम्यान आपण पाहिल्यास जवळजवळ ३,२०,००० चीनी सैन्य उत्तर व्हिएतनामी सैम्याच्या खांद्याला खांदा लावून अमेरिकन सैन्याशी लढले.

१२.५.५ चीन एक अण्विक सुसज्ज राष्ट्र :-

अमेरिकेने लोक प्रजासत्ताक चीनला राष्ट्रीय सरकारची (तैवान) संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेतील कायम सदस्याची जागा घेण्यापासून नेहमीच रोखण्याचा प्रयत्न केला होता. एवढेच नाही तर आपल्या मित्र राष्ट्रांनासुद्धा लोक प्रजासत्ताक चीनबरोबर कोणतेही परराष्ट्र संबंध न ठेवण्यास सांगितले होते. अमेरिकेने लोक प्रजासत्ताक चीनबरोबर समुद्री व्यापार करण्यावर बंदी घातली होती आणि आपल्या दोस्तांनासुद्धा त्याचे पालन करण्यास सांगितले होते. इ.स. १९६४ मध्ये चीनने आण्विक परीक्षण केले आणि अण्वस्त्र सज्ज राष्ट्रांच्या यादीमध्ये स्थान प्राप्त केले. परंतु अमेरिकन राष्ट्राध्यक्ष जॉन्सन ने चीनवर (प्रजासत्ताक) हल्ला करण्याचे ठरविले होते जेणे करून चीनच्या अणुकार्यक्रमास हानी पोहोचेल.

लोक प्रजासत्ताक चीनला अमेरिकेने १९५४ मध्ये अमान्य केल्यापासून १९७० पर्यंत चीन आणि अमेरिके दरम्यान परराष्ट्र मंत्रालय पातळीवर (वकीलाती पातळीवर) जवळजवळ१३६ भेटी झाल्या होत्या, त्यांत चर्चा घडून आल्या होत्या. त्यातील सर्वात पहिली भेट जिनिव्हा येथे तर नंतरची वार्सा येथे झाली होती.

१२.५.६ चीन – अमेरिका समझौता :-

लोक प्रजासत्ताक चीन आणि अमेरिका या दोघांनी परस्परांतील संबंध सुधारण्यासाठी आपले दूत एकमेकांकडे पाठवले होते व त्यासाठी सुचना पुढे करण्यात आल्या होत्या. प्रजासत्ताक चीनसाठी हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न होता कारण १९६९ पासून चीन – रशिया सीमा प्रश्नावरून संबंधांत कटूता आल्यामुळे चीनला नव्या मित्राची गरज वाटत होती. प्रजासत्ताक चीनने अलगतावादी धोरण स्विकारल्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर सत्तासंतुलन ठेवण्यासाठी आणि रशियाच्या भविष्यातील धोक्याला ओळखून अमेरिकेसारखा मित्र असणे प्रजासत्ताक चीनला आवश्यक वाटत होते. त्यासाठी चीनचे पंतप्रधान आणि परराष्ट्रमंत्री चौ एन लाय हे त्यासाठी जातीने प्रयत्नशील होते.

प्रजासत्ताक साम्यवादी चीनविषयी अमेरिकेत वेगवेगळे मतप्रवाह होते. एका गटानुसार प्रजासत्ताक साम्यवादी चीनला बाजूला ठेवणे अमेरिकेच्या दृष्टीने हानीकारक होऊ शकते तर दुसऱ्या मतप्रवाहानुसार प्रजासत्ताक चीनच्या संबंधांचा व्हिएतनाम, कंबोडिया, लाओस या आग्नेय

आशियातील देशांशी चर्चा करण्यासाठी आणि रशियन साम्यवादाविरूद्ध शक्तींचे विभाजन करण्याच्या निमित्ताने प्रजासत्ताक चीनची मदत अमेरिकेला होऊ शकते. त्याचप्रमाणे अमेरिकन व्यापारवृद्धीसाठी एक अब्जापेक्षा ग्राहक असलेली चीनची मुख्य भूमीतील बाजारपेठसुद्धा अमेरिकेस उपलब्ध होऊ शकते असे गृहीत धरले होते. अमेरिकेचा डेमोक्रॅटीक सिनेटर नेता माईक मॅन्सफील्ड हा प्रजासत्ताक साम्यवादी चीनशी संबंध प्रस्थापनेसाठी सर्वात अधिक उत्सुक होता. त्याला प्रजासत्ताक साम्यवादी चीनने संपर्क करून एक भेट ठरवून घेतली. त्यामध्ये माईक मॅन्सफील्डने आपल्या प्रशासनीक विभागास एक आणि अमेरिकन राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यास त्याविषयीचे एक पत्रकही पाठविले.

१२.५.७ राष्ट्रध्यक्ष निक्सनचा आशियात रस :-

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सनला तसेच त्याचा राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार हेन्री किसिंजर यांना अनुक्रमे आशियामध्ये आणि प्रजासत्ताक चीनमध्ये रस होता. निक्सनला आपले राजकीय वजन महत्त्वाचे वाटत होते आणि प्रजासत्ताक चीनची १९७२ च्या राष्ट्राध्यक्षाच्या निवडणुकीत मदत होऊ शकते अशी त्याची धारणा होती. एखादा डेमोक्रेटीक पक्षाचा सिनेटर आपल्या अगोदरच चीनशी संधान बांधील अशी त्याला काळजीसुद्धा वाटत होती आणि म्हणून प्रजासत्ताक चीनबरोबर संबंध स्थापन करण्याची संधी दवडता कामा नये असे त्याला वाटत होते. दरम्यान पाकिस्तान आणि रुमानिया या आपल्या मध्यस्थ राष्ट्रांमार्फत अमेरिका - चीन पत्रव्यवहार चालूच होता. या दृष्टीने रिचर्ड निक्सनचा प्रजासत्ताक चीनशी संबंध स्थापन करण्याचा रस आपल्याला दिसून येतो.

१२.५.८ पिंग –पाँग शिष्टाई :-

इ.स. १९६९ मध्ये अमेरिकेने चीनबरोबर संबंध सुधारण्यासाठी त्यावरील काही व्यापारी निर्बंध आणि इतर बंधने शिथिल केली आणि चीननेही त्याला सकारात्मक प्रतिसाद दिला. परंतु अमेरिकेच्या इंडोचायना मधील कारवायांमुळे चीन – अमेरिका समझौता प्रक्रीया थोडी थांबली गेली होती. त्यातच ६ एप्रिल १९७१ रोजी एक घटना घडली. अमेरिकेचा टेबलटेनिस खेळाडू ग्लेन्न कोवानची ३१ व्या जागतिक टेबलटेनिस चॅम्पीयनसाठी नागोंया (जपान) येथे अमेरिकन संघाला घेऊन जाणारी बस चुकली. त्यावेळी चीनचा संघ प्रवास करत असलेल्या बसमध्ये ग्लेन्न चढला आणि त्याने चीनी संघातील खेळाडूंशी अत्यंत मैत्रीपूर्ण व खेळीमेळीमध्ये गप्पागोष्टी केल्या. त्यातच चीनचा तीन वेळा विश्व पुरुष एकेरी टेबल टेनिस विजेता खेळाडू झुआँग झेडाँग याने ग्लेन्न कोवानला चीनच्या सुप्रसिद्ध ह्युआँगशान पर्वतराजींचे दृश्य असलेली चंदेरी तसवीर भेट म्हणून दिली. ही कृती जरी दोन टेबल टेनिस खेळाडूंमधील मैत्रीची प्रतिक्रीया असली तरीही चीनने त्याला दोन्ही देशांमधील संबंध प्रस्थापित करण्याचे एक निमित्त मानून महत्त्व दिले.

सदरच्या दोन खेळाडूंमधील मैत्रीपूर्ण संबंध आणि त्यांचे डकांकाओ मध्ये एकत्र असलेले फोटो, त्यांनी माओ त्से तुंग यांच्या मनावर एक सकारात्मक परिणाम घडून आला. चीनमध्ये टेबल टेनिस खेळण्यासाठी त्यांनी अमेरिकेच्या खेळाडूंना निमंत्रण न देण्याचे ठरवले होते परंतु या पिंग पाँग शिष्टाई मुळे चीनने अमेरिकन टेबल टेनिस संघाला चीनच्या मुख्य भूमीत (प्रजासत्ताक चीन) खेळण्यासाठी पाचारण केले. १० एप्रिल १९७१ साली अमेरिकेचे पिंग पाँम खेळाडू हे चीनमध्ये जाणारे प्रथम अमरिकन ठरले. कारण इ.स. १९४९ मध्ये प्रजासत्ताक साम्यवादी चीनची स्थापना झाल्यापासून अमेरिकेची अधिकृतपणे कोणतीही शासकीय भेट

चीनबरोबर झालेली नव्हती. ही शिष्टाई पुढे 'पिंग – पाँग शिष्टाई' म्हणून प्रसिद्ध झाली. कारण त्यानंतरच चीन व अमेरिका यांच्या मध्ये आंतराष्ट्रीय संबंध स्थापित होण्यास सुरुवात झालेली आपल्याला आढळते.

१२.५.९ हेन्री किसिंजरची चीनला गुप्त भेट :-

जुलै १९७१ मध्ये हेन्री किसिंजर पाकिस्तान भेटीवर गेले असताना त्यांनी आजारपणाचे कारण पुढे करुन एक दिवस सार्वजनिक कार्यक्रमात बिलकूल भाग घेतला नाही. प्रत्यक्षपणे पाहिल्यास, त्या दिवशी ते बिजिंगमध्ये प्रजासत्ताक साम्यवादी चीनबरोबर उच्चस्तरीय बोलणी करण्यासाठी गेलेले होते. हे सर्व जगाला तेव्हाच माहित झाले जेव्हा १५ जुलै १९७१ रोजी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सनने सदर भेटीची घोषणा केली आणि आपल्याला चीनकडून मिळालेले निमंत्रण व त्याचा स्विकार याची जगातील प्रमुख वृत्तवाहिन्यांना माहिती दिली.

१२.५.१० रिचर्ड निक्सनच्या नियोजित चीन भेटीवर प्रतिक्रीया :-

निक्सनच्या नियोजित चीनभेटीमुळे जगभरातील देशांना एक आश्चर्याचा जणू धक्काच बसला. अमेरिकेमध्येच साम्यवाद विरोधी गटाकडून विरोधी प्रतिक्रीया उमटली. परंतु जनमताने या निर्णयाला पूर्ण पाठींबा दिला. त्यामुळे निक्सनची अमेरिकेत लोकप्रियता शिगेला पोचली. चीनमध्ये सुद्धा निक्सनच्या भेटी विरुद्ध प्रतिक्रीया उमटली. चीनच्या साम्यवादी पक्षाचा एक नेता आणि लष्कराचा प्रमुख लिन बियाओ याने चीन – अमेरिका समझोत्याचा मुद्दा थोडा काळ राखून ठेवण्याचा उल्लेख केला. शेवटी लिन बियाओ, मंगोलियात अपघातामध्ये संशयास्पदरित्या मरण पावला. त्यामुळे सदर समझोत्याला होणारा अंतर्गत विरोध थोडा काळ मावळला.

आंतरराष्ट्रीय स्तरावर नियोजित निक्सन - चीन भेटीच्या वेगवेगळ्या प्रतिक्रीया उमटल्या. एकेकाळचे कटटर शत्रू मतभेद विसरून एकत्र येत आहेत आणि दोन्ही राष्ट्रे ताणतणाव विसरुन एका नव्या मैत्री पर्वात प्रवेश करत आहेत हे एकून रशियाला ते जास्तच महत्त्वाचे वाटले.

अमेरिकेची युरोपियन मित्र राष्ट्रे आणि कॅनडा या नव्या चीन अमेरिका भेटीने चांगलेच आनंदी झाले होते कारण त्यांपैकी बऱ्याच जपानी प्रजसत्ताक साम्यवादी चीनला अगोदरच मान्यता दिलेली होती. आशियामध्ये त्याविषयी थोडी संमिश्र प्रतिक्रीया उमटली. सदर घोषणेचा जपानला अत्यंत राग आला. कारण १५ मिनिटेसुद्धा अगोदर त्यांना याचा पत्ता लागला नव्हता. त्याचबरोबरच चीनसाठी अमेरिका जपानला दूर लोटत आहे. याची भीतीही वाटली. थोड्याच कालावधीनंतर जपाननेसुद्धा प्रजासत्ताक चीनला मान्यता दिली आणि त्यानंतर जपान चीनबरोबर व्यापारउदीम चालू ठेवील याचे सूतोवाच केले. दक्षिण कोरीया आणि दक्षिण व्हिएतनाम यांच्या मते, अमेरिका व चीनमधील शांती – समझोता म्हणजे त्यांना मिळणारी साम्यवादी – विरोधी मदत बंद होणे होय आणि म्हणूनच पूर्ण समझोता होईपर्यंत सदर राष्ट्रांना दूर लोटले जाणार नाही असे वारंवार आश्वासन द्यावे लागले.

१२.५.११ रिचर्ड निक्सनची चीन भेट :-

सुमारे २१ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी १९७२, रिचर्ड निक्सनने बिजिंग, हँगझाऊ आणि शांघाय असा प्रवास केला. सरतेशेवटी भेटीचे फलित म्हणून दोन्ही देशांनी आपल्या परराष्ट्र संबंधांविषयी एक निवेदन (शांघाय कम्युनिक) शांघाय येथून जाहिर केले. या प्रस्तावानुसार दोन्ही देशांनी आपले संबंध सामान्य करण्याची प्रतिज्ञा केली. अत्यंत महत्त्वाचे म्हणजे अमेरिकेने प्रजासत्ताक चीनला मान्यता दिली आणि दुसरा कोणताही चीन नसून तैवान हा चीनचाच एक भाग आहे असे जाहिर केले. सदरच्या निवेदनामुळे दोन्ही देश एकत्र येतील आणि सध्या तरी तैवानचा प्रश्न बाजूला ठेवून संबंध सामान्य करतील व परस्पर व्यापारी व इतर संबंध सुरळीत करण्याचे प्रयत्न करतील असे ठरले.

१२.५.१२ शांती समझोत्याचे परिणाम :-

चीन – अमेरिका समझोत्याचा एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे चीनला खूप मोठा लाभ झाला आणि संपूर्ण शीतयुद्धाच्या काळात चीनची सुरक्षा मोठ्या प्रमाणात वाढवण्यात आली. याउलट अमेरिकेला अपेक्षेपेक्षा फारच कमी फायदा झाला. व्हिएतनाम युद्धामध्ये ख्मेर घराण्याचे समर्थन केले. परंतु व्हिएतनामचे वागणे संशयास्पद आढळल्यामुळे आणि व्हिएतनामने कंबोडियावर आक्रमण केल्यामुळे चीन – व्हिएतनाम सहकार्याला तडा गेला व शेवटी १९७९ मध्ये चीन – व्हिएतनाम युद्धास प्रारंभ झाला. चीन आणि अमेरिका दोघेही आफ्रिकेतील लोकशाहीवाद्यांना आणि क्युबातील स्वातंत्र्य चळवळीला (लोकशाही) रशियन साम्यवाद विरोधात पाठींबा देत असत. चीन – अमेरिकेतील समझोत्याचा परिणाम म्हणून अमेरिकेस मिळणारे अर्थिक लाभ अत्यंत मंद गतीने मिळत होते आणि अमेरिकी उत्पादन चीनी बाजारपेठेत स्थिर होण्यासाठी जवळजवळ दशकाचा कालावधी लागत होता. निक्सनच्या कार्यकाळातील महत्त्वाचे धोरण म्हणजे त्यांची चीन विषयक राजनीती हे असले तरीही विलीयम बंडी सारख्या अमेरिकन नेत्यांच्या मते या नीतीमुळे अमेरिकेस फारच कमी फायदा मिळत होता.

१२.५.१३ चीन – अमेरिका औपचारिक परराष्ट्र संबंध :-

इ.स. १९७३ च्या मे महिन्यात चीन – अमेरिका परराष्ट्र संबंध औपचारिकपणे स्थापन करण्याचा प्रयत्न केला गेला. या दिशेने बिजिंगमध्ये आणि वशिंग्टन मध्ये दोन्ही देशांची संपर्क कार्यालये (Liaison office) उघडण्यात आली. इ.स. १९७३ – ७८ दरम्यान अमेरिकी संपर्क कार्यालयामध्ये बिजिंग येथे डेव्हिड के. ई. ब्रुस, जॉर्ज एच. डब्लू बुश, थॉमस गेट्स आणि लिओनार्द बुडकॉकसारख्या अत्यंत नावाजलेल्या राजदूतांनी काम पाहिले.

चीन – अमेरिका संबंध आणखी मजबूत होण्याच्यादृष्टीने अमेरिकी राष्ट्राध्यक्ष गेराल्ड फोर्ड यांनी १९७५ मध्ये चीनला भेट दिली आणि चीनमधील अमेरिकी संबंध वाढण्याच्या नीतीचा पुनरुल्लेख केला. इ.स. १९७७ मध्ये (शांघाय समझोता) जिम्मी कार्टर राष्ट्राध्यक्ष झाल्यावर त्यांनीही पुन्हा चीन – अमेरिका संबंध वृद्धींगत करण्याचा उल्लेख केला. १५ डिसेंबर १९७८ रोजी अमेरिका आणि प्रजासत्ताक साम्यवादी चीन १ जानेवारी १९७९ रोजी दोन्ही देशांतील परराष्ट्र नीती ठरविणार असल्याची घोषणा केली.

१२.५.१४ एकच चीनला मान्यता :-

एका संयुक्त समारंभामध्ये, १ जाने १९७९ रोजी अमेरिकेने आपली राजनीतीक मान्यता तायपेई वरून बिजिंगला दिल्याचे घोषित केले. अमेरिकेने शांघाय समझोत्यात ठरल्याप्रमाणे चीनमध्ये कोणतेही दोन चीन नसून एकच चीन आहे आणि तैवान हा त्या चीनचाच एक भाग आहे अशी घोषणा केली. शेवटी सर्व जगाला कळले की, चीन हा एकच चीन आहे आणि दुसरा कोणताही चीन अस्तित्वात नाही. त्याच्या परिणामस्वरुप बिजिंगने अमेरिकेला असे आश्वासन दिले की, अमेरिका तैवानबरोबर व्यापारी, सांस्कृतिक आणि इतर प्रकारचे सर्व संबंध चालू ठेवू शकते. त्यामुळे पारित झालेल्या तैवानसंबंधी कायद्याने अमेरिकेस तैवानबरोबर अनधिकृत संबंध ठेवण्यास मुभा मिळाली.

१२.५.१५ आपली प्रगती तपासा :-

१) व्हिएतनाम युद्ध आणि चीन – अमेरिका संबंध थोडक्यात लिहा.

२) पिंग पाँग शिष्टाई म्हणजे काय ?

_____

_____

_____

_____

_____

१२.६ डेंग झायोपिंग यांची अमेरिका भेट

जानेवारी १९७९ मध्ये चीनचे उपपंतप्रधान डेंग झायोपिंग यांनी वाशिंग्टनला भेट दिली व त्यामुळे उच्च पातळीवर उभय देशांमधील देवाण – घेवाण इ.स. १९८९ पर्यंत चालू होती. त्यामुळेच उभय देशांमध्ये द्विपक्षीय करार पार पडले. त्यांमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीबरोबर व्यापारी संबंध अत्यंत महत्त्वाचे आहेत. इ.स. १९७९ च्या सुरुवातीपासून अमेरिका आणि चीन यांनी विज्ञान व तंत्रज्ञानातील परस्पर सहकार्य करारानुसार शेकडो प्रकल्प व सहकारी कार्यक्रम संयुक्तपणे हाती घेतले.

१ मार्च १९७९ मध्ये अमेरिका आणि चीन यांनी औपचारीक पणे अनुक्रमे बिजिंग आणि वाशिंग्टन येथे परकीय वकीलाती कार्यालये उघडली. इ.स. १९७९ मध्ये खाजगी वाद मिटवले गेले आणि द्विपक्षीय व्यापारी करार करण्यात आले. ऑगस्ट १९७९ मध्ये उभय देशांच्या उपपंतप्रधान आणि उपराष्ट्राध्यक्ष अनुक्रमे डेंग आणि वॉल्टर मॉन्डेल यांनी वाशिंग्टन व बिजिंगला भेटी दिल्या. त्याच्या परिणामस्वरुप सप्टेंबर १९८० मध्ये उभय देशांमध्ये सागरी व्यापारी, नागरी विमान वाहतूक संपर्क, सूती कापड यांबाबतीत करार स्वाक्षरीत करण्यात आले.

इ.स. १९८० मध्ये उच्च – पातळीवरील आणि कार्यात्मक पातळीसंबंधांबाबतीत वेगवेगळ्या समस्यांवर, मुद्द्यांवर उभय देशांमध्ये सुसंवादाची प्रक्रीया सुरु झाली. त्यामध्ये आंतरराष्ट्रीय व प्रादेशिक समस्या, राजकीय - लष्करी प्रश्न, शस्त्रास्त्र नियंत्रण, संयुक्त राष्ट्र आणि इतर बहुपक्षीय संघटनांचे कार्यक्रम आणि आंतरराष्ट्रीय मादक पदार्थांवर नियंत्रण इ. विषयांवर संयुक्त चर्चा करण्यात आल्या.

१२.६.१ तैवान प्रश्न :-

चीन आणि अमेरिका यांचे औपचारिक परराष्ट्र संबंध वाढत असतानाच इ.स. १९८१ मध्ये चीनने अमेरिकेवर तैवानला अधिकाधिक शस्त्रास्त्रे विक्रीबाबत जोरदार आक्षेप नोंदवल्याने उभय देशांमध्ये संबंधांबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले. जून १९८१ मध्ये अमेरिकेचे परराष्ट्र सचिव आलेक्झांडर हेग यांनी अमेरिकेचे तैवानबरोबर असलेले अनधिकृत संबंधांबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी चीनला भेट दिली. या विषयी आठ महिने बोलणी चालल्यानंतर १७ ऑगस्ट १९८२ ला उभय देशांमध्ये एक करार करण्यात आला. या तिसऱ्या करारामध्ये अमेरिकेने तैवानला शस्त्रास्त्रे विकण्याचे प्रमाण हळूहळू कमी करण्याचे आणि चीनने तैवानचा प्रश्न शांततापूर्ण मार्गाने सोडवणे ही चीनची मूलभूत नीती असल्याचे मान्य केले. त्यातच मे १९८२ मध्ये अमेरिकेच उपराष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश यांनी चीनला भेट दिली.

१२.६.२ चीन – अमेरिका उच्च – पातळीवरील देवाणघेवाण :-

१९८० च्या दशकातील उच्च पातळीवरील देवाणघेवाण हे चीन – अमेरिका संबंध विकसित होण्याच्या प्रक्रीयेतील एक महत्त्वाचे माध्यम मानले पाहिजे. इ.स. १९८४ मध्ये अमेरिकेचे अध्यक्ष रोनाल्ड रेगन आणि चीनचे पंतप्रधान झाओ झियांग यांनी परस्परांच्या देशांना भेटी दिल्या. जुलै १९८५ मध्ये चीनचे अध्यक्ष लि झायनियन यांनी अमेरिकेस दिलेली भेट म्हणजे चीनच्या राष्ट्रप्रमुखांची पहिलीच अमेरिका भेट होय. अमेरिकेचे उपाध्यक्ष जॉर्ज बुश यांनी ऑक्टोबर १९८५ मध्ये चीनला भेट दिली आणि चेंगडू शहरात अमेरिकन वकीलातीचे कार्यालय उघडले. पुढे इ.स. १९८५ – ८९ दरम्यान मंत्री पातळीवरील देवाणघेवाण चालू राहीली आणि त्याच्या परिणामी अमेरिकी अध्यक्ष जॉर्ज बुश यांनी फेब्रुवारी १९८९ मध्ये बिजिंगला भेट दिली.

१२.६.३ सांस्कृतिक आदान – प्रदान :-

३ – ४ जून १९८९ च्या तिनानमेन कारवाईपूर्वीपर्यंत चीन आणि अमेरिकी जनतेदरम्यान सर्व पातळ्यांवर आदानप्रदान फार मोठ्या प्रमाणावर चालू होते आणि एक दुसऱ्याच्या सांस्कृतिक - शैक्षणिक प्रगतीबाबत कौशल्य – प्रदर्शन केले जात होते. प्रत्येक महिन्यात असंख्य चीनी व्यवसायिक आणि प्रशासकीय प्रतिनिधीमंडळे अमेरिकेस भेट देत होती. यातील बरेच प्रकारचे आदानप्रदान तिनानमेन वरील कारवाईनंतर सुद्धा चालू राहीले होते.

१२.६.४ तिनानमेन स्क्वेअर हत्याकांडाबाबत अमेरिकी प्रतिक्रीया :-

जून १९८९ मध्ये निदर्शकांचे हत्याकांड करून तो प्रश्न पूरता दाबून टकल्यामुळे, अमेरिका आणि इतर राष्ट्रांनी चीनच्या या मानवी हक्क उल्लंघनाच्या कारवाईचा वेगवेगळ्या प्रकारे निषेध केला. अमेरिकी शासनाने चीनबरोबर उच्च पातळीवरील आदानप्रदान स्थगित केले. तसेच अमेरिकी प्रशासनाने चीनवर आर्थिक निर्बंध लादले आणि चीनला शस्त्रास्त्र निर्यात बंद केली. इ.स. १९९०च्या उन्हाळ्यामध्ये जी – ७ राष्ट्रांचे सम्मेलन हयुस्टन येथे भरले होते. त्यामध्ये 'मानवी हक्कांच्या' क्षेत्रामध्ये साम्यवादी प्रजासत्ताक चीनबरोबरचे राजकीय व आर्थिक सुधारणांचे पुनर्नवीकरण करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन जी – ७ सदस्य राष्ट्रांनी केले.

१२.६.५ चीन – अमेरिका संबंधात वितुष्ट :-

इ.स. १९८९ मधील चीनच्या तिनानमेन स्क्वेअर हत्याकांडामुळे चीन – अमेरिका संबंधांत वितुष्ट आले होते आणि अमेरिकी व्यावसायिकांचा चीनमधील व्यापार करण्यामागील रस

ताबडतोब कमी झाला होता. अमेरिकी शासनाने सुद्धा चीनच्या या राजकीय दमनाच्या करवाईला प्रतिक्रीया म्हणून चीनबरोबरचे काही व्यापार व गुंतवणूक कार्यक्रम रद्दबातल केले होते.

२ सप्टेंबर १९९२ रोजी अमेरिकी अध्यक्ष जॉर्ज बुश यांनी स्वरक्षणार्थ तैवानला १५० एफ – १६ लढाऊ विमाने विकत देणार असल्याची घोषणा केली. परंतु हे पूर्वीच्या चीन अमेरिका कराराचे व त्यातील आश्वासनांचे पूर्णपणे उल्लंघन होते. याही पुढे जाऊन त्यांनी आपला व्यापारी प्रतिनिधी म्हणून कार्ला हिल्स यांना तैवानाला पाठविले आणि पुढे चीन – अमेरिका संबंध आणखीनच बिघडवण्याचा प्रयत्न केला.

५ ऑक्टोबर १९९२ रोजी अमेरिकी अध्यक्ष जॉर्ज बुश यांनी चीनच्या प्रखर विरोधाला न जुमानता अमेरिका – हाँगकाँग नीती कायद्यावर स्वाक्षरी केली. त्या कायद्यातील तरतूदीनुसार अमेरिकी कायद्याप्रमाणे हाँगकाँगला 'असार्वभौम राष्ट्र' म्हणून वागणूक देण्याचा अधिकार प्राप्त झाला. या कायद्याविरोधात चीनने आपला कठोर व जाहिर निषेध नोंदवला.

१२.६.६ आपली प्रगती तपासा :-

१) तैवान प्रश्न स्पष्ट करा.

२) तिनानमेन स्क्वेअर हत्याकांडाबाबत अमेरिकेने कोणती प्रतिक्रीया दिली ?

_____

_____

_____

_____

_____

१२.७ समारोप

चीनचा ऐतिहासिक वारसा पाहिल्यास चीनने प्राचीन काळापासूनच विलगतावादी वृत्तीचा अंगिकार केला होता. चीन नेहमीच आपल्या संस्कृतीचा गर्व बाळगून होता. वेगवेगळ्या घराण्यांनी वेगवेगळी नीती अवलंबण्याचा प्रयत्न केला. त्यांनी चीनला नेहमीच बाह्यजगापासून अलग ठेवले. परंतु हे धोरण फार काळ चीनला ठेवणे जमू शकत नव्हते. त्यामुळे चीनचे राष्ट्रीय सरकार आणि माओ त्से तुंग यांचा साम्यवादी पक्ष यांच्यामध्ये जेव्हा यादवी युद्ध झाले तेव्हा साम्यवादयांचा विजय होऊन राष्ट्रीय सरकारच्या प्रमुखास (चँग कै शेक) तैवानाला पळून जावे लागले. माओंनी आपल्या कारकीर्दीत रशियासह अमेरिकेबरोबर संबंध स्थापन करून चीनच्या विकासाची नीती आखली. परंतु अमेरिकेने मात्र आपला स्वार्थ सांभाळूनच चीनला मदत दिली. चीनच्या लोक प्रजासत्ताक सरकारला मान्यताही दिली गेली. पिंग पाँग शिष्टाईचा काही प्रमाणात चीन – अमेरिका संबंधांसाठी फायदा झाला.

१२.८ प्रश्न

१) चीनच्या परकीय धोरणानुसार त्याच्या विश्वसंकल्पनेचा आढावा घ्या.

२) प्रजासत्ताक साम्यवादी चीनच्या सुरक्षा धोरणाची उद्दिष्टे व पद्धती यावर चर्चा करा.

३) इ.स. १९७१ पर्यंतच्या चीन – अमेरिका संबंधांचे परीक्षण करा.

४) इ.स. १९७१- ९२ पर्यंतच्या चीन – अमेरिका संबंधांचा मागोवा घ्या.

५) टीपा लिहा :- अ) चीनची विश्वसंकल्पना
ब) चीनचे संरक्षण धोरण
क) पिंग-पाँग शिष्टाई.

❖❖❖

१३

चीनचे सुरक्षा धोरण आणि परराष्टनीती - २ चीन रशिया व चीन भारत परराष्ट्रसंबंध

घटक रचना :

१३.० उद्दिष्टचे
१३.१ प्रस्तावना
१३.२ चीन- रशिया मैत्री करार
१३.३ चीन - भारत संबंध
१३.४ अटलबिहारी वाजपेयींची चीनला भेट
१३.५ चीन-भारत संबंध सुधारण्याचे प्रयत्न
१३.६ राजीव गांधींची चीन - भेट
१३.७ लि पेंग यांची भारत भेट
१३.८ पी. व्ही. नरसिंह राव यांची चीन भेट
१३.९ समारोप
१३.१० प्रश्न

१३.० उद्दिष्टचे

१) चीन - रशिया परराष्ट्र संबंधांचा मागोवा घेणे.
२) काँग्रेस कालीन चीन - भारत संबंधांचा अभ्यास करणे.
३) चीन-भारत युद्धोत्तर (इ.स.१९६२) संबंधांचे विश्लेषण करणे.

१३.१ प्रस्तावना

इ.स.१९४९ मध्ये यादवी युद्ध संपल्यानंतर साम्यवादी चीनने आपल्या राजवटीला परराष्ट्रीय युद्ध संपल्यानंतर साम्यवादी चीनने आपल्या राजवटीला परराष्ट्रीय राजनैतिक मान्यता मिळविली. प्रजासत्ताक चीनला (साम्यवादी) सर्वात प्रथम मान्यता देणारा देश म्हणजे सोव्हिएत रशिया होय. त्यामुळेच बलाढ्य रशियाने मान्यता दिल्यानंतर पुढील सात महिन्यात संपूर्ण साम्यवादी राष्ट्रांच्या गटाने तसेच युगोस्लाव्हिया, नॉर्वे, स्विडन, डेन्मार्क, इझराईल, नेदरलँडस, स्वित्झर्लंड, इंग्लंड आणि सहा आशियाई देशांनी (अफगाणिस्तान, ब्रह्मदेश, श्रीलंका, भारत, इंडोनेशिया आणि पाकिस्तान) चीनच्या प्रजासत्ताकाला मान्यता दिली. पुढे तर चीनने संयुक्त राष्ट्रसंघाचे

सदस्यत्व घेतले आणि सुरक्षा परिषदेच्या कायम सदस्यत्वासाठीसुद्धा दावा केला. त्यामुळे चीनला आता खऱ्या अर्थाने 'लोक प्रजात्ताक चीन' म्हणून जागतिक मान्यता मिळाली व चीनने आपली परराष्ट्र नीती आखण्यास सुरूवात केली.

१३.२ चीन - रशिया मैत्री करार

चीनच्या परराष्ट्रनीतीला सुरूवातच रशियाबरोबर झाली. कारण साम्यवादी चीनला सर्वात प्रथम जागतिक मान्यता रशियानेच दिली होती. त्यामुळेच इ.स.१९४९ ऑक्टोबरमध्ये बिजिंगमध्ये चीनी सरकार स्थापन झाल्याबरोबर डिसेंबर १९४९ मध्ये माओने सर्वात प्रथम मास्कोला (रशिया) भेट देण्याचे ठरवले. त्याचा परिणाम असा झाला की, चीन व रशियाने फेब्रुवारी १९५० मध्ये तीस वर्षे मुदतीचा परस्पर सहकार्य व मैत्री - सामंजस्य करार केला. त्यामध्ये जपानच्या आक्रमणापासून दोन्हीही राष्ट्रे आपापसात सहकार्याची भावना ठेवतील व एकमेकांचे संरक्षण करण्यासाठी एकत्र येतील असे ठरले. हे जरी खरे असले तरी आंतरराष्ट्रीय पटलावर साम्यवादी चीन-रशिया खऱ्या अर्थाने अमेरिकेविरूद्ध एकत्र आलेले होते. दोन्ही देशांमधील कराराची सर्वात महत्त्वाची तरतूद ती अशी की, ''दोन्ही देशांमध्ये आर्थिक व सांस्कृतिक विकास करणे आणि ते साध्य करण्यासाठी चीन व रशियाने एकमेकांना सर्व प्रकारचे आर्थिक सहकार्य करावे.''

दोन्ही देशांमध्ये करार झाल्यानंतर ताबडतोब रशियाने चीनच्या आर्थिक व तांत्रिक विकासासाठी रशियन सल्लागार, तज्ञ व तंत्रज्ञ चीनमध्ये पाठविण्यास सुरूवात केली. रशियाने चीनला लष्करी व आर्थिक मदत प्रत्यक्ष पाठविण्यास सुरूवात केली. त्याचबरोबर सैबेरिया ते मांचुरिया ही रशियाने बांधलेली रेल्वे सेवा (डेरियन व पोर्ट आर्थरपर्यंत) आता संयुक्तपणे चीन व रशिया व्यवस्थापन करतील असे ठरले. त्याबदल्यात रशियाला डेरियन बंदर व पोर्ट आर्थर पर्यंत नाविक तळासाठी मुभा मिळाली. स्टॅलिनच्या मृत्यूनंतर माओ त्से तुंग आणि चौहानलाय यांनी मालेनोव्ह आणि मोलोटोव्ह यांनी चिनला दिलेल्या मदतीची 'भातृभाव' (रशिया - चीन) अशी मान्यता दिली.

१३.२.१ चीन - रशिया संबंधात वितुष्ट :

इ.स. १९५० च्या दरम्यान चीन रशियातील मजबूत संबंध इ.स. १९६० मध्ये कमजोर होण्यास सुरूवात झाली. त्याची खरी कारणे चीनमध्ये आलेला आत्मविश्वास, ज्यामुळे साम्यवादी गटामध्ये समान दर्जा मिळण्याची इच्छा, त्याविषयी चीनच्या प्रत्यक्ष मागण्या व थोडेसे रशिया - चीनमध्ये सैद्धांतिक मतभेद सुद्धा यास कारणभूत होते. रशिया - चीन संबंधातील वितुष्ट निर्माण होण्यास पुढील कारणे विशद करता येतील.

१) 'रशियाचे स्टॅलिनीकरण' विरोधी भूमिका :

इ.स.१९५३ मध्ये स्टॅलिन मृत्यू पावल्यानंतर त्याचा वारसदार कोण हे काही ठरले नव्हते. तसेच त्याच्या वारसदारांना सुधारित स्टॅलिनवाद हवा होता. इ.स.१९५६ मध्ये, निकीता ख्रुश्चेव्ह हा रशियन सुधारणावादी म्हणून मास्कोमध्ये नव्यानेच समोर आला. त्याने स्टॅलिनवाद नष्ट करण्यासाठी स्टॅलिनची रशियन जनमानसातील 'ईश्वरी' दर्जा किंवा प्रतिमा नष्ट करणे जरुरीचे आहे असे ठरविले. त्यामुळेच फेब्रुवारी १९५६च्या रशियन साम्यवादी पक्षाच्या २०व्या अधिवेशनात त्याने जे भाषण केले त्यात त्याने स्टॅलिनचा निषेध केला. त्यामुळेच ज्या स्टॅलिनने साम्यवादी जगावर जवळजवळ २५ वर्षे आपला दबदबा निर्माण केला होता. त्या त्याच्या प्रतिमेस ख्रुश्चेव्हने एक जबरदस्त हादरा दिला. त्यामुळेच माओंनी रशियन नीतीतील या बदलाचा निषेध केला. कारण चीनला याबाबतीत रशियाने विश्वासात न घेता हा परराष्ट्रनीतीमध्ये महत्त्वपूर्ण बदल केला होता.

२) पूर्व-युरोपविषयी चीन-रशियात असंमती :

निकीता ख्रुश्चेव्हने स्टॅलिनच्या नितीवर टिका करण्याबरोबरच आपल्या प्रभावाखालील साम्यवादी देशांवरील नियंत्रण काही प्रमाणात शिथिल करण्यास सुरूवात केली. त्याचा परिणाम असा झाला की, पूर्व युरोपातील हंगेरियाने याचा फायदा घेऊन इ.स. १९५६च्या नोव्हेंबरमध्ये सोव्हिएत संघा विरूद्ध बंड पुकारले. शेवटी ते बंड मोडून काढण्यासाठी रशियन लाल फौजा हंगेरीत दाखल झाल्या. या प्रकारावर चीनने 'रशियाची कमजोरी' अशी टीका केली. तर रशियाने चीनने आपल्याला पूर्व युरोपातील राजनीतीचे धडे देऊ नये असे चीनला सुनावले. त्यामुळे या उभयतांमधील संबंध बिघडत गेले.

३) शांतीपूर्ण - सह अस्तित्वाच्या धोरणास नापसंती :

निकीता ख्रुश्चेव्हने 'शांतीपूर्ण - सहअस्तित्वाच्या नीतीचा जो पुरस्कार केला होता ते एक महत्त्वपूर्ण कारण रशिया-चीन संबंध बिघडण्यास झाले. त्याच्या मते, व्यापाराच्या भरभराटीसाठी व युद्धाचा धोका टाळण्यासाठी आता पाश्चिमात्य लोकशाही देशांशी सहकार्य करणे व संबंध प्रस्थापित करणे महत्त्वाचे आहे. त्याने असा सिद्धांत मांडला की मार्क्स - लेनिनच्या युद्धाच्या आवश्यकतेच्या धोरणाने नव्हे तर शांतीपूर्ण राजकीय नीतीनेच साम्यवादाचा जगात प्रसार करता येईल. परंतु चीन या सिद्धांताशी पूर्णपणे असहमत होता. याउलट चीनच्या मते, 'युद्ध सदृश्य नीतीच व्हिएतनामसारख्या आशियन देशांत साम्यवाद प्रचार प्रसार व स्थापना करण्यास आवश्यक आहे.'

दोन्ही देशांमध्ये आंतरराष्ट्रीय साम्यवादाचे भवितव्य यावर कडवट मतभेद निर्माण झाले. रशियाने चीनची 'ठार वेडा देश' व चीनने रशियाची 'भित्रा देश' व 'पळपुटेपणा' अशी संभावना केली. याचा परिणाम असा झाला की, रशिया तर अमेरिकेकडे मैत्रीभावनेने जवळ गेला परंतु चीन एकटाच अमेरिकेचा पारंपारिक शत्रू राहिला.

४) चीनचा आक्रमक पाश्चिमात्य नीतीवर जोर :

इ.स.१९५७च्या ऑगस्टमध्ये रशियाने प्रथमच आंतरखंडीय क्षेपणस्त्राचे परिक्षण केले आणि त्याच वर्षी ऑक्टोबरमध्ये जगातील पहिला अवकाश उपग्रह पाठविला. चीनच्या मते, रशियाची तंत्रज्ञानातील ही प्रगती अमेरिकेलाही लाजवील अशी आहे. ऑक्टोबर १९५७ मध्ये माओ त्से तुंगनी बोल्शेविक क्रांतीस ४० वर्षे झाल्याच्या समारंभ प्रित्यर्थ जमलेल्या जगातील सर्व साम्यवादी पक्षांच्या मास्को येथील परिषदेमध्ये कणखर परराष्ट्रनीतीवर पुन्हा जोर दिला. तरीही सोव्हिएत नेते त्याच्या म्हणण्यास प्रतिसाद देऊ शकले नाहीत.

५) समुद्री बेटां बाबतीत रशियाचे मौन :

चीनच्या परराष्ट्रनीतीस पाठिंबा देण्यात आढेवेढे घेण्याची रशियाची भूमिका समुद्रीबेटांच्या राजनीतीमध्ये स्पष्ट झालेली आपणास दिसते. इ.स.१९५८च्या ऑगस्टमध्ये चीनने तैवानी राष्ट्रीय सरकारच्या ताब्यातील क्वेमॉय व मात्सु बेटे आपल्या नियंत्रणात घेण्याचे ठरविले. चीनने तैवानच्या भूप्रदेशात बरेच दिवस बॉम्बपेक्क चालू केली. त्यामुळे अमेरिकेने तैवानच्या राष्ट्रीय सरकारच्या व किनाऱ्यालगतच्या बेटांच्या रक्षणार्थ मदत करण्याची भूमिका घेतली. त्यामुळे चीनला माघार घ्यावी लागली. या समुद्री बेटांच्या प्रश्नांसंदर्भात ख्रुश्चेव्हने मदत करण्याऐवजी मौन राहणे पसंत केले. त्यामुळे चीन-रशियाच्या परराष्ट्र नीतीमध्ये पूर्णपणे समन्वयाचा अभाव असल्याचे आढळून आले. त्यामुळेच चीनला रशियाविषयी अविश्वास वाटू लागला.

६) चीनच्या भविष्याप्रत हनुमान उडीबाबत मतभिन्नता:

चीनने १९५८ मध्ये सुरूवात केलेला 'भविष्याप्रत हनुमान उडी' हा आर्थिक विकास कार्यक्रम व त्याचे चीनी साम्यवादाला दिलेले श्रेय याबाबतीत रशिया व चीनमध्ये मतभेद आणखीनच वाढत गेले. चीनने असा दावा केला की, आम्ही खरा साम्यवाद लवकरच पादाक्रांत करून आर्थिक दृष्ट्या प्रगत राष्ट्रांपेक्षाही (रशिया) पुढे जाऊ. याउलट ख्रुश्चेव्हने चीनी साम्यवादावर जुनाट व निकामी अशी टीका केली.

७) रशियाची अमेरिका भेट :-

सप्टेंबर १९५९ मध्ये ख्रुश्चेव्हने अमेरिकेला सदिच्छा भेट दिली व ते चीनला आवडले नाही. त्यातच ख्रुश्चेव्ह अमेरिकेतून सरळ पेकींगमध्ये दाखल झाले आणि चीनला तैवानच्या स्वतंत्र राष्ट्रास दर्जा देण्यासाठी समजावणी करू लागले आणि त्यामुळेच 'शांतीपूर्ण सहअस्तित्व' (peaceful co-existence) अंमलात आणणे शक्य होईल असे सांगितले. याउलट चीनने मात्र रशियाच्या अमेरिकन भेटीवरच टीका केली व माओने ख्रुश्चेव्हच्या चीन भेटीचे हव्या तेवढ्या दिमाखात नव्हे तर थंड स्वागत केले.

८) रशियन तंत्रज्ञांची चीनमधून बोलावणी :

१९६० मध्ये चीनने रशियाच्या 'शांतीपूर्ण सहअस्तित्वाच्या' धोरणांना कठोर विरोध करण्यास सुरूवात केली. शेवटी या वैचारिक मतभेदांमुळे ख्रुश्चेव्हने चीनमधून रशियन तज्ज्ञ व तंत्रज्ञ परत बोलावण्याचे व चीनला दिली जाणारी आर्थिक मदत ताबडतोब थांबविण्याचे आदेश दिले. आरोप - प्रत्यारोपांच्या, तत्वज्ञानांत्मक धोरणांपासून बाजूला गेल्याने या पैकी एकमेकांविरूद्ध झाल्या. दोन्ही देश आपलाच मार्क्सवाद - लेनिनवाद खरा असल्याचा दावा करू लागले व एकमेकांविरूद्ध टीका - टीप्पणी करू लागले. त्यांच्यामधील मतभेदांचे प्रमुख मुद्दे म्हणजे युद्ध आणि आंतरराष्ट्रीय शांतता व सामंजस्य, निशस्त्रीकरण अलिप्ततावाद, तटस्थतता इत्यादी होते. त्यावरूनच ही दोन राष्ट्रे आपसांत तात्विकपणे भांडत होती.

९) ख्रुश्चेव्हचा जॉन केनेडीला पाठविलेला संदेश:

जेव्हा फेब्रुवारी १९६१ मध्ये जॉन एफ्. केनेडी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी निवडून आले तेव्हा ख्रुश्चेव्हने त्यास अभिनंदन पर संदेश पाठविला. परंतु 'शांतीपूर्ण सहअस्तित्वाच्या' कल्पनेला विरोध करणाऱ्या चीनला ही गोष्ट रूचली नाही. त्यातच चीनचा मित्र असलेल्या अल्बानियावर रशियाने 'दुराग्रही' म्हणून टीका केली व सर्व प्रकारचे राजकीय व परराष्ट्रीय संबंध तोडून टाकले. याउलट चीनने रशियाचा मित्र राष्ट्र युगोस्लाव्हियावर ''रिव्हिजनिस्ट'' म्हणून टीका केली. त्यामुळे उभय राष्ट्रांतील संबंध बिघडतच गेले.

१०) भारत-चीन युद्ध (१९६२) व रशिया :

इ.स.१९६२ मध्ये चीनने भारतीय प्रदेशावर आक्रमण केले व भारत-चीन युद्धास तोंड फुटले. यावेळी रशियाने पूर्णपणे तटस्थपणाची भूमिका घेतली एवढेच नाही तर भारताला लढाऊ विमानेसुद्धा पुरविली. त्यामुळे तर चीन अधिकच दुखावला गेला आणि हा तर 'एक विश्वासघात आहे' अशी चीनची रशियाबाबत खात्रीच झाली.

११) क्युबातील रशियन क्षेपणास्त्रांचा प्रश्न (१९६२) :

चीन-भारत युद्ध चालू असतानाच रशियाने आपली क्षेपणास्त्रे क्युबामध्ये उभारली. त्याबद्दल चीनने रशियाला आपला पाठिंबा जाहिर केला. परंतु त्याचवेळी अमेरिकेच्या दबावापुढे नमते घेऊन रशियाने (ख्रुश्चेव्ह) माघार घेतली तेव्हा चीनी नेत्यांनी रशियावर 'धाडसीपणा' व नंतर 'शरणागती' अशी जाहीर टीका केली.

१२) चीन - रशिया सरहद्द प्रश्न :

इ.स.१९६२ मध्ये सरहद्दीचा प्रश्न दोन्ही राष्ट्रांमध्ये एक महत्त्वाचा वादाचा मुद्दा बनला. चीनने रशियावर असा आरोप केला की, रशियाने चीनच्या सिकियांग भागातील जवळजवळ ६०,००० लोकांना आपल्या प्रदेशात घेतले

आहे. त्यामुळेच चीनने त्यांना पुन्हा चीनमध्ये परतण्यास बंदी घातली. चीन - रशिया सरहद्दीचा मुद्दा पुढे करून चीनने झारच्या राजवटीमध्ये चीनबरोबर झालेले तह व करार अन्यायकारक व विषम असल्याचे म्हणण्यास सुरूवात केली.

१३) अण्वस्त्र परिक्षणबंदी करारावर (NTBT) चीनची टीका :

जुलै १९६३ मध्ये इंग्लंड, अमेरिका आणि रशिया यांनी मास्को येथे अण्वस्त्र प्रसार (परिक्षण) बंदी करारावर (NTBT-Nuclear Test Ban Treaty) स्वाक्षऱ्या केल्या. त्यामुळे चीनने रशियावर चीनला आण्विक गटापासून अलग ठेवल्याचा आरोप केला. माओंच्या मते, रशियाने चीनपेक्षा पाश्चिमात्य राष्ट्रांनाच आपला मित्र मानले आहे. तरीसुद्धा दोन्ही राष्ट्रांमधील मतभेद दूर करण्यासाठी चर्चा चालू झाली होती. इ.स.१९६४ मध्ये पेकींग (चीनची राजधानी) येथे रशिया-चीन सरहद्दीच्या प्रश्नावर बोलणी चालू झाली परंतु एकमत न झाल्यामुळे ती ताबडतोब फिसकटली सुद्धा.

त्यातच इ. १५ ऑक्टोबर १९६४ मध्ये ब्रूश्चेव्हला रशियाच्या सत्तेवरून पदच्युत केले होते. त्याच्या दुसऱ्याच दिवशी चीनने आपली प्रथम अणवस्त्र चाचणी परिक्षण केल्याचे जाहीर केले व कोणत्याही प्रगत राष्ट्रांप्रमाणेच आमच्याकडेही तंत्रज्ञान उपलब्ध आहे आणि तेही कोणाच्याही मदतीशिवाय चीनला स्वत:च्या ताकदीवर शक्य झाले, हे त्यांनी दाखवून दिले.

१४) व्हिएतनाम युद्धामध्ये मतभेद:

व्हिएतनाम युद्धाच्यावेळी चीन आणि रशियाने 'संयुक्त कृती' करावी अशी अपेक्षा रशियाची होती. परंतु चीनला हे मान्य नव्हते. त्याउलट रशियाची व्हिएतनामला चीनमार्गे जाणारी हवाई मदत रोखण्याचे चीनने ठरवले. माओंनी रशियाचा 'संयुक्त कृती' प्रस्ताव कठोर पणे ठोकरला. त्यामुळेच चीन आणि अल्बानियाने मार्च १९६६ मध्ये रशियन साम्यवादी पक्षाच्या २३व्या काँग्रेसला हजेरी लावली नाही. उलट त्याची संभावना 'Revisionist' (पुनरूज्जीवनवादी) अशी केली.

१५) रशियाचे झेकोस्लोव्हाकीयावरील आक्रमण:

इ.स.१९६८ मध्ये जेव्हा रशियाने झेकोस्लोव्हाकीयावर हल्ला केला त्याचा चीनने स्पष्ट शब्दात निषेध केला. चीनचे राष्ट्रपती चौ-एन-लाय यांनी रशियावर टीका करताना 'रशिया आपल्या बंदुकीच्या जोरावर आपल्या हातातील बाहुले निर्माण करीत असून हा हल्ला पूर्वी हिटलरने झेकोस्लोव्हाकीयावर आणि अमेरिकेने व्हिएतनामवर केलेल्या हल्ल्याप्रमाणे आहे' असे म्हटले. चीनने ब्रेझनेव्ह सिद्धांतावर टीका केली व त्याची संभावना 'उघड - उघड वर्चस्व सिद्धांत' अशी केली. कारण 'ब्रेझनेव्ह सिद्धांताने' असा दावा केला की, आपल्या साम्यवादी संघातील कोणत्याही राष्ट्राविरूद्ध रशियाला लष्करी कृती करण्याचा अधिकार आहे आणि त्याचाच अंमल रशियाने झेकोस्लोव्हाकीयाविरूद्ध केल्याचे आढळले.

१६) चीन-रशिया लष्करामध्ये चकमकी :

२ मार्च १९६९ मध्ये उसुरी नदीतील दमान्स्की बेटाबाबत दोन्ही राष्ट्रांमध्ये संघर्ष उदभवला. इ.स. १९६० पासूनच छोट्या चकमकी चालूच होत्या. परंतु ही जरा जास्त गंभीर परिस्थिती होती. कारण रशियाची चीनी फौजांकडून जास्त हानी झाली होती. तसेच मांचुरिया आणि सिकीयांग सरहद्दीवरही तशीच परिस्थिती निर्माण झाली. ११ सप्टेंबर १९६९ रोजी रशियन पंतप्रधान कोसिजिन हो चि मिन्ह यांना श्रद्धांजली आटोपून (हनोई येथून) रस्त्यात पेकींग येथे चीनच्या चौ एन लाय बरोबर बोलणी करण्यासाठी उतरले. त्यावेळी उभयतांमध्ये ताबडतोब युद्धबंदी आणि फौजांची माघार घेण्याचे ठरले. त्याचे करारामध्ये रूपांतर ७ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर १९६९ रोजी झाले.

१७) अमेरिकेबरोबर समाझोता :

चीन-रशिया संबंध १९६९-१९८२ पर्यंत हवे तेवढे सुधारलेले नव्हते. आंतरराष्ट्रीय धोरणांमध्ये बदल झाल्यामुळे चीनी नेत्यांच्या धोरणांमध्ये सुद्धा बदल होऊ लागले. १९७०च्या दशकात चीनने आपली आंतरराष्ट्रीय समुदायापासून अलिप्त राहण्याची भूमिका सोडून दिली आणि बऱ्याच राष्ट्रांची मान्यताही मिळविली. १९७१ मध्ये चीनने संयुक्त राष्ट्राचे सभासदत्व घेतले. त्यातच सर्वांत महत्त्वाचा धोरणात्मक निर्णय म्हणजे अमेरिकेबरोबर १९७२ मध्ये पुन्हा मैत्रीपूर्ण समझोता केला. माओ त्से तुंगनी अमेरिकी राष्ट्राध्यक्ष निक्सनची आणि नंतर फोर्डची भेट घेतली आणि चीन-अमेरिका संबंध सुरळीत झाले.

१८) रशियाने चीनबरोबर संबंध सुधारण्याचे प्रयत्न :

इ.स.१९७६च्या जानेवारी आणि सप्टेंबरमध्ये अनुक्रमे चौ एन लाय आणि माओ त्से तुंग यांचे निधन झाले. त्यातच रशियाने चीनविरोधी प्रचारही थांबवला आणि चीनबरोबर पुन्हा शांततेची बोलणी करण्याची तयारी दाखवली. परंतु चीनने रशिया विरोधी प्रचार थांबवला नाही. रशियन नेते लिओनिड ब्रेझनेव्ह यांनी हुआ गुओफेंग यांना चीनी साम्यवादी पक्षाचे नेते निवडल्याबद्दल पाठविलेला अभिनंदन पर संदेश त्यांनी नाकारला. त्यातच कंबोडिया व व्हिएतनाम यांच्याबद्दलच्या भूमिकेने दोन्ही देशामधील संबंध आणखीच बिघडत गेले. इ.स.१९७९ मध्ये चीनने कंबोडियाचे संरक्षण करण्यासाठी व्हिएतनामवर आक्रमण केले. त्याचा रशियाने जाहीर निषेध केला आणि व्हिएतनामला सागरी जहाजे पुरविली.

१९) अफगाणिस्तानाच्या रशियन आक्रमणाचा चीनकडून निषेध :

इ.स.१९७९च्या दरम्यान रशियाने अफगाणिस्तानवर आक्रमण केले आणि चीन रशिया शांती वार्ता संपुष्टात आली. त्यातच चीनने १९५०च्या रशिया-चीन-अफगाणिस्तानच्या मैत्री कराराचा पुनरूल्लेख केला. शेवटी १९८२ मध्ये चीन रशिया सरहद्दी प्रश्नावर बोलणी पुन्हा चालू झाली. परंतु १९८६-८७ पर्यंत गोर्बाचेव्ह यांच्या धोरणापर्यंत संबंध काही सुधारले नव्हते. शेवटी

१९८८ मध्ये अफगाणिस्तान, व्हिएतनाम व कंबोडियामधून रशियन व चीनी फौजा मागे घेण्याच्या निर्णयामुळे पुन्हा चीन-रशिया संबंध सुधारू लागले. ख्रुश्चेव्हच्या कारकीर्दीपासून बिघडलेल्या संबंधानंतर जून १९८९ मध्ये प्रथमच चीन-रशिया परिषद झाली असल्याचे दिसते.

२०) चीन- रशिया संबंधात सुधार:

इ.स.१९९०च्या दशकात चीनने रशियाकडून शस्त्रास्त्र व इतर लष्करी सामग्री आयात करण्यात रस दाखविल्यामुळे दोन्ही देशांना संबंध सुधारण्यास मदत झाली. इ.स.१९९२ मध्ये उभय देशांमध्ये लष्करी तज्ज्ञांची देवाणघेवाण करण्यास सुरूवात झाली. तसेच शस्त्रास्त्र आयात निर्यात विषयक करार होण्यास सुरूवात झाली. इ.स. १९९३ मध्ये तर उभयतांमध्ये पाच वर्षांचा परस्पर लष्करी तज्ञांच्या देवाणघेवाणीचा करार झाला तसेच परस्पर सांमजस्य व सहकार्य करण्याचे ठरले. इ.स. १९९६ मध्ये विशेष युद्धनिती, सहकार्य विषयी करार उभय देशांमध्ये झाला.

२१) चीन - रशिया संबंध पूर्ववत :

डिसेंबर १९९२ मध्ये रशियाचे अध्यक्ष येल्तासिन यांनी चीनला भेट दिली व उभयता अनाक्रमणाच्या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. दुसरा महत्त्वाचा करार म्हणजे अणुभट्टी उभारण्यासाठी संपूर्ण रशियन सहकार्य चीनला देण्यात आले. सप्टेंबर १९९४ मध्ये जेव्हा चीनचे अध्यक्ष जियांग झेमिन यांनी मास्कोला भेट दिली तेव्हा काही सरहद्दीबाबतचे प्रश्न सोडविण्याचे ठरले व परस्पर बोलणी अधिक पोषक होण्यास मदत झाली. एप्रिल १९९६ मध्ये जेव्हा येल्तासिन यांनी पुन्हा चीनला भेट दिली तेव्हा उभय राष्ट्रांमधील संबंध म्हणजे आंतरराष्ट्रीय स्तरावर एक महत्त्वपूर्ण भागीदारी असल्याचे मानले गेले आणि परस्पर शस्त्रास्त्रांची खरेदी - विक्रीस मान्यता दिली गेली. त्यातच दोन्ही राष्ट्रांनी आपल्या सरहद्दीच्या ३६४५ किमी. पर्यंत निर्लष्करीकरण करण्याचे ठरले. तरीही चीनची रशियन प्रांतामध्ये अतीपूर्वेकडे घूसखोरी चालू होती तरीही येल्तासिन यांनी हा प्रश्न प्रादेशिक पातळीवर सोडवण्याचा प्रस्ताव ठेवला. रशियाने तैवान हा चीनचा प्रांत असल्याचे मान्य केले होते आणि परंतु तरीही तैवान बरोबर १९९५ पर्यंत जवळजवळ ३ बिलियन डॉलरचा व्यापार वाढवला होता तसेच तेथे १९९६ मध्ये रशियन व्यापार केंद्रे, कार्यालये उघडण्याचे रशियाने ठरविले होते.

इ.स. १९९४-९६ च्या दरम्यान चीन ही रशियन शस्त्रांत्रांसाठी एक महत्त्वाची उदयोन्मुख बाजापेठ झाली होती. त्यात रशियाने चीनला (Su - 27) लढाऊ विमाने, तसेच बलाढ्य पाणबुड्या दिलेल्या होत्या. तसेच रशियाने कच्चा माल, धातू, यंत्रे, तंत्रज्ञान यांच्या व्यापाराबाबतीत चीनबरोबर व्यापारात बऱ्यापैकी संतुलन राखले होते. इ.स.१९९४- आणि १९९५ मध्ये उभयतांमध्ये उच्च पातळीवरील परस्पर भेटी चालू झाल्या होत्या. तसेच दोघांनी अमेरिके बाबतीतली आपली भूमिका निश्चित केली होती. त्यानंतर मार्च १९९६ मध्ये रशियाने चीनला २ बिलियन अमेरिकन डॉलर्सची मदत

देण्याचे व चीनमध्ये अणुभट्टी उभारण्यास सर्व प्रकारचे साहाय्य करण्याची घोषणा केली.

वरील मुद्यांवरून आपल्या असे निदर्शनास येते की, चीनने रशियाबाबत नेहमीच आक्रमक भूमिका घेऊन रशियला सतत विरोध केला. परंतु आंतरराष्ट्रीय स्तरावर रशियाला शांतता, परस्पर सहकार्य, शांतीपूर्ण सहअस्तित्व यांचे महत्त्व चांगले माहित असल्यामुळे शेवटी उभय देशांतील संबंध सुधारण्यात रशियाने पुढाकार घेतला आणि या परराष्ट्रीय धोरणाचे महत्त्व चीनलासुद्धा थोडे उशिरा का होईना परंतु पटले.

१३.२.२ आपली प्रगती तपासा :-

१) सुरूवातीच्या काळात साम्यवादी चीनला रशिया कडून काय लाभ झाला ते लिहा.
२) कोणकोणत्या मुद्यांवर चीन व रशियामध्ये मतभेद निर्माण झाले ?
३) चीन-रशिया संबंध केव्हापासून सुधारण्यास सुरूवात झाली ?

_____

_____

_____

_____

१३.३ चीन - भारत संबंध :

१३.३.१ प्रास्ताविक :-

चीन आणि भारताचे सांस्कृतिक संबंध प्राचीन काळापासूनच आहेत. जवळजवळ २५०० वर्षापूर्वी बौद्ध भिक्षु हिमालय पर्वत पार करून बुद्धाची शिकवण देण्यासाठी तिबेट, चीन आणि जपानमध्ये गेले. त्याच्या परिणामी चीनमध्ये बौद्ध धर्माचा फार मोठा प्रभाव व प्रचार-प्रसार झाला. त्यानंतर बुद्धाचा आणि त्याच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्याच्या जिज्ञासेने चिनी प्रवासी बुद्ध भूमीमध्ये म्हणजे भारतामध्ये दाखल झाले. त्यामध्ये प्रसिद्ध व ज्यांचे भारतातील प्रवासवर्णन आजही उपलब्ध आहे, त्यांत फाहेन, यु एन त्संग, इत्सिंग इ. अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. ते भारतामध्ये, येथील बौद्ध विद्यापीठामध्ये वर्षानुवर्षे राहिले, येथील बौद्ध धर्माच अभ्यास केला व आपल्यासोबत अनेक बौद्ध साहित्य, ग्रंथ घेऊन गेले. त्यांच्या प्रवासवर्णनावरून आपल्याला तत्कालीन भारताच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक परिस्थितीचे ज्ञान होते. यावरून प्राचीन काळापासून भारत-चीन संबंध घनिष्ठ होते असे आपल्याला आढळते.

१३.३.२ भारताच्या स्वातंत्र्य चळवळीस पाठिंबा :

१९व्या शतकाच्या दरम्यान भारताप्रमाणे चीनसुद्धा परकीयांच्या विळख्यात अडकला होता. या साम्राज्यवादाविरूद्ध चीनमध्ये प्रथमत:च राजकीय क्रांती

१९११ मध्ये झाली आणि मांचू राजवट पूर्णपणे उलथवून टाकली आहे. हा चीनमधील राष्ट्रवाद भारतीय स्वातंत्र्यचळवळीस व राष्ट्रवादास प्रेरक ठरला. चीनमध्ये कोमिंगटांगच्या स्थापनेमुळे भारत चीनच्या अधिक जवळ जाऊ लागला. १९२०च्या म. गांधींच्या असहकार आंदोलनास डॉ. सन - यत सेन यांनी पाठिंबा जाहीर केला होता. चँग कै शेक आणि त्यांची पत्नी यांनी अनेक वेळा भारताला भेटी दिल्या होत्या. तसेच चीनला १९३१-४५च्या जपानविरूद्ध लढ्यास भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने सतत नैतिक पाठिंबा दिला होता. इ.स.१९३९ मध्ये पं. नेहरूंनी चीनला भेट दिली आणि चीन बरोबर संबंध कायम ठेवण्याची इच्छा व्यक्त केली. इ.स.१९४२ मध्ये रविंद्रनाथ टागोर यांनी चीनला भेट दिल्यावर त्यांचे चीनने जोरदार स्वागत केले. परंतु दुसऱ्या महायुद्धाच्या रणधुमाळीत चीनला यादवी युद्धाने घेरले आणि तेथील राष्ट्रवादी आणि साम्यवादी यांच्या संघर्षात साम्यवाद्यांचा विजय झाला आणि माओ त्से तुंग व चौ एन लाय यांचा चीनच्या राजकीय पटलावर उदय झाला.

१३.३.३ भारत - चीन परराष्ट्रीय संबंध

यादवी युद्धामध्ये विजय मिळाल्यानंतर साम्यवाद्यांनी चीनमध्ये सार्वभौम प्रजासत्ताकाची ऑक्टोबर १९४९ मध्ये स्थापना केली. चीनच्या या साम्यवादी शासनास प्रथम मान्यता देणाऱ्यांमध्ये भारतही होता. त्यामुळे स्वतंत्र भारतानेसुद्धा चीनबरोबर आंतरराष्ट्रीय धोरणानुसार सरदार के. एन. पनीक्कार यांना भारताचे चीनमधील राजदूत म्हणून नेमले व अशा रीतीने भारत - चीन राजकीय नीतीस सुरूवात झाली.

१३.३.४ चीनची तिबेटमधील कृती आणि भारताची प्रतिक्रिया :

इ.स. १९५० च्या ऑक्टोबरमध्ये जेव्हा चीनने पूर्व तिबेटवर आक्रमण केले. तेव्हा भारत चीनच्या मैत्रीमध्ये थोडासा तणाव निर्माण झाला. चीनने आपल्या लष्कराला तिबेटमधून ३० लाख लोकांना मुक्त करून चीनचे एकीकरण करण्याचे आदेश दिले. तेव्हा तिबेटने भारताची मदत मागितली. त्यामुळे भारताने चीनच्या या कृतीचा निषेध केला. त्याउलट चीनने तिबेटचा प्रश्न हा चीनचा अंतर्गत प्रश्न असल्याचे म्हटले. मग मात्र पुन्हा भारताने त्या प्रश्नात हस्त क्षेप करण्याचे नाकारले. परंतु भारताने तिबेटच्या स्वायत्ततेच्या अधिकाराचा पुनरूच्चार केला व तिबेटच्या या हक्काचा आदर करण्याचे व प्रश्न शांतता व सलोख्याने सोडवण्याबाबत आपले मत व्यक्त केले.

२३ मे १९५१ मध्ये चीनने तिबेटला प्रादेशिक स्वायतत्ता दिली आणि संरक्षण आणि परराष्ट्र खाते आपल्या नियंत्रणात ठेवले. चीनने तिबेट प्रश्नी केलेली कृती जरी भारताला आवडली नाही तरीही भारताला चीन बरोबर जुळवून घेणे आवश्यक होते व ते त्याने घेतले.

१३.३.५ पंचशील तत्वज्ञानाचा पुरस्कार:

भारताला चीनबरोबरचे मैत्रीपूर्ण संबंध सांभाळणे गरजेचे होते. त्यामुळेच भारताने चीनच्या संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या सभासदत्वाला पाठिंबा

दिला. १९५०-५२ च्या कोरीयन युद्धामध्ये चीनला आक्रमक ठरविलेल्या पाश्चात्यांवर भारताने टीका केली. एवढेच नाही तर भारताने त्याचे तिबेटबाबतीतले आपले विशेष हक्क सुद्धा सोडून दिले. २९ एप्रिल १९५४ रोजी चीन व भारताने एक करार केला ज्याद्वारे परस्परांमध्ये व्यापार आणि भारत-तिबेट देवाणघेवाण यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. परंतु भारत व भारताबाहेरही सदर कराराच्या तरतूदींवर टीका करण्यात आली. परंतु पं. नेहरूंनी सदर कराराचे जोरदार समर्थन केले.

सदरचा करार (१९५४) आठ वर्षांचा असून त्याद्वारे तिबेटला चीनचा एक प्रांत म्हणून दर्जा देण्यात आला. त्याद्वारे व्यापार केंद्रे, यात्रेकरूंचा मार्ग, तसेच तिबेट - भारत यांतील व्यापारी नियम यांची योजना करण्यात आली. भारताने चीनला नवी दिल्ली, कलकत्ता आणि कलिमपाँग येथे व्यापार केंद्रे उघडण्यास परवानगी दिली. त्याचबरोबर चीननेसुद्धा भारताला याटुंग, ग्यांत्से, गार्टोक या ठिकाणी तशीच केंद्रे उघडण्यास परवानगी दिली. दोन्ही देशांतील व्यापार, यात्रेकरू, आणि प्रवासी वाहुतक सुरळीत झाली. भारताने चीनमध्ये काही विश्रामगृहे, टपालकेंद्रे, तारागृहे, दूरध्वनीकेंद्रे या सेवा उभारल्या.

सदर कराराची सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे त्याची उद्देशपत्रिका (Preamble) होय. त्यामध्ये परस्परांतील संबंधाबाबतची तत्वप्रणाली स्पष्टपणे उल्लेखिलेली होती. त्यामध्ये 'शांतीपूर्ण सहअस्तित्वाबाबत' पाच तत्वे ज्याला 'पंचशील' म्हटले गेले अत्यंत महत्त्वाची होती. ही पंचशील तत्वे पुढीलप्रमाणे होती.

१) एक दुसऱ्याची सार्वभौमिकता आणि प्रादेशिक एकात्मतेचा आदर करणे.
२) परस्पर अनाक्रमण
३) एक-दुसऱ्याच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करणे.
४) समानता आणि परस्पर हित.
५) शांतीपूर्ण सहअस्तित्व

सदर पंचशील तत्वांचे शिल्पकार पं. नेहरू होते व त्यांच्या मते, अशा प्रकारचे शांतीपूर्ण सहकार्याची भावना संपूर्ण आशिया खंडातच नव्हे तर संपूर्ण जगात नांदावी आणि आपापसांतील वैर मिटून सर्व जगच गुण्यागोविंदाने नांदावे, आंतरराष्ट्रीय शांतता व सौहार्दाचे वातावरण निर्माण व्हावे.

१३.३.६ चौ एन लाय यांची भारत भेट :

जून १९५४ मध्ये चीनचे पंतप्रधान भारत भेटीवर आले आणि त्यांनी व पं. नेहरू यांनी संयुक्त पणे एक जाहिरनामा २८ जून १९५४ मध्ये प्रसिद्ध केला. त्यातच उभयत: आग्नेय-आशियात शांतता आणि जिनिव्हा परिषदेमधील भारत-चीन संबंधाबाबतचे प्रश्न यांवर विस्तृत चर्चा केली.

दोघांनी तिबेट बाबतच्या भारत-चीन पंचशील कराराचा व त्यातील तरतूदींचा व त्याच्या पालनाचा पुनरूच्चार यावेळी केला.

१३.३.७ पं. नेहरूंची चीन भेट :

पं. नेहरूंनी ऑक्टोबर १९५४ मध्ये चीनला १५ दिवसांची भेट दिली. कारण त्यांना वाटत होते की, चीनने आपल्याला करारामध्ये दिलेल्या अटींचे पालन करावे. परंतु या भेटीचा परिणाम भारत-अमेरिका संबंध बिघडण्यात होईल असे वातावरण निर्माण झाले. परंतु नेहरूंना आपल्या शांतीपूर्ण सहअस्तित्वाच्या व सहकार्याच्या तत्वज्ञानावर पूर्ण विश्वास होता व जागतिक शांततेसाठी हा 'शांतीदूत' सतत प्रयत्नशील राहिला.

१३.३.८ बांडूंग परिषद (१९५५) :

भारत - चीन (१९५४) कराराचा एक चांगला परिणाम म्हणजे दोन्ही देश आफ्रो - आशियन राष्ट्र प्रमुखांच्या बांडुंग येथे भरलेल्या परिषदेला हजर राहिले. या परिषदेचे अध्यक्ष इंडोनेशियाचे प्रमुख सुकार्नो होते. सदर परिषदेमध्ये पं. नेहरूंनी चीनचे पंतप्रधान चौ एन लाय यांचा आफ्रो - आशियन देशांना परिचय करून दिला. परंतु नंतर मात्र चीनने आपणच खरे आशियाचे नेतृत्व करतो आहोत असे वातावरण निर्माण केले.

१३.३.९ मॅकमोहन सरहद्दीवरील मतभेद :

भारत व चीन यांमधील सरहद्द 'मॅकमोहन रेषा' म्हणून ओळखली जाते. पं. नेहरूंनी आपल्या चीन भेटी दरम्यान (१९५४) चीनच्या असे निदर्शनास आणून दिले की, चीनने जे नकाशे प्रकाशित केलेले होते त्यात भारताचा काही प्रदेश चीनच्या सरहद्दीत दाखविला गेला होता आणि तो जवळजवळ ५०,००० चौरस मैलांचा होता. त्यामुळे चौ एन लाय यांनी सदर नकाशे कोमिंगटांगची उत्पत्ती आहे आणि त्यांच्यात दुरूस्ती करण्यास सध्याच्या साम्यवादी शासनाला वेळ मिळाला नव्हता असे म्हणून विषयाला बगल दिली.

१३.३.१० भौगोलिक आक्रमण (Cartographic Aggression) :

२३ जाने.१९५९ रोजी चीनने पहिल्यांदाच भारत - चीन मधील सीमा रेषेबाबत (McMohan Line) अधिवृत्तारित्या आपलेच म्हणणे मांडले आणि नकाशामधील माहितीचा अस्वीकार केला. कारण १४ डिसेंबर १९५८ ला पं. नेहरूंनी चौ.एन. लाय यांना त्यांची नकाशातील सीमा रेषेबाबत अधिवृत्त चीनी नियत कालिकात प्रसिद्ध झालेली चूक दाखवून दिली होती. चौ. एन. लाय यांनी असे प्रतिपादन केले की, चीन-भारत सीमा रेषा पूर्वीपासून औपचारिकरित्या ठरवली गेलेली नाही. तशातच दोन्ही बाजूंकडील थोडीफार भिन्न मते असल्यामुळे १९५४ ला चीनने तो प्रश्न उचलला नव्हता. पुढे त्यांनी असे म्हटले की, चीन सरकारने मॅकमोहन सीमा रेषेला कधीच अधिवृत्त मान्यता दिली नव्हती आणि सध्याच्या नकाशात दाखवलेली सीमा रेषा ही नवीन नसून पूर्वीपासूनच अस्तित्वात आहे. याचाच अर्थ असा की, १९५४ला

भारत -चीन जो करार झाला होता, त्याच्या पूर्णपणे उलट भूमिका चीनने घेतली आणि भारताच्या सीमा रेषेलगतच्या ५०,००० चौ. मैलाच्या प्रदेशावर हक्क दाखवण्यास सुरूवात केली. ही 'भौगोलिक घुसखोरी' किंवा भौगोलिक आक्रमण दोन्ही देशांमध्ये तणावाचे व नाराजीचे वातावरण निर्माण करण्यास कारणीभूत झाली.

१३.३.११ तिबेटचे बंड :

तिबेटचे धर्मगुरू दलाई लामा हे इ.स.१९५६ मध्ये गौतम बुद्धांच्या २५०० व्या महापरिनिर्वाण कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी भारतात आले. परंतु त्यानंतर केवळ चीनच्या भीतीमुळे ते ल्हासा येथे परतण्यास तयार नव्हते. तरीही, पं. नेहरूंनी त्यांना आपल्या मायदेशी परतण्यास पाठपुरावा केला. त्याच वेळेस चौ. एन. लाय हे भारतभेटीवर दिल्लीत असताना त्यांनी दलाई लामांना तिबेटच्या प्रश्नांबाबत योग्य तो तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. परंतु चौ एन लाय यांनी आपले आश्वासन पाळले नाही आणि मार्च १९५९ च्या सुरूवातीस तिबेटी जनतेने चीनी प्रशासनाविरूद्ध बंड केले. परंतु हे बंड क्रूरपणे चीनने दडपून टाकले आणि चीन सरकारने तिबेटची स्वायतत्ता नष्ट केली. दलाई लामा १९५९ (एप्रिल)ला भारतामध्ये 'राजकीय आश्रय' म्हणून आले आणि त्यांनी 'हद्दपारीतील शासन' (Government in exile) किंवा समांतर शासन स्थापन केले. परंतु त्याचा प्रतिकूल परिणाम चीन - भारत संबंधावर झाला.

१३.३.१२ चीन-भारत सीमा वाद :

तिबेटच्या प्रश्नामुळे लांबलेला भारत-चीन सीमा वाद लवकर सुरू झाला. सीमा प्रांतामध्ये भारत - चीनच्या फौजांमध्ये चकमकी घडू लागल्या. भारताने चीनकडे वादग्रस्त प्रांतामधून सैन्य हलवण्याची मागणी केली तर चीनने 'जैसे थे' परिस्थितीमध्ये चर्चेद्वारे प्रश्न सोडवण्याची इच्छा व्यक्त केली. १९५७च्या सुरूवातीस भारतीय अधिकाऱ्यांच्या असे लक्षात आले की, अनेक वर्षांपासून चीन भारताच्या भूमिचा वापर करीत आहे. त्यात दोन ठिकाणांचा प्रदेश सामील आहे. एक ३५,००० चौ. मैलांचा ईशान्य सरहद्द प्रांत आणि दुसरा १४,००० चौ. मैलांचा अक्साई चीन पठारी प्रदेश.

चीनने भारताचा ५०,००० चौ. मैलांचा प्रदेश वापरल्यावर नैत्रृत्य चीनला तिबेटमध्ये जोडणारा रस्ता बांधण्याचा प्रकल्प हाती घेतला. परंतु हे पं. नेहरूंना स्वीकारार्ह नव्हते आणि हा प्रश्न युद्धानेच सोडवावा म्हणून त्यांच्यावर दबाव येत होता. मात्र चीनने वरकरणी दिखाव्याचे वातावरण तयार केले आणि आपल्या शेजारील राष्ट्रांबरोबर सीमा रेषेबाबत करार करून टाकले. उदा. ब्रह्मदेश (जाने.१९६०, नेपाळ (मार्च १९६०), पाकिस्तान (डिसें.१९६२), बाह्य मंगोलिया (डिसें.१९६२) आणि अफगाणिस्तान (नोव्हेंबर १९६३).

१३.३.१३ भारत-चीन युद्ध (ऑक्टो. १९६२) :

यावेळी चीनबरोबर सीमा भागाबाबत कोणतीही तडजोड स्वीकारणे म्हणजे भारताच्या दृष्टीने देशहिताच्या विरोधी होते. त्यामुळे भारतीय सैन्याने आगेकूच करण्यास सुरूवात केली. भारतीय नेत्यांना वाटले की, सैन्याच्या मदतीने आपण चीनव्याप्त भारतीय प्रदेश (NEFA) पूर्णपणे खाली करून चीनी सैन्याला मागे रेटत जाऊ शकतो. ऑगस्ट १९६२ मध्ये पं. नेहरूंनी संसदेमध्ये असे निवेदन दिले की, भारतीय सैन्याने लडाखचा १२००० चौ. मैलाचा प्रदेश ताब्यात घेतला आहे आणि सैन्याला संपूर्ण प्रदेशातून चीनी सैन्याला हाकलून लावण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ऑक्टोबर १९६२ मध्ये चीन-भारत युद्धास प्रारंभ झाला आणि चीनी व भारतीय फौजा समोरासमोर भिडल्या. उत्तरेकडल्या भारतीय फौजांना चीनी सैन्याला हाकलून लावण्यास व त्यांच्या मोक्याच्या ठिकाणांवर हल्ला करण्याचे आदेश देण्यात आले. एवढेच नाही तर चीनी प्रदेशातही शक्य झाल्यास हल्ला करण्यास सांगण्यात आले.

परंतु भारताच्या सैनिक हालचालींपेक्षा चीनी सैन्याच्या हालचाली अत्यंत जलद व चपळ होत्या. भारताला आक्रमक ठरवत चीनी फौजांनी भारतीय फौजांवर प्रतिहल्ला करत वादग्रस्त भागाच्या दक्षिणेपर्यंत (NEFA-North-Eastern Frontier Agency) ढकलण्यास सुरूवात केली. थोड्याच दिवसांत चीनी सैन्याने भारतीय सैन्यास वादग्रस्त भागातून (NEFA) पूर्णपणे मागे ढकलले. परंतु त्या भागाच्या पलिकडे चीनी सैन्य आले नाही.

१३.३.१४ एकतर्फी युद्धबंदी :

भारतीय सैन्याला वादग्रस्त भागापलिकडे ढकलल्यानंतर २१ नोव्हेंबर १९६२ मध्ये चीनी सैन्यांने युद्धबंदी जाहीर केली आणि मॅकमोहन सीमा रेषेपलिकडे मोर्चा सांभाळला. या कृतीद्वारे चीनने जागतिक मत आपल्या बाजूला वळविण्याचा प्रयत्न केला आणि आपण भारताबरोबर प्रत्यक्ष युद्ध करू इच्छित नाही असे भासविले. चीनने भारताला वादग्रस्त भाग (NEFA) परत दिला, भारतीय युद्ध कैद्यांची सुटका केली आणि मोहिमेदरम्यान जप्त केलेली शस्त्रास्त्रेही परत दिली. भारताने जवळ जवळ वादग्रस्त प्रदेशापैकी २/३ भाग परत मिळविला आणि त्यानंतर २० वर्षांपर्यंत चीन-भारत संबंध तणावाचेच राहिले.

१३.३.१५ चीन-भारत युद्धाचे परिणाम :

या युद्धाने चीनची जागतिक प्रतिमा थोडी डागाळली. शीत-युद्धाच्या काळात चीन-रशियाच्या 'शांतीपूर्ण सहअस्तित्वाच्या' सिद्धांतावर चीनने नेहमीच टीका केली होती आणि युद्धाचे समर्थन केले होते. तर त्याकाळात भारताने अलिप्ततावादाचे धोरण स्वीकारून बराच मोठा जागतिक पाठिंबा मिळविला होता. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची प्रतिमा 'शांतीप्रिय' आणि स्वच्छ राहिली होती. बऱ्याच प्रमाणात जागतिक मतानुसार चीन-भारत युद्धात भारताची भूमिका योग्य असल्याचे मानले जात होते. सदर युद्धाच्या

वेळी रशियाने तटस्थ भूमिका स्वीकारली होती आणि साम्यवादी चीनला मदत दिली नाही. त्यामुळे चीन-रशिया संबंधात तणाव आला होता. पुढे १९६५च्या भारत-पाकिस्तान युद्धात चीनने पाकला पाठिंबा दिल्यामुळे चीन-भारत संबंध आणखीनच बिघडत गेले. तसेच १९७१ च्या बांग्लादेश निर्मितीमुळे आणि भारताच्या विजयामुळे चीनला भारताचा हेवा वाटू लागला.

तशातच १९६९ च्या सुरूवातीला भारताने कोणतीही पूर्वअट न ठेवता, चीनबरोबर शांतीवार्ता करण्याचे व संबंध सुधारण्याचे प्रयत्न केले. परंतु चीनी पंतप्रधानांनी इंदिरा गांधीच्या या प्रयत्नांना ताबडतोब प्रतिसाद न दिल्यामुळे भारत-चीन संबंध प्रक्रिया सामान्य होण्यास फार वेळ निघून गेला.

१३.३.१६ बांग्लादेश आणि सिक्कीमबाबत चीनची टीका :

बांग्लादेश निर्मितीमध्ये आणि सिक्कीमच्या विलीनीकरणामध्ये (भारतामध्ये) भारताच्या सक्रीय भूमिकेवर चीनने कडक टीका करण्यास सुरूवात केली. परंतु भारताने त्याबाबतीत कडक प्रतिकार केला नाही. सिक्कीमच्या जनतेला चीनने पूर्ण पाठिंबा जाहीर केला आणि त्याचे 'न्याय्य लढा' असे वर्णन केले. चीनी प्रसार माध्यमांनी भारतावर 'विस्तारवादी', 'साम्राज्यवादी' अशी टिका करण्यास व आपल्या शेजारील राष्ट्रांबरोबर भारताच्या व्यवहार आक्रमक आहे असे प्रसारीत करण्यास सुरूवात केली. भारत आपल्या 'अणुतंत्राच्या' धमकीने आणि रशियाच्या मैत्रीच्या संबंधाने शेजारील राष्ट्रांवर वर्चस्व गाजविण्याचा व त्यांना भीती निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे, अशी टीका भारतावर चीनी प्रसारमाध्यमांनी करण्यास सुरूवात केली. परंतु भारताने यावर अत्यंत सावध प्रतिक्रिया दिली आणि चीन-भारत संबंध आपणांकडून बिघडणार नाहीत याची काळजी घेतली. केवळ यामुळेच १९७६ मध्ये दोन्ही देशांमध्ये राजदूत नेमण्यात आले आणि जवळजवळ १५ वर्षांनी राजकीय संबंध पुन्हा सुरळीत होऊ लागले.

१३.३.१७ आपली प्रगती तपासा :-

१) भारत - चीन पंचशील तत्वज्ञान काय होते ?

२) चीनचे भारतावरील 'भौगोलिक आक्रमण' कसे होते ?

_____

_____

_____

_____

१३.४ अटलबिहारी वाजपेयींची चीनला भेट

जनता सरकारच्या काळात अटलबिहारी वाजपेयी भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री होते. चीनी परराष्ट्र मंत्री ह्युआंग ह्युआ यांच्या निमंत्रणावरून

सन १९७९ मध्ये अटल बिहारी वाजपेयींनी चीनला भेट दिली. सन १९६०च्या नंतर ही उभय देशांमधील पहिलीच उच्च पातळीवरील भेट होती. त्यावेळी चीनच्या १९६२च्या युद्धाचा संदर्भ दिल्यामुळे व तेच एक कारण चीन-भारत संबंध सामान्य होण्यातील अडचण असे सांगितल्यामुळे वाजपेयी जरा नाराज झाले. त्यांनी चीनला सांगितले की, कोणत्याही देशाचे राष्ट्रीय हितसंबंध जोपासणे ही त्या देशाची प्राथमिक जबाबदारी असून चीनला भारताचा एखादा भाग सोडून देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

१३.५ चीन-भारत संबंध सुधारण्याचे प्रयत्न

१९८० मध्ये श्रीमती इंदिरा गांधींनी चीनबरोबर संबंध सुधारण्याचे प्रयत्न चालूच ठेवले. मे १९८० मध्ये चीनचे पंतप्रधान हुआ गुओपेंग आणि इंदिरा गांधी यांची बेलग्रेड येथे भेट झाली. इ.स.१९८१ (जून) मध्ये चीनी परराष्ट्रमंत्री हुआंग हुआ यांनी भारत भेट केली. त्यामुळे परस्पर अधिकृत शांतीवार्ता आणि समस्यांचे निराकरण करण्याचे ठरले. त्यातच सीमारेषेबाबत आणि वादग्रस्त भागाबाबत अटी समोर ठेवून पुढची बोलणी करण्यासाठी पूर्वअटी ठेवू नयेत असे ठरले. त्यानंतर डिसेंबर १९८१ मध्ये पहिली अधिकृत बोलणी उभय देशांमध्ये सुरू झाली. या भेटीमध्ये परस्परांचे पाच गट निर्माण करण्यात आले आणि त्यांनी त्या त्या समस्येबाबत बोलणी करण्याचे ठरले. उदा. १) सीमारेषा २) व्यापार ३) आर्थिक सहकार्य ४) सांस्कृतिक देवाण-घेवाण आणि ५) विज्ञान व तंत्रज्ञान

सन १९८५ मध्ये चीनने भारतापुढे एक प्रस्ताव ठेवला. त्याद्वारे दोन्ही देशांनी भारत-तिबेट व्यापाराबाबत विचार विनिमय करण्यासाठी परस्पर देशांचे प्रतिनिधी पाठवावेत असे ठरले. परंतु भारताच्या दृष्टीने सीमा रेषा वाद हा मुख्य मुद्दा असल्यामुळे चीनच्या या प्रस्तावाला भारताकडून थंड प्रतिसाद मिळाला.

१३.६ राजीव गांधींची चीन भेट

इ.स.१९८८ च्या शेवटी भारतीय पंतप्रधान राजीव गांधी यांची चीन भेट दोन्ही देशांमधील संबंधाबाबत एक नवीन पायरी असल्याचे म्हटले गेले. या भेटीने असे ठरले की, सीमा रेषा वाद थोडा बाजूला ठेवून प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या (Line of Actual Control - LAC) परिसरात शांती व सौहार्द टिकू शकते आणि त्यासाठी शांतीपूर्ण बोलणी न थांबवता विकास शक्य होऊ शकतो. तसेच सीमा रेषेबाबत संयुक्त कृती गट स्थापन करणे, संयुक्त समिती (अर्थ, व्यापार, विज्ञान व तंत्रज्ञान, नागरी विमानवाहतूक) स्थापन करून बोलणी चालू ठेवू शकता येतील असे उभय देशांत ठरले.

१३.७ लि पेंग यांची भारत भेट :

डिसेंबर १९९१ मध्ये चीनचे पंतप्रधान लि पेंग यांनी भारताला भेट दिली. या भेटीने दूतावासातील संबंध, सीमा व्यापार, विज्ञान - तंत्रज्ञान, देवाण-घेवाण याबाबत करार झाले. तसेच उच्च-स्तरीय भेटी कायम ठेवण्याचे ठरले गेले. त्यामुळे परस्पर संबंध विकास पावतील आणि समस्यांचे निराकरण होईल. चीनी दूतावास (मुंबई) आणि भारतीय दूतावास (शांघाय) अनुक्रमे इ.स.१९९२ आणि १९९३ मध्ये कार्यान्वित करण्यात आले. इ.स. १९९२ मध्ये भारताने चीनबाबत असलेले विरोधी व बंधनकारक कायदे-नियम रद्दबाबत केले.

१३.८ पी.व्ही. नरसिंहराव यांची चीन भेट :

सप्टेंबर १९९३ मध्ये भारताचे पंतप्रधान नरसिंहराव यांनी चीनला भेट दिली. उभय देशांनी प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर शांतता, सीमा रेषेवर शांतता (वादग्रस्त), पर्यावरण, संतुलन, रेडिओ, दूरदर्शन, व्यापार याबाबतीत करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. त्याच वर्षी लि रूई हुआन चीनी (PPCC-Chairman of the National Committe of the Chinese People's Political Conference) कमिटीचे अध्यक्ष यांनी भारताला भेट दिली. इ.स.१९९४ मध्ये भारताचे उपराष्ट्रपती के. आर. नारायणन यांनी चीनला भेट दिली तर चीनचे उपपंतप्रधान व परराष्ट्रमंत्री कीयाने कीचेन यांनी भारताला भेट दिली. उभयता पुन्हा द्विकरप्रणाली, आरोग्य व वैद्यकीय सहकार्य, व्हिसा प्रक्रिया, बँकींग सहकार्य याबाबतीत करारावर स्वाक्षरी केल्या. सन् १९९५ मध्ये चीनचे कियाओ शी -(Chairman of the Standing Committee on the National People's Congress(CSCNPC) यांनी भारत भेट केली आणि सहकार्याची बोलणी केली.

''अशाप्रकारे आजतागायत भारत-चीन संबंध वरून शांततेचे राहिले आहेत. परंतु आतून तणावपूर्ण राहिले आहे.

१३.८.१ आपली प्रगती तपासा :-

१) अटलबिहारी वाजपेयींच्या चीन भेटीबाबत लिहा.

२) इ.स. १९९४ मध्ये भारत - चीन करार कोणत्या बाबींमध्ये झाला ?

_____

_____

_____

_____

१३.९ समारोप

लोक प्रजासत्ताक चीनची (साम्यवादी) इ.स.१९४९ मध्ये माओं त्से तुंग यांनी स्थापना केल्यानंतर रशियानेच त्याला प्रथम मान्यता दिली. त्यामुळे चीन - रशिया तीस वर्षे मैत्रीचा करार झाला. परंतु पुढे दोन्ही देशांमध्ये सैद्धांतिक मतभेद होऊन वितुष्ट आले. रशियाने चीनच्या शांतीपूर्ण सहअस्तित्वाच्या धोरणावर टीका केली. त्यामुळे चीनने अमेरिकेकडे मदतीचा हात पुढे केला. शेवटी अनेक घडामोडीनंतर इ.स.१९९०च्या दशकात चीन-रशिया संबंध पूर्ववत होऊ लागले.

तसेच चीन - भारत संबंध सुरूवातीस जरी सौहार्दाचे असले तरी सीमा वाद, इ.स.१९६२ चे चीन - भारत युद्ध, इ.स.१९७१ चे भारत - पाकीस्तान युद्ध यामुळे ते संबंध बिघडले. भारताने ते सुधारण्यासाठी प्रयत्न केले खरे परंतु चीनने तेवढा प्रतिसाद दिला नाही. शेवटी अटलबिहारी वाजपेयी, राजीव गांधी, पी. व्ही. नरसिंह राव या भारतीय पंतप्रधानांनी चीनला भेटी देऊन संबंध सुधारण्याचे प्रयत्न केले.

१३.१० प्रश्न

१) चीन - रशिया परराष्ट्र संबंधांचा मागोवा घ्या.
२) चीन - भारत संबंधाचे विश्लेषण करा.
३) जनता सरकार नंतरचे चीन - भारत संबंधाचे परीक्षण करा.
४) टीपा लिहा.
अ) चीन रशिया मैत्री करार
ब) पंचशील तत्वज्ञान

❖❖❖